# सं वा दि नी



२ ० ० ७

**महाराष्ट्र फाउण्डेशन**

मराठी साहित्य पुरस्कार

चित्रकार षांताराम पवार यांनी तयार केलेले बोधचिन्ह

जगाच्या पाठीवर कुठेही असला तरी महाराष्ट्राच्या मातीला, मराठी मायबोलीला जो विसरला नाही,
त्या मराठी माणसाच्या 'मम'त्वाचे हे सुचिन्ह!

**संपादक**
सतीश काळसेकर

**संपादन साहाय्य**
राहुल कोसम्बी, प्रमिला माया नारायण

**मुखपृष्ठ**
संतोष क्षीरसागर

**आतील छायाचित्रे**
संदेश भंडारे

**प्रोसेसिंग**
रेप्रोस्कॅन, मुंबई

**मुद्रक/प्रकाशक**
कृष्णनाथ नेवरेकर
केशव गोरे स्मारक ट्रस्ट
'स्मृती', आरे रोड
गोरेगाव (पश्चिम)
मुंबई, ४०० ०६२

**मुद्रणस्थळ**
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड, प्रभादेवी
मुंबई, ४०० ०२५

# केशव गोरे स्मारक ट्रस्ट

*आयोजित*

महाराष्ट्र फाउण्डेशन (USA)
मराठी साहित्य पुरस्कार प्रदान समारंभ २००७

**अध्यक्ष**

मा. न्या. हेमंत गोखले
मुख्य न्यायाधीश
अलाहाबाद उच्च न्यायालय

**प्रमुख पाहुणे**

डॉ. जब्बार पटेल

**सूत्रसंचालन**

शिल्पा नेवे

रविवार, दिनांक ३० डिसेंबर २००७, सायंकाळी ५ वाजता
अखिल भारतीय नाट्य परिषदेचे यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुल (यशवंत नाट्यगृह)
मनमाला टँक रोड, माटुंगा-माहीम, मुंबई - ४०० ०१६

समारंभाचे अध्यक्ष

# मा. न्या. हेमंत गोखले



भारतातल्या विविध राज्यातील उच्च न्यायालयांमध्ये सर्वात मोठे उच्च न्यायालय म्हणून अलाहाबाद उच्च न्यायालय गणले जाते. अशा सर्वात मोठ्या असणाऱ्या उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती म्हणून न्या. हेमंत गोखले यांची ७ मार्च २००७ रोजी नेमणूक झाली. सर्वसामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून, भारतीय राज्यघटनेच्या उद्दिष्टाप्रमाणे न्यायालयाचे कार्य चोखपणे करावे, यासाठी अत्यंत प्रामाणिकपणे झटणारी व्यक्ती म्हणून न्या. गोखले ओळखले जातात. त्यांच्या या वृत्तीच्या पाऊलखुणा त्यांच्या जीवनप्रवासात दिसून येतात.

न्या. हेमंत लक्ष्मण गोखले यांचा जन्म १० मार्च १९४९ रोजी बडोदे येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण दादर येथील बालमोहन विद्यामंदिर या मराठी माध्यमाच्या शाळेतून झाले, तर महाविद्यालयीन शिक्षण मुंबईतील नामांकित रामनारायण रुईया महाविद्यालयातून झाले. बी.ए.ची पदवी प्राप्त केल्यानंतर त्यांनी, मुंबईच्या शासकीय विधी महाविद्यालयातून एलएल.बी. ही पदवी मिळवली. पुढे एम.ए. आणि एलएल.एम. या पदव्युत्तर पदव्याही त्यांनी विशेष नैपुण्यासह प्राप्त केल्या. घटनात्मक कायदा आणि आंतरराष्ट्रीय कायदा हे विषय घेऊन ते एलएल.एम.च्या परीक्षेत विद्यापीठात सर्वप्रथम आले होते.

शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात त्यांनी विविध प्रकारच्या वक्तृत्व स्पर्धा आणि वादविवाद स्पर्धा गाजवल्या. अनेक पारितोषिके मिळवून महाविद्यालयाचे नाव गाजवले. पुण्याची न्या. रानडे वादविवाद स्पर्धा ही प्रतिष्ठेची स्पर्धाही त्यांनी त्यावेळी जिंकून, महाविद्यालयाला विजयश्री प्राप्त करून दिली होती. विविध स्पर्धांमध्ये सहभागी होणारे न्या. गोखले त्यावेळच्या पुरोगामी विद्यार्थी व युवक संघटनांमध्येही अग्रेसर होते. मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि भारताच्या नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. भालचंद्र मुणगेकर, मराठी साहित्यातले नामवंत श्रेष्ठ लेखक श्री. अनिल अवचट हे त्यांचे त्याकाळातले सहकारी/मित्र होते. युवक चळवळींमधल्या चर्चा, शिबिरे, अभ्यासमंडळे आणि सामाजिक कार्यक्रमात त्यांनी हिरिरीने भाग घेतला. प्रा. मे. पुं. रेगे, डॉ. गोपाळ राणे, श्री. दादासाहेब रूपवते, प्रा. नलिनी पंडित, डॉ. य. दि. फडके, प्रा. राम बापट अशांसारख्या नामवंत, विचारवंतांच्या वैचारिक व सामाजिक जाणीवा सखोल करणाऱ्या मार्गदर्शनाचा लाभ, न्या. गोखले यांना प्राप्त झाला. यातूनच आपली परिवर्तनवादी आणि समाजाभिमुख भूमिका घडली, हे ऋण न्या. गोखले कायम मानत आले आहेत. अशा सामाजिक विद्यापीठात वैचारिक भूमिका घडत असतानाच, गोखले स्वत:हून श्री. बाबा आमटे यांच्या श्रमशिबिरातूनही स्वत:ला घडवीत होते व बांगलादेश मुक्तीच्या वेळी, सीमेवरच्या शरणार्थींच्या शिबिरातही काम करण्यात पुढाकार घेत होते. १९७३मध्ये मुंबई उच्च न्यायालयामध्ये वकिलीची सनद घेईपर्यंत न्या. गोखले यांचा पिंड समाजाभिमुख विचाराने पोसला गेला होता. त्यांनी वकिलीचा व्यवसाय सुरू केल्यावर त्यामध्येही त्याचे पुरेपूर प्रतिबिंब पडलेले दिसते.

बेस्ट, महापालिका, रेल्वे कर्मचारी संघटना अशा विविध संघटनांना, त्यातील गरीब कामगारांना न्याय

मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न न्या. गोखले यांनी वकील म्हणून केला. यासाठी मुंबईच्या दिवाणी न्यायालय, औद्योगिक न्यायालय, उच्च न्यायालय आणि काही प्रसंगी तर सर्वोच्च न्यायालयातही त्यांनी लढे दिले, बाजू मांडल्या व अनेकांना न्याय मिळवून दिले.

रुईया महाविद्यालयात असताना प्रा. वसंत बापट, प्रा. सरोजिनी वैद्य आणि कायद्याचे शिक्षण घेत असताना प्राचार्य त्र्यं. कृ. टोपे, डॉ. दामोदर वाडेगावकर, डॉ. सत्यरंजन साठे यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले होते अशा या प्राध्यापकांचा संस्कार वकिलीचा व्यवसाय करत असतानाही ते विसरले नाहीत. १९७७ साली त्यांनी शासकीय विधी महाविद्यालयात अर्धवेळ प्राध्यापकी अत्यंत आवडीने स्वीकारली आणि १९८४ पर्यंत ते मनापासून कायद्याचे विद्यार्थीही घडवीत होते. त्यांनी पर्यावरण, दहशतवाद, कामगार प्रश्न व घटनात्मक तरतुदी यांसारख्या महत्वाच्या विषयांवर निरनिराळी विद्यापीठे, कायदे शिक्षण देणारी महाविद्यालये येथे आयोजित केलेल्या चर्चासत्रांमध्ये अभ्यासपूर्ण विवेचन केले. तर काही विषयांमध्ये व्यासंगी शोधनिबंधही सादर केले.

१९८४ ते १९८९ या काळात त्यांना मुंबई उच्च न्यायालयामध्ये शासकीय अधिवक्ता म्हणून काम करण्याची संधी मिळाली. अत्यंत कष्टाळूपणे, प्रामाणिकपणे केलेल्या कामामुळे आणि कायद्याच्या सखोल अभ्यासामुळे वीस-बावीस वर्षांत वकील म्हणून ॲड. गोखले ह्यांचे नाव सर्वश्रुत झाले. त्यांच्या सचोटीने केलेल्या कार्यालाही तशीच दाद मिळाली. २० जानेवारी १९९४ रोजी ॲड. गोखले यांची मुंबई उच्च न्यायालयामध्ये न्यायमूर्ती म्हणून नेमणूक झाली.

सर्वोच्च न्यायालयाच्या तत्कालीन धोरणानुसार न्या. गोखले यांची बदली गुजरातमध्ये झाली गुजरात राज्याच्या उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम करताना त्यांनी पर्यावरणाच्या संदर्भात अनेक महत्वाचे निवाडे दिले. फेब्रुवारी १९९९मध्ये त्यांची मुंबईच्या उच्च न्यायालयात फेरबदली झाली. मुंबईच्या गृहनिर्माण आणि नगरविकास योजना, वैद्यकीय आणि अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचे प्रवेशप्रश्न, कैद्यांचे अधिकार, महाबळेश्वर विकास योजना, पर्यावरण विषयक प्रश्न आणि इतर अनेक सामाजिक जिव्हाळ्याच्या विषयांवर न्या. गोखले यांनी लोकाभिमुख निवाडे दिले. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर, औरंगाबाद व गोवा इथे असणाऱ्या खंडपीठावर त्यांनी वेळोवेळी काम पाहिले आहे.

जिल्हा न्यायालयांपर्यंतचे न्यायनिवाडे मराठी भाषेतून देण्याच्या उपक्रमाला गती देण्याचे महत्वाचे कार्य त्यांनी केले. मुंबई उच्च न्यायालयाच्या विधी विषयक सहाय्यक समितीचे ते पाच वर्ष अध्यक्ष होते. त्यांच्या अध्यक्षीय कालखंडात त्यांनी लोक-अदालत चळवळ आणि ग्रामीण भागात विधी साक्षरता वाढवणे ह्या दोन नव्या उपक्रमांना चालना दिली. विधी साक्षरता अभियानात त्यांनी विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले. विधी महाविद्यालयांतून नव्यानेच पदवीधर झालेल्या विद्यार्थ्यांना अनुभव मिळावा म्हणून, योग्य मानधनासह, न्यायमूर्तींचे कायदेविषयक सहाय्यक (लॉ क्लार्क) म्हणून काम करण्याची संधी देण्याची योजना त्यांनी अंमलात आणली. ६ जानेवारी २००७ रोजी न्या. गोखले मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती झाले व सध्या अलाहाबाद उच्च न्यायालयात मुख्य न्यायमूर्ती म्हणून कार्यरत आहेत.

आज न्या. गोखले यांच्यावर मुख्य न्यायमूर्तीपदाची महत्त्वाची जबाबदारी आहे. अनेक वर्षे प्रलंबित असलेले खटले निकालात काढणे, न्यायालयीन यंत्रणा गतिमान, प्रामाणिक आणि आश्वासक बनवणे या कामाला त्यांनी अग्रक्रम दिला आहे.

न्या. गोखले यांचा एक विशेष वेगळा पैलू म्हणजे त्यांना संगीत आणि साहित्यामध्ये रुची आहे. संगीताचा हा वारसा त्यांच्या मातोश्री दिवंगत लीलाताईकडून न्या. गोखले यांना मिळालेला आहे. न्या. गोखले हे कृतज्ञतेने नमूद करतात की विवेकशीलतेचा संस्कार त्यांनी त्यांचे वडील कै. ल. दा. गोखले यांच्याकडून घेतला. त्यांचे वडील मुंबई पोर्ट ट्रस्टचे मुख्य अभियंता होते. मराठी साहित्याच्या विद्यार्थीप्रिय अध्यापिका, रुईया महाविद्यालयाच्या माजी मराठी विभाग प्रमुख प्रा. मीना गोखले या न्या. गोखले यांच्या पत्नी होत. प्रा. मीनाताईच्या खंबीर साथीमुळेच आपल्याला अनेक अडचणीतून पुढे जाता आले असे ते आवर्जून मानतात.

समोर आलेल्या कोणत्याही विषयाचा कसून अभ्यास करणे, त्या विषयांच्या विविध बाजू पुन्हा पुन्हा तपासून पाहणे, व्यक्ती कितीही छोटी वा मोठी असो तिची बाजू समजून घेताना कोणतीही कसूर न ठेवणे आणि सर्वसामान्य माणसाविषयीची आस्था हे त्यांचे गुण, त्यांची कृती व निर्णय यांमधून प्रकर्षाने दिसून येतात.

**- ॲड. नीता प्र. कर्णिक**



समारंभाचे प्रमुख पाहुणे

# डॉ. जब्बार पटेल

समाजात काही व्यक्ती अशा असतात की त्यांनी विविध क्षेत्रात भरपूर आणि भरीव कामगिरी करूनसुद्धा त्यांची ओळख त्यांच्या कारकिर्दीतल्या एखाद्या खास अशा कामगिरीशी निगडित असते. नव्हे तोच त्यांचा असा खास परिचय असतो. डॉ. जब्बार पटेल यांचंही असंच आहे. नाटक, चित्रपट आणि एकूणच सांस्कृतिक क्षेत्र यात त्यांच्या नावावर अनेक गौरवास्पद पराक्रम आहेत. अनेक गौरव त्यांनी प्राप्त केले आहेत. परंतु त्यांचं नाव घेताच सर्वप्रथम नजरेसमोर येतं त्यांचं महाराष्ट्रात आणि देशातच नव्हे तर जगभर गाजलेलं 'घाशीराम कोतवाल' हे नाटक! मराठीच नव्हे तर भारतीय रंगभूमीवरची एक सर्वश्रेष्ठ घटना असा ज्याचा सार्थ आणि यथोचित गौरव झाला त्या 'घाशीराम कोतवाल'चे दिग्दर्शक ही त्यांची सर्वकालीन ओळख आहे. या अभिजात कलाकृतीच्या आधी आणि त्यानंतरही त्यांनी प्रथम नाटक आणि मग चित्रपटात आपलं आगळं कर्तृत्व दाखवणाऱ्या कलाकृती दिल्या. परंतु तरीही 'घाशीराम'वाले जब्बार पटेल अशीच त्यांची प्रतिमा कायम जनमानसात राहिली.

'घाशीराम'नंतर 'तीन पैशांचा तमाशा' हे अगदी वेगळ्या जातकुळीचं आणि सादरीकरणाच्या अगदी नव्याच शक्यता असलेलं नाटक त्यांनी केलं. मराठी रंगभूमीवर प्रथमच पॉप म्युझिक आलं आणि त्यानं एक छानसा दणदणाट केला. कानठळ्या बसविणाऱ्या आवाजातलं नंदू भेंडेचं, 'माझं नाव अंकुश नागावकर' नाट्यसंगीताला एका आधुनिक वळणावर घेऊन आलं. पारंपरिक नाट्यसंगीताचा बाज आजुबाजूला ठेवत डॉक्टरांनी हा अतिशय आगळा आणि यशस्वी प्रयोग करून दाखवला. पारंपरिकतेच्या लक्ष्मणरेषा पाळणाऱ्यांनाही त्यांनी काही क्षण निरुत्तर करून टाकलं. 'पडघम'मध्ये त्यांनी तत्कालीन तरुण पिढीचा जोश वेगळ्या ढंगात आविष्कृत केला.

नाटकात असं दरवेळी वेगवेगळे प्रयोग करणाऱ्या डॉक्टरांकडे चित्रपटसृष्टीचं लक्ष गेलं नसतं तरच नवल...? आणि मग 'सामना'पासून त्यांची चित्रपटीय कारकिर्द सुरू झाली. तोवरच्या मराठी चित्रपटाने न चोखाळलेली वाट डॉक्टरांनी आपलीशी केली. इथेही विजय तेंडुलकर सोबत होतेच. परंतु दिग्दर्शक म्हणून डॉक्टरांनी आपली छाप पाडली. निळू फुले आणि डॉ. लागू असे दोन नटश्रेष्ठ आणि त्यांची अभिजात अदाकारी असा ऐवज होताच परंतु डॉक्टरांनी ज्या पद्धतीने गाण्यांचा वापर केला तो विलक्षण होता. शाळा-कॉलेजात असताना जसं त्यांनी नाटकाचं अनौपचारिक शिक्षण घेतलं होतं तसंच पुण्यात नाटक करता करता फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये संधी मिळेल तेव्हा जगभरचे चित्रपट त्यांनी पाहिले होते. पुढे चित्रपट दिग्दर्शक म्हणून वावरताना त्यांना याचा खूप फायदा झाला. त्यांच्यातल्या प्रयोगशीलवृत्तीच्या कलाकाराने दुसऱ्याच चित्रपटात एक नवं आव्हान घेतलं. 'जैत रे जैत' हा भारतीय सिनेमातला एक आगळा प्रयोग आणि प्रकार ठरला. युरोप-अमेरिकेत चांगलाच दृढ असलेला 'म्युझिकल्स'चा हा भारतीय आविष्कार होता. हे तसं

धाडस होतं. परंतु जब्बार पटेलांनी ते केलं. सर्वसामान्य प्रेक्षकांना असले प्रयोग पचनी पडत नाहीत. त्यामुळे बॉक्स ऑफिसचे निकष लावण्यात अर्थ नाही. परंतु एक वेगळा आणि तितकाच यशस्वी प्रयोग म्हणून 'जैत रे जैत'ला भारतीय चित्रपट इतिहासात मानाचं स्थान निश्चितच आहे. 'सिंहासन'मध्येही त्यांची ही प्रयोगशीलता ठळकपणे दिसते, जाणवते. मुळात अरुण साधू यांच्या 'मुंबई दिनांक' आणि 'सिंहासन' अशा दोन कादंबऱ्या एकत्र घेऊन त्यातून कथा आकाराला आणणं हे सुचणंच महत्त्वाचं होतं. त्यात राजकारण्यांच्या नाना तऱ्हा दाखवताना आणलेलं वेगळेपण खास होतं. विशेषत: दत्ता भटांचा माणिकराव. खरं तर सगळे राजकीय पुढारी इथूनतिथून सारखे. परंतु त्यातही त्यांची खास वैशिष्ट्ये आणून मोनौटोनी टाळणं हे कौतुकास्पद होतं.

डॉक्टरांच्या नाटक-चित्रपटांचं आणखी एक खास वैशिष्ट्य म्हणजे त्यांचं संगीत! संगीताची अशी विलक्षण जाण असणारे दिग्दर्शक फारच थोडे आहेत. डॉ. जब्बार पटेल हे त्यातले एक महत्त्वाचे दिग्दर्शक. त्यांच्या चित्रपटाचं संगीत जरी संगीत दिग्दर्शकाचं असलं तरी दिग्दर्शक म्हणून आपल्याला काय प्रकारचं संगीत पाहिजे याची नेमकी जाण त्यांना आहे. आणि म्हणूनच त्यांच्या चित्रपटांचं संगीत वैशिष्ट्यपूर्ण ठरतं. 'सामना', 'जैत रे जैत', 'सिंहासन', 'उंबरठा', 'एक होता विदूषक', 'मुक्ता' यातली एकूण एक गाणी या विधानाची साक्ष देतील.

डॉक्टरांचा सर्वार्थाने मोठा आणि महत्त्वाकांक्षी चित्रपट म्हणजे 'बाबासाहेब आंबेडकर!' मल्याळी चित्रपटाचा सुपरस्टार मामुटी याला बाबासाहेब म्हणून उभं करणं हे केवळ डॉक्टरांनाच सुचू शकतं. एकाहून एक सरस व्यक्तिरेखा अनेकानेक चित्रपटातून साकारणाऱ्या या अभिजात अभिनेत्याने बाबासाहेब आंबेडकर मूर्तिमंत साकारले आहेत. हा चित्रपट म्हणजे डॉ. जब्बार पटेल यांच्या चित्रपटीय कारकिर्दीतला आतापर्यंतचा सर्वोच्च क्षण म्हणता येईल.

डॉ. जब्बार पटेल नाटक, चित्रपट करता करता अनेक गोष्टी करत असतात. सरकारी, बिनसरकारी अनेक समित्या, संस्था यांमध्ये त्यांचा सतत वावर असतो. संगीत-नाटक अकादमी, नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा, फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, सत्यजित राय फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, कुसुमाग्रज प्रतिष्ठान, मुंबई विद्यापीठ इत्यादी अनेक मान्यताप्राप्त संस्थांमध्ये त्यांनी विविध प्रकारच्या भूमिका बजावल्या आहेत. बजावत आहेत. सध्या ते पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे संचालक आहेत.

डॉ. जब्बार पटेलांची आणखी एक खास ओळख जुन्या मंडळींच्या ध्यानीमनी आजही आहे. नवीन पिढीच्या दृष्टीने ही पूर्णत: अपरिचित गोष्ट आहे आणि ती म्हणजे अभिनेता जब्बार पटेल. शाळा-कॉलेजात प्रथमत: अभिनेता आणि मग दिग्दर्शक अशी सुरुवात करणाऱ्या डॉक्टरांनी अभिनेता म्हणूनदेखील काही काळ गाजवला. त्यांची सर्वात गाजलेली आणि अनेकांच्या आजवर स्मरणात राहिलेली भूमिका म्हणजे विजय तेंडुलकरांच्या 'अशी पाखरे येती'मधली अरुण सरनाईकची! त्या नाटकातले तरुण, देखणे (आजही ते तसेच आहेत) डॉक्टर आणि त्यांचा तो रंगमंचावरचा वावर विलक्षण होता. त्यांना आजही कुणी काम करणार का? म्हणून विचारत असतं. राम गोपाल वर्माने 'कंपनी'मधल्या पोलीस कमिश्नरच्या भूमिकेसाठी विचारलं होतं. ती मग मोहनलालने केली.

या सगळ्याच्या पलीकडे डॉक्टरांची एक खास ओळख आहे. ते जगन्मित्र आहेत. समाजातील सर्व थरांतील, सर्व वयोगटातील लोकांचे ते मित्र आहेत. त्यांच्या वागण्या-बोलण्यातला मोकळेपणा, सहजपणा त्यांना हा असा जगन्मित्र करून टाकतो. त्यामुळे नाट्य-चित्रपट दिग्दर्शक तसेच एकूणच सांस्कृतिक क्षेत्रातली त्यांची गौरवशाली कामगिरी या त्यांच्या ओळखीपेक्षा दशांगुळे वर उरते ती त्यांची हीच ओळख - जगन्मित्र!

**- अशोक राणे**

# संवादिनी
## २००७

७९६५

'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या साहित्य पुरस्कारांचे हे चौदावे वर्ष आहे. सातत्याने गेली चौदा वर्षे म्हणजे आरंभापासूनच या पुरस्कारांच्या कार्यवाहीशी माझा नजीकचा संबंध आहे. आरंभीची दहा वर्षे भारतातल्या पुरस्कार निवड समितीचा सदस्य म्हणून आणि नंतरची चार वर्षे निवड समितीचा निमंत्रक म्हणून मला या पुरस्कारांच्या कार्यवाहीत सहभागी होता आले. आदरणीय मृणालताई गोरे, प्रा. चंद्रकांत केळकर आणि प्रा. दिगंबर पाध्ये यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वेळोवेळीच्या निवड समितीच्या अभ्यासू सहकाऱ्यांच्या सहकार्याने हा चौदा वर्षांचा काळ आनंददायी झाला. यासोबतच अमेरिकेतील निवड समितीचे माननीय सदस्य सुनील देशमुख, राजन गडकरी, दिलीप वि. चित्रे, विद्युल्लेखा अकलूजकर, संध्या कर्णिक, ललिता गंडभीर, अशोक सबनीस, पद्मजा फाटक, रजनी शेंदुरे या सगळ्यांनी पुरस्कारांच्या अंतीम निवडीसाठी केलेला अभ्यास आणि व्यक्त केलेले गांभीर्य याचाही महत्त्वपूर्ण वाटा या वाटचालीत दिशादर्शक होता.

महाराष्ट्र फाउण्डेशनच्या पुरस्कारांचे आजवर नेहमीच उत्स्फूर्त स्वागत होत आले आहे. मतभेद व्यक्त होणारच नाहीत किंवा झालेच नाहीत, असे नाही. लोकशाही व्यवस्थेत तसे ते होणे अपरिहार्य असते आणि अंततः आरोग्यदायीही असते.

या संदर्भात आरंभापासूनच काही आखणी करण्यात आली होती. निवडींची वर्षभर चालणारी प्रक्रिया, तिची अंतीम परिणती यासाठी ती आवश्यक होती. शिवाय या पुरस्कारांमागचे निकष आणि त्यांची व्याप्ती याही बाबतीत महाराष्ट्र फाउण्डेशनची भूमिका निःसंदिग्ध होती. तिचा उच्चार आरंभापासून आजवर करण्यात आम्ही सातत्य राखले आहे. या पार्श्वभूमीवर आपणही या पुरस्कारांकडे येत्या काळातही पाहायला हवे असे या प्रसंगी मी आपणास नम्रपणे सांगतो.

या आधीही म्हटल्याप्रमाणे, पुरस्कार दोन कारणांसाठी दिले जातात : प्रथमतः ज्यांनी साहित्य-संस्कृतीच्या क्षेत्रात मोलाची आणि भरीव कामगिरी केली आहे, त्यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि त्यानंतर येत्या काळात ज्यांच्या हातून काही महत्त्वाचे लेखन होण्याच्या शक्यता त्यांच्या आजवरच्या लेखनातून दिसताहेत, त्यांना पुढल्या कामासाठी प्रोत्साहन द्यावे यासाठी.

यावर्षी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. प्रा. भा. ल. भोळे यांना या वर्षीच्या गौरव पुरस्काराने सन्मानित करून आम्ही त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करत आहोत. समाज, संस्कृती, साहित्य या तिन्ही अंगांनी त्यांनी साहित्यव्यवहारात केलेले कार्य निःसंशय या सन्मानासाठी सार्थ आहे.

महादेव मोरे यांना विशेष पुरस्काराने सन्मानित करताना होणारा आनंद तर खासच वेगळा आहे. परप्रांती, परभाषेत वास्तव्य हे तर आहेच पण त्याही बाहेर एका लेखकाच्या खडतर जगण्याची परिमाणे विचारात घेता आली आणि त्याही विषयीची कृतज्ञता या पुरस्कारांतून व्यक्त करता आली.

अन्य पुरस्कारातही गणेश देवी यांना सन्मानित करताना त्यांचा ग्रंथ आणि त्यांच्या गुजरातच्या दुर्गम भागातल्या आदिवासी प्रकल्पांचा आणि सामाजिक भानाने केलेल्या लिखाणाचा गौरव होत आहे यांची नोंद घ्यायला हवी. संदेश भंडारेंचा ग्रंथ हा त्यांच्या पूर्णतः वेगळ्या अशा क्षेत्राविषयीच्या संशोधनाचा, वेगळ्या धाटणीच्या निरीक्षणांचा आणि त्याला दिलेल्या प्रकाशचित्रांच्या अनोख्या जोडणीचा संयोग आहे. डॉ. सुनीलकुमार लवटे

यांनी घेतलेला त्यांच्या जीवनाचा आलेख हा त्यांच्या कष्टसाध्य यशाचा सूचक तर आहेच, शिवाय त्यातल्या जीवनविषयक भूमिकेचाही तो सन्मान ठरावा. तरुण आणि महानगरांना, व्यावसायिक रंगभूमीला अपरिचित असा अरुण मिरजकरसारख्या महानगरांपासून दूर असलेल्या नाटककाराचा सन्मान हाही नक्कीच वेगळा ठरावा.

साहित्यात येणाऱ्या बदलांची चाहूल सर्वसाधारणत: प्रथम कवितेतून लागते. गेली काही वर्षे कविता आणि अन्यही साहित्यप्रकारांच्या निर्मितीचे भौगोलिक विस्तार त्याआधीच्या केंद्रापासून परीघाकडे सरकत आहेत. नवी केंद्रेच हा बदल व्यक्त करत आहेत. कवितेसंदर्भात तर हे प्रकर्षाने पाहायला मिळत आहे. भारतीय निवड समिती आणि अमेरिकेतील निवड समित्या या दोघांनीही या बदलांची नोंद घेतली आहे. अनेक महत्त्वपूर्ण कवींची आणि त्यांच्या प्रकाशित कवितासंग्रहांची नोंद, त्यांची विशिष्टता, भविष्यकाळातली त्यांच्या विकासाची शक्यता अशा बाबींचा साक्षात अभ्यास, त्यावर आस्थापूर्वक केलेली चर्चा आणि बदलत्या साहित्यप्रवाहांना दिलेली दाद आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे निवडीच्या मर्यादा अशा सर्व बाबींचा आढावा घेत अरुण काळे, अजय कांडर, वीरधवल परब आणि अविनाश साळापुरीकर यांना पुरस्काराने सन्मानित करण्याचा निर्णय घेण्यात आला. व्यक्तिगत पातळीवर आणखी काही कवींचा आणि लेखकांचा सन्मान करता आला असता तर मला अधिक आनंद झाला असता. पुरस्कारांच्या बाहेरही पुरस्कारांनी सन्मानित व्हावेत असे अनेकजण आहेत. याची नम्र जाणीव आणि खंत मलाही आहे. पण अखेर आमच्याही मर्यादा आहेत त्याचा आपण स्वीकार करावा, अशी नम्र विनंती.

'पालकनीती' हे नियतकालिक हे बदलत्या काळाची गरज ओळखून 'पाल्य-पालक' संबंधाचा अभ्यासपूर्ण आणि समाजोपयोगी कामाची जोड या अभ्यासाला मिळावी, यासाठी प्रयत्न करणारे नियतकालिक आहे. त्यांना दिलेला पुरस्कार त्यांच्या कामाविषयीची कृतज्ञता आणि प्रोत्साहन असा दुहेरी आहे.

आम्ही या सर्व सन्मानितांचे अभिनंदन करतो आणि त्यांना येत्या काळात अधिक मोलाच्या कामासाठी शुभेच्छा देतो. ज्येष्ठांना आणि विशेषत: नव्यांनाही चांगल्या आरोग्यासाठी आणि समाधानी (निर्मितीचे 'सातत्याचे असमाधान' निराळे मानून) आयुष्यासाठीही शुभेच्छा देतो.

महाराष्ट्र फाउण्डेशनने आरंभापासून प्रकाशित साहित्याचा आणि काही ज्येष्ठांचा पुरस्कारांनी सन्मान केला. मराठी साहित्यात समाजाभिमुख पुरोगामी भूमिका स्वीकारून प्रकाशित होणाऱ्या नियतकालिकांना मदतीचा हात दिला. वाचकांपर्यंत पुरस्कारप्राप्त साहित्य पोहचावे यासाठी ग्रंथालयांना ग्रंथसंच पुरविले. याबरोबरच साहित्य आणि समाज अशा दुहेरी परिमाणे असलेल्या काही वाङ्मय प्रकल्पांना मदतही केली. यातले काही प्रकल्प पूर्ण झाले आहेत. काही पूर्णत्त्वाच्या वाटेवर आहेत. अशा प्रकल्पांतून निर्माण झालेले साहित्य मराठी भाषकांपर्यंत पोहचावे असे आमचे प्रयत्न सुरू आहेत.

'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'च्या माननीय अध्यक्षा मृणालताई गोरे, प्रा. चंद्रकांत केळकर, 'ट्रस्ट'चे अन्य पदाधिकारी व सहकारी, भारतातील व अमेरिकेतील निवड समितीचे सर्व सदस्य आणि आमच्या सर्व कामांत तत्परतेने मदत करणारे ज्येष्ठ, समकालीन आणि नव्या उमेदीचे मित्र, 'संवादिनी'च्या कामात मदत करणारे लेखक, मुखपृष्ठाचे चित्रकार संतोष क्षीरसागर आणि त्यांचे मित्र, 'न्यू एज प्रिंटिंग प्रेस'चे समजूतदार मुद्रणतज्ज्ञ, माझे लोकवाङ्मय गृहातील सर्व सहकारी या सगळ्यांच्या सहकार्याने हे वर्षभराचे 'मंथन' आणि 'संवादिनी'च्या संपादनाचे काम झाले आहे. 'संवादिनी'च्या संपादनाची भागश: जबाबदारी प्रमिला माया नारायण आणि राहुल कोसम्बी यांनी घेतली यासाठी त्यांचे विशेष आभार. या सर्वांचे प्रेम असेच राहो. सगळ्यांच्या कष्टांसाठी, सूचना-सहकार्यासाठी आणि सहभागासाठी आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

**- सतीश काळसेकर**

# महाराष्ट्र फाउण्डेशन (USA)
# मराठी साहित्य पुरस्कार योजना २००७ चे मानकरी

महाराष्ट्र फाउण्डेशन गौरव पुरस्कार
**डॉ. भा. ल. भोळे**





नियतकालिक
**पालकनीती**



विशेष पुरस्कार
**महादेव मोरे**



रा. शं. दातार नाट्य पुरस्कार
**निब्बाण**

ग्रंथ पुरस्कार
**तमाशा: एक रांगडी गंमत / संदेश भंडारे**
**वानप्रस्थ / गणेश देवी**
**खाली जमीन वर आकाश / सुनीलकुमार लवटे**
**नंतर आलेले लोक / अरुण काळे**
**आवानओल / अजय कांडर**
**दर साल दर शेकडा / वीरधवल परब**
**कुठल्याही विरामचिन्हाशिवाय / अविनाश साळापुरीकर**











# मला दिसलेला भोळे

चंद्रकान्त पाटील

'भास्कर लक्ष्मण भोळे' असं पल्लेदार नाव असलेला, सुदृढ बांध्याचा, अतिरेकी दाढी आणि बिनमिश्यांचा, जाड्याभरड्या खादीचे ऐसपैस कपडे घालणारा, खास आपली संस्कृतीमुद्रा म्हणून अमेरिकेनं रूढ केलेली जीन्स नावाची पँट घालणारा, निर्विष विनोद करणारा आणि दुसऱ्यांनी केलेल्या विनोदांवर स्फोटक हसणारा, शास्त्रीय संगीत ऐकताना हमखास चुकीच्या जागांवर मनसोक्त दाद देणारा, उदारहृदयी, वैचारिक दाब टाकून समाजात आब राखणारा, वागण्या-जगण्यात तुडुंब बुडून जाणारा असा माझा एक मित्रय्, आणि मला त्याच्यावर लिहायचंय, या कल्पनेनंच माझी शांतता पार विस्कटून गेलीय्. मित्रांवर मोकळेपणानं आणि खरंखुरं लिहावं अशी आपली वाङ्मयीन संस्कृतीच नाहीय्. त्यामुळं इथं खोटेपणाला राजमान्यता आणि समाजमान्यता लाभलीय्. म्हणून असं लिहायला हल्ली भीतीच वाटते. तरी पण लिहायचा प्रयत्न करतोय.

आरंभालाच हे सांगून टाकतो की आमच्या मैत्रीला आता ४७ वर्षं पूर्ण होतील, आणि ही मैत्री इतकी वर्षं टिकून राहण्याचं सगळं श्रेय त्यालाच आहे! (पण हेही जर कुणाला खोटंच वाटत असेल तर त्याचा मला आनंदच होईल!) आणखी एक : 'भास्कर' या नावानं हाक मारली तर आत्मीयता, आडनावानं हाक मारली तर अंतर — असा रिवाज असूनही इतकी वर्षं मी आणि माझ्यामुळं झालेले त्याचे सगळे मित्र त्याला 'भोळे'च म्हणतात! म्हणजे इथून पुढं या लेखात मी त्याचा उल्लेख भोळे असाच करीन. म्हणजे त्याच्या बाबतीत 'भोळे' सोडून इतर सगळी नावं — म्हणजे 'भा.ल.' 'भास्कर', 'भोळे सर', 'भास्करराव' इत्यादी अंतरनिदर्शकच आहेत, हे लक्षात घ्यायला पाहिजे.

रिवाजाप्रमाणे आमची पहिली ओळख कधी–कुठे–कशी–कशामुळे झाली इत्यादी सांगून टाकतो. मी १९६० मध्ये एच.एस.एम.पी.एस.सी. अशी प्रायोगिक धर्तीवरची मॅट्रिक होऊन औरंगाबादच्या ज्ञानविज्ञान महाविद्यालयात दाखल झालो, आणि त्यावेळी भोळे माझ्या एक वर्ष पुढं म्हणजे बी. ए. च्या पहिल्या वर्षाला त्याच महाविद्यालयात नव्यानं आला होता. मराठी साहित्य–तत्त्वज्ञान–राज्यशास्त्र असे त्याचे विषय होते. मी विज्ञानशाखेत होतो, पण 'लोकसत्ता' या त्याकाळच्या एकमेव राज्यव्यापी दैनिकात विनोदी लेख लिहिणारा, शिवाय कविता करणारा म्हणून प्रसिद्ध होतो. भोळेही तेव्हा कविता करायचा. त्यामुळे त्याला माझ्याबद्दल कुतूहल. लवकरच आम्ही ओळखीपाळखीच्या सीमा ओलांडून घनिष्ठ मित्र झालो. माझे रायभान जाधव, बाळकृष्ण कवठेकर, मुकुंद कृष्ण गायकवाड हे मित्र त्यानं स्वीकारले. त्याचे शशी भालवणकर, कमलाकर सोनटक्के, प्रभाकर वैष्णव हे मित्र मी स्वीकारले. मग आम्ही दोघांनी माझ्या एक वर्षानं मागं असलेले लक्ष्मण देशपांडे, (स्व.) वसंत काळे (आमदार विक्रम काळेचे वडील), नारायण शर्मा, गोपाळ साक्रीकर इत्यादी बरेच मित्र स्वीकारले. मैत्रिणी नव्हत्याच.

त्या काळच्या ज्ञानविज्ञान महाविद्यालयाबाबत आणि एकूण औरंगाबाद शहराबद्दल तर खूपच बोलण्यासारखं आहे. त्या काळी मराठवाड्याच्या कान्याकोपऱ्यांतून बहुतेक हुशार मुलं ज्ञानविज्ञान महाविद्यालयात यायची. खऱ्या अर्थानं तिथं बहुविधता नांदायची. सगळ्या जातीपातींची, उपसंस्कृतींची, गरीब-श्रीमंतांतली मुलं चांगल्या शिक्षणाच्या तळमळीपोटी यायची. शिवाय ते शासकीय महाविद्यालय असल्यानं फीसुद्धा कमी असायची. त्यामुळं हुशार विद्यार्थ्यांचं ते मराठवाड्यातलं सगळ्यात मोठं केंद्र होतं. औरंगाबाद शहर त्या काळी शिक्षणाचं प्रमुख क्षेत्र



भास्कर लक्ष्मण भोळे

**जन्म :** ३० सप्टेंबर १९४२

**वैचारिक**

भारताचे स्वातंत्र्य : पन्नास वर्षांचा मागोवा (१९९८)
डॉ. आंबेडकरांचा वैचारिक वारसा (१९९८, २००६)
विसावे शतक आणि भारतातील समता विचार (२००४)
महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे बहुजनवादी राजकारण (२००१)
आगकरांचे धर्मचिंतन (२००५)
महर्षी शिंदे यांचे विचारविश्व (२००७)

**समीक्षा**

साहित्य प्रत्यय (२००१)

**संपादने**

संशोधनाची क्षितिजे - डॉ. वि. भि. कोलते अमृतमहोत्सव गौरव ग्रंथ (१९८५)
बदलता महाराष्ट्र, सहसंपादक : किशोर बेडकिहाळ (२००३)
शतकांतराच्या वळणावर - सहसंपादक : किशोर बेडकिहाळ (२००६)
एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य : खंड १ आणि खंड २ (२००६)

**भाषांतरे**

महादेव गोविंद रानडे (मूळ लेखक - प्र. ज. जहागीरदार, १९८८)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर : अनुभव आणि आठवणी (मूळ लेखक-नानकचंद रत्तू, १९९८, २०००)
मोरनामा आणि इतर कथा (पाकिस्तानी लेखक इंतजार हुसैन यांच्या एकवीस कथांची निवड, संपादन व भाषांतर, २००७)

**इतर**

तिसरी ते पाचवी (इतिहास) आणि पाचवी ते आठवी (नागरिकशास्त्र) या पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीत मोलाचा सहभाग. विद्यापीठीय स्तरावरील राज्यशास्त्राची अनेक पुस्तके प्रकाशित. एकूण ५० पुस्तके, विविध विषयांवरील ५०० लेख आणि अनेक पुस्तिका प्रकाशित

होतं. मात्र कालांतरानं हेच शहर पुढं शैक्षणिक पातळीवरसुद्धा जातीपातींत विभागलं गेलं. इथं ब्राह्मण–मारवाडी–गुजराती–मुस्लीम–दलित–ख्रिश्चन–मराठे–भटकेविमुक्त–दलितेतर अशा अनेक शिक्षणसंस्था निघून समाज कायमचा दुभंगला गेला. अस्मितेच्या प्रश्नांआडून सत्तासंघर्षाचे खेळ सुरू झाले. भोळेचा पिंड या धूर्त राजकारणाच्या आधीच घडलेला होता, हे महत्त्वाचंय्. त्यामुळे त्याचं भावी आयुष्य इतकं वेगळं आणि अर्थपूर्ण होऊ शकलं. त्याचं साधं उदाहरण द्यायचं तर भालवणकर – कमलाकर सोनटक्के या मित्रांमुळं तो महाविद्यालयीन जीवनात नाटकांशी जोडला गेला. पण त्याच्या वाट्याला कायम 'प्रॉम्टिंग'चंच काम आलं. आपल्या भावी आयुष्यात त्याचा जेव्हा अनेक सामाजिक चळवळींशी घनिष्ठ संबंध आला तेव्हाही त्यानं हीच 'प्रॉम्प्टिंग'ची भूमिका निष्ठेनं पार पाडली, मात्र चळवळींत त्यानं 'नाटक' कधीच केलं नाही!

तर आता त्याच्या आधीच्या आयुष्याकडं येऊ. ३० सप्टेंबर १९४२चा त्याचा जन्म. बुलडाण्यातल्या तालखेड गावचा. म्हणजे ते त्याच्या मामांचं गाव असावं. पण त्याचं गाव वरणगाव. भुसावळ जवळचं. आता तिथं मोठी शस्त्रास्त्रांची फॅक्टरी झालीय्. पण ती व्हायच्या आधीच हे शस्त्रास्त्रसंपन्न व्यक्तिमत्त्व गावाबाहेर पडलं. म्हणजे १९५८मध्ये तो मॅट्रिक झाला. बऱ्याच विषयांत विशेष प्रावीण्य मिळवल्यामुळं त्यानं जळगाव ऐवजी पुण्याला जायचा विचार केला. पण वडील शाळामास्तर. चार भाऊ आणि दोन बहिणी. सगळ्यांत मोठा हाच. त्यामुळं पुण्याऐवजी जवळच्या जवळ म्हणून हा औरंगाबादला आला. तिथं त्यानं मिलिंद महाविद्यालयात प्रवेश घेतला. मिलिंदमधून प्री-युनिवर्सिटीची परीक्षा पुन्हा विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झाला. सोबतच्या सगळ्या मित्रांनी ज्ञानविज्ञान महाविद्यालयात जायचं ठरवलं, तर त्यांच्यासोबत हाही ज्ञानविज्ञानमध्ये बी.ए.च्या पहिल्या वर्षात दाखल झाला. पुढे सलग ३ वर्षं तिथं काढली. भाषा विषयांची विशेष आवड असूनही एम. ए. ला राज्यशास्त्र घेतलं. त्यात प्रा. बारी या त्याच्या राज्यशास्त्राच्या प्राध्यापकाचाही थोडा प्रभाव असावा. मराठीत त्याचं काव्यलेखन चालू असूनही एकूण प्राध्यापकांकडे बघता त्याच्या डोक्यात पक्कं बसलं की मराठी हा छंद म्हणूनच जोपासायचा विषय आहे; गंभीर अभ्यासाचा विषय म्हणून तो स्वीकारणं अवघडंय्. अर्थात एका तरुण प्राध्यापकानं मराठीसाठी ठेवलेलं डॉ. ना. गो. नांदापूरकर पारितोषिक ऐनवेळी त्याच्याऐवजी स्त्रीदाक्षिण्याच्या उदार भूमिकेतून दुसऱ्याला देऊन टाकल्यानं तो निराश



झाला आणि त्यानं राज्यशास्त्र घेतलं असं आम्हीच पसरवलं होतं.

त्याच्या पुढील आयुष्याची एकंदर जडण-घडण महाविद्यालयातच झाली. शिवाय त्या काळचं औरंगाबाद शहरही त्यासाठी महत्त्वाचं ठरलं. गावाकडून मिलिंद महाविद्यालयात आल्यावर त्याची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांशी ओळख झाली. हे धन त्यानं आयुष्यभर आपलंसं केलं. विचारांच्या पातळीवर हे चालू असतानाच साहित्याच्या प्रेमापोटी त्यानं अनेक मित्र मिळवले. त्यातलं प्रमुख नाव सुखराम हिवराळेचं. सुखराम, नरेश इंगळे वगैरे लोक त्याकाळी 'साकम' नावानं प्रसिद्ध असलेलं एक साहित्य कला मंडळ चालवत. ते मंडळ जिवंत असेपर्यंत भोळेचा त्या मंडळाशी आणि त्या मंडळींशी आत्मीय संबंध होता. भगवान भटकर, प्रभाकर वराळे, नंतर आलेले वामन निम्बाळकर, यशवंत मनोहर, प्र. ई. सोनकांबळे अशा अनेकांशी त्याचे संबंध आले ते मिलिंदच्या संस्कारांतूनच. बाबूराव बागूल असो, नामदेव ढसाळ असो, की अगदी आत्ताचा अरुण काळे असो, भोळे त्यांच्या साहित्याचा मूलगामी विचार करत आलेला आहे, नामांतराच्या चळवळीवर आणि दलित चळवळींवर खोलवरचा विचार करीत आला आहे. नानकचंद रत्तूंच्या पुस्तकाचा त्यानं केलेला अनुवादही याच वैचारिक संस्कारातून आलेला आहे.

१९६०-६१मध्ये तो ज्ञानविज्ञान महाविद्यालयात आला, आणि त्याच्या आयुष्यातला एक वेगळा टप्पा सुरू झाला. एक तर इथं तो होस्टेलवर राहायचा. त्यामुळे आपोआपच त्याचं जग एकदम विस्तारलं.




महाविद्यालयातल्या पहिल्या वर्षापासून एम. ए. पर्यंतचा त्याचा वर्गमित्र आणि त्याचा निरोगी स्पर्धक मोईन शाकीर होता. त्याचे राज्यशास्त्राचे शिक्षक प्रा. बारी होते, आणि तत्त्वज्ञानाचे शिक्षक प्रा. सिद्दिकी होते. त्याकाळचा महाविद्यालयातला व्हॉलिबॉल-हीरो जमाल त्याचा अगदी जवळचा मित्र होता. महाविद्यालयाच्या आजूबाजूला सर्व मुस्लीम वस्त्या होत्या. फावल्या वेळात ज्या हॉटेलांत बसून टिवल्याबावल्या करायचो ती सगळी हॉटेलं मुसलमानांची होती. औरंगाबाद हे तीन-चारशे वर्षांच्या हिंदू-मुस्लीम संस्कृतीसंगमाचं शांत शहर होतं. पुढं शहरावर शिवसेनेनं आपला कब्जा जमवला तेव्हा या संस्कृती संगमाचे तीनतेरा वाजले. पण भोळे त्या आधीच हे शहर सोडून गेला होता. त्याच्यावरचे मुस्लीम संस्कृतीचे संस्कार निकोप, निरोगी होते, आणि तेही त्यानं जाणीवपूर्वक जपले ते अर्थातच आयुष्यभर. फार पुढे त्यानं फैजी यांच्या इंग्रजी ग्रंथाचा 'इस्लामसंबंधी एक आधुनिक दृष्टिकोन' या नावानं महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळासाठी अनुवाद केला त्यात त्याची जी बौद्धिक-भावनिक गुंतवणूक होती तिची पाळंमुळं त्याच्या महाविद्यालयीन जीवनातच शोधावी लागतील. वसंत पळशीकरांच्या 'जमातवाद' या पुस्तकाचं त्यानं केलेलं संपादन याचीच साक्ष आहे. अगदी या वर्षीच साहित्य अकादमीकडून त्यानं इन्तजार हुसैन या प्रख्यात पाकिस्तानी कथाकारांच्या २१ निवडक कथांचा अनुवाद *मोरनामा आणि इतर कथा* प्रकाशित केलंय्. या पुस्तकाची प्रस्तावना हा याच डोळस संस्कारांचा परमोत्कर्ष आहे. प्रत्येकानं वाचलीच पाहिजे अशीच ही प्रस्तावना आहे.

वर मोईन शाकीरचा संदर्भ आलेला आहे. दोघंही एम. ए. झाल्यावर औरंगाबादच्याच ज्ञानविज्ञान महाविद्यालयात प्राध्यापक झाले. शाकीर लवकरच विद्यापीठात गेला. भोळेला मराठवाडा विद्यापीठात जायचं होतं, आणि औरंगाबादशी जुळलेली नाळ तोडायची नव्हती. पण दुर्दैवानं ते जुळलं नाही, आणि पाच-साडेपाच वर्षांच्या ज्ञानविज्ञान महाविद्यालयातल्या नोकरीनंतर तो ५ सप्टेंबर १९७० रोजी नागपूर विद्यापीठात रुजू झाला. नंतरचं त्याचं सगळं काही नागपूरमध्येच झालं. तिथून तो निवृत्त होऊनही आता ४-५ वर्षं झालीत. पण नागपूर काही त्याला सोडावं वाटत नाहीये. त्याचा मुलगा नोकरीनिमित्तानं पुण्यात स्थायिक झालाय. मुलगी लग्न होऊन मुंबईतच स्थायिक झालीय, पण यानं नागपूरशी इतकं अभिन्न नातं जोडलंय की पुण्यामुंबईची कल्पनाही त्याला शिवत नाहीय.

मोईन शाकीर त्याचा जवळचा मित्र होता, स्पर्धकही होता. पण भोळेनं कुठल्या तरी क्षणी इंग्रजीत लिहायचं नाही, मराठीला सर्वस्व मानून सगळं लेखन मराठीतच करायचा निर्णय घेतला. वस्तुत: त्याचं इंग्रजीवर चांगलंच प्रभुत्व होतं. एम. ए. ला त्याचं माध्यम इंग्रजी होतं आणि तो एम. ए. च्या परीक्षेत गुणवत्ता यादीत होता. ठरवलं असतं तर त्याला द्वैभाषिक सहज होता आलं असतं. शाकीरला इंग्रजीशिवाय पर्यायच नव्हता. इंग्रजीमुळं तो लवकरच राष्ट्रीय स्तरावर गेला. भोळे राज्यस्तरावरच राहिला. त्यानं प्रचंड लेखन केलं. अक्षरश: हजारो पानांचा छापील मजकूर त्याच्या नावावर आहे. अर्थात हे शक्य झालं ते त्याच्या बायकोमुळं. त्याची बायको विजयाबाई लग्नानंतर शिकली, आणि संसाराला हातभार लावावा म्हणून जिद्दीनं हाताचं काम शिकली — म्हणजे टाइपिंगचं काम. टाइपिंगमुळं संसाराला मदत झालीच शिवाय भोळेची असंख्य हस्तलिखितं, लेख, भाषणं कायम टाइप करत गेली. पुढे जसा काळ बदलला तसं विजयाबाईंनी डीटीपीवर प्रभुत्व मिळवलं आणि बदलत्या काळात भोळेचं लेखन डीटीपी करून देण्यात हात आखडता घेतला नाही. त्याचं सगळं लेखन गद्य आणि वैचारिक. दरम्यान वेळीच त्यानं कविता करणं सोडून दिलं, म्हणून बरं. नाहीतर विजयाबाईंची काय अवस्था झाली असती! यानं कुणावर तरी कविता करायच्या आणि विजयाबाईंनी मन मारून त्या टाईप करून द्यायच्या! बाप रे!

औरंगाबादच्या महाविद्यालयीन जीवनात आम्ही सगळेच दरिद्री होतो. रायभान

जाधवसारखा एखादाच घरंदाज श्रीमंत होता. बाकी सगळे दारिद्र्यरेषेवर उड्या मारून मारून परेशान होते. या काळात भोळे आणि मी फारच जवळचे मित्र होतो. त्याचं आणि माझं तर खूप जुळायचं ते अनेक गोष्टींमुळं. तो प्राथमिक शाळामास्तरचा मुलगा, तर मी शाळाकारकुनाचा मुलगा. ते चार भाऊ, दोन बहिणी. मी पाच भाऊ, दोन बहिणी. तो होस्टेलवर राहायचा. मी भाड्याच्या दोन खोल्यांमध्ये. मी लॉजवरून डबा आणायचो, तोही डबा आणायचा. एका माणसाच्या डब्यात मी आणि माझा काका असे दोघं जेवायचो. आमच्या दोघांचाही — म्हणजे भोळेचा व माझा व्यवहार हा आम्हाला मिळणाऱ्या वार्षिक शिष्यवृत्तीवर चालायचा. त्यातच कपडे, फीज, घर खर्च, परीक्षा फीज असं सगळं भागवावं लागायचं. पण आपल्या दारिद्र्याची आम्हाला कधीही लाज वाटली नाही. व्यापकतेत आणि संपूर्णतेत विचार केला की आपले सगळेच मित्र समपातळीत असल्याचं लक्षात यायचं, आणि बरं वाटायचं. आपण एकटे नाहीत, आपल्यासोबत आपले मित्र आहेत, आपल्यासाठी किशोरकुमारची गाणी आहेत, गुरुदत्तचे



भावविकल सिनेमे आहेत, व्हॅन गॉफ-पॉल गोग्याँसारख्या दरिद्री पण प्रतिभाशाली चित्रकारांची चित्रं आहेत, बेगम अख्तरची गाणी आहेत, खोल आतून आलेल्या गूढ निराशेनं ग्रासलेले वहिदा रहमानचे चेहरे आहेत — असं सगळं आम्हाला बळ देणारंच होतं. सगळ्यांवर मात करून शिकण्याची, शिकून पोटापाण्याला लागण्याची व स्थैर्य मिळो — न मिळो, आपल्या आवडत्या गोष्टींसाठी झोकून देण्याची अर्धवट स्वप्नाळू–अर्धवट वास्तववादी विजिगीषा आमच्यात होती.

या सगळ्यानं भोळेला खूप काही शिकवलं. एक तर या काळात भोगलेल्या अनुभवलेल्या क्षणांनी त्याला कायम जमिनीवर ठेवलं. सर्वसामान्य माणूस हाच त्याच्या पुढील आयुष्यातील विचारांच्या केंद्रस्थानी राहिला. सामान्यांच्या सुखदुःखांकडे कानाडोळा करून परिवर्तनाचा विचार शक्यच नाही, याची सतत तीव्र जाणीव होत राहिली. म्हणजे सत्तेचं परिवर्तन किंवा समाजाचं ढोबळ पातळीवरचं परिवर्तन, संगणक–साक्षरतेनं घडून येणारं परिवर्तन किंवा मूठभरांची क्रयशक्ती वाढवणारं परिवर्तन हे त्याच्या टीकेचं नेहमीच लक्ष झालेलं आहे. राजकीय तत्त्वप्रणालींचा आणि राजकारणाचा विचार कुठेतरी सामाजिक विचारांच्या जमिनीत खोलवर मुरलेलाच हवा अशी त्याची धारणा आहे. फुले-आंबेडकरांच्या विचारांची सद्यकालीन मांडणी करताना त्याला विठ्ठल रामजी शिंदे ही मधली कडी फारच महत्त्वाची वाटते ती यामुळेच.

भोळे कलाशाखेचा विद्यार्थी आणि मी विज्ञानशाखेचा. तरीही महाविद्यालयीन काळात आम्ही जास्तीत जास्त वेळ सोबत राहायचो. तास बुडवून गप्पा मारत बसायचं, दोस्तांची थट्टामस्करी करायची, सतत उलटे-सुलटे विनोद करून हसायचं आणि हसवायचं, आणि काही तासांच्या भंकसगिरीनंतर अधून-मधून गंभीर चर्चा करायच्या असं आमचं चालायचं. शिवाय आमचा एक अत्यंत आवडता भाग म्हणजे रात्री नऊ वाजता फिरायला निघून *औरंगाबादच्या त्या काळातली* दोन टोकांमध्ये—म्हणजे किले-आर्क ते रेल्वे स्टेशन—रात्रभर फिरत राहायचं. आणि सकाळी चार-साडेचारच्या सुमारास घरी परतायचं. बऱ्याचदा महाविद्यालयासमोरच्या कबरस्तानात लिंबाच्या झाडाखालच्या पारावर रात्रभर गप्पा मारत बसायचं. सुखं वाटून घ्यायची, दुःखं वाटून घ्यायची, विचार वाटून घ्यायचे, ज्ञान वाटून घ्यायचं, दारिद्र्य वाटून घ्यायचं असं चालायचं. दोघांपैकी कुणालाही कशाचेही पैसे मिळाले की ते आम्ही अर्धे अर्धे वाटून घेत असू. आमच्या दारिद्र्यावर कलात्मकतेनं मात करायला आम्ही शिकत असू. त्यातला एक आम्ही शोधलेला प्रकार—एकदा आमच्यापैकी एकाला थोडेसे पैसे मिळाले तर त्यातून आम्ही चट्ट्यापट्ट्याच्या दोन लुंग्या विकत घेतल्या, आणि त्याचे चक्क शर्ट शिवले. दाढी वाढवायची ती दाढीचं सामान विकत घ्यायला पुरेसे पैसे नव्हते म्हणून. अत्यंत स्वस्तातल्या हॉटेलात जाऊन चहाचा एक कप अर्धाअर्धा घ्यायचा, आणि 'चहा महत्त्वाचा नाही, त्या निमित्तानं चालून होतं आणि बोलूनही होतं' असं एकमेकांना पटवायचो. सिनेमाला जायचो ते मध्यांतराच्या आसपास गेटकीपरला चार आणे देऊन. नंतर




त्या सिनेमांवर मित्रांमध्ये गप्पा निघाल्या की तो चित्रपट मध्यांतरानंतरच कसा चांगला झालाय् हे वेगवेगळ्या तऱ्हेनं पटवून द्यायचो.

आम्ही कवितेवर आणि एकूण मराठी साहित्यावर रात्र रात्र चर्चा करायचो. चांगलं-वाईट आमच्या परीनं शोधायचो. चांगल्या-वाईटाची परी लावण्यासाठी निकष शोधलेच पाहिजेत, असा आमचा कटाक्ष असायचा. त्या काळी वाङ्‌मयीन निकष होते, त्यांची कदरही होत असे. आजच्यासारखे 'व्यक्तिगत संबंध-मित्राग्रह-गटातटाचं वर्चस्व-जातीपातीचा तराजू- प्रादेशिक अस्मिता-अपराधी भावनेतून दयाभाव, दयाभावातून पुरोगामित्व, इत्यादी निकष त्यावेळी जन्माला आले नव्हते. आम्हाला 'मिडिऑक्रिटी'चा तिटकारा. भोळेचा एक आवडता छंद म्हणजे गावातली लोकल टॅलन्टवाल्यांची कविसंमेलनं पाडणं. एकदा एका कविसंमेलनात आमचे एक प्राध्यापक अतिशय भावुकपणे कविता वाचू लागले. पहिलीच ओळ 'उगीच माझ्या मनात येते' म्हणाले आणि मागं बसलेला भोळे ओरडला, 'त्याचं काय एवढं मनावर घ्यायचं हो.' दुसऱ्या एक कवयित्री वाचू लागल्या, 'आम्हा बायकांचे जिणे' हा लगेच ओरडला, 'अंडरलाइन'. त्यांनी दुसरी ओळ वाचली. हा म्हणाला, 'इनव्हर्टेड कॉमा', बाई रडवेल्या झाल्या. मग बराच वेळ हा गप्प. दुसरा एक कवी म्हणाला, 'तू आली नव्हतीस बकुळीखाली तेव्हा' भोळेकडून प्रेरणा घेऊन एकजण ओरडला, 'इम्पॉर्टंट, इम्पॉर्टंट' लगेच भोळेची पुस्ती: 'संदर्भासह स्पष्टीकरणासाठी!' तो कवी इतका चिडला की कविता वाचायच्याऐवजी 'ठीकय् ठीकय् बघून घेईन' म्हणत म्हणतच मंचामागं गायब झाला. आम्ही दोघं महाविद्यालयातल्या वर्गातही वाह्यातपणा करत असू. त्या काळी आमच्या महाविद्यालयात गो. मा. पवार प्राध्यापक म्हणून रुजू झाले होते. तेव्हा ते नवशिकवे प्राध्यापक होते. त्यांनी आमचा इतका धसका घेतला होता की तो पुढं आयुष्यभर कसोशीनं पाळला. वर्गात आले की ते आधी दोन मिनिटं एनसीसीच्या शिस्तीत वर्ग न्याहाळायचे. मग करड्या आवाजात म्हणायचे, 'भोळे, तुम्ही बाहेर जा?

आम्हाला त्या काळी नुकतीच प्रकाशित झालेली *कोसला* कादंबरी खूप आवडायची. वाङ्‌मयीन समाजातला दंभस्फोट आम्हाला प्रिय वाटायचा. पण शिक्षण ही *कोसला*च्या नायकाची 'लक्झुरी' होती ती मात्र आम्हाला कधीही आवडली नाही. प्रत्येक वर्गात चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होणं ही आमची तीव्र आंतरिक गरज होती. आणि त्या दृष्टीनं *कोसला*चं अपयश आम्हाला पुसटसच जाणवायचं!

आमच्या पदव्युत्तर शिक्षणात आम्ही खऱ्या अर्थानं वाचनाकडं वळलो. प्रचंड वाचन केलं. आपापल्या विषयांचं आणि साहित्याचंही. खूप चर्चा केल्या. राजकीय विचारप्रणालींच्या सखोल अभ्यासानं त्याची सामाजिक समस्यांची जाण वाढत गेली. राज्यशास्त्र-समाजशास्त्र-ललित साहित्य ही त्रिसूत्री त्याला पुढच्या आयुष्यात फार परिपक्व करीत गेली. राज्यशास्त्रवाल्यांचा बौद्धिक दृष्टिकोण त्यांच्या अंगी भिनला, समाज समोर ठेवल्यामुळे समतेचं मूल्य आणि स्वातंत्र्याची किंमत त्याच्या विचारांत अंगभूत झाली. कवितेमुळं त्याची कल्पनाशक्ती वाढली, भाषा नितळ झाली आणि पाहिजे तेव्हा त्याला सूचकतेचा आणि बहुअर्थतेचा आधार घ्यायला मदत झाली. जगण्यात आणि वागण्यात 'आपण समाजाचाच अंश आहोत, म्हणून समाजानं जपलेली मानवी मूल्यं टिकवलीच पाहिजेत' अशी धारणा प्रबळ होत गेली. आमच्या चर्चा म्हणजे बऱ्याचदा चहाच्या पेल्यातली वादळं असायची. पण मी आधीच सांगितलं की एकच चहा आम्ही अर्धा-अर्धा प्यायचो, दोघांनीही पूर्ण चहा घ्यावा एवढे पैसेच नसायचे. त्यामुळे आमची वादळंही अर्धीच असायची. त्याचा एक उपयोग होत गेला. एकटे असताना आम्ही आपापल्या मनातच भांडत राहायचो. त्यातून विलक्षण 'क्रिटीकल' बनत गेलो. कोणतीही गोष्ट सहज, आंधळेपणानं, किंवा सगळेच स्वीकारतात तशी स्वीकारली नाही. तावून-सुलाखून, पारखून घेऊनच

स्वीकारली. त्यामुळे त्याची मतं अतिशय पक्की होत गेली, पण तो कधीही दुराग्रही झाला नाही. दुसऱ्यांच्या मतांचा आदर करण्याची सहिष्णुता आणि तरीही आपलं मत, आपले विचार, आपल्या निष्ठांसाठी त्यानं तडजोडी केल्या नाहीत. सुदैवानं भौतिक सुखांसाठी तडजोडी करणारे मित्र त्याला नव्हतेच. या समाजात तडजोडींशिवाय प्रतिष्ठाच मिळत नाही, हे फार आधीच समजल्यामुळे तो प्रतिष्ठेच्या मागं लागला नाही. काही मित्र प्रतिष्ठेच्या पायघड्यांवरून चालत-चालत सत्तेच्या सिंहासनाकडे गेल्याचं त्यानं पाहिलं होतं. जातीचा आधार असूनही सत्तेच्या वाटा त्यानं कसोशीनं टाळल्या. संघर्ष केले. वेळ आल्यावर जाहीरपणे विरोध केले, समित्यांचे राजीनामे दिले आणि आपल्या भूमिकेवर ठामपणे उभा राहिला. या सगळ्या प्रकारात आपल्या वागण्याचं तत्त्वज्ञान करून आपले वैचारिक होर्डिंग्ज समाजात उभारले नाहीत. जे केलं त्याची आत्मसंतुष्टता नव्हती; जे झालं नाही त्याची तक्रार नव्हती; जे करायचं राहून गेलं त्याची टोचणी मात्र कायम आत बाळगली. त्यामुळेच त्यानं आपल्या मित्रांचा 'तक्रारनिवारण केंद्र' म्हणून कधीच उपयोग केला नाही. किंवा आपल्या ओळखींचा अगदी छुपेपणानं, कुणालाही कळू न देता, कुटुंबकल्याणासाठी उपयोग केला नाही. भावनात्मक आधारांसोबतच बौद्धिक आधार देणं महत्त्वाचं असतं, पण बौद्धिक आधार देता येऊ शकतो का, याबद्दलच त्याच्या मनात द्वंद्व होतं.

मधल्या काळात आमच्या भेटी खूप कमी झाल्या. त्याच्या नागपूरच्या वास्तव्यात तो खूपच रमून गेला, पण याच काळात त्यानं स्वत:ला अनेक लहानमोठ्या संस्थांशी जोडून घेतलं. विशेष म्हणजे फार मोठा काळ त्यानं 'बालभारती'च्या इतिहास विषय समितीच्या कामात, नागरिकशास्त्राची पुस्तकं लिहिण्यात, 'समाज प्रबोधन पत्रिके'च्या आणि 'आजचा सुधारक'च्या संपादन-सल्लागाराच्या भूमिकेत घालवली. शिवाय महाराष्ट्रभर दौरे करून आपल्या व्याख्यानांचा 'अश्वमेध' फिरवला. खूप पुस्तकं लिहिली. खूप लेखन केलं, आणि



स्वत:ला 'विचारवंत' होण्यापासून वाचवलं. गांभीर्यानं आणि जबाबदारीनं, निष्ठेनं आणि प्रामाणिकपणानं सगळ्या गोष्टी केल्या. या समाजात नुसती भाषणं केली की 'विचारवंत' होता येतं, नुसतं लिहीत राहिलं की महान प्रतिमा उभी करता येते, एकच एक गोष्ट दीर्घकाळ करीत राहिली की ज्येष्ठ तज्ज्ञ होता येतं, निव्वळ स्वत:च्या स्वार्थासाठी कायम मांडामांड करीत गेलं की थोर नेता होता येतं, याची अगदी पूर्वीपासून जाण असल्यानं या सगळ्या गोष्टी त्यानं मन:पूर्वक टाळल्या. एका सामान्य बुद्धीच्या माणसाला वर्तमानपत्रांनी आणि 'मीडिया'नं 'ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ' केल्याची तक्रार एक कार्यकर्ता त्याच्याजवळ करीत होता. भोळे म्हणाला, अगदी साधंय याचं उत्तर; 'घुसल्याने होत आहे रे। आधी घुसलेचि पाहिजे।।' एवढा मंत्र मनाशी बाळगला की झालं!

आम्ही चार-पाच मित्रांनी एकदा गप्पांच्या ओघात असं ठरवलं की आपण शिक्षणक्षेत्रात आहोत तर पीएच.डी. करून टाकायची. सगळे कामाला लागलो. प्रौढ झाल्यावर पीएच.डी. करायची म्हणजे आपल्या प्रौढपणाला साजेसंच काम करावं लागणार हे उघड होतं. भोळेला १९८२मध्ये नागपूर विद्यापीठातून पीएच.डी मिळाली. त्याच्या प्रबंधाचा विषय होता. 'भारतीय शेतकरी कामगार पक्ष: एक अभ्यास—स्वातंत्र्य ते संयुक्त महाराष्ट्र'. आमच्या तरुणपणी शेतकरी कामगार पक्ष म्हणजे जहाल जातीयवाद्यांचा पक्ष अशी प्रतिमा समाजातल्या एका विशिष्ट वर्गात रूढ होती. ही प्रतिमा पुसून या पक्षाच्या संतुलित मूल्यमापनाचं काम भोळेनं आपल्या प्रबंधातून केलं. या पक्षाचं 'ब्राह्मणद्वेष' हे वैचारिक अधिष्ठान कधीच नव्हतं, वर्गीय पातळीवरचं राजकारण हाच या पक्षाचा गाभा होता ही गोष्ट पुन्हापुन्हा ठामपणे सांगणं महत्त्वाचं आहे असं भोळेचं मत. त्यानं आपल्या प्रबंधातून जडणघडणीची इत्यंभूत मीमांसा केली. पक्षाच्या राजकीय विचारांचा सर्वसामान्यांवर झालेला प्रभाव त्यानं सखोल विश्लेषणात्मक पातळीवरून मांडला.

आणि शेवटी या पक्षाचं कुठे चुकलं, कोणते व्यूह फसत गेले याचीही सबळ पुराव्यांनिशी चर्चा केली. भोळेमधली कुशाग्रता, चिंतनशीलता, सामाजिक विचारप्रवाहांचा आग्रह अशी सगळी वैशिष्ट्यं त्याच्या या प्रबंधातून ठायीठायी दिसून येतात. जेव्हा हा प्रबंध प्रकाशित होईल तेव्हा महाराष्ट्रातल्या राजकीय सामाजिक विचारांत महत्त्वाची भर पडेल असं आता तरी, आणि या सद्य:कालीन स्थितीतून जाताना वाटतंय.

मधल्या काळातल्या आमच्या गतिशील जगण्यामुळं आमच्या भेटी कमी कमी होत गेल्या होत्या, त्यावर अचानक एक उतारा सापडला. सुमारे बारा वर्षांपूर्वी माझ्या डाव्या पायावर सोरियासिसनं घर केलं. मी त्रस्त झालो होतो. भोळे म्हणाला, नागपूरला आमचे होमिओपथीचे डॉक्टर आहेत डॉ. डांगरे नावाचे, त्यांचं औषध घेऊन बघ. माझ्या तरुणपणी मी होमिओपथीचा मटेरिया मेडिका वाचला होता. माझ्या एका मित्राकडूनही माहिती घेतली होती. मी तयार झालो. डॉ. डांगरेंचं चार-पाच महिने नियमित औषध घेतलं. सोरियासिस कायमचा गेला. खरं म्हणजे डॉ. डांगरे हे सकृतदर्शनी कारण म्हणून मी स्वीकारलं होतं. त्यानिमित्तानं माझ्या नागपूरभेटी वाढत गेल्या. पण सोरियासिसमधून सुटलो हा आनंद इतका मोलाचा वाटला की आमच्या नात्यात डॉ. डांगरेही आपोआपच घट्टपणे बसले. आता जेव्हा मी नागपूरला जातो तेव्हा भोळे आणि प्रफुल्ल शिलेदार सोबत डॉ. डांगरेंना भेटण्याचाही मला आनंद वाटत असतोच.

सुरुवातीची वर्षं भोळेला नागपुरात फार एकाकी वाटायचं. 'बालभारती'च्या निमित्तानं त्या काळी त्याच्या पुण्यात चकरा झाल्या नसत्या तर कदाचित नागपूर सोडायचाही त्यानं गंभीरपणे विचार केला असता. पुढं योगायोगानं तो विद्यापीठात प्रपाठक झाला, आणि प्रपाठक झाल्यावर नागपूर विद्यापीठात त्या काळी विद्यापीठानं दिलेलं निवासस्थान काढून घेण्याची अजब पद्धत असल्याने घराचा प्रश्न तीव्र झाला. त्यानं स्वत:चं घर बांधलं.




काटकसर हा त्याचा वांशिकच गुण असल्यामुळं त्यानं उत्तम घर बांधलं. कोणत्या तरी अनियमित आकाराच्या प्लॉटला त्यानं नियमित घर बांधून उत्तर दिलं. घरात मागं-पुढं छान बाग केली. पण घराच्या एका बाजूला त्यानं चक्क बांबूंचं बेटच उभं केलं. आता घरात ऐसपैस जागा नसतानाही बांबू लावायचं कुणाला सुचेल? पण त्यानं ते कठिण कर्म निभावून नेलं. त्याच्या आजन्मब्रह्मचारी अशा लहान भावानं बाळासाहेबानंही (जो नागपुरातला सुप्रसिद्ध वाहनहृदयसम्राट आहे!) बांबूवर जीव लावला. पाहता-पाहता बांबू प्रचंड वाढला. नागपुरातल्या पर्यावरणातही भोळे जसा एकाकी आणि उंच वाढत गेला तसा!

भोळे हळूहळू नागपुरात रुजला, आणि त्यानं समविचारांचे अनेक मित्र केले. अनेक परिवर्तनवादी चळवळींशी तो जोडला गेला. त्याचे त्या काळात तिथे कोण मित्र होते, आता मला आठवत नाहीय. पण हळूहळू श्रीनिवास खांदेवाले, रूपा कुलकर्णी, मनोहर पिंपळापुरे, मनोहर म्हैसाळकर, (कै.) मोहन कडू, महेश एलकुंचवार अशी काही नावं कळत गेली. 'आजचा सुधारक'च्या निमित्तानं जमा झालेल्या लोकांबद्दल मला अधूनमधून तो बरंच काही सांगायचा. शिवाय 'रुईकर इन्स्टिट्यूट ऑफ लेबर मेनेजमेंट अँड सोशिओ-इकनॉमिक्स' संस्थेशीही तो जोडला गेला. लोहिया-गांधी-फुले-आंबेडकर-शिंदे-मार्क्स-लेनिन-आचार्य भागवत-जावडेकर-लोकहितवादी-आगरकर-रानडे-राजवाडे-केतकर-राजारामशास्त्री भागवत—अशा लांबच लांब लोकांची यादी आणि त्यांचं लेखन. त्यांचे विचार पारखून घेऊन समकालीनतेशी त्यांची संगती लावण्याचा त्यानं कसोशीनं प्रयत्न केला. विचारांना पुस्तकांच्या पातळीवरच ठेवण्याचा त्यानं कधीच प्रयत्न केला नाही. वैचारिक साहित्य असो की कथासाहित्य असो, प्रत्यक्ष जगण्याला लावून बघण्याची, आपल्या आसपासच्या आपल्याला माहीत असलेल्या भिन्न भिन्न लोकांच्या जगण्याला लावून बघण्याची त्याची उपजतच वृत्ती होती. त्यामुळेच टोकाच्या भूमिका घेणं त्याच्या

स्वभावात नाहीच. आपल्या प्रदीर्घ अभ्यासातून त्याला सतत जाणवत गेलं की सद्य:स्थितीत महाराष्ट्रातल्या सामाजिक चळवळींचा इतिहास उदारमतवादाच्या अंगानं लिहिण्याचा प्रकल्प तातडीनं हाती घेणं निकडीचं आहे. भोळेच्या लेखनातून पूर्वी क्लिष्टता जाणवायची, पण गेल्या काही वर्षांत त्याची भाषा अधिकाधिक सहजसोपी होऊ लागलीय. जेव्हा व्यक्ती आणि समाजातला नात्यांचा गुंता मांडण्यात विद्याशाखीय विश्व मश्गूल असतं तेव्हा लेखनाची भाषा क्लिष्ट होत जाते हेही त्याला उमगलंय. हीच समज त्याच्या अलीकडच्या लेखनातील भाषा सहज, सुलभ, प्रवाही असण्यामागे दिसून येते. प्रबोधनाच्या चळवळींवर तो गेली कित्येक वर्षं भाष्य करीत आलाय्. या बाबतीत त्याचा दृष्टिकोण विश्लेषणात्मक, समाजसापेक्ष, डाव्यांचा विचारव्यूह पारखून घेणारा आहे. मार्क्सवादी विचारांचं सामाजिक अंगानं परिष्करण करणं असं त्याच्या एकंदर जीवनदृष्टीचं स्वरूप आहे, अशी माझी धारणा आहे. साहित्य अकादमीसाठी त्यानं संपादित केलेल्या द्विखंडात्मक अशा *एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य* याची दीर्घ प्रस्तावना किती मोलाची आहे हे वाचकांना कळून येईल. त्याचं अलीकडचं लेखन *बदलता महाराष्ट्र* आणि *शतकांतराच्या वळणावर* या संपादित ग्रंथांच्या प्रस्तावनांवरूनही ते किती मूलगामी स्वरूपाचं आहे हे सहज लक्षात येईल. सध्या प्रकाशनाच्या शेवटच्या टप्प्यात असलेले *विसाव्या शतकातील मराठी गद्य* हे दीर्घ प्रस्तावना असलेले द्विखंडात्मक ग्रंथही नक्कीच विचारांना उद्युक्त करणारे ठरतील.



गेल्या काही वर्षांत तो साहित्य क्षेत्रातील घडामोडींवर आणि ललितसाहित्यकृतींवरही विश्लेषणात्मक आणि संश्लेषणात्मक लेखन करू लागलाय. ह्यानं अनुवादित केलेल्या *मोरनामाच्या* प्रस्तावनेबद्दल वर आलंच आहे. त्याच्या ललितसाहित्यविषयक टीकालेखांचा एक संग्रह *साहित्य प्रत्यय* २००३ मध्ये प्रकाशित झाला आणि आता दुसरा संग्रह *साहित्य अवकाश* मुद्रितावस्थेत आहे. त्याच्या एकंदर लेखनावरून साहित्याच्या समाजशास्त्रीय मीमांसेचा मोलाचा आविष्कार म्हणून त्याकडे बघणं उचित होईल.

भोळेच्या आजवरच्या प्रवासात त्याच्या बायकोचाही वाटा महत्त्वाचा आहे. असं लिहायची पद्धत आहे म्हणून लिहितोय असं नाही, तर भोळेला व्यवहारात विदेशी आणि आहारात देशी करण्याचं काम विजयाबाई इतकी वर्षं करत आल्या आहेत. भोळे, विजयाबाई आणि बाळासाहेब तिघंही स्वयंपाकात तरबेज आहेत. मुलगा हिरण्मय स्वयंपाक करण्याच्या बाबतीत मात्र बराच प्रयोगवादी आहे. मुलगी गौरी सासरी गेल्यावर एकदम गुजराती संस्कृतीत मुरली. नात निधी जन्मजात द्विभाषिक आहे. म्हणजे भाषेच्या बाबतीत बरीच प्रयोगशील आहे.

भोळेबद्दल आता आणखी काय सांगायचं? म्हणजे खरं तर आणखी खूपच सांगता येईल, लिहिता येईल, पण दुर्दैवानं त्याच्यावर लिहिण्यासाठी जपून ठेवलेला यूनी लॅकनॉक्चा नवा कोरा बॉलपेन संपलाय. म्हणजे आवरतं घेतलंच पाहिजे.

एकंदरीत भोळे हा असा आहे. म्हणजे मला दिसलेला भोळे असा आहे. आणि मी त्याचा मित्रय् ही गोष्ट मला सुखावणारी आहे. आमचे रस्ते वेगळे, आमची जीवनदृष्टी वेगळी, कार्यक्षेत्र वेगळं, जगण्याचं तंत्र वेगळं, तरीही आम्हाला इतक्या वर्षांनंतर अजूनही अगदी अधीरतेनं भेटावं वाटतंय ही गोष्टच अस्सलय्. काळाला आमच्या मैत्रीचं ओळखीत रूपांतर करता आलं नाही, हे जगण्याच्या संदर्भात थोर नाहीय का?



निर्भीड व बहुजनवादी विचारवंत

# भा. ल. भोळे

राजेंद्र व्होरा

भास्कर लक्ष्मण भोळे यांनी बहुजनवादी चळवळ, साहित्यसमीक्षा व राज्यशास्त्र या तीन क्षेत्रात; आपला स्वतंत्र ठसा उमटविला आहे. चळवळीतील कार्यकर्ते, साहित्याचे अभ्यासक व राज्यशास्त्राचे प्राध्यापक त्यांना आपला मार्गदर्शक मानतात. खानदेश, मराठवाडा व विदर्भ या विभागात शिक्षण झालेल्या व अध्यापन केलेल्या भोळेंनी वैचारिक क्षेत्रातील पुण्या-मुंबईच्या मिरासदारीला आव्हान देऊन आपले स्थान अशा प्रकारे निर्माण केले की, महाराष्ट्रातील सामाजिक चळवळ, साहित्य व राज्यशास्त्र या प्रांतांनी त्यांची नुसती दखलच घेतली असे नव्हे तर आपापल्या प्रांतांतील सर्वोच्च सन्मान व पुरस्कार त्यांना प्रदान केले गेले. इंग्रजी भाषेत चालणाऱ्या वैचारिक व्यवहाराला पूर्णपणे बाजूला सारून मराठी भाषेत हा व्यवहार समर्थपणे कसा करता येऊ शकतो, याचा आदर्श घालून देऊन प्रा. भोळे यांनी राजवाडे, लक्ष्मणशास्त्री व य. दि. फडके यांची परंपरा पुढे चालवली आहे. आज उभा महाराष्ट्र त्यांच्याकडे एक साक्षेपी, निर्भीड व परिवर्तनवादी विचारवंत म्हणून पाहतो आहे.

भोळेंना सानेगुरुजींना आदर्श मानणारे वडील व तारतम्य व स्पष्टवक्तेपणा असणारी आई लाभली. शाळेत सर्व जाति-जमातींचे सवंगडी मिळाले. परंतु वैचारिक क्षेत्रातील त्यांच्या वाटचालीचा पाया घातला गेला तो औरंगाबाद शहरात. मिलिंद महाविद्यालयातील पहिल्या वर्षात त्यांचा आंबेडकरी विचारप्रणालीशी परिचय झाला व शासकीय महाविद्यालयातील तीन वर्षात त्यांना चंद्रकान्त पाटील, मोईन शाकीर, चंद्रशेखर जहागीरदार, भालचंद्र नेमाडे, रवींद्र किंबहुने, ना. धों. महानोर, रावसाहेब कसबे, अरविंद देशपांडे, मा. गो. देशमुख, सुधीर रसाळ व गो. मा. पवार यांसारखे मित्र मिळाले. औरंगाबादमधील शिक्षण व अध्यापनाच्या दहा वर्षात प्रा. भोळे यांनी सार्वजनिक व साहित्याच्या क्षेत्रात जेव्हा पदार्पण केले तेव्हा या मित्रांबरोबर झालेल्या चर्चा वैचारिक स्पष्टता येण्याच्या दृष्टीने त्यांना अत्यंत उपयोगी पडल्या. भोळेंची सामाजिक बांधीलकीची भूमिका याच काळात आकार घेऊ लागली.

नागपूर विद्यापीठाच्या राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभागात प्राध्यापक म्हणून १९७० साली रुजू झाल्यावर भोळेंचा औरंगाबाद शहराचा संबंध संपला पण त्यांचे मन त्या शहरात कायमचे गुंतले गेले होते. नागपूरला आल्यावर त्यांनी वैचारिक व पाठ्यपुस्तक लेखनास प्रारंभ केला. राज्यशास्त्र नियमातील उच्चमाध्यमिकपासून पदव्युत्तर पातळीपर्यंतची पाठ्यपुस्तकं तर त्यांनी लिहिलीच पण बालभारतीच्या नागरिकशास्त्र व इतिहास या विषयसमित्यांवर अध्यक्ष म्हणून काम करून तिसरी ते आठवी इयत्तेच्या पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीत पुढाकार घेतला. महाविद्यालयीन किंवा शालेय पाठ्यपुस्तकांच्या लेखनात वस्तुनिष्ठता व परिवर्तनवादी भूमिका यांचा मेळ घालण्यात भोळे यांनी बरीच बौद्धिक शक्ती खर्च केली आहे. त्याचप्रमाणे राज्यशास्त्रातील मूळ इंग्रजी संज्ञांना नेमके मराठी प्रतिशब्द तयार करून या विषयातील परिभाषा विकसित करण्यात ते यशस्वी झाले. एकूणच मराठीतून पाठ्यपुस्तके लिहिणे या गोष्टीला भोळे यांनी प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांच्याकडून स्फूर्ती घेऊन इतरही प्राध्यापक या कामात रस घेऊ लागले आहेत.

समकालीन राजकीय घडामोडी व सामाजिक चळवळीतील भाष्य करणाऱ्या लेखमाला वृत्तपत्रात लिहून भोळे यांनी पाठ्यपुस्तकेतर वैचारिक लेखनास सुरुवात केली तो साधारणतः

१९७५च्या आणीबाणीनंतर. नव्याने उदयाला आलेल्या नमुनापाहणीपद्धतीला व अमेरिकी राज्यशास्त्राच्या बडेजावाला शरण न जाता भोळे यांनी आपले लेखन केले व स्वत:चे खास स्थान निर्माण केले. शास्त्रीय संशोधन पद्धती, संख्याशास्त्राचा वापर व मूल्यविरहित भूमिका या गोष्टींपासून ते दूरच राहिले. परकीय व उपरे राज्यशास्त्र या देशाला लागू पडणार नाही, एतद्देशीय संदर्भ हा जास्त महत्त्वाचा आहे, ही भूमिका घेऊन त्यांनी आपली लोकशाही समाजवादी व बहुजनवादी तत्त्वप्रणाली कधीच सोडली नाही. त्यामुळे त्यांच्या लिखाणाला धार आली. प्रत्यक्ष संशोधन करण्याकडे कमी कल असणाऱ्या भोळेंनी पीएच.डी.साठी शेतकरी कामगार पक्षाच्या इतिहासावर जो प्रबंध लिहिला तो संशोधनाची चौकट पूर्णपणे पाळूनच. य. दि. फडकेंसारखा ऐतिहासिक पुराव्याचा व तपशीलाचा आग्रह ते धरीत नाहीत, पण त्यांचे लेखन सहजासहजी खोडून काढता येण्यासारखे नसते. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विठ्ठल रामजी शिंदे, यशवंतराव चव्हाण व गोपाळ गणेश आगरकर या विचारवंतांवरील भोळेंचे लेखन चरित्रलेखनासारखे नाही. चरित्रलेखनात त्यांना तसा रस नाही. त्यांना प्रिय आहे या विचारवंतांच्या विचाराचा अभ्यास, त्यांच्या वारसदारांच्या कामगिरीची समीक्षा, फुले-आंबेडकरी चळवळीच्या आजच्या अधोगतीची कारणमीमांसा. भोळे यांच्या टीकेचे एक लक्ष्य आहे प्रतिगामी व हिंदुत्ववादी गट व दुसरे लक्ष्य आहे चळवळीतील नेते व कार्यकर्ते जे त्यांचे मित्र आहेत, ज्यांच्याबद्दल त्यांना आस्था आहे. परिवर्तनवादी चळवळींना चुचकारून चळवळीचेच नुकसान होत असते, असे भोळे मानतात म्हणून ते चळवळीवर निर्भीडपणे टीका करतात. या भूमिकेवर खंबीर राहिल्याने चळवळीतील काही मंडळी त्यांच्यावर नाराज होण्याचा धोका भोळे पत्करायला तयार असतात. जेव्हा दलित चळवळीतील काहीजण हिंदुत्ववाद्यांशी जवळीक करू लागले तेव्हा त्यांच्यावर कठोरपणे टीका करण्यात व त्यांची हेटाळणी करण्यात भोळे सर्वांत पुढे होते. बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानापासून आजची चळवळ कशी दूर चालली आहे हे सांगताना भोळे म्हणतात की दलित चळवळीतील






विविध प्रवाहात इतर बाबतीत विस्तव जात नसला तरी आंबेडकरी विचार गाडून टाकण्याबाबत सर्वांचे संगनमत झालेले आहे. दलित चळवळीला विभूतीपूजा व पांढरपेशीय मानसिकतेने ग्रासलेले आहे. दलितांचे राजकारण विचारकेंद्री होण्याऐवजी व्यक्तीकेंद्री झाल्यामुळे त्यास गटबाजीची लागण झाली आहे. अशी मते स्पष्टपणे मांडणारे भोळेंसारखे विचारवंत आज महाराष्ट्रात हाताच्या बोटावर मोजण्याएवढेही नाहीत.

भोळेंनी पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त जे लेखन केलेले आहे त्यात जवळ जवळ सहा पुस्तके राजकीय घडामोडींवरील आहेत व नऊ पुस्तके व पुस्तिका फुले-आंबेडकर-शिंदे-आगरकर यांचे कार्य व तत्त्वज्ञान व त्यांचा वारसा यांविषयी आहेत. साहित्यसमीक्षा हा भोळे यांचा विशेष आवडीचा प्रांत. पण त्यात त्यांचे एकच पुस्तक आहे पण ते महत्त्वाचे आहे. 'साहित्यप्रत्यय' या शीर्षकाच्या या पुस्तकात भोळेंच्या तेरा सैद्धान्तिक लेखांचा व अकरा पुस्तक परीक्षणांचा समावेश केलेला आहे. सामाजिकशास्त्राच्या अभ्यासकांना अधिक अर्थपूर्ण दृष्टीने साहित्याकडे पाहणे शक्य होते असे भोळे यांचे मत आहे व त्यांचे वरील पुस्तक वाचताना त्याचा प्रत्यय येतो. फुले-शिंदे–राजवाडे-शेजवलकर-केतकर यांच्या साहित्यविषयक भूमिकेकडून प्रेरणा घेऊन भोळे यांनी साहित्य व समाजजीवन यांमधील आंतरसंबंध शोधण्याचा प्रयत्न केला आहे. निशिकांत ठकार यांनी भोळेंच्या 'साहित्यप्रत्यय'चे परीक्षण करताना म्हटले आहे की साहित्याच्या सामाजिक आशयाला महत्त्व देताना भोळे आंधळी समाजवादी भूमिका घेत नाहीत व वाङ्मयीन निकषाचे महत्त्व अधोरेखित करतात पण साहित्यकृती एकदा सामाजिक जीवनाचा भाग बनली की तिची सामाजिक व राजकीय समीक्षा झाली पाहिजे, असा आग्रह धरतात. मराठी साहित्य मुख्यत: मध्यमवर्गीय जाणीवा जोपासणारे व प्रस्थापित




व्यवस्थेचे समर्थन करणारे आहे. तसेच विद्रोही वाङ्मयाची व्यासपीठे क्रांतिकारी जाणिवांचे वाहन होण्याच्या दृष्टीने थिटी पडली आहेत, असे भोळे स्पष्टपणे बजावतात. लोकप्रिय मराठी साहित्यास भोळे बेगडी, ठोकळेबाज, निर्जीव व स्थितीवादी म्हणतात तर दलित साहित्याचे वर्णन साचेबंद, शब्दबंबाळ व पोकळ या शब्दांत

**महात्मा फुले : वारसा आणि वसा**
भास्कर लक्ष्मण भोळे

*"डॉ. भोळे आज महाराष्ट्रातील अग्रगण्य विचारवंत आहेत. सामाजिक शास्त्रांचा त्यांचा चांगला अभ्यास आहे. आज जगभर प्रचलित असणाऱ्या राजकीय विचारप्रवाहांची त्यांना सूक्ष्म जाण आहे आणि जोतिरावांच्या विचारांचे चिकित्सक विवेचन करीत असताना डॉ. भोळे यांनी या प्रवाहांचा योग्य तिथे वापर केला आहे. त्यामुळे महात्मा फुल्यांवर आतापर्यंत लिहिलेल्या सर्व पुस्तकांपेक्षा या पुस्तकाचे स्वरूप वेगळे आहे. महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा कोणता आहे, त्यांची परंपरा कोणती आहे, याचे विवेचन करीत असतानाच त्यांच्या विचारांचा वसा आपण घेतला आहे का, तो न उतता व न मातता आपण टाकून तर दिला नाही ना? यावरचे त्यांचे विचार सर्वांनाच अंतर्मुख करावयास लावणारे आहेत."*

अशोक चौसाळकर, रविवार सकाळ, २८ एप्रिल १९९१

करतात. 'साहित्यप्रत्यय' या पुस्तकास २००३चा महाराष्ट्र फाउण्डेशनचा साहित्यपुरस्कार मिळाला होता तो किती योग्य होता, याचा प्रत्यय हे पुस्तक वाचल्यावर येतो.

साहित्यक्षेत्रातील भोळे यांचे दुसरे योगदान आहे अनुवाद करण्याबद्दलचे. चार भाषांतरित पुस्तके भोळे यांच्या खात्यावर आहेत व त्यांच्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : अनुभव आणि आठवणी' या पुस्तकास साहित्य अकादमीचा अनुवाद पुरस्कार (२००२) मिळालेला आहे. अलीकडेच त्यांनी पाकिस्तानी लेखक इंतजार हुसैन यांच्या एकवीस कथांचे भाषांतर साहित्य अकादमीसाठी केले आहे. महेश एलकुंचवार यांच्या मते हा अनुवाद इतका सरस आहे की तो अनुवाद वाटतच नाही. हुसैन यांनी मराठीतच कथा लिहिल्यात असे वाटते. भाषेवरील प्रभुत्व व समाजजीवनाची सखोल जाण असल्याशिवाय इतका चांगला अनुवाद होणे शक्य नसते.




परंतु समाजजीवनाची नुसती जाण अपुरी पडते. विचारवंताची वैचारिक बैठक पक्की असावी लागते. भोळे यांचा वैचारिक प्रवास विचाराच्या क्षेत्रातील दिग्गजांच्या सोबतीने झाला. केवळ तत्त्ववैचारिक, अमूर्त व स्थलकालनिरपेक्ष विचार न करता तो

**मोरनामा आणि इतर कथा**
इंतजार हुसैन
अनुवाद : भास्कर लक्ष्मण भोळे

*"श्री. भोळे यांनी हा अनुवाद केल्याने अप्रतिम कथा मराठीत आल्या तर आहेतच पण त्याबरोबरच त्यांनी एका मूलभूत शहाणपणाशी आपली ओळख करून दिलेली आहे. हा अनुवाद इतका सरस आहे की तो अनुवाद वाटतच नाही. इंतजार हुसैन यांनी मराठीतच या कथा लिहिल्यात असे वाटते. पण यापेक्षाही भोळ्यांनी या संग्रहाला जी प्रस्तावना लिहिली आहे ती इतकी विवेचक, प्रगल्भ व खोल समजुतीने भरलेली आहे की तिचे स्वतंत्र वाचन वारंवार करावेसे वाटते. ही प्रस्तावना समीक्षणात्मक आहे व तिच्याइतके समीक्षणात्मक कोणालाही लिहिता येणे कठीणच आहे."*

महेश एलकुंचवार, लोकसत्ता,
२ सप्टेंबर २००७

अभावग्रस्ततेचे जीवन जगणाऱ्या माणसांच्या अनुषंगानेच करावा लागतो याचे भान त्यांना फुले-शिंदे-आंबेडकरांच्या वाचनाने आले. लोकशाही, स्वातंत्र्य अशा पुस्तकी परिभाषेत विचार करण्याच्या पद्धतीला




त्यांनी छेद दिला. मार्क्स-लेनिन वाचल्यावर वर्गाधारित समाजात समता-स्वातंत्र्य या मूल्यांचे अर्थ वर्गनिहाय बदलतात, हेही ध्यानात आले. गांधीजींच्या वाचनाने भोळे यांच्या विचाराला एतद्देशीय संदर्भ प्राप्त झाला. फुले-शिंदे-आंबेडकरांच्या विचारांचा सखोल परिणाम भोळे यांच्या लेखनावर पडला व बहुजनवादी व वास्तववादी परिमाण त्यांच्या विश्लेषणाला मिळाले, असे म्हणता येईल. पाठ्यपुस्तकापासून ते स्तंभलेखनापर्यंत आणि साहित्यसमीक्षेपासून ते अनुवादित पुस्तकांपर्यंत भोळे यांच्यावरील बहुजनवादी विचाराचा प्रभाव स्पष्टपणे नजरेत भरतो. त्यांना फुले-आंबेडकरी विचाराची समकालीन संदर्भात फेरमांडणी करायची आहे. हे कार्य त्यांच्या हातून होईलच, यात शंका नाही.

## उपेक्षितांच्या जगण्याचा तळ गाठणारा लेखक

# महादेव मोरे

राजन गवस

मराठी समूहात लेखकाची विशिष्ट अशी एक प्रतिमा आहे. लेखक हा सामान्य माणसापेक्षा वेगळा. त्यामुळे त्याच्याविषयीचे समज-गैरसमज टोकाला पोहचलेले. या समज-गैरसमजास लिहिणारेही या ना त्या प्रकारे खतपाणीच घालत असतात. थोडेफार लेखन-थोडेफार यश एवढ्या शिदोरीवर मराठी लेखक फटाफट समाजापासून तुटत जातो. यातून तो लेखनाच्या ऐवजालाच मुकत जातो. हळूहळू तो उच्चमध्यमवर्गाचा भाग कधी बनून जातो, हे त्याचे त्यालाही कळत नाही. त्यामुळे जगण्यातला जिवंतपणा फारसा वाट्याला येत नाही. जगण्यातली रिस्क घेणे त्याला परवडत नाही. त्यामुळे बहुसंख्य लेखक बऱ्या उत्पन्नाची मासिक सोय लावून भौतिक चंगळखोरीच्या सापळ्यात बसून लेखनाचा मासिकधर्म निभावत असतात. महादेव मोरे यांनी हे जाणीवपूर्वक टाळलं आहे. कधी शेतावर मजुरी, कधी ट्रकवर क्लिनर, कधी ड्रायव्हर, कधी स्वत:चे गॅरेज, मिस्त्री, शेवटी निपाणीच्या सटवाई गल्लीत स्वत:ची पिठाची गिरणी टाकून गावाचे दळप दळत बारा तास उभा असलेला हा जिवंत अनुभवांना कवटाळणारा लेखक आजच्या मराठी लेखकातील एक वेगळे उदाहरण!

मोडकी का असेना टेबल-खुर्ची असावी, लिहायला स्वत:ची एक खोली असावी, मन प्रसन्न ठेवणारे वातावरण असावे एवढे स्वप्न लेखकाचे असणारच. पण अशा स्वप्नातल्या प्रदेशात महादेव मोरे कधी शिरले नाहीत. पिठाच्या गिरणीतली

> *पांढरपेशात वावरतांना*
> *मला चुकल्यागत होतं*
> *पण दलित पददलितात मला*
> *गोतावळ्यात आल्यागत वाटतं...*
>
> *महादेव मोरे*

पिठाने माखलेले बाकडे हेच त्यांचे लेखनस्थळ. गिऱ्हाईक नसेल ती लेखनाची वेळ. केसांपासून पायाच्या नखापर्यंत गिरणीतल्या पिठाचा पांढरटभुरा लेप लेऊन एक लेखक कथा-कादंबरी लिहितोय. ही कल्पना करणेही कठीण. पण याच परिस्थितीत मोरे यांनी आजवरचे लेखन केलेले आहे. हे वास्तव. या असल्या परिस्थितीचा त्यांनी डांगोरा कधी पिटला नाही. मला जगायला मदत करा हो! असा वर्तमानपत्रीय टाहोही कधी फोडला नाही. लेखन ही त्यांची मानसिक गरज. आतल्या ओढीने ते लिहीत राहिले. आजही लिहीत आहेत. गेल्या चाळीस-पंचेचाळीस वर्षांच्या लेखनप्रवासात त्यांनी स्वत:चा असा वाचकवर्ग निर्माण केला आहे.

आंग्लसंपर्कानंतर वाढीस लागलेल्या कथात्मक वाङ्मयाचा परीघ पुणे-मुंबई या शहरांपुरताच मर्यादित झाला. याचे कारण आंग्लानुकरणात जसे आहे तसेच लेखकाचा जीवनविषयक दृष्टिकोण जात-वर्ग यांच्या प्रभावाने भारित होण्यामध्येही सापडते. वाचणारे-लिहिणारे एकाच वर्गातले असल्यामुळे असे होणे स्वाभाविक होते. परिणामी साठपूर्व वाङ्मयातील तोच-तोचपणा विशेष चर्चेत येत राहिला.

१९६० नंतर खेड्यातल्या नवशिक्षित तरुणांमध्ये लिहिण्याची चाह निर्माण होणे, त्यांनी आपल्या जीवनानुभवाला साहित्याच्या परिघात आणणे, या बरोबरच प्रस्थापित वाङ्मयीन संकेतांना धुडकावून नवी वाट शोधणे यामुळे पूर्वपरंपरेतल्या वाङ्मयनिर्मितीने वाचकवर्गाच्या अभिरुचिबदलास आरंभ केला.



महादेव मोरे

**जन्म :** २२ जून १९३९

**कादंबऱ्या**

पाव्हणा (१९६५)

एकोणिसावी जात (१९६८)

रैत (१९७१)

स्टँड (१९७८)

व्हलय (१९८८)

आणि झोंबडं (१९९०) सहित एकूण १८ कादंबऱ्या प्रसिद्ध

**कथासंग्रह**

चिताक (१९७५)

दवना (१९७७)

फरी (१९८४)

बेंडल (१९८६)

तिगाड (१९९३)

गब्रु (१९९४)

सहित एकूण १५ कथासंग्रह प्रसिद्ध

**इतर**

ललितगद्याची तीन पुस्तके प्रकाशित

*डोंबाऱ्याचा खेळ, कोसला, धग, माणूस, टारफुला* या कादंबऱ्यांनी, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील यांच्या कथांनी कथात्मक वाङ्मयाच्या कक्षा रुंदावण्याचा प्रयत्न केला. याचा परिणाम वाङ्मयविषयक धारणा बदलण्यात झाला. असे असले तरी नंतरच्या काळात खेड्यापाड्यातील नव्याने लिहिणाऱ्यांनी सर्वच वाङ्मयीन वास्तव बदलले असे मात्र झाले नाही. उलट मध्यमवर्गीय वाचकांवर डोळा ठेवून कथात्मक वाङ्मयाची निर्मिती होऊ लागली. खेड्यापाड्यातील लेखकांनी ती तशी करावी म्हणून मुंबई-पुण्यातील टोकदार मंडळी जोमाने कामाला लागली. याचे कैक बळी ठरले. यामुळे कथात्मक वाङ्मयातील अनुभव खेड्यापाड्यातले पण ते टोकदार पॉलिश करून वाचकासमोर मांडणारे कंत्राटदार पुण्या-मुंबईतले, अशी स्थिती निर्माण झाली. अशातच भरीसभर म्हणून खेड्यापाड्यातील लिहिणाऱ्यांचेच मध्यमवर्गीयीकरण अपरिहार्यपणे सुरू झाले.

श्रमनिष्ठ व्यवस्थेतून आलेल्या माणसाचे मध्यमवर्गीयीकरण झाले की त्याच्या जगण्याच्या धारणाच बदलतात, हे मान्य करणे शेतीपरंपरेतून आलेल्या व आज पांढरपेशावर्गात आसनस्थ होऊन लेखन करणाऱ्या लेखकांनाही कठीण जाते. पण ती वस्तुस्थिती आहे. या साऱ्या मध्यमवर्गीय लेखकांच्या दुनियेत वयाच्या सत्तरीकडे झुकलेले, अजूनही बारा तास कष्ट करून घाम गाळून स्वत:च्या कष्टाची भाकरी खाणारे आणि निष्ठेने वाङ्मयीन निर्मिती करणारे 'महादेव मोरे' हे अपवादात्मक लेखक आहेत.

सामान्य माणसात सतत वावरणारे, जगण्याच्या गदारोळात लेखननिष्ठा प्रामाणिकपणे जपणारे महादेव मोरे मराठी साहित्याच्या प्रांगणात तसे उपेक्षितच राहिले. याबाबत त्यांची काही तक्रार नाही. त्यांचे समग्र साहित्य न वाचताच स्वत:ला अभिजन




समजणाऱ्या समीक्षकांनी एकदोन ओळींची शेरेबाजी केली. मोरे या साऱ्या गोष्टी फिजूल मानतात. माझ्या लेखनात काही सत्त्व असेल तर ते काळाच्या ओघात टिकेल, नसेल तर संपून जाईल ही त्यांची भूमिका. त्यामुळे प्रसिद्धीपासून दूर, गटातटापासून अलिप्त, सभा-संमेलनांतून मिरवणे नाही की प्रकाशकाचे उंबरे झिजवणे नाही. व्रतस्थपणे लिहिणे, एवढाच त्यांचा धर्म. त्यामुळे दबदबा असणाऱ्या प्रकाशनसंस्थांकडून त्यांची पुस्तके छापली गेली नाहीत. त्यासाठी खटपट, लटपट कधी करावी असे त्यांना वाटले नाही. आपल्या भोवतालाला, आपल्या वर्तमानाला नीटनेटकी, गंभीर प्रतिक्रिया देणे हे त्यांच्यापुरते लेखकाचे काम. ते त्यांनी चोख बजावले. त्यामुळेच मराठी साहित्याच्या आस्थेच्या परिघात नसणारे कैक मानवी समूह त्यांनी आस्थेच्या परिघात आणले. तंबाखूवखारीचे लेखक, मांग-गारुड्यांचे लेखक, ड्रायव्हर-क्लिनरांचे लेखक इत्यादी तुच्छतादर्शक वापरले गेलेले शब्द हीच त्यांच्या साहित्याची बलस्थाने, बिरुदावली आहेत.

महादेव मोरेंचे गाव निपाणी. पुणे-बेंगलोर महामार्गावरील गाव. एखाद्या गावातून जेव्हा महामार्ग जातो तेव्हा त्या गावाचा इतिहास-वर्तमान-भविष्य सगळेच बदलते. याबरोबरच निपाणी आणि तंबाखू यांचे अतुट नाते. निपाणीच्या धमन्यांतून तंबाखू वाहत असतो. आसपास असणारी काळीशार जमीन, त्यातील मुख्य पीकही तंबाखूच, शेतकऱ्यांचा माल खरेदी करणारे आडते, नडते, दलाल, व्यापारी यांचे चक्रावून टाकणारे जग, तंबाखूच्या वखारी, त्यात काम करत करत आयुष्य पाखडणाऱ्या स्त्रिया, त्यांचे शोषण करणारे मालक-दिवाणजी-नोकर-चाकर, यातून जन्म पावणारा वेश्याव्यवसाय, वेश्यांना लुटणारे पोलीस, भडवे, पंटर आणि वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या मालकिणी, त्यांचे ठेवलेले गुंड, महामार्गावरून धावणाऱ्या वाहनांच्या




गर्दीतून जन्म पावलेली गॅरेज संस्कृती, मिस्त्री, मेकॅनिक, ड्रायव्हर-क्लिनर, हाताखालची लहान लहान पोरे, टॅक्सी मालक, टॅक्सी ड्रायव्हर, गाडा संस्कृतीतील हॉटेल्स-मालक-नोकर-मालवाला-भट्टीवाला, टेबल पुसणारी अनाथ पोरे, या बरोबरच आयत्या अमाप पैशातून निर्माण झालेली पैसेवाल्या वर्गाची निर्मिती, त्यांचे नोकर-चाकर, गाड्या, ड्रायव्हर, त्यांच्या उच्च गरजेतून जन्मलेले उच्च शौक, शोषण विरोधात उभारले जाणारे लढे, गोळीबार करणारे पोलीस, त्यांच्या गोळीबाराला बळी पडणारा व अंग चोरून जगत असलेला इथला शेतकरी वर्ग, त्यांची कुणबिक असे बहुविधस्तर पोटात सामावून जगणारी वाढणारी निपाणी नगरी. या बकाल मोहमायावीनगरीत जन्मलेले वाढलेले व याच विश्वाला शब्दरूपात वाचकासमोर ठेवणारे महादेव मोरे भूमिनिष्ठ लेखक आहेत.

आजोबांची रैतकी, वडिलांची टॅक्सी धंद्यात भागीदारी, पण दोन्ही धंदे फारसे न चालणारे त्यामुळे शिकण्यापेक्षा मुलाने पोटापुरते कमवावे ही घरातल्या माणसांची इच्छा. कोल्हापूरच्या गोखले कॉलेजात इंटरला असतानाच त्यांनी शिक्षणाला रामराम ठोकला. पण त्या काळात अनुराधा पोतदारांसारख्या प्रख्यात कवयित्रींच्या वर्गअध्यापनाने मोरे यांच्या मनात वाङ्मयविषयक आवड निर्माण झाली. येथूनच लेखन आणि वाचन त्यांच्या जगण्याचे सोबती बनले.

शिक्षण अर्धवट, घरची परिस्थिती गरिबीची यामुळे पोटासाठी मोरे विविध उद्योग करू लागले. कॉलेज सोडल्या सोडल्या दोन-तीन वर्षे शेतमजुरी केली. सात-आठ वर्षे मोटर गॅरेजमध्ये बापू मेस्त्री, कुंभार मेस्त्री यांच्याबरोबर भागीदारी करून स्वत:चे मोटर गॅरेज सुरू केले. पण मोटार मेस्त्री व्यवसायातील भागीदार लोकांना असणारे दारू, बिडी-सिगरेट-रंडीबाजीचे व्यसन यामुळे धंदा बुडीत गेला. भागीदारी बुडल्यानंतर स्वत:चे स्वतंत्र गॅरेज सुरू केले. नवीन धंदा. त्यात भरमसाठ उधारी पडत गेल्याने महिना पंधरा रुपये भाडे भागवणेसुद्धा जमेनासे झाले. परिणामी गॅरेज बंद करून निपाणीतल्या सटवाई गल्लीत पीठाची गिरणी सुरू केली. आजही सत्तरीकडे झुकलेले मोरे पिठाच्या गिरणीत बारा-बारा तास पीठ माखल्या देहाने उभे राहून सटवाईने लिहिलेले नशीबाचे भोग भोगत आहेत. मात्र लेखनावरचे प्रेम अविचल आहे.

निपाणी सीमाप्रदेशातील धगधगते गाव. सतत आंदोलने, मोर्चे, नव्या चळवळी या साऱ्याचे महादेव मोरे सहप्रवाशी आहेत. कधी तटस्थ निरीक्षक तर कधी प्रत्यक्ष सहभागी अशा वेगवेगळ्या भूमिकेतून ते वावरत असतात. त्यांच्या जगण्यातील सामान्य माणसाविषयीची आस्था हीच त्यांच्या लेखनाची महत्त्वाची ऊर्जा आहे.

महादेव मोरे यांची पहिली कथा 'साप्ताहिक स्वराज्य' मासिकात १९५९ साली प्रसिद्ध झाली. आजवर त्यांचे पंधरा कथासंग्रह आणि अठरा कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. *एकोणिसावी जात, व्हलम, पाव्हणी, दैत, स्टँड, झोंबड* या त्यांच्या उल्लेखनीय कादंबऱ्या. *तर चिताक, दवना* हे त्यांचे महत्त्वाचे कथासंग्रह. वरकरणी बहुप्रसव वाटणारी त्यांची लेखणी सामान्य माणसाच्या जगण्याचा तळ गाठण्याचा ध्यास सतत बाळगताना दिसते. त्यांच्या साहित्यानुभवाचे भौगोलिक क्षेत्र निपाणी



आणि निपाणी परिसर आहे. या भौगोलिक क्षेत्रातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक या साऱ्या गुंतागुंतीचे जीवनचित्रण त्यांच्या साहित्यात आलेले आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्यातील जीवनचित्रण वैचित्र्यपूर्ण आणि व्यामिश्र बनले आहे. मानवी स्वभावाच्या अनेक वृत्ती-प्रवृत्तींनी त्यांचे साहित्यविश्व गजबजलेले आहे. मोटार व्यवसायातील मालक–ड्रायव्हर–क्लिनर–मिस्त्री, पोलीस अधिकारी, आर. टी. ओ., तंबाखू व्यवसायातील स्त्री-पुरुष दिवाणजी, मालक, बिछायत लोक, पुरुषी कामवासनेला बळी पडलेल्या व उपजीविकेसाठी शरीरविक्रय करणाऱ्या वेश्या, दलाल, भडवे, गुंड, यल्लाम्मा देवीच्या नावावर सोडलेले जोगते, जोगतीणी. परिसरातील शेतकरी, शेतमजूर. भटक्या समाजातील बेलपत्तारी, डवरी, गोसावी, भंगी, अस्वलवाले, लमाणी, डोंबारी, मांग-गारुडी, मुरुडी इत्यादींच्या जीवनचित्रणाने मोरे यांचे साहित्य समृद्ध झालेले आहे. त्यांच्या साहित्यात येणारी उपरोक्त सर्व मंडळी त्यांच्या सोबत जगणारी, त्यांच्या अनुभवविश्वातील आणि त्यांच्याशी निर्माण झालेल्या घनिष्ठ नातेसंबंधातून साहित्यात येतात.

या विविध जातिजमातितील, विविध स्तरांतील, भिन्नभिन्न जातीधर्मांतील लोकांच्या पाचवीला दारिद्र्य, अज्ञान, व्यसनाधीनता पूजलेली आहे. तर कष्टकरीवर्गाला नाडणारा दलालांचा व मालकांचा वर्ग, ऊसाच्या व तंबाखूच्या पैशाने श्रीमंत झालेला शेतकरीवर्ग व त्यांचा चंगळवाद, त्यातून निर्माण झालेली चित्रपटगृहे, हॉटेल्स, जुगार अड्डे, मद्यपानगृहे, वेश्यागृहे मोरे यांच्या साहित्यात आपोआपच येतात. रुचिपालट म्हणून खालच्या व मध्यमवर्गातील लोकांनी या अनैतिक धंद्यास दिलेली बळकटी मोरे तपशिलाने आपल्या साहित्यात चित्रित करतात. दलित, ग्रामीण, भटके, मुस्लीम या साऱ्या समूहांना आपल्या साहित्यात व्यापक सहानुभावाने चित्रित




करणारे मोरे व्यापक संवेदन स्वभावाचे लेखक आहेत.

महादेव मोरे यांच्या कादंबरीतून मोटार व्यवसायातील अनोख्या जगाचा प्रवेश मराठी साहित्यात झाला. त्यांनी *एकोणिसावी जात, पनोती, स्टॅन्ड, लाईन, झण्डा, व्हलम* या कादंबऱ्यांतून मोटारविश्वाचा उभा-आडवा छेद घेतलेला आहे.

*मोठं विलक्षण जग मोरे यांच्या कथांत आहे. अनुभवाचे अनोखे विश्व मोरे यांनी साहित्यात आणले. पीडक आणि पीडित, शोषक आणि शोषले जाणारे हाच, हाच प्रॉब्लेम गॉर्की आणि चेकॉव्हना दिसला. हाच अप्टन सिंक्लेअर आणि पर्लबक यांना दिसला.*

*पण मोरे यांचा कलात्मक संयम असा मोठा आहे की, त्यांनी सर्व सांगून, सुचवूनही कथेचा घाट आणि आत्मा बिघडू दिला नाही. न पेलणारे भाष्य बुद्ध्या सांगितले आहे असे वाटणारे तत्त्वज्ञान यांना त्यांनी दूर ठेवले आहे. जशी रसिकांची जाणकारी असेल तसे त्याला हे भावेल, एवढेच.*

*पर्ल बकने पाहिलेल्या कालखंडातल्या चिनी स्त्रिया आणि सिंक्लेअरच्या शिकागोमधल्या त्या कामगार स्त्रिया जशा धनिकांच्या वासनांच्या शिकारी झाल्या तशा मोरे यांच्या कथांतील स्त्रियाही परिस्थितीच्या शिकार होताहेत. देह भ्रष्ट होणं, देह विटाळणं, संस्कृती, शील, पावित्र्य या कल्पना इथे पुस्तकी ठरतात. व्यवहाराची आच लागली की त्या जळून जातात.*

प्रा. अनंत मनोहर
('ईगीन' या कथासंग्रहाच्या प्रस्तावनेतून)

*श्री. महादेव मोरे हे १९६० नंतरच्या काळात उदयास आलेल्या ग्रामीण साहित्यिकांपैकी महत्त्वाचे लेखक आहेत. त्यांनी त्यांच्या लेखनातून बदलत्या ग्रामीण जीवनात प्रवेश करत्या झालेल्या नव्याच व उपेक्षित माणसांचे जग रेखाटले आहे. कांदबरी लेखनाशिवायही त्यांनी विपुल प्रमाणात लेखन केलेले आहे. परंतु एकूणच मराठी समीक्षकांचे लक्ष त्यांच्या लेखनाकडे अजूनही फारसे गेलेले नाही. आपल्या लेखनात रंजनात्मकता हेतूतः आणण्यापेक्षा त्यांनी रेखाटलेल्या जगातील माणसांच्या व्यथा-वेदना आणि त्यांचे एकूणच जगणे किती क्लेशदायी आहे हे मांडण्याचा त्यांचा प्रयत्न विचारात घेणे आवश्यक आहे.*

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

*एकोणिसावी जात* ही त्यांची विशेष उल्लेखनीय कादंबरी.

भारतीय समाजात असणाऱ्या अठरापगड जातींत मोटारव्यवसायातील ड्रायव्हरच्या रूपाने एका नवीन जातीची भर पडली आहे. या एकोणिसाव्या जातीचे समग्र चित्रण मोरे आपल्या कादंबरीत करतात. जीवनसंघर्षात चिवटपणे झुंज देणाऱ्या ड्रायव्हरशिवाय खाजगी गाड्यांचा धंदा करणारे मालक, एकोणिसाव्या जातीला पुरेपूर लुटणारे पोलीस, आर. टी. ओ. ही विसावी जात. या व्यवसायातील स्पर्धा, वृत्ती-प्रवृत्ती, संघर्ष, अपघात असे अनेक उपघटक या कादंबरीत येतात. कादंबरीचा नायक नारायण अनाथ होऊन बहिणीच्या घरातून बाहेर पडतो आणि विपन्नस्थितीत जीवन कंठता कंठता ड्रायव्हर बनतो आणि त्याच्या जगण्याचा सारा पट या कादंबरीतून उलगडत जातो.



त्यांच्या *पनोती* कादंबरीतील नायक मांग-गारुडी समाजातील असून पाकिटमारीचा व्यवसाय सोडून मिस्त्री व्यवसायात येतो. या कादंबरीत पाकिटमारांचे जग आणि मिस्त्री व्यवसायातील चकित करणारे अनुभवविश्व मोरे पहिल्यांदाच कादंबरीच्या माध्यमातून वाचकांसमोर आणतात. मोरे यांनी *वर आभाळ खाली धरती* या कादंबरीत या भागातील देवदासी प्रथेचे स्वरूप वाचकांसमोर ठेवले आहे. चंपा नावाच्या जोगतिणीच्या जगण्याची होरपळ मांडणारी ही कादंबरी या भागातील सामान्य माणसांच्या जगण्यावर रूढी परंपरांची असणारी दहशत अधोरेखित करते.

त्यांनी *लोफड* आणि *प्रवाह* या कादंबऱ्यातून या भागातील बेरोजगार तरुणांचे तांडे स्वत:चे पोट जाळण्यासाठी वाममार्गाकडे कसे वळतात याचे अत्यंत वास्तवदर्शी चित्रण केलेले आहे. या वाममार्गातून वाढणारी व्यसनाधीनता, मारामाऱ्या, खून, बलात्कार या अपप्रवृत्ती कशा वाढतात याचाही वेध घेतलेला आहे. अफू, चरस, गांजाचे जग, निमशहरातील गुन्हेगारी विश्वाचे स्वरूप, कायदाबाह्य वागणाऱ्यांचे जग, राजकारणी, पुढारी, मंत्री, मटकावाले, त्यांचे बुकी, बॉस, दादा हे सारे आणि यांचे बळी ठरलेले बेकार तरुण मोरे यांच्या उपरोक्त दोन्ही कादंबऱ्यात केंद्रस्थानी येतात.

महादेव मोरे यांनी वेश्याव्यवसायातील स्त्रियांचे जगणे *खोंबारा, भुगवटा, मासाय, यशोदा, एका फुलाची गोष्ट, ऐलतीर पैलतीर, नाम्ना, उझाळ, बहाणा, काळोखखुणा, प्रतिक्षा, भोरड्या, बाळी* इत्यादी कथांतून मांडले आहे. दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा, तारुण्याच्या पदार्पणात वाट चुकलेल्या,



देवदासी म्हणून सोडलेल्या, उपजीविकेसाठी स्वत:चे घर आशुक माशुकांना भाड्याने देणाऱ्या, स्वत: व्यवसाय करून इतर पोरींना धंद्याला लावणाऱ्या इत्यादी विविध स्त्रियांचे जग मोरे यांच्या कथांतून चित्रित झाले आहे. येथे अनेक पोरांना फिरवणाऱ्या दुरपीचे लग्न त्याच गावात होते, याचे लोकांना आश्चर्य वाटत नाही. तसेच एखाद्या वेश्येच्या आईचे महारोगीपण तिच्या लग्नाच्या आड येत नाही. येथे लग्नापूर्वी वेश्याव्यवसाय करणारी पण लग्नानंतर एकनिष्ठ संसार करणारी बाळव्वा भेटते. तसेच व्यसनी-गुंडमाणसाबरोबर लग्न करणारी वेश्या भेटते. या साऱ्या चित्रणातून मोरे पांढरपेशा लेखकांच्या साहित्यातील सीमित जगातील नीती-अनीतीच्या रूढ कल्पनांपेक्षा तळागाळातील लोकांच्या विशाल जगात नीती-अनीतीचे कायदे वेगळे असतात हेच सांगून जातात.

तंबाखू व्यवसायाचे चित्रण करणाऱ्या त्यांच्या *आडगार* व *झोंबड* या कादंबऱ्या विशेष महत्त्वाच्या आहेत. *झोंबड* या कादंबरीत तंबाखू पिकवणारा शेतकरी, तो विकत घेणारा व्यापारी, तंबाखूवर प्रक्रिया करणारे वखार मालक, दिवाणजी, तंबाखूच्या खळ्यात काम करणारे मजूर, स्त्री-पुरुष कामगारांना व शेतीमालाला योग्य भाव मिळावा म्हणून झगडणारे, आंदोलन करणारे कामगार नेते, शेतकरी नेते, शेतकऱ्यांना व मजुरांना लुबाडणारे सरकारी अधिकारी, वरील सर्व घटकांचा स्वार्थीपणे वापर करून घेणारे राज्यकर्ते या समूहाचे तपशिलाने चित्रण येते. आणि शेवटी सामान्य

*मोरे यांच्या कथांतील ही माणसं स्वतःच्या भाषेत बोलतात. नागर वाचकाला ही भाषा चक्रावून टाकील. पण ही भाषा रसरशीत नि जिवंत आहे. तिचं वळण कानडीमिश्रीत मराठीचं आहे. यातले मुसलमान कानडी–मराठीमिश्रीत हिंदी बोलतात. त्या बोलण्यात जोर आहे, ठसका आहे. निपाणी–बेळगाव मराठी सीमा भागातले खास शब्दप्रयोग त्यात आहेत. बडद्याडणं, यरगाटणं, भाकऱ्या मुरगाळणं इ. सारखे वैशिष्ट्यपूर्ण शब्द तर शेकड्यांनी आहेत. वाक्यप्रचार, म्हणी स्वतःचं असं खास वळण असलेल्या आहेत. समाजाच्या तळागाळातील ही अनेकानेक माणसं आपापल्या वळणाने बोलतात. कधी दृष्टांत, कधी समर्पक उपमा त्यांच्या बोलण्यात असतात.*

*खरं तर या कथा ग्रामीण बोलीत सांगितल्या जात असल्या तरी त्या अस्सल माणसांच्या वास्तवपूर्ण कथा आहेत. ही माणसं हे मला अनंत काळाचं चित्र वाटतं. म्हणून मला या कथांना कसला शिक्का मारावा, असं वाटत नाही.*

प्रा. अनंत मनोहर
('ईगीन' या कथासंग्रहाच्या प्रस्तावनेतून)

माणसांची होणारी अक्षम्य परवड या कादंबरीचा गाभा बनते.

मोरे यांनी आपल्या *पाव्हणा, दैत, झंगाट* या कादंबऱ्यांतून कृषिजन संस्कृती, गावगाडा, गावगाड्यातील जातिपातीची रचना, रूढी, परंपरा, नीती-अनीतीच्या कल्पना, राजकारण, दुष्काळ, दारिद्र्य, गावगाड्यावर अवलंबून असणाऱ्या अठरापगड जाती-जमाती, भटके-फिरस्ते, शेतीवर नशीब काढणाऱ्यांचे होणारे हाल, त्यांच्या जगण्यातील संकटाची मालिका, समूहभाव या साऱ्याचे सूक्ष्मचित्रण केलेले आहे. या कादंबऱ्यांतूनच गवंडी, लोहार, सुतार, चांभार हे छोटे व्यावसायिक जसे भेटतात तसेच त्यांच्या *वस्ती* या कादंबरीत मोरे वृत्तीसंघर्ष शोधण्याचा प्रयत्न करतात. त्यात लपलेली हिंसा, अमानुषता आणि तरीही बाकी उरणारी अगतिकता मोरे आपल्या साहित्यातून अधोरेखित करतात.



कष्टकऱ्यांच्या जगण्यातील श्रमजीवी व्यवस्थेचा उभा-आडवा छेद घेणारे व व्यापक आस्थेचा परीघ असणारे मोरे हे एकमेव लेखक आहेत असे म्हणण्याचा मोह व्हावा इतक्या समर्थपणे त्यांनी कष्टकऱ्यांच्या जगण्याचा वेध घेतलेला आहे. शेतात राबणारा शेतमजूर, गॅरेजमधील मिस्त्री, ट्रकवर खपणारा क्लिनर यापासून ते वेश्या व्यवसायातील सामान्य पंटर इथपर्यंतचे विविध श्रमजीवी त्यांच्या वृत्ती-प्रवृत्तीसह मोरे यांच्या साहित्यात येतात. कथा–कादंबरी याबरोबरच मोरे यांनी ललितलेख विपुल संख्येने लिहिले आहेत. या ललितलेखांतून त्यांच्या कविवृत्तीचा प्रत्यय येतो.

मोरे लिहीत असलेल्या काळात दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, मुस्लीम साहित्य असे वेगवेगळे प्रवाह वेगवेगळ्या वेळी निर्माण झाले. नंतर त्यातील काही एकारलेही. पण या सर्व प्रवाहांना पोटात घेऊन लेखन करण्याची वृत्ती मात्र आकारास आली नाही. महादेव मोरे या सर्व प्रवाहातील कर्तेसवर्ते लेखक नसले तरी उपरोक्त सर्वांना आस्थेच्या परिघात सामावून घेणारे लेखक आहेत हे मात्र निश्चित. त्यामुळे त्यांच्या लेखनाला विशिष्ट असे लेबल लावणे त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे आहे.

मोरे कथा, कादंबरीची मांडणी करीत असताना जो निवेदक निर्माण करतात तो या सामान्य माणसांच्या मौखिक परंपरेतील निवेदकाजवळ जाणारा निवेदक असतो. कधी कथाविश्वाबाहेर राहून तर कधी कथाविश्वाच्या केंद्रस्थानी राहून तो गोष्टी-वेल्हाळपणे निवेदन करत जातो. त्यामुळे त्यांच्या कथानकांची मांडणी सरळ, साधी, सोपी, सहज बनत जाते. त्यांच्या कथात्मक साहित्यात येणारी सीमा भागातील मराठी-कन्नड सहसंबंधातून विकसित होत गेलेली सर्वस्वी वेगळी अशी बोली विशेष महत्त्वाची आहे. महादेव मोरे यांच्या साहित्याबाबत भुवया उंचावणाऱ्यांनी मोरे यांनी मराठी भाषेला दिलेले शब्द, म्हणी, वाक्प्रचार जरी नजरेखालून घातले तरी त्यांच्या भुवया जागच्या जागी स्थिर होतील. सीमा-भागातील संस्कृती संकर, सीमाभागातील भाषा संकर, सीमाभागातील कला संकर मोरे




जाणीवपूर्वक अधोरेखित करतात. या प्रदेशातील जनजीवन हिंदू-मुस्लीम-जैन-लिंगायत अशा धर्मपंथांनी व्यापलेले आहे. यातून एक नवीनच जीवनशैली, भाषाशैली या भागात निर्माण झालेली दिसते. मोरे आपल्या साहित्यात या जीवनशैलीला, भाषाशैलीला नेमकेपणाने पकडण्याचा प्रयत्न करतात.

तळागाळातील उपेक्षित माणसांच्या जगण्याचा तळ गाठणारे, सामाजिक वास्तव थेटपणे मांडणारे महादेव मोरे हे मराठीतील महत्त्वाचे पण उपेक्षित लेखक आहेत. निपाणीसारख्या साहित्यवर्तुळाच्या बाहेर असणाऱ्या गावात राहून प्रसिद्धीच्या झगमगाटाला दूर सारून एकांतात एकाकी साहित्यनिर्मिती करणारे महादेव मोरे हे महत्त्वाचे लेखक आहेत. त्यांच्या साहित्याचे नेमके, नीट आकलन व्हायचे झाल्यास समीक्षक, उच्चभ्रू वाचकवर्गाने आपल्या जीवनकक्षा व आस्थेचा परीघ लवचीक करायला हवा तरच त्यांच्या साहित्याच्या गाभ्यापर्यंत पोहचता येईल. अशा मक्तेदारांनी आतातरी आपला ताठा सोडून महादेव मोरे यांच्या साहित्याचे पुनरावलोकन केले पाहिजे. सामान्य माणूस मोरे यांचे साहित्य वाचत असताना अडखळत नाही. तो त्यांच्या नव्या लेखनाची आतुरतेने वाट पाहताना दिसतो. सामान्य माणसाशी मोरे यांनी निर्माण केलेले नाते विशेष महत्त्वाचे आहे.

एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात माहिती-तंत्रज्ञानाचा स्फोट आपण अनुभवत असताना आजही एक संवेदनशील लेखक फोनसारख्या साध्या सुविधेपासून वंचित राहून पिठाच्या गिरणीत मजुरासारखे राबराब राबून वयाच्या सत्तरीतही साहित्यनिर्मिती करत आहे. या बरोबरच आपल्या अवती-भवतीच्या लिहिणाऱ्या लेखनाकडे विशेष गांभीर्याने पाहतो आहे. त्यांचे लेखन गांभीर्याने वाचतो आहे. कधी कोणी नवा लिहिणारा गिरणीत आलाच तर त्याला विशेष आस्थेने मार्गदर्शन करतो आहे. वयाची सत्तरी, त्यात पत्नीचे आजारपण, संसाराचे व्यापताप याची रेघही चेहऱ्यावर दिसू न देता अत्यंत प्रसन्न जगणारे महादेव मोरे मला लेखकापेक्षा माणूस म्हणून खरोखरच आदर्श वाटतात. कारण असे माणूसपण आता लिहिणाऱ्यांच्यातही दुर्मीळ होत चालले आहे.



छायाचित्रात्मक शोधनिबंध

# तमाशा : एक रांगडी गंमत

विद्यागौरी खरे

संदेश भंडारे ह्यांचे *तमाशा : एक रांगडी गंमत* हे पुस्तक पाहिल्याबरोबर उचलून हातात घ्यावेसे वाटले ते त्याच्या मुखपृष्ठामुळे. एका मोठ्या जनसमूहाच्या छायाचित्राने पुस्तकाचे मुखपृष्ठ आणि मलपृष्ठही व्यापले होते. छाया, प्रकाश आणि रंग ह्यांचे इतके सुंदर चित्रण कितीतरी दिवसांनी नजरेस पडत होते. पांढरे सदरे आणि पांढऱ्या टोप्यांमध्ये रंगीबेरंगी पागोटी झळकत होती पण ह्या चित्रात खऱ्या अर्थाने रंग भरत होते ते समोरच्या दृश्याशी पूर्णपणे एकरूप होऊन त्याला प्रतिसाद देणारे हसरे चेहरे. प्रौढ व्यक्तींच्या चेहेऱ्यावर असा लहान मुलांसारखा निर्व्याज आनंद पहायला मिळणं विरळाच—ह्या छायाचित्रामध्ये केवळ एक दोन व्यक्तीच नाही तर एका मोठ्या समुदायाच्या चेहेऱ्यावरचे निखळ आनंदाचे भाव छायाचित्रकाराने आपल्या कॅमेऱ्यामध्ये पकडले होते. पुस्तकाच्या मलपृष्ठावर लिहिले होते "महाराष्ट्रातील शेतकरी दोन वेळा खळाळून हसतो—सुगीच्या वेळी आणि तमाशा पाहताना." चित्र आणि हे भाष्य ह्या दोन्हींमुळे मी पुस्तकाकडे ओढली गेले.

*तमाशा : एक रांगडी गंमत* हे भंडाऱ्यांचे पुस्तक म्हणजे छायाचित्रांच्या माध्यमातून सादर केलेला एक शोधनिबंधच आहे. पुस्तकाच्या सुरुवातीला त्यांनी लिहिलेले मनोगत वाचल्यावर जाणवतं की 'लोकांचे रोजचे जगणे' हा भंडाऱ्यांच्या जिव्हाळ्याचा आणि चिंतनाचा विषय आहे. 'कुस्ती' ह्या विषयाचा शोध घेत असताना त्यांना 'तमाशा' भेटला. दोन्हीही महाराष्ट्रातील ग्रामीण भागात रुजलेल्या लोककला. तमाशाची पंढरी समजल्या जाणाऱ्या नारायणगावापासून भंडाऱ्यांनी आपल्या अभ्यासयात्रेला प्रारंभ केला. आपल्या मनोगतात ते म्हणतात, "वर्तमानपत्रात छायाचित्रकार म्हणून ज्या बेदरकारपणे फोटो काढले जातात त्याप्रमाणे मला हे काम करावयाचे नव्हते. समोर घडणाऱ्या प्रसंगाचे झडप घातल्याप्रमाणे चित्रण करणे माझ्या मनाला पटत नव्हते. त्यांच्याबरोबर चांगला संपर्क प्रस्थापित झाल्याशिवाय फोटो काढू नयेत असे मन म्हणत होते." अशा संवेदनशीलतेने भंडाऱ्यांनी तमाशा कलावंतांच्या जगण्याचा मागोवा घेतला. ह्या अभ्यासामुळे त्यांच्या मनात अनेक प्रश्न उभे राहिले. ते म्हणतात, "ह्या कलावंतांचे जगणे कसे आहे, जीवनस्तर काय आहे, त्यांच्याकडे आपण कसे पाहतो, त्यांच्याबद्दल काय विचार करतो, विचार तरी करतो का हे वास्तव पेलणे अवघड होत होते... त्यांचे फोटो का काढत आहोत, कशाकरता काढत आहोत असे प्रश्न मला पडू लागले."

भंडाऱ्यांना वाटणाऱ्या अस्वस्थतेने अंतर्मुख होऊन जेव्हा आपण विचार करू लागतो तेव्हा अनेक प्रश्न आपल्याही समोर उभे राहतात. मध्यमवर्गीय शहरी व्यक्ती तमाशा पाहते का? ते तिच्या मनोरंजनाचे साधन आहे का? ही महाराष्ट्राची लोककला आहे आणि तिचा आणि आपला काहीच संबंध नाही? मला

> *"आपले लोक चित्रपट बघतात म्हणजे त्यातील गोष्ट पाहतात, नाटक बघतात म्हणजे त्यातील संवादावर लक्ष केंद्रीत करतात. एखादे चित्र असो वा छायाचित्र असो त्यातही ते गोष्टच शोधू पाहतात... त्यातील दृश्य भागाकडे मात्र दुर्लक्ष करतात, डोळे आहेत म्हणून पाहतात पण काय पाहतात ते त्यांनाही कळत नाही... छायाचित्रांची देखील एक भाषा असते, ती समजून घेण्याचा मात्र प्रयत्न होत नाही...*
> *या छायाचित्रांनी मी वेडावून गेलो; स्वत:ला विसरून जाऊन मी ती पाहत राहिलो. छायाचित्रकाराने त्यासाठी खूप कष्ट घेतले आहेत. खरे तर हे पुस्तक नाही तर तमाशातील लोकांच्या जगण्याचा प्रबंध आहे. त्याची स्पंदने आपल्याला पुस्तकभर जाणवत राहतात."*
>
> विजय तेंडुलकर


ANJALI

संदेश भंडारे

**जन्म :** २५ जून १९६३

**छायाचित्रात्मक ग्रंथ**

पुणे : क्वीन ऑफ डेक्कन (२०००)
ब्राह्मण (२००१)
तमाशा : एक रांगडी गंमत (२००६)
मुंबई विद्यापीठ : शहराचे भूषण (२००६)

**छायाचित्र प्रदर्शन**

पुणेरी ब्राह्मण (मुंबई, १९९५; लंडन, २००७)
देवळी कोनाडा (मुंबई, १९९९)
कुस्तीचा आखाडा (मुंबई, २००१)
बहुरूपी (पुणे, २००४; मुंबई २००४)
तमाशा (महाराष्ट्र आणि कलकत्ता येथे २००३-०४ या काळात प्रदर्शन)
३ वर्षांपर्यंतच्या बालकांच्या मानसिक व शारिरीक विकास अवस्था
(महाराष्ट्र आणि भारतातील सात राज्यांत)

जाणवलं की माझं आणि माझ्यासारख्या मराठी माणसांचं तमाशाचं ज्ञान हे मराठी चित्रपटांमधून कमावलेलं आहे. गण-गवळण, वग, लावणी, दौलतजादा ह्या शब्दांपुरतेच ते मर्यादित आहे. जयश्री गडकर आणि हंसा वाडकर, सूर्यकांत आणि चंद्रकांत ह्यांच्या अभिनयापलीकडे ते जात नाही. राम जोशी, होनाजी बाळा, पठ्ठे बापूराव असे एका हाताच्या बोटावर

फुलवणारी ही रांगडी गंमत आपल्याला पूर्ण अनोळखी आहे.

पुस्तक वाचताना आणि पाहताना लक्षात येतं की ह्या पुस्तकाचे वेगळेपण भंडाऱ्यांना त्यांच्या चित्रविषयाबद्दल वाटणाऱ्या आदरात आहे. हे निर्विकार अनास्थेने केलेलं यांत्रिक छायाचित्रण नाही. ह्यातली माहितीसुद्धा 'कोरडी जंत्रीवजा गोळा केलेली आकडेवारी' ह्या स्वरूपाची नाही. तमाशावरच्या ह्या

मुलाखती घेतल्या, त्यांच्याबरोबर त्यांच्या फडांवर राहिले. महाराष्ट्रभर कोकण किनार-पट्टीपासून विदर्भापर्यंत फिरले आणि वेगवेगळ्या भागातील तमाशांचा अभ्यास केला. तमाशा हा कलाप्रकार ग्रामीण भागातील बहुजनसमाजाच्या आधाराने उभा आहे हे सतत मनात ठेवून अभ्यास करताना मुद्दाम लहान गावं निवडली. तिथे पोचण्यासाठी तमाशाच्या गाडीतून,




मोजता येतील इतकेच शाहीर आपल्याला माहीत आहेत. भंडाऱ्यांचं पुस्तक पाहत असताना प्रकर्षाने जाणवलं ते हे की महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनात रुजलेली ही कला आहे, तिथल्या मातीने खत-पाणी घालून तिची मशागत केली आहे पण त्या रापलेल्या चेहेऱ्यांवर मनमोकळं हसू

पुस्तकामध्ये तमाशा कलावंतांइतकंच महत्त्व तमाशा पाहणाऱ्या प्रेक्षकांना आहे. आनंद देणारे आणि घेणारे— दोघांचीही मानसिकता जाणून घ्यायची असल्याने भंडाऱ्यांनी पूर्ण तयारीनिशी कामाला सुरुवात केली. मान्यवर अभ्यासकांची ह्या विषयावरची पुस्तके वाचली, तमाशातील कलावंतांच्या

सार्वजनिक वाहनातून, प्रसंगी पायीसुद्धा प्रवास केला. तमाशा करणाऱ्या कलावंतांच्या प्रेरणा काय आणि तो पाहणाऱ्या प्रेक्षकांच्या मागण्या काय हे जाणून घेण्यासाठी भंडारे त्यांच्यातलेच एक होऊन राहिले, आणि जे अनुभवले ते छायाचित्रबद्ध केले.

छायाचित्रांमधून सूचित होणारा अर्थ स्पष्ट करण्यासाठी शब्दांची मदत घेतली. तमाशा कलावंतांच्या व्यथा आणि वेदना, स्वाभिमानाने जगण्यासाठी चाललेली त्यांची धडपड त्यांच्याच शब्दात उद्धृत केली ज्यामुळे छायाचित्रं जिवंत झाली.

विदर्भातील नामवंत शाहीर अंबादास ह्यांच्या एका उमद्या छायाचित्राने 'बतावणी' ह्या पहिल्या प्रकरणाची सुरुवात होते. तमाशात गवळणीनंतर 'बतावणी' हा चुटकेवजा प्रहसनात्मक प्रकार असतो ज्याच्यावर सोंगाड्याचे पूर्ण वर्चस्व असते. समकालीन राजकीय, सामाजिक घटनांचे ज्ञान असलेला, बहुश्रुत आणि कल्पक सोंगाड्या असेल तर तमाशा यशस्वी होतो. ह्या प्रकरणात तमाशाचा ऐतिहासिक आढावा थोडक्यात वाचायला मिळतो. गोंधळ, भारुड ह्यासारख्या धार्मिक करमणुकीत तमाशाची मुळं जशी सापडतात तशीच ती मुसलमानी आक्रमणानंतर लोकप्रिय झालेल्या बाजारी करमणुकीमध्येही सापडतात. भंडारे सांगतात, ''महाराष्ट्रात जत्रा, सण अशा प्रसंगी लोकनाट्याचे जे प्रकार सादर होत त्यातील मुख्य प्रकार 'गंमत' ह्या नावाने ओळखला जाई... त्या काळी लोकांच्या अभिरुचीला पटणाऱ्या अशा मनोरंजनाच्या साऱ्या गोष्टी 'गंमत' ह्या सदरात येत... पुढे त्याला 'खेळ–तमाशा' हे नाव पडले. यासाठी गावकीच्या उत्पन्नातून 'देकार' नावाची देणगी बाजूला काढून ठेवली जाई. चिठ्या-पत्रकात 'विल्हेवाट' या सदराखाली याची नोंद आढळते.''

आजही महाराष्ट्रात दसऱ्यापासून ते अक्षय्यतृतीयेपर्यंत तमाशाचे अनेक लहान-मोठे फड गावोगाव फिरून आपले कार्यक्रम करतात. कधी सुपारी देऊन त्यांना बोलावले जाते तर कधी बाजारच्या दिवशी स्वत: तिकिटे लावून ते प्रयोग करतात. ''अगदी ज्या गावात पत्रंसुद्धा जात नाही अशा गावात जाऊन लोकांची करमणूक करतो तोच खरा तमासगीर.'' असं गफूरभाई पुणेकर सांगतात. तमासगीराची ही व्याख्या करतानाच हायवेवरची तमाशाकेंद्रे, संगीतबाऱ्या, बैठकीच्या लावण्या ह्यांच्यामुळे तमाशा ह्या कलेबद्दल पसरत असलेले गैरसमज आणि त्याबद्दल त्यांना वाटणारा विषादही ते व्यक्त करत असतात. तमाशा कोण करतात. कुणासाठी करतात ह्याबद्दल लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. गंगाधर मोरजे ह्यांचे विचार भंडारे उद्धृत करतात— ''अंबाबाई, खंडोबा आदी लोकदेवतांच्या यात्रा, उत्सवप्रसंगी रंजन करण्यासाठी तमाशा उभा राहतो. तसेच ग्रामीण जनता, शेतकरी, कामगार, शिपाईगडी अशी तमाशाची प्रेक्षक मंडळी आहेत. तमाशा सादर करणारे कलावंत सर्वसामान्य जीवन जगणारे होते. लोकसंस्कृती परंपरेतील गोंधळी, वाघ्या-मुरळी, वासुदेव, भराडी, बहुरूपी, कीर्तनकार ही सामान्य माणसेच होती. अभिजात व प्रस्थापित वर्गाची अभिरुची असलेले अभावानेच होते हे समजून घ्यावे लागेल. तमाशा हा लोककलाप्रकार लोकांनी, लोकांसाठी केलेला, लोकांचा जीवनानुभव प्रकट करणारा लोककलाप्रकार असतो.''

तमाशा कलावंतांच्या ह्या यादीत आता बंद पडलेल्या गिरण्यांमधील मजूर, धरणांमुळे विस्थापित झालेली माणसं ह्यांचाही समावेश झाल्याचे भंडारे नमूद करतात.

तमाशाचं हे स्वरूप भंडाऱ्यांच्या पुस्तकात पानापानावर व्यक्त होतं. तमाशा कलावंतांची आणि तमाशाच्या प्रेक्षकांची अनेक छायाचित्रं इथे पहायला मिळतात. प्रामुख्याने जाणवतं ते त्यांचं ग्रामीणपण. हे ग्रामीणपण तमाशाच्या जागा, रंगमंच, प्रेक्षकांची बसायची सोय, त्यांचा पेहराव, कलावंतांच्या राहण्या-जेवण्याची सोय, त्यांची साथीची वाद्यं ह्या सगळ्यात दिसतं आणि कोकणापासून विदर्भापर्यंत सगळीकडे दिसतं. उघड्यावर, माळरानावर, कधी बसून तर कधी उभं राहून गर्दीने आणि एकाग्रतेने तमाशा पाहणारे प्रेक्षक आणि मधल्या वर्तुळात त्यांचं रंजन करणारे कलाकार ह्यांच्यामध्ये एक मेळ जाणवतो. ते दोघेही त्या मातीतून आलेले आहेत, तिच्याशी जोडलेले आहेत. त्यांच्या नात्यात एक खुलेपण आहे. हे सगळं सर्व ठिकाणच्या तमाशात सारखं असलं तरी प्रत्येक ठिकाणच्या तमाशाचे स्वत:चे वेगळेपण आहे. स्थानिक मागणी आणि परंपरा ह्यानुसार तमासगीर आपली कला सादर करतात त्यामुळे पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ,

*...This book is a unique coverage of every aspect of the daily life and strenuous professional existence of members of Tamasha companies as they eke out their lives providing entertainment to multitudes in the countryside whose lives are similarly fraught with hardship and uncertainty.*

*The work is an invaluable social document in that it scrutinizes the audience with as much probity and passion as it does the performers. In the midst of laughing, grinning faces there are sudden visages tragic in their stillness, etched with grief.*

Ebrahim Alkazi

कोकण, मराठवाडा वगैरे भागात तमाशाचे वैशिष्ट्यपूर्ण प्रकार घडले आहेत. त्यातील काहींचा इथे आढावा घेतला आहे.

सातारा, सांगली, कराड, कोल्हापूर ह्या भागात झाडाखालचे तमाशे होतात. ह्या कलावंतांकडे मोठा डामडौल नसतो. रंगमंच नसतो, बऱ्याचदा पडदाही नसतो. अशा कमी साधनसामग्रीमध्ये प्रेक्षकांना गुंगवून ठेवण्यासाठी झाडाखालचा तमाशा करणाऱ्या गवळण, बतावणी, पोवाडे, लावण्यांवरचे नाच, रंगबाजी म्हणजे हिंदी सिनेमातील गाण्यांवर नाच वगैरे प्रकार सादर केले जातात. फड लहान असतो त्यामुळे कष्ट खूप. ह्यातील छायाचित्रं तमाशा कलावंतांचं उघड्यावरचं अस्थिर जीवन फार नेमकेपणाने आपल्यापुढे उभे करतात. उघड्यावर केवळ पडद्याच्या आडोशाने कपडे बदलणाऱ्या स्त्रिया, वर्तमानपत्राच्या कागदावर सुकी भेळ कलावंत ठायी ठायी व्यक्त करतात. बायनाबाई सातारकर, गजराबाई कराडकर ह्या फडाच्या मालकिणी स्वत:च्या तमाशात गण-गवळण म्हणतात मग आत जाऊन भाकऱ्या भाजायला बसतात, पडतील ती सर्व कामे त्या करतात.

ह्या उलट कनातीतील तमाशा. कलावंत, बिगारी, स्वयंपाकी, मंडप उभारणारे वगैरे मिळून १२० ते १७० लोकांचा फड असतो. चार-पाच ट्रक,



तमासगीराजवळ फार मोठी ताकद असावी लागते. दुपारची थोडी विश्रांती सोडली तर सकाळी नऊ वाजल्यापासून पहाटे चारपर्यंत तमाशा चालू शकतो. सगळे प्रसंग केवळ वर्णनावरून उभे केले जातात. गण-

चिवडणारा कलावंत, जोरजोराने वाजवून हलगी गरम झाल्यामुळे जखमी झालेला हात. रात्रीच्या वेळेस भांडी घासत बसलेली फडाची मालकीण गजराबाई कराडकर. ह्या उघड्यावरच्या आयुष्याला प्रतिष्ठा नाही हे दु:ख हे

जीप, कार असा वाहनांचा ताफा असतो. प्रेक्षकांना बसण्यासाठी मोठा तंबू, रंगमंच, कलावंतांच्या मेकअपसाठी एक, जेवण्यासाठी एक असे अनेक तंबू असतात. पंधरा ते वीस हजार रुपये रोजचा खर्च असतो.

नांदेड, पुणे, सोलापूर, पंढरपूर येथे मोठ्या जत्रांमध्ये हे फड लागतात. रात्री झगमगीत प्रकाशात उजळून निघालेल्या, कनातींमध्ये हे तमाशे सुरू होतात. ह्या प्रकरणाची सुरुवातच भडक लाल साडी नेसलेल्या, नखशिखांत मढलेल्या, मुजरा करणाऱ्या नाचणारणीच्या चित्राने होते. लाल, पिवळे, जांभळे, हिरवे रंग मुंडाश्यांच्या शेमल्यातून आणि नाचणारणींच्या लुगड्यांमधून झळकत राहतात. नारायणगावच्या तमाशाचं एक सुंदर छायाचित्र ह्यात आहे. डाव्या बाजूला वरच्या कोपऱ्यात प्रकाशाचा गाभाच असावा अशी तमाशाची कनात आणि उरलेल्या सर्व भागात गच्च भरलेला, अंगावर त्या प्रकाशाचे ठिपके झेलत असलेला प्रेक्षकवर्ग. हे देखणं चित्र पाहूनही खिन्नतेचं सावट येतं ते त्याच्या बाजूला असलेल्या अवतरणामुळे. कांताबाई सातारकर म्हणतात, ''तमाशाच्या पोटातून सगळं निर्माण झालं. नाटक, सिनेमा, लावणीचे कार्यक्रम. ही जिवंत कला तिला पायाखाली चेंगरलीत. तिच्या पोटातून जन्म झालेल्या कलेला मात्र फार महत्त्व दिलं. अनुदानं देत आहात, महत्त्व देत आहात. तमाशासारख्या जिवंत कलेला मात्र आज मातीत घालण्याचा प्रयत्न होत आहे.''

वर्षातले सात महिने दौरा, त्यात २१० ते २२० तमाशाचे खेळ. विंचवासारखं बिऱ्हाड पाठीवर घेऊन जगभर हिंडायचं. भंडारे म्हणतात, ''कलावंतांची मुलं कशी जगत असतील, काय खेळत असतील हे समजणे सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेरचे आहे. बाळाच्या झोपेच्या वेळी आई नाचायला जायच्या तयारीमध्ये असते. मूल उठते तेव्हां आई झोपायच्या तयारीत असते. शिक्षणामुळे मिळू शकेल अशी दुसरी संधी मिळण्याची शक्यताच या जीवनपद्धतीमध्ये शिल्लक राहात नाही.''

आई आणि तिचं लहान मूल ह्यांची छायाचित्रं त्या पुस्तकात येणं अनिवार्यच होतं. रडणारं मूल आणि त्याची नाचणारी आई यांच्यातला मेलोड्रामा हिंदी सिनेमाने पिळून कोरडा केला आहे. पण ह्या पुस्तकातील छायाचित्रांमधून त्यातली शोकांतिका जाणवते. मेकअप करत बाळाला भरवणारी, त्याचे कपडे बदलणारी, त्याला झोपवणारी आई ह्या सर्व गोष्टी आयुष्याचा एक भाग म्हणून स्वीकारताना दिसते. इथल्या सर्व स्त्रिया धडपडणाऱ्या, झगडणाऱ्या दिसतात. क्वचित कधी विमनस्क दिसतात पण असहाय, रडक्या दिसत नाहीत. 'हे सगळे आमच्याच नशिबी का?' असले प्रश्न त्या विचारताना दिसत नाहीत. 'कशासाठी?' ह्या प्रश्नाचं एकच उत्तर त्यांना माहीत आहे – 'पोटासाठी.'

एकामागून एक ही छायाचित्रं पाहत असताना ज्या छायाचित्रामुळे आपण नि:शब्द होतो ते आहे एका बापाचं आणि त्याच्या मुलीचं. वयात आलेली ही देखणी पोर आपल्या हिरव्या शालूचा भरजरी पदर अंगभर पांघरून वयस्क बापाच्या मांडीवर डोकं ठेवून पडली आहे. स्टेजवरचा तिचा 'आयटेम' अजून व्हायचा असावा. ज्या जगात मुलं आपलं बाल्य लहानपणीच हरवून बसतात त्या जगात आपलं मूलपण टिकवण्याचा अट्टाहास करणारी ही मुलगी आपल्याला अस्वस्थ करते. कॅमेऱ्याकडे पाहणाऱ्या त्या बापलेकीच्या डोळ्यातले प्रश्न आपल्याला निरुत्तर करतात. सोबत चार वाक्यांत त्या दोघांची कहाणी आहे. ''मी भाकऱ्या थापायच्या कामाला लागलो. पोरगी लहानच होती. बगून बगून ती इथेच नाचाया लागली. मला पंधराशे आणि तिला तीन-साडेतीन मिळत्यात. तिच्या लग्नाची चिंता हाय, पन ते बी हुईल इथंच कुठं तमाशात.'' तमाशातली ही गणितं आपल्या आवाक्याच्या बाहेरची तर आहेतच पण आपल्या मध्यमवर्गीय सुरक्षिततेच्या, नैतिकतेच्या कल्पना हास्यास्पद ठरवणारी आहेत.

विदर्भातली 'खडी गंमत' तमाशाचं वेगळंपण दोन गोष्टींमध्ये विशेषत्वाने जाणवतं. एक म्हणजे ह्या तमाशात पुरुषच स्त्रीपार्टी असतात. नाच्यांचं काम तेच करतात. आणि दुसरं म्हणजे इथे शाहीर हा मुख्य कलावंत असतो. रात्री नऊ वाजल्यापासून सकाळी सात वाजेपर्यंत उभे राहूनच कार्यक्रम केले जातात, म्हणून त्याला म्हणतात 'खडी गंमत'. एका शाहिराने प्रश्न विचारल्यावर दुसरा शाहीर त्याला गाण्यातून उत्तर देतो ह्याला 'दुय्यम' म्हणतात. दुय्यम नसेल तर सामाजिक विषयावरचे पोवाडे सादर केले जातात. ह्या तमाशाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे स्त्रिया खूप मोठ्या प्रमाणात तो पाहायला येतात. हुंडाबळी, दारुड्या नवरा ह्यांसारखे त्यांचे प्रश्न पोवाड्यातून सादर केले जातात. एकंदरच सामाजिक जाणीव असलेले शाहीर मोठ्या संख्येने तमाशाच्या माध्यमातून लोकांचं प्रबोधन करताना दिसतात. निळ्या निशाणाचे शाहीर परशुराम ह्यांच्यावर आंबेडकरी विचारांचा मोठा प्रभाव होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दीक्षा समारंभ

*...The photographs (in the book) are deeply moving, both in their beauty and their human context and the quotes from the artists bring their whole art and anguish to life.*

Girish Karnad

त्यांनी पाहिला होता. लोकांना शिक्षणाचे महत्त्व समजावं, स्वतंत्र विचार करण्याची कुवत त्यांच्यात निर्माण व्हावी म्हणून त्यांनी शाहिरी केली. तमाशाच्या पारंपरिक रूपातील व्यर्थता लक्षात आल्यावर ते रूपच त्यांनी बदलून टाकलं. ते म्हणतात, ''अजूनही आम्ही त्याच त्या जुन्या गवळणी तमाशात गातो, तेच गण गातो. तुम्ही माणूस बना. हे काय तुम्ही अयोध्या, काशी, मथुरा करता? केव्हा जाता तुम्ही तिथे? त्यात काय आहे? शेवटच नाही त्याला.'' तमाशा हा प्रबोधनासाठीच आहे असे शाहीर अंबादास मानतात. आपल्या बोलण्यात आणि वागण्यात तफावत राहू नये म्हणून कटाक्षाने काळजी घेतात. त्यांची शाहिरी ऐकायला इतर शाहीर प्रेक्षकात येऊन बसतात इतकी ती प्रभावी आहे.

कोकणातील तमाशा, भारुडापासून झालेला तमाशा, ह्याबद्दलही अभ्यास करून भंडारे लिहितात. नवसाची फेड करण्यासाठी केला जाणारा 'तखतरावचा तमाशा' हा एक वेगळाच प्रकार ह्या पुस्तकामुळे समजला. 'मुलगा झाला तर मी पिंपळगावच्या जत्रेत तुला तखतराव करीन' असा पिराला नवस केला जातो. हा नवस ब्राह्मण, मराठा, बौद्ध, मुसलमान कुणीही बोलतं. नवस पूर्ण झाला की तखतराव काढला जातो—म्हणजे बैलगाड्यांवर फळ्या टाकून मंच तयार करतात. तो सजवतात. बैलांना सजवलं जातं. एका बैलगाडीवर पंधरा ते वीस फुटी मल्लखांब उभारला जातो. त्याच्यावर गावच्या तालमीतली मुलं प्रात्यक्षिकं करायला लागतात. मंचावर नाची, ढोलकीवाला, शाहीर वगैरे आपली कला सादर करायला लागतात. बैलगाड्यांची ही मिरवणूक गावातून निघते. ह्या चालत्या फिरत्या तमाशाला तखतरावचा तमाशा म्हणतात. मराठवाड्यातील अनेक गावात हे तमाशे निघतात.



भंडाऱ्यांनी काढलेली ही तमाशाची छायाचित्रं एक वेगळीच जाण आपल्या मनात जागृत करतात. ही जाण केवळ तमाशाबद्दल नाही तर संपूर्ण ग्रामीण जीवनाबद्दल आहे, जगण्याच्या एका पद्धतीबद्दल आहे, ग्रामीण आणि नागरी जीवनातील दरीबद्दल आहे. छायाचित्रांमधून एका सामाजिक विषयाची मांडणी करणारं मराठीतील हे पहिलंच पुस्तक असावं. छायाचित्र म्हणून त्यांचा आनंद घेताना त्यातले सामाजिक संदर्भ विसरता येत नव्हते तरीही ही एक रांगडी गंमत आहे, त्यात आनंद आहे हेही सारखं जाणवत होतं. माझ्या मते छायाचित्रकार म्हणून आणि एक संवेदनशील व्यक्ती म्हणून भंडाऱ्यांची ही मोठी उपलब्धी आहे. ह्या पुस्तकातले भंडाऱ्यांचे लाँग शॉट्स् मला फार आवडले. माथ्यावर पांढुरकं आकाश, हिरव्यागार टेकड्यांचे उतार, त्या उतारावर गोळा झालेली माणसांची गर्दी आणि त्या गोलाकार गर्दीच्या मध्यभागी मनोरंजन करणारे कलावंत असा एक विस्तीर्ण अवकाश कवेत घेणारी ही छायाचित्रं इथं वरचेवर भेटतात. जमीन आणि आकाशाची ही पार्श्वभूमी ह्या पुस्तकाच्या विषयाला एक वेगळं परिमाण देते.

शब्द हे भंडाऱ्यांचे माध्यम नाही. 'छायाचित्र हेच माझे व्यक्त होण्याचे मुख्य माध्यम आहे' असे ते म्हणतात. तरीही त्यांनी निवडलेली अवतरणं, शब्दबद्ध केलेला तमाशाचा इतिहास आणि वर्तमान ह्यामधून त्यांची प्रगल्भ सामाजिक जाणीव आपल्या लक्षात येते. आशयावरची पकड नीट असल्याने शब्दही त्यांना आपोआप सापडत जातात. ''महाराष्ट्रातील शेतकरी दोन वेळा खळाळून हसतो, सुगीच्या वेळी आणि तमाशा पाहताना.'' मलपृष्ठावरील भंडाऱ्यांनी निवडलेले हे वाक्य त्यांची संवेदनशीलता दाखवतं. दुर्दैवाने गेली कितीतरी वर्षे विदर्भातील शेतकरी सुगीच्या वेळी हसला नाही. 'सततची नापिकी आणि सावकारी पाश' ह्या दोन गोष्टींनी त्याचं जिणं बरबाद करून टाकलं आहे. तमाशातल्या दोन घटका करमणुकीमुळे त्याच्या मनावरचं मळभ खरंच कमी होत असेल तर ह्या लोककलेचे आपण सर्वांनी आभार मानले पाहिजेत.

*....पुस्तकातील छायाचित्रे तर जिवंत व बोलकी आहेतच, पण भंडारे यांचे लेखनही अभ्यासपूर्ण आहे. मराठी लोकजीवनाशी हा संबंध असलेला विषय निवडण्याबद्दल, देखण्या छायाचित्रांबद्दल व प्रत्ययकारी लेखनाबद्दल भंडारे यांचे अभिनंदन.*

श्री. पु. भागवत



समाजमनस्क विचारवंताचे आत्मानुभव

# वानप्रस्थ

नीलिमा गुंडी

डॉ. गणेश देवी हे नाव लेखक या नात्याने मराठी वाचकांना कदाचित परिचित नसेल. कारण डॉ. देवी हे मूळचे महाराष्ट्रातील असले तरी त्यांचे कार्यक्षेत्र मुख्यत: गुजरात राहिले आहे आणि त्यांचे यापूर्वीचे लेखन इंग्रजीमध्ये प्रकाशित झालेले आहे. मात्र एक नामवंत विचारवंत, भाषाभ्यासक, राष्ट्रीय कीर्तीचे इंग्रजी लेखक आणि कृतिशील समाजचिंतक अशा कोणत्या तरी रूपात त्यांची ओळख मराठी मनाला नक्कीच असेल. डॉ. देवी यांच्या 'आफ्टर ॲम्नेशिया' या इंग्रजी पुस्तकाला केंद्रीय साहित्य अकादमी पुरस्कार मिळाल्यामुळे त्यांच्या वैचारिक लेखनाविषयी सर्वसामान्य वाचकांना उत्सुकताही असेल. डॉ. देवी यांच्या 'वानप्रस्थ' (२००६) या पद्मगंधा प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या पुस्तकामुळे त्यांचे मौलिक चिंतन प्रथमच मराठीतून उपलब्ध होत आहे, ही स्वागतार्ह गोष्ट आहे.

'वानप्रस्थ' हे पुस्तक म्हणजे एका समाजमनस्क विचारवंताचे आत्मानुभव आहेत. हा विचारवंत वृत्तीने तत्त्वज्ञ कवीच्या कुळातील आहे आणि कृतिशीलतेने विचारांचा पाठपुरावा करणारा आहे. स्वत:च्या विचार-आचारांमधील पारदर्शक असा सुसंवाद हा या पुस्तकाचा एक लोभसवाणा विशेष आहे. 'वानप्रस्थ'मध्ये डॉ. देवी यांनी आदिवासींसाठी केलेल्या प्रकल्पांमागील आपली मनोभूमिका अनेक लेखांतून व्यक्त केली आहे. ते प्रकल्प प्रत्यक्षात आणताना आलेल्या अडचणी आणि त्यावर केलेली मात, असा प्रकल्पांचा वृत्तांतवजा वाटणारा पण सामाजिक दस्तऐवज ठरणारा अहवालही यात आहे. 'वानप्रस्थ' या लेखकाला अभिप्रेत असलेल्या संकल्पनेचे विवेचनही यात आहे. आणि भाषा, तसेच आदिवासींचे सौंदर्यशास्त्र, हिंसाप्रवृत्ती याविषयींबाबतचे मूलगामी चिंतन हा तर पुस्तकाचा गाभाच आहे. त्यामुळे काहीबाबतीत लेखकाचे व्यावहारिक आत्मचरित्रवजा लेखन जसे यात आहे, तसेच त्याचे सामाजिक-आध्यात्मिक आत्मचरित्राचे काही अंशही यात मिसळले आहेत आणि त्यामुळे पुस्तकातील वैचारिक गाभ्याला बळकट आधार मिळाला आहे.

'वानप्रस्थ'मध्ये बारा लेख तीन गटांमध्ये समाविष्ट झालेले आहेत. गटांची विभाजकरेषा काटेकोरपणे पाळली जाणे शक्य नाही. कारण यातील लेखन बरेचसे उत्स्फूर्त चिंतन या पद्धतीचे आहे. अशा चिंतनाला विषयक्षेत्राची लक्ष्मणरेषा आखून देणे शक्य नसते. त्यामुळे यातील गट स्थूलमानाने लक्षात घ्यायला हवे आहेत.

पहिल्या गटात सहा लेख अंतर्भूत आहेत. 'मनातले वन', 'वानप्रस्थ', 'परंपरेच्या शोधात', 'भिल्लांचे भवितव्य', 'एक्सप्रेस हायवेवर—अश्वमेध' आणि 'जंगल इंग्रजी बोलते' ही लेखांची शीर्षके वाचतानाच यातील सर्वसाधारण विचारसूत्र लक्षात येते. ते सूत्र म्हणजे आदिवासींच्या भाषा आणि संस्कृतीच्या जपणुकीसाठी प्रयत्न करण्याचे मार्ग शोधणे आणि ते कार्यान्वित करणे. स्वत: लेखकाने बडोदा विद्यापीठातील नोकरी वयाच्या पंचेचाळिसाव्या वर्षीच सोडून आपल्या ईप्सिताचा पाठपुरावा करण्यासाठी उर्वरित आयुष्य झोकून दिले आहे; हे येथे आवर्जून नोंदवायला हवे. लेखकाला असलेले अनेक भाषांचे ज्ञान त्याला 'भाषा' प्रकल्पाच्या दिशेने खेचत होते. विशेषत: दुर्लक्षित अशा भाषासमूहांविषयीची सामाजिक उत्तरदायित्वाची भावना त्याला आतून अस्वस्थ करीत होती. या अस्वस्थतेतूनच सर्जनशीलतेचे धुमारे कसे फुटले, याची हकीकत यात वाचायला मिळते.



**गणेश नारायणदास देवी**

**जन्म :** १ ऑगस्ट १९५०

**इंग्रजी लेखन**

आफ्टर ॲम्नेशिया (१९९२-९४)
इंडिया बिटवीन ट्रॅडीशन ॲण्ड मॉडर्निटी (१९९७)
पेण्टेड वर्डस् : लिटरेचर ऑफ आदिवासीज ॲण्ड डिनोटीफाईड ट्राइब्स (२००३)
इंडीयन लिटररी क्रिटीसीझम् : थिअरी ॲण्ड इंटरप्रिटेशन (२००३)
अ नोमॅड कॉल्ड थिफ (२००७)

**आत्मकथा**

वानप्रस्थ (२००६)

गुजरातीमध्येही चार पुस्तके प्रकाशित

**नियतकालीके**

इंग्रजी, गुजराती आणि मराठीसह नऊ आदिवासी बोलींमध्ये 'ढोल' हे आदिवासी साहित्यासाठी वाहिलेल्या नियतकालिकाची सुरुवात.

जोपर्यंत वडाच्या पारंब्यांसारख्या पसरलेल्या असंख्य भाषांची नीट जुळवाजुळव होत नाही, जोपर्यंत भाषा, साहित्य, संगीत, नाट्य, नृत्य, शिल्प, चित्र इत्यादींची अथांग सोबत ओळखली जात नाही, तोपर्यंत भारतीय संस्कृतीसंबंधी काही जुजबी स्वरूपाचे विधान करणेही शक्य नाही, (पृ. ३१) या बेचैनीतून डॉ. देवी यांनी साहित्य अकादमीपुढे 'भाषा' केंद्राचा प्रस्ताव मांडला. त्यातून 'भाषा संशोधन प्रकाशन केंद्र', 'आदिवासी अकादमी', 'ग्राम विकास केंद्र', 'ढोल' या नियतकालिकाची निर्मिती अशा कामांना आकार येत गेला. मात्र हा प्रवास सरळरेषेतील नव्हता. त्यात आर्थिक, राजकीय स्तरावर अनेक अडचणी येत गेल्या. तेजगढला जमीन मिळवताना लेखकाला लाल फितीच्या कटकटींनाही तोंड द्यावे लागले. ट्रस्ट स्थापन करणे, आर्थिक मदत मिळवणे, प्रत्यक्ष प्रकल्पात सहभागी होणे... या प्रवासात लेखकाला अनेक झपाटलेल्या व्यक्तींनी केलेले सहकार्य मोलाचे ठरते. त्यात चित्रकार भूपेन खख्खर (संस्थेचे एक विश्वस्त असलेल्या खख्खर यांचे निधन झाल्यामुळे पुस्तक त्यांना अर्पण केले आहे), लेखिका महाश्वेतादेवी अशा नामवंत व्यक्तींबरोबर नीमा गढीया, सुधीर देवरे अशी आदिवासी कार्यकर्ते मंडळीही आहेत. तेजगढ अकादमीला भारतातल्या 'आदिवासींचे शांतिनिकेतन' बनविणे हे लेखकाचे स्वप्न आहे.

मात्र या स्वप्नाची वाट काट्याकुट्याची आहे. गुजरातमधील दंगलीच्या काळात भाषाकेंद्रावर ठपका ठेवण्याचा कधी प्रयत्न, तर कधी 'नक्षलवादी' म्हणून शिक्का अशा अपप्रचारांना तोंड देत लेखकाला वाट काढावी लागत आहे.

प्रकल्पाचे काम करताना लेखक एका सखोल आणि व्यापक अशा वैचारिक परिवर्तनाचा अनुभव घेत आहे. त्यात लेखकाला येणारे अनुभव त्याला नव्या जीवनदृष्टीकडे वळवणारे आहेत. जसे परंपरा व आधुनिकता यातील द्वंद्वाविषयीचे त्यांचे विचार मननीय आहेत. ते असे : "परंपरेच्या आंधळ्या भक्तीमध्ये विचार करण्याची, प्रश्न विचारण्याची ताकदच नाहीशी करण्यात येते. आधुनिकतेच्या अतिउत्साहात भावनांचा हकनाक बळी पडतो व परंपरा आणि आधुनिकतेचे मिश्रण बनवण्याच्या हट्टामध्ये सांस्कृतिक स्मृती व कल्पनाशक्ती या दोन्ही खंडित होत राहतात. परंपरेकडे या तीन विचारपद्धतीपेक्षा वेगळ्या रीतीने पाहण्याची कोणतीच पद्धत नाही का? या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी आदिवासी परंपरा व परंपरांकडे पाहण्याचा आदिवासी दृष्टिकोण समजून घेणे उपयोगी ठरावे." (पृ. ८१)

या संदर्भातील 'परंपरेच्या शोधात' हा लेख आदिवासींची पिठोरा चित्रे, चालीरीती, संस्कृती यांचा विचार मांडते. डॉ. देवी या लेखात




आदिवासींच्या सांस्कृतिक प्रेरणांमधील विश्वाच्या उत्तरदायित्वाची भावना लक्षात आणून देतात. ते स्वत: आदिवासींच्या कल्पनासृष्टीत पोहोचण्याचे रस्ते शोधतात. भिल्लांच्या मूलत: सहिष्णू आणि अहिंसक वृत्तीचे दाखले देतात.

कायद्याच्या चौकटीत आदिवासींच्या विकासाचे बंद झालेले दरवाजे ठोठावण्यासाठी पुढाकार घेतात. तेजगढला भिल्लांना कॉम्प्युटर शिकवण्याचा उपक्रम राबवून त्यांना खेड्यातच निर्वाहाचे साधन उपलब्ध करून देण्यावर भर देतात.

आदिवासींच्या निमित्ताने डॉ. देवी यांनी वेळोवेळी शासनाच्या धोरणांवर जशी टीका केली आहे, तशीच किंबहुना



त्याहून अधिक धारदार टीका त्यांनी ब्रिटिशकालीन धोरणांवर केली आहे. देशीवादाच्या संदर्भातील त्यांची भूमिका स्पष्टच आहे. वसाहतवादी कालात भारतातील आणि त्यातही आदिवासींमधील शोषणाचे अनेक तपशील लेखक उद्‌धृत करतात. आदिवासींच्या सांस्कृतिक पर्यावरणाचा भाग असलेले जंगल त्यांच्यापासून अलग करणे, आदिवासींना निकृष्ट जमिनी देणे, परिणामतः ते 'सिकलसेल' या रोगाला बळी पडणे—या साऱ्या घटनाचक्रामागे 'अपरिमित जंगलतोड' ही एक मुख्य बाब आहे. येथे लेखक नमूद करतो— "जंगलतोडीचा इतिहास, युरोपियन वसाहतवादातून निर्माण झालेला असो अथवा त्यापूर्वीच्या मर्यादित सरंजामशाहीतला असो, मुळात तो सत्ताधीशांकडून जमीन कसणाऱ्यांवर झालेल्या अन्यायातून बनलेला इतिहास आहे." (पृ. १०५)

यातून मार्ग काढण्यासाठी लेखकाने 'वानप्रस्था'कडे वाटचाल सुरू केली आहे. त्यांच्या 'वन' या संकल्पनेत पर्यावरण, मानसिकता, अध्यात्म आणि आर्थिकस्थिती ही चारही संदर्भक्षेत्रे आहेत.

'वानप्रस्थ'मधील दुसऱ्या गटात 'किक्यारिया', 'हिंसेची स्वप्नसृष्टी' आणि 'मृत्यूचे गणराज्य' हे तीन लेख आहेत. 'किक्यारिया' हा आदिवासींच्या मौखिक संस्कृतीतील उत्कटपणे सामूहिक असा भेदक स्वरोद्गार आहे. या लेखात हा शब्द 'एक अर्थपूर्ण प्रतिमा' या रूपात उलगडत जातो. गुजरातमधील गोध्राला ट्रेन जाळली गेल्यानंतर घडलेली हिंसक दंगल, त्यातील आदिवासींच्या प्रतिक्रिया आणि लेखकाची समुपदेशनाची भूमिका या साऱ्यांचे घटनाचित्र या लेखात रेखाटले आहे. दंगलीच्या संदर्भातील प्रसारमाध्यमांच्या बातम्या, त्यामागील राजकारण, हिंदु-मुस्लीम यांचे परस्परसंबंध, अफवांचे पीक अशा अनेक पैलूंतून घटनेकडे पाहण्याचे तारतम्य लेखकाने बाळगले आहे. दंगलीमध्ये काही भागात योजनाबद्ध हल्ले होत होते. मुस्लिमांची दुकाने, घरे जाळली जात होती. त्याविषयीचे लेखकाचे भाष्य असे आहे. "अगदी सावकाशपणाने आणि थंडपणाने हा व्यवहार उरकला जात होता. या थंड माथ्याच्या पद्धतशीरपणाने एक बाब स्पष्ट होत होती ती ही की, जातीय वा धार्मिक दंगल या ठिकाणी फारशी धार्मिक न राहता आदिवासी संस्कृतीमधल्या विशिष्ट कर्मकांडाचा भाग बनली होती." (पृ. १२५)

या कठीण काळात लेखक सातत्याने केंद्रीय नेत्यांशी तसेच प्रसारमाध्यमांशी संपर्क ठेवून दंगल आटोक्यात आणण्याचे प्रयत्न करीत राहिला. तसेच आदिवासींच्या आर्थिक स्थितीविषयीचे स्वतःचे विश्लेषण देत राहिला. दंगलीत सहभागी झालेला आदिवासीवर्ग हा 'लुम्पेन' म्हणतात,

तसा आहे; असे लेखकाचे निरीक्षण आहे. आदिवासींचे प्रचंड प्रमाणात झालेले राजकीय झुंडीकरण लेखकाला अस्वस्थ करते. लेखकाच्या मते आदिवासींनी त्यांच्या मनात अनेक दशके साचलेला क्रोध, दंगलीतून व्यक्त केला. 'किक्यारिया' हा आदिवासींचा शोषणकर्त्यांच्या विरोधासाठी जपून ठेवलेला स्वर होता. तो दंगलीच्या निमित्ताने प्रकट झाला.

डॉ. देवी यांनी 'हिंसा' या विषयावर जवाहरलाल नेहरू फेलोशिपच्या कालावधीत संशोधन केले आहे. त्यामुळे ते हिंसा करणाऱ्यांची मने, समूहमानसशास्त्राच्या अंगानेही, वाचू शकतात. 'हिंसेची स्वप्नसृष्टी' हा लेख वाचतानाही याचा प्रत्यय येतो. आधुनिक जगासमोरच्या प्रगतीच्या ध्येयाची वाटच हिंसेतून जाते, हे कटू सत्य लेखक दाखवून देतात. विविध व्यक्ती आणि विविध देशांचा इतिहास यातील दाखले देऊन ते हिंसेमागील मानसिकतेचा—त्यातील विविध टप्प्यांचा मागोवा घेतात आणि लिहितात. ''स्वप्नरंजनातून गूढ रीतीने कलाकृतीप्रमाणे निर्माण होणारी हिंसा विसाव्या शतकातील मानवी व्यवहाराच्या अंगोपांगी भिनत गेली.'' (पृ. १७३) या लेखात डॉ. देवी यांनी महाभारत आणि विशेषत: गीतेतील तत्त्वज्ञानाची केलेली मीमांसा वाचनीय आहे.

'हिंसेची स्वप्नसृष्टी' या लेखात हिंसेमागील विविध कारणांचा शोध लेखकाने घेतला आहे. त्यात आत्मरक्षणासाठीची हिंसा, शोषणाच्या प्रतिक्रियेतून आलेली हिंसा, नपुंसकत्वाच्या भीतीतून आलेली हिंसा, मृत्यूच्या भीतीतून आलेली हिंसा, जैविक कारणामुळे घडणारी (मेंदूतील विशिष्ट द्रव्य कमी होणे) हिंसा असा प्रकारभेद ते करतात. प्राण्यांमधील हिंस्रता आणि मूलत: प्राणी असलेला आणि संस्कृतीच्या जोरावर स्वत:ला वरच्या पायरीवर समजणाऱ्या माणसाची हिंसकवृत्ती यातील फरक ते सूक्ष्मपणे उलगडून दाखवतात. हिंसा ही एक 'विक्रेय वस्तू' बनवण्याचे माणसाचे प्रयत्न त्याच्या तथाकथित मोठेपणाला कसे लांच्छनास्पद ठरवतात, हे या लेखातून कळते. डॉ. देवी येथे जगाच्या इतिहासातील दाखले देऊन थांबत नाहीत, तर सृष्टीतील उत्क्रांतितत्त्वाचाही मागोवा घेतात. '' 'महाभारता'सारख्या ग्रंथात हिंसेचे जे अनेकविध प्रकार व त्यासंबंधीचे सखोल तत्त्वचिंतन आहे, ते जगाच्या साहित्यात अजोड आहे,'' असे मत नोंदवतात. (पृ. १५७)

डॉ. देवी यांची घटना जाणून घेण्याची भूमिका विचारवंताची असल्यामुळे हिंसेसारख्या आदिम प्रवृत्तीला ते नीतिशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, जीवशास्त्र अशा अनेकविध शास्त्रांच्या मदतीने जणू सूक्ष्मदर्शकयंत्राखाली ठेवून तपासू लागतात. हिंसा आणि कलात्मक सर्जन यांच्यातील साम्यभेदही समोर ठेवतात. ''सर्जकतेची रसायनप्रक्रिया तपासण्याची साधने सौंदर्यशास्त्रात उपलब्ध असती तर कदाचित त्यांच्यावरून मानव्यशास्त्रात हिंसेची रसायनप्रक्रिया समजून घेण्याची साधने घडविणे शक्य झाले असते.'' (पृ. १७१-१७२) हे त्यांचे विधान वाचकाला क्षणभर स्तंभित करते. एक लेखक या नात्याने मूळापर्यंत जाऊन वासनांचे स्रोत शोधण्याची त्यांची प्रवृत्ती आजकाल अपवादानेच पाहायला मिळते.

'हिंसेची स्वप्नसृष्टी' हा लेख या संग्रहातील महत्त्वाचा लेख असून तो वाचून मनन करण्याजोगा आहे. लेखकाने या लेखाला(च फक्त) संदर्भ टीपांची जोड दिली आहे. त्यामुळे त्यातील विवेचन साधार प्रमाण राहते. २७ फेब्रुवारी ते ४ मार्च २००२ या कालावधीतील गुजरातमधील दंगलींविषयीचा 'किक्यारिया' हा लेख मुख्यत: घटनालक्ष्यी निवेदन करतो, तर 'हिंसेची स्वप्नसृष्टी' हा लेख अशा तात्कालिक घटनेमागील, सनातन प्रवृत्तीचा वेध घेतो.

प्रस्तुत पुस्तकाच्या तिसऱ्या भागात 'भाषा केव्हा?' 'पोटभाषेची प्राथमिकता' आणि 'ओरसंगच्या प्रवाहाबरोबर' हे छोटेखानी लेख आहेत. यात जागोजागी भाषेविषयी मर्मदृष्टी देणारी चिंतने विखुरलेली आहेत. उदाहरणार्थ हा परिच्छेद पाहा:

''एकंदरीत, भाषा अर्थ आहे पदार्थ आहे, आध्यात्मिक शक्ती आहे किंवा सामाजिक संस्था आहे किंवा केवळ उत्क्रांतिच्या ओघातील एक शारीरिक प्रक्रिया आहे अथवा भाषा एकाच वेळी या सर्व गोष्टी आहे; हे सांगता येणे अजूनही शक्य दिसत नाही.'' (पृ. १८८) अशा वेळी भारतीय संस्कृतीचे किनारे म्हणजे 'मान्य भाषा' व प्रवाहाची गती म्हणजे 'पोटभाषा', असा विचार डॉ. देवी मांडतात, आणि आदिवासींच्या भाषांच्या संवर्धनाकडे लक्ष वेधतात. भारतातल्या प्रत्येक

आदिवासी स्त्रीपुरुषाने स्वत:ची भाषा जपून ठेवणे हा आता 'नवा धर्म'च मानायला हवा; असा त्यांचा आग्रह आहे.

खरे तर सुरुवातीच्या लेखांतही भाषेविषयीचे लेखकाचे संवेदन तरल शब्दांत व्यक्त झाले आहे. ते लिहितात— ''प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानात इतका विपुल भाषाविचार असतानाही आपल्या आजच्या भाषाशास्त्रज्ञांना त्याचा उपयोग कसा करायचा, हे समजत नाही? शिवाय भाषाशास्त्र केवळ अठराव्या शतकात युरोपमध्ये निर्माण झाले, असे ते का मानतात? बऱ्याच वेळेस भाषाशास्त्राच्या अभ्यासकांशी बोलताना असे ध्यानात येत असे, की भाषा म्हणजे त्यांना 'वस्तू' वाटते किंवा 'सामाजिक संस्था' वाटते. पण या विश्वात फिरणारे अगणित आवाजांचे व अर्थांचे भांडार, त्यात असणारा स्थळ-काळक्रमणाचा अद्‌भुत गुण, भाषेचे रंग, रूप, आकार, वजन, पोत, तीक्ष्णता, माधुर्य ह्यात त्यांना फारसे स्वारस्य नव्हते. हा सारा भाषाप्रपंच त्यांना पेलवेल असा नव्हता. एखाद्या पाणीपुरवठा कंपनीला, अथांग महासागराचा पत्ता काय असणार?'' (पृ. ३०) अशी 'प्रश्नोपनिषदे' यात जागोजाग आढळतात.

लेखकाचा एकाचवेळी स्वत:शी आणि इतरांशी चाललेला हा संवाद यातील लेखनशैलीला एक वेगळी डूब देऊन जातो.

डॉ. देवी यांनी भाषाशास्त्र, तौलनिक साहित्य अशा विषयांचा व्यासंग केला आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनात 'पैशाची' या आदिवासी भाषेत लेखन केलेल्या 'गुणाढ्य' या प्राचीन लेखकाचा उल्लेख येतो. बांगला भाषेतील महाश्वेतादेवींची एखादी कथा त्यांना आठवते. विक्रम सेठ यांची कविता, व्हिक्टर ह्यूगोची कादंबरी, पॅट्रिक व्हाईट या ऑस्ट्रेलियन लेखकाची 'व्हॉस' ही कादंबरी... अशा कितीतरी कलाकृतींचे संदर्भ देत ते विषयाची मांडणी करतात. त्यांच्या व्यासंगामुळे पैलूदार झालेले हे लेखन वाचकाला बहुश्रुत करून जाते.

डॉ. देवी जाताजाता सहजपणे विचारांना चालना देणारी निरीक्षणे नोंदवतात. संवेदनशील वाचकाच्या मनात त्यातून शोध घेण्याची प्रक्रिया नक्कीच सुरू होईल. मनात घर करून राहणारी ही काही निरीक्षणे पाहा :

१. ''जंगले व आदिवासी यांच्यामधला पारंपरिक बोलीतील संवाद बेकायदेशीर बनल्यानंतर आता जंगलांना स्वत:लाच त्यांचे अस्तित्व टिकवून धरण्यासाठी इंग्रजीत लिहिलेल्या कलम-पोटकलम कायद्यानुरूप स्वत:ची व्याख्या स्वीकारावी लागत आहे.'' (पृ. १०९)

२. ''मृत्यूच्या भीतीपोटी निर्माण झालेल्या शल्यविद्येबरोबर मृत्यूवर मात करणाऱ्या transcendental aesthetics चा उद्‌भव स्वाभाविकच असतो.'' (पृ. १५६)

३. ''श्वापदाच्या नि:शब्द हिंसेपेक्षा मानवाची शब्दांमधून व्यक्त होणारी परसंवेदनेला आवाहन करणारी हिंसावस्तू जितकी वेगळी, तितकीच, किंबहुना त्याहीपेक्षा कितीतरी पटीने विसाव्या शतकातील विक्रेय हिंसा वेगळी आहे.'' (पृ. १७३)

४. '' 'अक्षर' या शब्दाला 'ईश्वर' आणि 'लिहायचा शब्द' असे दोन्ही अर्थ संस्कृत आणि मराठीमध्ये आहेत. कदाचित हा लिपी आणि ईश्वर यांचा मानवाने बांधलेला संबंध मानव आणि इतर प्राणी यांच्यातला मूलभूत भेद दाखवणारा असावा.'' (पृ. २३)

डॉ. देवी यांनी आदिवासींसाठी केलेल्या विधायक कार्याचे काही तपशील यात आले आहेत. त्यात 'भिल्लांचे महाभारत', 'गढवाली लोकगीते', 'कुंकणा कथा', 'वारली गीते' या आणि इतर पुस्तकांच्या प्रकाशनाचा उल्लेख आहे. डॉ. देवी यांची या प्रकल्पाविषयीची आस्था त्यांच्या कल्पनाशक्तीची जोड मिळाल्यामुळे चैतन्यपूर्ण रूपात काही गोष्टी साकार करू शकते. जसे अकादमीच्या जमिनीवर हजारो झाडे लावताना त्यांना कल्पना सुचते—''प्रत्येक झाडाला नाव द्यावे व ते एकेका भाषेचे, बोलीचे असावे... त्यावर त्या त्या भाषेतील थोडे शब्द असावेत... कोणी सहज फिरायला आलेली व्यक्ती तेथून फेरफटका मारत असली तरीही भारतातील भाषांच्या अफाट वैविध्याची त्याला कल्पना येईल.'' (पृ. ५९)

विचार आणि आचार यांतील एकात्मता अनुभवताना डॉ. देवी यांनी त्यामागे प्रेरक ठरणारा आंतरिक स्फुरणाचा क्षण मोठ्या सन्मानाने मनात जपून ठेवला आहे. बुद्धी जेव्हा द्रवरूप घेते, त्या बौद्धिक प्रक्रियेसाठी ते बौद्ध तत्त्वज्ञानातील 'संवेग' ही संज्ञा वापरतात. अकादमीतील ज्ञानकुटीराला त्यांनी 'संवेग' हेच नाव ठेवले आहे. डॉ. देवी यांनी 'वानप्रस्थ', 'संवेग',

'अपरिग्रह' अशा भारतीय संस्कृतीतील सत्त्वसंपन्न संकल्पना सहज आत्मसात केल्या आहेत.

वंचितांविषयीचा गाढ सहानुभाव, सच्ची कृतिशीलतेची प्रेरणा, काहीसा काव्यात्म स्वरूपाचा (कोणी 'स्वप्नाळू'ही म्हणेल!) प्रेषितभाव आणि त्यामुळे आपल्या कार्याविषयीची पूर्ण श्रद्धा—हे डॉ. देवी यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू यात लक्ष वेधून घेतात. हिंसेमागील समाजमनाचे आंतरिक व बाह्य दर्शन डॉ. देवी ज्या पद्धतीने मांडतात आणि २००२ साली झालेल्या गुजरातमधील दंगलीच्या काळात धार्मिक सहिष्णुता व मानवी न्याय यांच्या प्रतिष्ठेसाठी झटत राहतात; त्याविषयी वाचकांना आदरच वाटेल.

मुळात 'बिनराजकीय कृतिप्रवणता आणि बिनआध्यात्मिक अपरिग्रह' अशा आधारांवरचा हा वानप्रस्थाश्रमाचा प्रवास लेखकाला स्वत:शी आणि इतरांशी खोलवर जोडून टाकतो. आपल्याला समजणारे 'अक्षर', अक्षरापासून वंचित ठेवलेल्यांपर्यंत पोहोचवणे, हे लेखकाला 'आध्यात्मिक कार्य'च वाटते. (पृ. २७)

लेखकातील सामाजिक जाणिवेचा कार्यकर्ता अशा आध्यात्मिक पातळीवर पोहोचल्यावर कशी काव्यात्म प्रतिमांची भाषा वापरतो, ते पाहण्याजोगे आहे. लेखकाच्या मनातील विचार, भावना व संवेदना या शक्तींचा सुंदर मिलाफच अशावेळी प्रत्ययाला येतो. डॉ. देवी लिहितात :

''संध्याकाळपर्यंत जीवतोड श्रम केल्यानंतर त्या दगडावर बसून मुलांना शांततेच्या, सहिष्णुतेच्या गोष्टी सांगू लागलो. एक दिवस मी त्यांना मिर्झा गालिबच्या जीवनकाळातील युद्धात उद्ध्वस्त झालेल्या दिल्लीच्या स्थितीवर आधारित विक्रम सेठ यांची हृदयद्रावक कविता समजावून सांगितली. ती कविता मुलांच्या मनाला जाऊन भिडली. त्यामुळे बाहेर जाळपोळ व दंगल पण तेजगढ अकादमीत सहिष्णुतेने भारावून गेलेल्या विद्यार्थ्यांचा छोटासा गट असे चित्र दिसू लागले. त्या दिवसात मी माझ्या बडोद्याच्या घरासमोर धुळीला रोखून धरणारे पिवळ्या फुलांचे जे झाड आहे तसली बारा झाडे तेजगढ अकादमीमध्ये रोवली; नंतर ती फुलत गेली!'' (पृ.७०)



डॉ. देवी स्वत: काही विचार-कल्पनांमुळे भारावून गेले. म्हणूनच त्यांना असे इतरांना भारावून—बदलून—टाकण्याचे काम करता आले. त्यांचे पुस्तकही अशाच निकोप संवेदनशीलतेचा प्रसार करणारे आहे. त्यांच्या या पुस्तकाला महाराष्ट्र फाउण्डेशनचा मानाचा पुरस्कार मिळणे, अगदी योग्यच आहे.

प्रश्नग्रस्त आयुष्याचा आत्मशोध

# खाली जमीन वर आकाश

सदा डुम्बरे

'अनाथ' या शब्दाची आणि त्यात अनुस्यूत असलेल्या अर्थाशयाची फेरव्याख्या करायला भाग पडावं अशा वजनाचं हे आत्मकथन, कोल्हापूरचे डॉ. सुनीलकुमार लवटे यांचं. त्यांच्या मते हे आत्मकथन नव्हेच. ते आहे एक 'कन्फेशन.' एका अर्थाने त्याची प्रचीती पुस्तकात मिळत जाते.

जीवन, जगणं हाच धर्म समजून त्यावरील त्यांच्या अढळ श्रद्धेचा, विश्वासाचा, त्यातील सौंदर्याचा, त्यांनी उराशी बाळगलेल्या श्रेयस मूल्यांचा प्रत्यय इथे येतोच.

पण दुसऱ्या अर्थाने हे 'कन्फेशन' त्यांचं नव्हे.

त्यांनी कशाला द्यायला हवं कन्फेशन?

नाव, गाव, आई, वडील, नातेवाईक, जात, धर्म, कुल, गोत्र अशा समाजाची मागणी असते त्या ओळखीच्या कोणत्याच खुणा अंगाखांद्यावर न बाळगता एका फसवणूक झालेल्या कुमारीमातेच्या पोटी बालकाश्रमात जन्माला आलेल्या, निरागस, निरपराध मुलाने कन्फेशन द्यायचं ते कुणापुढे आणि कशासाठी?

इथं कन्फेशन देण्याचं उत्तरदायित्व असलंच तर ते समाजाचं. अशा मुलांचं माणूसपण नाकारणाऱ्या, नाव, गाव आणि आई वडिलांविषयी निरुत्तर करणाऱ्या प्रश्नांची सरबत्ती करणाऱ्या समाजाने खरं तर दिलं पाहिजे कन्फेशन—या निष्पाप जीवांपुढे.

अशा प्रश्नग्रस्त आयुष्याचा आत्मशोध म्हणजे डॉ. सुनीलकुमार लवटे यांचं आत्मकथन. बालकाश्रमात जन्मलेल्या, अनाथाश्रमात व रिमांड होममध्ये वाढलेल्या, बालपण हरवलेल्या, भावविश्व दुभंगलेल्या एका मुलाने पुढे स्वत:च्या कर्तबगारीवर रिमांड होमचं मातृमयी संस्थेत रूपांतर करून तीनशे बालकांचं पालकत्व स्वीकारावं आणि माणूसपणाच्या लढाईत उज्ज्वल यश मिळवावं हा काही एखाद्या कादंबरीचा किंवा नाटकाचा प्लॉट नाही. लवटे यांच्या आयुष्याचीच ती खरीखुरी गोष्ट आहे. आत्मकथनाच्या आधीच समृद्ध असलेल्या मराठी वाङ्मयाच्या दालनात 'खाली जमीन वर आकाश' या डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्या लेखनाने अनुभवाच्या व्याप्तीचा प्रदेश भरघोसपणे विस्तारला आहे.

आत्मकथन हे श्रेष्ठ प्रतीचं वाङ्मय होऊ शकतं याचा पुन:प्रत्यय मराठीतील दलित साहित्यिकांच्या लेखनाने १९७० नंतरच्या कालखंडात आणून दिला होता. सर्जनशील निर्मितीला आवश्यक असलेलं आयुष्याचं मूलद्रव्य उसनं घेण्याची ज्यांना गरज नव्हती त्यांनी आपल्याच जगण्यातून लेखकाला आवश्यक असलेलं एक 'इस्थेटिक डिस्टन्स' ठेऊन घडविलेल्या कलाकृती 'फिक्शन'च्या पातळीवर गेल्या. दया पवार यांचं 'बलुतं' आलं. त्यावेळी त्यावर लिहिलेल्या परीक्षणात्मक लेखात मी त्याची वर्गवारी 'फॅक्शन'मध्ये करता येईल असं सुचविलं होतं. नॉर्मन मेलर, ट्रुमन कपोटी किंवा टॉम वुल्फसारख्या लेखकांनी त्या काळात अनेक सत्य घटनांचं खोलवर संशोधन, विश्लेषण करून लिहिलेल्या कृतींचा नवा वाङ्मयीन प्रकार अमेरिकेत रुजत होता. फॅक्ट आणि फिक्शन यांचा एक अपूर्व संयोग त्यात झाला होता. ऐतिहासिक कारणांमुळे आपली समाजभूमी अशा जीवघेण्या अनुभवांसाठी सुपीक होतीच. अक्षरांवरची एकाधिकारशाही संपुष्टात येताच त्यातून नव्या जोमाने जे उगवलं ते वाङ्मयीन महत्तेच्या रसरशीत खाणाखुणा लेऊनच. सगळं पीक सारखंच उगवलं असं नव्हे, पण त्याच्या अगाध क्षमता आणि विविध



**सुनीलकुमार लवटे**

**जन्म :** ११ एप्रिल १९५०

**आत्मकथा**

खाली जमीन वर आकाश (२००६)

**समीक्षा**

मराठी भारतीय साहित्यिक (२००७)

**संपादन**

समाज सेवा (त्रैमासिक)

वि. स. खांडेकरांच्या समग्र असंकलित, अप्रकाशित साहित्याचे संपादन. एकूण २५ ग्रंथ. त्यापैकी १५ प्रकाशित १० प्रकाशनाधीन.

उच्चमाध्यमिक (पुणे) आणि विद्यापीठीय (कोल्हापूर) स्तरावरील अनेक पाठ्यपुस्तकांचे संपादन.

**हिंदी**

नाटककार शंकर शेष (१९८२)

यशपाल : एक समग्र मूल्यांकन (१९८४)

शेवडे : व्यक्तित्त्व एवं कृतित्त्व (१९८६)

**अनुवाद**

वि. स. खांडेकरांच्या निवडक साहित्याचा हिंदी अनुवाद

राजर्षि शाहू : व्रत और विरासत : कॉ. गोविंद पानसरे (२००२)

शक्यता डोळ्यात मावेनाशा होत्या एवढे मात्र खरे.

हा स्फोट, उद्रेक मराठीपुरताच मर्यादित होता असे नाही. गेल्या अर्धशतकात जागतिक वाङ्‌मयात मोलाची भर घालणारे बहुतेक सगळे महत्त्वाचे लेखकही तथाकथित 'तिसऱ्या जगातले'च आहेत. या पार्श्वभूमीवर आणि विशेषकरून मराठी आत्मकथनाच्या या नव्या प्रवाहात आपली स्वत:ची वेगळी ओळख ठसठशीतपणे अधोरेखित करणारे पुस्तक म्हणजे गेल्याच वर्षी प्रकाशित झालेले प्रस्तुतचे आत्मकथन.

हे आत्मकथन अतिशय वाचनीय झालं आहे त्याचं कारण त्याच्या 'भाषाशैलीत' खचितच नाही. ती तर लेखकाकडे आहेच. कारण ते भाषेचे अभ्यासक आहेत. त्यांची डॉक्टरेटच हिंदी साहित्यात आहे, आणि त्या भाषेतील अनेक लेखक त्यांनी बारकाईने अभ्यासले आहेत. पण अशा अध्ययनातून येणारी कारागिरी, चमकोगिरी आणि अध्यापनातून येणारं ग्रांथिक जडत्व यापासून त्यांची शैली मुक्त आहे. त्यांना शैली आहे पण ते शैलीदार लेखक नाहीत. अलंकरणाचा लवलेशही त्यात नाही. मुळातच अनेक प्रसंगात असलेलं नाट्य त्यांना अधिक नाट्यमय किंवा नाटकी करता आलं असतं, पण त्याच्याही वाटेला ते गेलेले नाहीत. त्यांची निवेदनशैली सरळ, सोपी, प्रवाही आणि पारदर्शक आहे; घटना, प्रसंग आणि भाव-भावनांना थेट भिडणारी आहे. ती त्यांची स्वाभाविक शैली आहे. कारण तेच त्यांचं व्यक्तिमत्त्व आहे. या पुस्तकाच्या नायकावर, निवेदकावर या माणसातला लेखक स्वार झालेला नाही, उलट तो त्याच्या संज्ञाप्रवाहाचा वाहक बनलेला आहे, हे पुस्तकाच्या वाचनीयतेचं गमक आहे, 'व्हॅल्यू ॲडिशन' आहे.

या लेखनात नाट्यमय, सनसनाटी, भावोत्कट, उद्रेकी, विद्रोही म्हणता येतील असे अनेक घटना प्रसंग आहेत. पण तेही इथे बेटासारखे, स्वतंत्र, तुटल्यासारखे उभे राहात नाहीत. आयुष्याच्या जडणघडणीच्या गुंतागुंतीच्या प्रक्रियेचा ते अविभाज्य भाग असतात आणि लेखक त्याच्याकडे सजगतेने पाहात असतो, एक अंतर ठेवून. एका समाधिस्थ तटस्थपणे. एका साक्षात्कारी जाणीवेने. आपण कसे घडलो, कसे जगत आलो, आयुष्याचा अर्थ आपल्याला कसा उलगडत गेला, मी कोण याचा शोध आपल्याला इतक्या वर्षांनंतरही कसा लागलेला नाही, असा चिंतनशील शोध घेण्याच्या वाटेवर त्यांची मार्गक्रमणा अजूनही सुरू आहे. आपल्या आयुष्यातील घटनांकडे पाहताना जगण्याच्या शोधाचे निमित्त म्हणूनच अनेकदा त्या येताना दिसतात. एके ठिकाणी ते म्हणतात, 'मी मागं टाकलेलं आयुष्य




अविश्वसनीय वाटावं इतका सारा बदल एका जन्मात व्हावा, हे खरं वाटत नसलं तरी ते एक माझं जीवनवास्तव होऊन बसलं आहे. कितीही आघात झाले तरी मी स्वत:ला उसवू दिलं नाही. आयुष्याची लक्तरं होणार नाहीत

याची काळजी घेत मी सतत विधायक वृत्ती जोपासत आलो.'

डॉ. लवटे यांच्या वाट्याला जे आयुष्य आलं त्याने अनेकांना उद्ध्वस्त केलं असतं, जीवनविन्मुख केलं असतं, परंतु एवढा विधायक दृष्टिकोन स्वीकारून त्यांनी स्वतःचं आयुष्य सुंदर तर केलंच, परंतु अशा तऱ्हेचं शापित, निकृष्ट आयुष्य वाट्याला आलेल्या अनेकांच्या जीवनात आनंदाचे मळे फुलविण्याचा ध्यासही त्यांनी घेतला आणि त्यासाठी किंमत मोजण्याची तयारीही ठेवली. 'खाली जमीन वर आकाश' या पुस्तकाची महत्ता आहे ती या जीवन जगण्याच्या रीतीत. जीवनावरची श्रद्धा वाढविणाऱ्या एका सामान्य माणसाच्या असाधारण धैर्याची, शौर्याची, पराक्रमाची ती गाथा आहे. पुस्तक वाचून संपलं तरी त्यातल्या २०३ पृष्ठांतून मनभर शिल्लक राहते ती ही माणूसपणाची आदिम जाणीव. 'खाली जमीन वर आकाश'च्या नायकाची, निवेदकाची गोष्ट किंवा कथा ज्या मूल्यभावाने विणलेली आहे ती पाहता त्यातील घटना, प्रसंग सुटे करून सांगणं म्हणजे वस्त्र उसवण्यासारखं आहे. जाड्या-भरड्या, खरखरीत लोकरीच्या धाग्यांनी विणलेली असली पंढरपुरी घोंगडीला असलेली ऊब या कथनात आहे. ती अनुभवायची तर पुस्तक मुळातूनच वाचायला हवं. वर्षाच्या आत या पुस्तकाची दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली आणि काही पुरस्कारही मिळाले, याचा अर्थ वाचकांना ते भावलं असणार. तरीही एक किमान उत्सुकता म्हणून तुमच्यासाठी ही पानं मी भरभर उलगडणार आहे. पंढरपूरला यात्रेसाठी आलेला वारकरी विठ्ठलापुढे डोकं टेकवायचा आणि मग नवरंगे बालकाश्रमाच्या किलकिल्या दारातून आत डोकवायचा तसं.



पंढरपूरच्या याच नवरंगे बालकाश्रमात ११ एप्रिल १९५० रोजी एका गरीब घरातल्या कुमारीमातेच्या पोटी सुनीलचा जन्म झाला. आई मुलाला आश्रमात सोडायला तयार नव्हती. पण अशा कुमारीमातांना निर्णयाचं स्वातंत्र्य कुठं असतं? परिस्थितीला शरण जाण्याशिवाय पर्यायच नसतो. पण अशा आश्रमातही आभाळाएवढं मन असलेली माणसं असतात. त्यात होती परित्यक्त उमाबाई. स्वतःच्या पोटी जन्माला आलेल्या मतिमंद, पोलिओग्रस्त मुलीचं दुःखं विसरून तिनं सुनीलला ओटीत घेतलं. तिनंच सुनीलचं आईपण निभावलं, शेवटपर्यंत.

पहिल्या काही भागात लेखक हा आश्रम आपल्यापुढे उभा करतो. इतरांसाठी अनाथाश्रम असला तरी मुलांचं ते गोकुळ असतं. त्यातली समाजाने अव्हेरलेली माणसं, त्यांचे प्रश्न, त्याचं कोंडलेलं, दडपलेलं भावविश्व, त्यातली व्यवस्था, समाजाचा त्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन, सेवाभावी

माणसांनी खस्ता खाऊन उभारलेलं अनाथांचं ते घर, त्यातलं प्रेम, जिव्हाळा, माणुसकी, आपुलकी, राग-लोभ, भांडण-तंटे अशा अनेक तऱ्हांनी नवरंगे बालकाश्रम आपल्यापुढे उभा राहतो. त्याचं आतलं, गाभ्याचं जे दर्शन लेखक घडवतो, ते वर्णनाच्या पलीकडे जातं. कारण तो आश्रम त्याचं 'घर' असतं, त्यात त्याची बहिणभावंडं असतात, आई-मावश्या असतात, मित्र-मैत्रिणी असतात. प्रत्येकाची एक 'स्टोरी' असते आणि सगळ्यांचं मिळून एक महाकथानक असतं.

लेखक इथं कधीतरी म्हणून जातो, "समाजात नैतिकता, प्रतिष्ठा, जात, धर्म, परंपरांचा टेंभा मिरवणारी तथाकथित उच्चभ्रू मंडळी अश्राप मुला-मुलींना, त्यांचा काही अपराध नसताना, त्यांच्यावर अनाथपणाचं उद्ध्वस्त जीवन लादून नामानिराळी होतात. समाजभयापोटी कुमारीमातांची मुलं आजन्म असामाजिक विजनवास भोगत राहतात, मानव अधिकारांचं अपहृत जीवन जगणं त्यांना भाग पडतं... अनाथाश्रम, रिमांड होमसारख्या संस्था समाजाच्या लेखी प्रासंगिक दया व्यक्त करायची करुणालयंच असतात."

अनाथ आश्रमातील मुलं थोडी मोठी झाली की त्यांची रवानगी रिमांड होममध्ये व्हायची. आश्रमाच्या आया-मावशांच्या सुरक्षित कवचातून 'रिमांड होम' म्हणजे तुरुंगच. सुनीलची बदली कोल्हापूरच्या रिमांड होममध्ये. पहिल्याच दिवसाने त्याला भविष्याची चुणूक दाखविली. तो म्हणतो, "माझं सारं बालपण त्या रात्री कुस्करलं गेलं. रिमांड होममधलं रॅगिंग... मी जन्मत: शिकार होतोच, पण असं कायमचं लुटलं जाणं शिसारी आणणारं होतं."

रिमांड होममधली मुलं म्हणजे घड्याळाचे काटे असा सारा बंदिस्त कार्यक्रम. त्यातही काही देवमाणसं भेटायची आणि जगणं सुसह्य व्हायचं. उदा. "याच काळात शंकर अण्णा भालकर नावाच्या व्यवसायाने परीट असलेल्या एका मातृहृदयी माणसाशी आमची गाठ पडली नि आयुष्याचं अनाथपण धुऊन गेलं."

रिमांड होमची मुलं ज्या शाहू दयानंद मोफत मराठी शाळेत जायची तिथं आसपासच्या गरीब वस्तीतील मुलंही येत. त्याविषयी लिहिताना सुनील म्हणतो, "रिमांड होम सकाळी गव्हाची कांजी आणि दोन वेळचं जेवण एवढ्यावरच आमची गुजराण करायचा. घरातून येणारी शाळेतील मुलं मधल्या सुट्टीसाठी जेवणाचा डबा आणायची. नाही म्हणायला कधीतरी अरुण कसबेकर, अनिल घाटगे, शंकर वाडकर, शिवाजी पाटील यांसारखी सहृदय मित्रमंडळी घासातला घास द्यायची. खिशातून आमच्यासाठी घरातून चोरून भाकरी आणणारे हे मित्र..."

समाजातल्या तळागाळातल्या अशा अनेक साध्या, गरीब माणसांच्या मनाच्या ऐश्वर्याच्या, करुणेच्या, सहवेदनेच्या कितीतरी हकिगती या पुस्तकात येतात आणि आपलं आयुष्याचं भान समृद्ध, श्रीमंत होतं. डॉ. लवटे यांचा जगण्यावरचा विश्वास दृढ करणारा, त्यांच्या मनात मूल्यभाव निर्माण करणारा, जीवनाकडे पाहण्याची होकारात्मक दृष्टी देणारा हा कालखंड अतिशय महत्त्वाचा आहे. पुढे त्यांनी स्वत:ला ज्या कामात झोकून दिलं त्याचं बीजारोपण याच कालखंडात झालं असणार. ते एके ठिकाणी म्हणतात, "चौथीपासून अकरावीपर्यंतच्या प्रवासात या सवंगड्यांनी मला मैत्रीचं अभय कवच दिलं. त्या अभेद्य कवचात मी माझं अशक्तपण नेहमी सुरक्षित अनुभवलं!"

शाळा संपली, वयाची अठरा वर्षं पूर्ण झाली आणि रिमांड होममधून बाहेर पडायची वेळ आली. या टप्प्यावर लेखक म्हणतो, "तुरुंग आणि रिमांड होममध्ये एक मूलभूत फरक असतो. तुरुंगातील कैदी आपली मुदत, शिक्षा कमी कशी होईल याचा आटोकाट प्रयत्न करीत असतात. या उलट रिमांड होममधील मुलं, विशेषत: अनाथ, निराधार मुलं-मुली संस्थेतील मुदत वाढेल कशी याचा आटापिटा करीत असतात... संस्थेचं सुरक्षित कवचच त्यांचं जीवन असतं. संस्था हीच त्यांची जमीन असते नि आकाशही... बाहेरचं सारं जग अनोळखी, आधारहीन असतं..."

आणि वेगळ्या संदर्भात पुढे, "एक मात्र खरं की आश्रम असू द्या की रिमांड होम, या दोन मातृसंस्थांनीच माझ्या पायांना बळ दिलं नि माझ्या महत्त्वाकांक्षेस पंख फुटले तेही या संस्थांमुळेच. लहानपणी या संस्था मला नकोशा वाटायच्या. संस्था नियमांच्या काचात बंदिस्त असतात. त्यावेळच्या मर्यादित जागृती व साधनांनिशी चालणाऱ्या या संस्थांनीच मला उद्याची उज्ज्वल पहाट दाखविली हे नाकारून

कसं चालेल? माझ्या जीवनास खरी उभारी, भरारी लाभली ती याच काळात.''

मॅट्रिकला पुरेसे गुण मिळाले नाहीत



म्हणून कॉलेजप्रवेश नाही, परंतु पुढं आणखी शिकण्याची उर्मी तेवढीच प्रबळ. सुनीलने गारगोटीच्या मौनी विद्यापीठात डिप्लोमा इन रुरल सर्व्हिसेसच्या कोर्सला प्रवेश घेतला. पैशाची कायम चणचण. पण परिस्थितीशी झगडून या बी.ए. बी.एड. समकक्ष कोर्समध्ये ते भारतात पहिले आले. अनाथाश्रम, रिमांड होमच्या इतिहासात असं यश संपादन करणारा हा पहिलाच विद्यार्थी. वाचन, लेखन, भाषणं, नाटक, समाजसेवा, नेतृत्व अशा सर्वच अंगांनी सुनीलच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण येथे झाली. उत्तम प्राध्यापकांचं मार्गदर्शन मिळालं. 'मौनी विद्यापीठातील दिवसांनी माझं चित्र, चरित्र नि चारित्र्य घडविलं. त्याआधी संस्कारांची पेरणी कोल्हापूरच्या आंतरभारती विद्यालयाने केली होती.' असं सुनीलने लिहिलंय. या संस्थांचे संस्थापक जे. पी. नाईक आणि वि. स. खांडेकर यांनी उभारलेल्या पायाभूत कामाला मिळालेली ही केवढी मोठी दाद आहे!

परीक्षेतील या यशाने त्यांना नोकरीची ऑफर आली तीही आंतरभारतीकडून. भुदरगड तालुक्यातील पिंपळगावसारख्या एका दुर्गम खेड्यात त्या दिवसांनी सुनीलला एक माणूस म्हणून, शिक्षक म्हणून जीवनभान दिलं. मातीशी नातं जोडलं. आणि नंतरच्या काळात जीवनसाथीशीही नातं जुळलं, पंढरपूरच्या आश्रमातील सुनीलसारख्याच एका अनाथ मुलीशी—रेखाशी. अनाथ मुलीशीच लग्न करायचं हे त्याचं स्वप्न साकार झालं होतं. अनाथाच्या लग्नास अनाथांचाच मेळा होता. 'रेखामुळे मी पूर्ण सनाथ झाल्याची, पूर्णत्वाची प्रचीती येत गेली', इति सुनील.

आंतरभारतीतील प्रारंभीच्या दोन-तीन वर्षांचा काळ सुनीलच्या मनात अंकुरलेल्या ध्येयवादी शिक्षकाच्या घडणीचा, आणि धडपडीचा.

याच काळात आजार, नोकरी, संसार, शिक्षकसंघटना सांभाळत सुनील एम.ए. झाला. आंतरभारतीच्या लोकशाहीकरणाच्या लढ्यात सुनील अग्रभागी होता. स्वकीयांविरुद्ध उभं ठाकणं सोपं नव्हतं. संस्थेबद्दल व्यक्तिगत पातळीवर कृतज्ञतेची भावना होती, पण सामाजिक जीवनातील अन्यायाचा विरोध करणं ही सदसद्विवेकबुद्धी होती. अंत:प्रेरणा होती. ध्येयवादाने स्थापन झालेल्या संस्थेत तत्त्वांची पायमल्ली होत असताना लढाईसाठी पुढे आले ते सुनीलसारखे 'नाही रे' वर्गातले ध्येयवादी तरुण. त्याचं पर्यवसान अटळ होतं — आंतरभारतीच्या नोकरीचा राजीनामा. हा संघर्ष त्याला अकाली प्रौढत्व देऊन गेला.

सुदाम्याच्या पोह्यांचा संसार करता करता सुनीलने अठरा अठरा तास अभ्यास करून शिवाजी विद्यापीठातून पीएच.डी. केली. महावीर महाविद्यालयात प्राध्यापकी कायम झाली. या टप्प्यावर लिहिताना ते म्हणतात, ''माझ्या घडण्याच्या काळात जे संस्कार मला मिळाले, त्यांनी मला ध्येयवादी शिक्षकाचे स्वप्न दिले होते. आंतरभारतीमध्ये ध्येयवादाची फारकत न घडती तर मी शिक्षक राहणेच पसंत केले असते. माध्यमिक विद्यालयात शिकवण्याचे समाधान असते. विद्यार्थी घडतो, घडवता येतो याचे प्रत्यक्ष प्रत्यंतर जर कुठे येत असेल, तर ते माध्यमिक विद्यालयातच. असे असताना मी प्राध्यापक झालो. माझे प्राध्यापक होणे हा माझ्या महत्त्वाकांक्षेचा भाग मुळीच नव्हता. माझे प्राध्यापक होणे परिस्थितीने माझ्यावर लादलेले ओझे होते. मी ज्या विषम परिस्थितीतून उभा राहिलो, त्यात माझ्या प्राध्यापक होण्याची बीजे रुजलेली मला आढळतात. प्राध्यापक व्हावयाची ऊर्मी नि ऊर्जा माझ्यात निर्माण झाली ती मूल्यांच्या भ्रमनिरासामुळे. ही एक निषेधात्मक प्रतिक्रिया होती. क्लेशकारकही.''

पीएच.डी. झाल्यानंतर कोल्हापूरच्या रिमांड होमने आणि पंढरपूरच्या नवरंगे बालकाश्रमाने सुनीलचा सत्कार केला. या संस्थांनी केलेल्या ऋणाची, उपकाराची फेड म्हणून काही करावं असं वाटणं स्वाभाविक होतं. पूर्वाश्रमीच्या अनुभवाचं अपत्य म्हणून या संस्थांचं चित्र बदलण्याचा ध्यास मनाशी होता. ''ज्या विषम स्थितीतून मी वर आलो, त्याचं विस्मरण मला कधी शक्य होत नाही. त्यामुळे परहिताचा ध्यास मला नित्य लागून राहतो. अनाथ, निराधार मुले, मुली नि महिलांसाठी काही करावं, अशी ऊर्मी आतल्या आत खदखदत असायची.'' या मनातल्या विचारांचं यथावकाश प्रत्यक्ष कृतीत रूपांतर झालं आणि १९८० ते २००० अशी अखंड वीस वर्षं काम करून कोल्हापूरच्या रिमांड होमचं मातृमयी संस्थेत रूपांतर केलं. 'ही संस्था मातेचे कार्य करते' हा पोस्टरवरचा मजकूर मुलांच्या भावविश्वाचा, रोजच्या जगण्याचा भाग झाला. रिमांड होमचं बालकल्याण संकुलातील परिवर्तन आणि त्यासाठी सुनीलने व त्यांच्या सहकाऱ्यांनी घेतलेले कष्ट, योजकता, कल्पकता, धडाडी, केलेला संघर्ष, जोडलेली माणसं, शासनदरबारी घातलेले खेटे, केलेल्या मिनतवाऱ्या, मिळविलेल्या देणग्या या वीस वर्षांच्या कालखंडाचं वर्णन सद्भावाने केलेली 'सायलेंट रेव्होल्युशन' असंच करावं लागेल.

कोल्हापुरात बालकल्याण संकुलांच्या कामात झोकून दिल्यामुळे लेखकाला राज्य पातळीवरही अशा तऱ्हेच्या कामाची संधी मिळाली आणि युरोप आणि सिंगापूर, जपानमध्ये या क्षेत्रात चालणारे काम प्रत्यक्ष पाहता आले. त्यातून निर्माण झालं ते प्रचंड असमाधान. युरोपला 'बालकल्याणाची जगपंढरी' मानलं जातं, आणि जपानने या क्षेत्रात केलेल्या अजोड कामाशी तुलनाच होऊ शकत नाही. आपण या क्षेत्रात किमान सुविधाही उपलब्ध करून देऊ शकलेलो नाही, या जाणिवेने लेखकाला अपराध्यासारखं वाटतंच, पण अनेक कारणांमुळे 'वंचित' ठरलेल्या लोकांकडे पाहण्याचा या देशातील समाजाचा सुसंस्कृत दृष्टिकोण आणि आपल्याकडील अनास्था आणि अनादर यातील प्रचंड दरी कुठल्याही संवेदनशील व्यक्तीला व्याकूळ करणारी आहे. इतरांसाठी 'मॉडेल' ठरावं असं काम इथं उभारणाऱ्या लेखकाला या अंतराच्या परिमाणाचे आणि त्यातील डायनॅमिक्सचे भान तर अधिक तीव्रतेने आले असणार.

आपल्याकडे सर्रास आढळणाऱ्या अशाच संस्थांतर्गत राजकारणाने शेवटी लेखकाचा बळी घेतलाच. महर्षी शिंदे यांना प्रार्थना समाज किंवा डिप्रेस्ड क्लास मिशनमधून बाहेर पडावं लागणं किंवा आगरकरांना 'केसरी' सोडावा लागणं अशा घटना आपल्याकडे अपवादात्मक नाहीत, तो जणू नियमच असावा. लेखक इथे म्हणतो, ''वाईट वाटतं ते त्या अश्राप, अनाथ जीवांचं! ईर्षा, व्यक्तिद्वेषापोटी माणसं किती टोकाची निष्ठूर नि बेजबाबदार होतात याचं! त्यांनी अनाथांना निराधार करण्याचं शल्य अधिक अस्वस्थ करतं!''

डॉ. सुनीलकुमार लवटे यांचं वेगळेपण हे की लढाई केल्याशिवाय ते हार मानत नाहीत, आणि एक मार्ग बंद झाला म्हणून तिथंच ते थांबत नाहीत. नव्या वाटा शोधत राहतात. नवं काम मागं लावून घेतात. प्रश्न असतातच, त्यांच्या उत्तराचा शोध घेत राहतात. नवनिर्मिती, सृजन ही त्यांची अंत:प्रेरणा आहे. कारण मुळात ते 'मातृहृदयी' आहेत.

## इतिहासावरचा विषाणू दाखवणारी कविता

# नंतर आलेले लोक

### रंगनाथ पठारे

'नंतर आलेले लोक' या अरुण काळे यांच्या कवितासंग्रहाला पुरस्कार देऊन महाराष्ट्र फाउण्डेशनने अत्यंत योग्य अशा कवितेचा गौरव केला आहे. या कवितांची गेल्या वर्षभरात लिखित प्रतिसाद देऊन घेतलेली दखलच या कवितेचे महत्त्व सांगण्यासाठी पुरेशी बोलकी आहे. भास्कर भोळे यांच्यापासून ते थेट अगदी नवख्या तरुण समीक्षकांपर्यंत साऱ्यांनी अतीव उत्साहानं या कवितेचे स्वागत केलेलं आहे, तिचं महत्त्व विशद केलेलं आहे. अरुण काळे यांनी शीर्षकासाठी निवडलेली कविता आणि रवींद्र किंबहुने यांनी या पुस्तकाची पाठराखण करताना लिहिलेला मजकूर या दोहोंची दाट छाया या रसास्वादावर दिसते. हे मी या समीक्षकांचा अधिक्षेप करण्यासाठी म्हणत नाही, तर एखादी उत्तम पाठराखण आणि एखादं शीर्षक आपल्या आस्वादावर किती प्रभाव टाकू शकतं याचा नमुना म्हणून याकडं बघावं असं मला वाटतं (मला संधी असती तर ''झिंग झिंग लपालपा'' हे शीर्षक मी या संग्रहाला सुचवलं असतं. असो.)

१

'नंतर आलेले लोक' ही या संग्रहातली शीर्षस्थानीची कविता आहे. कवीनं ज्याअर्थी तिची शीर्षस्थानी निवड केली आहे, त्याअर्थी आपण एक वाचक म्हणून ती गंभीरपणेच घेतली पाहिजे. 'नंतर आलेले लोक' ही चांगली कविता आहे. एकतर तिचं प्रतल हे जागतिक स्वरूपाचं आहे. म्हणजे भारतात किंवा महाराष्ट्रात नांदणाऱ्या प्राचीन संस्कृती अन् त्यांच्यावर हल्ला करून त्यांना जिंकणारे आर्य वगैरे लोक एवढ्यांच्याच बद्दल ती बोलत नाही. ती जगातल्या अनेक भागात वेळोवेळी घुसलेल्या आक्रमक 'नंतर आलेल्या लोकां'संबंधी बोलते. प्राचीन काळी आर्यांच्या रानटी अन् भटक्या टोळ्यांनी आपल्याकडं जे काही केलं असेल त्याच प्रकारचं जरा अलीकडच्या काळात स्पॅनिश आणि पोर्तुगीजांनी अमेरिका खंडातल्या विविध प्राचीन रेड इंडियानांच्या संदर्भात केलंय हे आपल्याला माहीत आहे. न्यूझीलंड, ऑस्ट्रेलियातही गोऱ्यांनी तिथल्या ॲबोरिजिन्सच्या अतोनात कत्तली केल्या अन् आफ्रिका खंडातही कित्येक ठिकाणी असंच घडलेलं आपल्याला माहीत असतं. मानवी संस्कृतीची वाढ आणि विकास एकरेषीय नसतो. जगाच्या पाठीवर नांदलेल्या अनेक संस्कृती काही एका टप्प्यावर अशाच लयाला गेलेल्या दिसतात. कोणत्या ना कोणत्या आक्रमक समूहांच्या हल्ल्याला त्या बळी गेलेल्या आढळतातच. काही ठिकाणी असे हल्ले न होताही संस्कृती हळूहळू लयाला गेल्याचाही दाखला मिळतो. नालंदा, तक्षशिला येथील ग्रंथसंपत्तीचा विध्वंस असो वा काबूलमधल्या मशिदीत प्रार्थना करणाऱ्या मुसलमानांची अडाणीपणे चंगीजखानानं कत्तल करणं असो किंवा अमर्याद सोन्याच्या लोभाची पिझारोची मागणी दक्षिण अमेरिकेतल्या त्या इंका किंवा माया संस्कृतीतल्या राजानं पुरी करूनही त्या राजासकट अनेकांची पिझारोनं केलेली कत्तल असो, सगळ्यांमध्ये महत्तम साधारण विभाजक उरतो तो क्रौर्याचा. अडाणी क्रौर्याचा. पण आधुनिक काळातल्या गोऱ्या हिकमती वसाहतवाद्यांनी यापेक्षा जरा वेगळा व अधिक हुशारीचा रस्ता निवडला होता हेही लक्षात घेतलं पाहिजे. याचं कारण त्यांच्याकडं औद्योगिक क्रांती झालेली होती अन् ते व्यापारी होते. त्यांना त्यांचा तयार माल खपवण्यासाठी हुकमी बाजारपेठा हव्या होत्या. त्यांनी,

*कधी कधी दुसऱ्याचा देश*
*आपला म्हणून विकला*



अरुण गोविंद काळे

**जन्म :** २५ एप्रिल १९५२

**कविता**

रॉकगार्डन (१९९३)
सायरनचे शहर (१९९७)
नंतर आलेले लोक (२००६)

**आगामी**

ग्लोबलचं गावकुस (कविता संग्रह)
सायरन का शहर (हिंदी कविता संग्रह) अनु. ओम प्रकाश वाल्मिकी

एवढंच नाहीतर 'आयजीच्या जीवावर बायजी उदार' असं करत इंग्लडच्या राजघराण्यात आपली लेक देणाऱ्या पोर्तुगीज राजानं मुंबईचं बेट आपल्या लेकीसाठी प्रेमपूर्वक आंदणही दिलं!

अरुण काळे या कवितेत अनेक काळातल्या व पृथ्वीच्या पृष्ठभागावरील अनेक प्रदेशातल्या 'नंतर आलेल्या लोकां'नी केलेल्या शारीरिक, भावनिक, मानसिक विध्वंसाची कहाणी मांडतात. या कवितेतील वेदना ही एका प्राचीन आणि समृद्ध संस्कृतीच्या सभासदाची वेदना आहे. अशा सभासदाला पुष्कळदा अनेक गोष्टी अनाकलनीयसुद्धा वाटत असतात. प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ युंग हा जगभर हिंडला होता. (तो भारतातही येऊन गेला होता.) एकदा असाच तो अमेरिकन इंडियन (अमेरिकेतले मूळ रहिवासी) माणसाशी बोलत असताना तो इंडियन म्हणाला, 'या गोऱ्या लोकांचं काय होईल याची मला फार काळजी वाटते.' यावर युंग अतिशय चकित झाला. जेत्या आणि भौतिक सुखांनी समृद्ध गोऱ्या अमेरिकनाच्या भवितव्याची चिंता सर्वस्वी भणंग असलेल्या त्या इंडियनाला का वाटावी? युंगनं अर्थातच विचारलं की, का बुवा? त्यावर तो म्हणाला, गोरा माणूस डोक्यानं विचार करतो. नुसतंच डोकं या गोऱ्या माणसाला विनाशाकडं घेऊन जाईल. मला त्याची काळजी वाटते. हे प्राचीन संस्कृतीच्या सभासदाचं एक प्रौढ आकलनच म्हणता येतं. अरुण काळे यांचा स्वर या तुलनेनं अधिक आक्रमक व अधिक परखड असा आहे.

*...सर्वांचा कागूदपत्र केला*
*लिंगाचा पेपरवेट वर ठेवला*
*त्यावरही आपला हात ठेवला*
*नंतर आलेल्या लोकांनी*

असं ते म्हणतात.

## २

'नंतर आलेले लोक' ही शीर्षस्थानीची कविता केंद्रस्थानी मानून या संग्रहातील कवितांकडे पाहणं शक्य आहे का? या संग्रहातील कविता कोणाविषयी अन् कशाविषयी बोलत आहे? ती कोणत्या काळासंबंधी बोलत आहे? ती कोणत्या लोकांविषयी बोलत आहे? तिच्या भाषेची जातकुळी कोणती आहे? तिचा स्वर कसा आहे? ती कोणत्या प्रकारचे प्रश्न मांडते अन् कोणते प्रश्न उपस्थित करते? या कवितेची आपल्याला भिडण्याची रीत कोणती? असे काही प्रश्न सुरुवातीलाच उपस्थित करत या कवितेत शिरण्याचा प्रयत्न करूया.




नुसता हिंदुस्थानापुरता विचार करायचा तर आर्यांच्या आलेल्या टोळधाडी, नंतरचे शक, हूण, कुशाण, त्याहीनंतरचे तुर्क, अरब, इराणी, अफगाण अशा टोळ्या आपल्याकडं सतत येत राहिलेल्या आहेत. (अल्लाऊद्दीन खिलजीनं युक्तीनं थांबवल्या म्हणून तार्तार लोकांच्या टोळ्यांचा बंदोबस्त झाला. अन्यथा तार्तार, बर्बर, मंगोल हेही आले असते.) इथं जे आले, त्यांनी जरा धामधूम करत इथं जागा केली अन् ते इथं रहिवसले, हा आपला इतिहास. महार हे महाराष्ट्र देशाचे मूळ रहिवासी. रट्ट लोकांनी त्यांना जिंकलं अन् ते इथं रहिवसले; असं मानलं जातं. या सगळ्या या ना त्या प्रकारे नंतर आलेल्या लोकांसंबंधी आधीच्या

लोकांचा प्रतिनिधी म्हणून कवी या संग्रहात बोलतो का, असा प्रश्न उपस्थित केला तर जवळपास नकारार्थीच उत्तर मिळतं. कवी दलिताच्या जगण्यातील दुःख वंचना यांची मांडणी करतो हे खरं, पण ती फक्त दलित जातींपुरती नाहीय. त्यामुळे रूढ अर्थाने ही दलित कविताच नाहीय, असं मी म्हणतो. ती दलित या संकल्पनेची जी व्यापक मांडणी,



बाबूराव बागूल, नामदेव ढसाळ यांना अभिप्रेत आहे, तिला अनुसरणारी शोषित समूहाची कविता आहे. जातीय जाणिवेला विस्तारत, व्यापक करत एकूण शोषिताच्या वर्तमानाची मांडणी करणारी ही कविता आहे. रामकिसन इंग्लीस कुत्रीवाला, भाऊराव कृष्णाजी गायकवाड, एन आर आय, वॉटर किंगडम, विंडो २०००, कसारा ते कल्याण प्रवासातले बापलेक, कुत्र्याला खंडेराव म्हणणारी आई, मला आतली चड्डीपण नाही म्हणणारी प्रेयसी, महामार्गावर धंदा करणाऱ्या पोरी, बारकोडिंगवाल्या बारबाला, सनई फुंकून फुंकून तोंडातला एकही दात ठिकाणावर न उरलेला सीताराम मास्तर, आयटीचा रेडलाईट एरिया, संगणकाचा मदरबोर्ड झालेले बाबासाहेब आंबेडकर, लार्जर दॅन लाईफः लहानीबाय, अशी अनेक माणसं अन् प्रवृत्ती या कवितांमध्ये आपल्या समोर येतात. रांडव झालेल्या मराठी भाषेला सवाष्ण करण्याची भाषा नामदेव ढसाळांनी केली होती. त्या आता सवाष्ण झालेल्या वा न झालेल्या भाषेत अरुण काळे म्हणतो,

*मला शोधायचाय एक शब्द*
*जो भाषापंडितांना माहीत नाही*
*जो सर्वांच्या रक्तातून वाहतो आहे*
*जो अजून बोलला गेला नाही.*

जी व्यापक करुणेची जाणीव या ओळी प्रकट करतात, ते या एकूण संग्रहातल्या कवितेचं शीर्षस्थानीचं भाष्य आहे, प्रतिपाद्य आहे असं मला वाटतं. या ओळींना केंद्रस्थानी धरून या कवितांकडे जरा नीट अन् नेमकेपणानं पाहणं शक्य आहे.

शोषितांचा पक्ष मांडणारी ही कविता वर्तमान वास्तवाचा विरूप, क्रूर अन् पिसाट चेहरा थेटपणं मांडते. साहाजिकच तिची भाषा ही वर्तमानाची भाषा आहे. अडाणी खेडुताच्या वा शहरातल्या दलदलीच्या नरकात राहणाऱ्या झोपडपट्टीतल्या माणसाच्या भाषेपासून ते संगणक वापरणाऱ्या भद्र लोकांच्या भाषेपर्यंत असा तिचा विस्तृत पट आहे. भद्र लोकांच्या भाषाव्यवहाराचा एक आयुध म्हणून वापर करत वर्तमान वास्तवातलं अभद्र ओंगळ सगळं ती निधडेपणानं समोर आणते. या दृष्टीनं संग्रहात अखेरीला छापलेली 'मल्टीलूटालुटीचा झिंग लपालपा' ही कविता पाहण्यासारखी आहे.

*बजाऽऽऽव, नाचोऽऽ*
*झिंग लपालपालपा, झिंग लपालपा*
*खुल्क है खुदाका आणि मुल्क जनताका*
*हुकूम कंपनीका, नाचो झिंग लपालपा*
*घुंब घुंब नकानका, झिंग लपालपा*

या ओळींमध्ये झिंग आणणारी लय आहेच खेरीज ती काहीतरी लपालपा खाण्याचं, ताव मारण्याचं आवाहन करणारी आहे. जुनी खुल्क खुदाका वगैरे घोषणा; तिच्यात मुल्क पातशाहका ऐवजी जनताका, हुकूम

कंपनी सरकारका ऐवजी कंपनीका ही बदललेली शब्दयोजनाही लक्षात घेण्याजोगी आहे. लोकशाहीमुळं मुल्क जनताका अन् पातशहा जसा नामधारी होता ब्रिटिश राज्यात, तशीच सत्ताधारी जनता वा लोकशाही ही नामधारी. इथं कंपन्यांचा हुकूम चालतो, मल्टिनॅशनल कंपन्यांचा. म्हणून कंपनी सरकारऐवजी कंपनीका हुकूम. नंतरच्या ओळीत लयीला आणखी उंचावर नेणारे 'धुंब धुंब नकानका' काय आहे? लयीत ढोल वाजतोय. धुंब धुंब नका नका. घोष चाललाय. नाचा. घुमा. कशासाठी हा जल्लोष?

*श्वापदाने मारली शिकार*
*तोंड खुपसून दिली डकार*

श्वापदानं जनावर मारलंय. एवढंच नाहीतर पोट भरून ढेकरही दिलीय. आतापर्यंत दुरून टुकटुक पाहणाऱ्या कोल्ह्या-कुत्र्यांसाठी, लांडग्या–गिधाडांसाठी आवाहन आहे. नाचा. घुसा. लुटा. आणखी कसलाही विचार करू नका. कसलाही निषेध मानू नका. हाव आहे तर ताव मारा. जाणारा त्याच्या मरणानं मेला. खंत नको. खेद नको. तो भलामोठा गवा असूद्यात वा आणखी कोणताही प्राणी. फडशा पाडा.

हा आजचा आपल्या मध्यमवर्गाचा शिकारी चेहरा. शिकार करण्याची हिंमत त्याच्यात नाही. त्यासाठी श्वापदच पाहिजे ना! ताकदवान कंपन्या ते काम करतात. तुम्ही फक्त मोक्याच्या जागी उभं राहायचं, हाकारे द्यायचे, वाटा अडवायच्या. श्वापद आपलं काम करील. उरलेल्यावर मग तुटून पडा. नाचा. लुटा. खा. गा. कसलीही खंत बाळगू नका. कल्याणकारी राज्य, शोषिताच्या दु:खाविषयी बांधीलकी असलं काही जे आत्ताआत्तापर्यंत थोडंबहुत का होईना आपल्या मध्यमवर्गाच्या मनाशी होतं, ते आता संपलंय. आत्ता बस्स. फक्त निर्दयी निर्मम झिंग. बाकीच्यांनी जगण्याला लायक असतील तर जगावं. अन्यथा मरावं. त्याला कोण काय करणार? किंवा त्याचा विचार कशाला करायचा?

कंपन्या लुटारू आहेतच. त्या विधिनिषेधशून्य आहेतच. पण त्या केवळ आपल्या मध्यमवर्गाचा वापर करूनच लूट करू शकतात. मध्यमवर्गाला उरलंसुरलं देऊन व त्याची झिंग आणणारी लय देऊन. जगण्यातली ही झिंग वेगळं काहीही सुचू न देण्याइतकी आज प्रमाथी झाली आहे. 'विंडो २००० : २' या कवितेत कवी म्हणतो,

*दलितत्व नष्ट करण्याऐवजी*
*दलितच डिलिट झाला*
*गुटखा गिळून बसला नेता*

हे जरा वेगळ्या संदर्भात असलं तरी ते इथं जोडायला हरकत नाही.

एक समाज म्हणून आपण किती क्रूर, विकृत अन् निर्मम निर्ढावलेले होत चाललो आहोत हे या *मल्टीलूटालुटीचा झिंग लपालपा* या कवितेच्या आरशात अत्यंत प्रभावीपणं दिसतं. ही कविता वाचताना मला 'नॉर्मन मेलर'च्या 'व्हाय आर वुई इन व्हिएतनाम' या कादंबरीची आठवण झाली. मेलर या कादंबरीत अमेरिकन माणसांचा मानसिक विकृतींनी पिडलेला पिसाट चेहरा दाखवतो. मानसोपचार तज्ज्ञ, त्याच्याकडं उपचार घेण्यासाठी जाणारी व अत्यंत अश्लील बोलून त्याला भयाण करणारी बाई, व्यक्तींच्या अनेक पातळींवरच्या विकृती, कौटुंबिक विघटन, अस्वस्थता असं चित्रण करतो. नंतर तो एका अर्थहीन सामूहिक शिकारीचं, तिच्यातील क्रौर्य, विकृती यांचं चित्रण करता करता अमेरिकन समाजाचा विकृत, क्रूर, अधाशी चेहरा उभा करतो. कादंबरीच्या अगदी शेवटच्या पानावर प्रश्न आहे: आपण व्हिएतनाममध्ये का आहोत? उत्तर आधी स्पष्ट उभं करून शेवटी प्रश्न विचारण्याची अभिनव रीत मेलरनं तिथं वापरलीय.

अरुण काळे यांची ही '... झिंग लपालपा' कविता अत्यंत भेदक अनुभव देणारी आहे. ती अगदी विरोधी पद्धतीनं शोषितांचा पक्ष मांडते. नॉर्मन मेलर त्याच्या कादंबरीत मांडतो तशाच पद्धतीनं.

## ३

जागतिकीकरणाची झिंग आणि माहिती तंत्रज्ञानाचा हंगामा व या साऱ्यात गरिबाची गरिबी किंवा शोषिताचं शोषण नष्ट होण्याऐवजी तो गरीब अन् शोषितच नष्ट केला जातोय. (गरिबी आणि शोषण नष्ट करण्याचा जालीम उपाय!) ही जाणीव *नंतर आलेले लोक*च्या गाभ्याशी असलेली प्रधान जाणीव आहे. ही जाणीव व्यक्त करण्याचा अरुण काळे यांचा पवित्रा तुकारामासारखा रोखठोक आणि कर्ममेळ्यासारखा रोकडे सवाल करणारा आहे. त्यांची भाषा मात्र खास आजची, जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या जल्लोषाची आहे. शोषकाशी लढण्यासाठी त्यांचीच

हत्यारं वापरण्याचा हा पवित्रा वेधक आहे. मदरबोर्ड, संगणकीय पडदा, मल्टीमिडिया कीबोर्ड, हे महाजाल एक इंद्रजाल, इनकमिंग आऊट गोइंग, विंडो २०००, उधारीकरणाची सायबर खिंड, सर्फीकरण अँन्टीव्हायरस, प्रोग्राम अपडेट, माहिती तंत्रज्ञानाचं कोलीत, प्रेमाचं जागतिकीकरण, सायबर कॅफे, आयटीचा रेडलाईट एरिया, पृथ्वीचा डेक, ईराख, ई-रॉक, वॉटर किंगडम, इतिहासावर विषाणू ॲना कुर्निकोवा, मी संगणकाला देतो कमांड... असे अनेक नव्या बोलीतले शब्द, संज्ञा, संकल्पना, चिन्हं यांना हा कवी आपल्या भाषेत घेऊन त्यांना नवा उजेड देतो. तो नव्या अद्‌भुत प्रतिमा तयार करतो.

*हे जंगल नसून जंगलाचा भास*
*आहे*
*हे अभयारण्य भयाचं साम्राज्य आहे*
*हे उजवीकडून डावीकडं पसरत*
*जात आहे*

'डिस्कव्हरीवर सर्वचजण दिसत नसतात' या कवितेची सुरुवात वरील ओळींनी होते. डिस्कव्हरी चॅनलवर काय काय दिसतं ते आपल्याला माहीत असतं. पक्षी, प्राणी, जलचर, वनचर, वजन उतरवण्यासाठी श्रम करणारे जाडे लोक, जंगल, आदिवासी, नाना देश, नाना लोक, सिरियनांचे लग्नांचे रीतीरीवाज सांगणारा काळा अमेरिकन; अशा पुष्कळ 'एकदा पाहताना' रंजक वाटाव्यात अशा कैक गोष्टी. कवी हे सगळं कसं बघतो? मुक्त वाऱ्याला धरून येणारे महत्त्वाकांक्षी पक्षी दूरवरून येतात अन् स्ट्रॉचा वापर करत किडे ओढतात. उरते दलदल. लांब चोचींचे अन् उंच टांगांचे पक्षी दलदलीत बारके मासे वा तत्सम प्राणी गटकावताना आपण पाहिलेलं असतं. कवी त्यांच्यात हिकमती शोषक पाहतो. तो स्ट्रॉचा वापर करून किडे ओढतो. उरल्या दलदलीची त्याला पर्वा नाही. कोण असतो हा पक्षी? ती असते एक मनोवृत्ती (सीडलेस आंबा कृत्रिमरित्या निर्माण करायचा अन् त्यात स्ट्रॉ खुपसून रस ओढायचा. उरलेला रस अन् कातडी फेका. ही मनोवृत्ती कशाची द्योतक असते? मुळात बीजच नाहीसं करणं किती अमानुष आहे! ही आपल्या नव्या जेनेटिक इंजिनियरिंगची देणगी) किंवा पडद्यावरील बुद्धिवादी ग्रंथांचे ओंडके वाहतात, त्यांची पानं लबालबा खातात. सिंहीण शिकार करते, पण खाण्याचा मान पहिला नराचा. सगळी आकाशात नजर ठेवून सरपटणारी वा जमिनीत नजर ठेवून उडणारी दुनिया. सत्य काय आहे? भ्रम कोणता, वास्तव कोणतं? समोर काय आहे अन् कवी काय पाहतो? हे जंगल नसून जंगलाचा भास आहे. समोर दिसतंय ते अभयारण्य नाहीय. ते भयाचं साम्राज्य आहे. यातले शोषक आजवर फक्त उजवे प्रतिगामी होते. आता उजव्यांच्या जोडीला डावेही येऊ घातलेत. सूर्यालाही दिसत नसतं ते कवी पाहू शकतो. जे न देखे रवी ते देखे कवी.

वापरा आणि फेका हा आजच्या युगाचा धर्म आहे. टिकाऊपणा वगैरे भानगड संपली. वापरलं संपलं. त्याचा कचरा झाला. स्क्रॅप. राक्षसी निर्मिती अन् राक्षसी कचरा. क्षणकालाची निर्मिती, क्षणकालाचा वापर अन अनंतकालाचा कचरा. तंत्रज्ञान काहीही निर्माण करू शकेल. पण टिकेल किती? स्क्रॅप ही त्याची अंतिम परिणती. *नाती संपली म्हणजे माणसंही स्क्रॅप होतात.*

तुटत चाललेल्या, संपलेल्या किंवा आधीपासूनच कधीही जोडल्याच न गेलेल्या नात्यांची जाणीव या सगळ्या कवितांमध्ये ठायी ठायी आहे. वॉटर किंगडम ही आधुनिक चंगळवादी दुनियेची देणगी. पाण्याचे प्रपात, कल्लोळ, जल्लोष, कारंजी, घसरगुंडी पाण्याला पातळी सोडून नाचवण्याचे रंजक अवाढव्य खेळ.

*या! ग्रुपने या!*
*यमुनेच्या डोहात खेळलात*
*ॲम्युजमेंट पार्कात या*
*सवलतीच्या डाईव्हज*
*अनुभवा थरार...*

हे पाहताना कवीला दिसतात पाण्याच्या असाधारण मातृत्वात सामावू न दिलेल्या माणसांच्या पिढ्या. *पाणी असतं माय। पाणी वाढ ग माय!* नदी, समुद्र, तलाव यांच्या काठाशी वाढलेल्या संस्कृती आणि परंपरांनी, त्यातल्या माणसांनी, पाण्याला हाताशी धरून त्यात माज कालवला. अन् पाण्यानंही त्याला सहकार्य केलं.

*मग तुझी झाली गटार आणि*
*बाटली*
*तुझी केली वस्तू आणि मोडली*
*बाजारात*
*घोटभर प्रेम तर लय लांब*
*विटाळ विटाळ करत झाल्या अनेक*
*अंघोळी*

कवी पाण्याला प्रश्न करतो. कवी समोरचे प्रपात, कल्लोळ, जल्लोष, पाण्याचं नाचणं-उसळणं; साऱ्याला

प्रश्न करतो. पाखरांसाठी कुंड्या भरून ठेवल्या अन् मला मात्र वरून वाढलं. तुझ्या या संस्कृत (!) भडव्यांनी माझा पावलोपावली अपमान केला. त्या कोणत्याही वेळी तुझ्यात खळबळ का उठली नाही?

खरंतर पाणी स्वत: होऊन कसं खळवळणार? तो काही पाण्याचा धर्म नाही. पाणी कड्यावरून कोसळतं, कारण त्याच्या रस्त्यात कडा असतो. पाणी विशाल करुणेसारखं तलावात साचतं, कारण तलाव त्याला धारण करतो. पाणी उसळतं, लाटा होतं, कोसळतं कारण बाकीची चार महाभूतं तात्पुरता समतोल गमावतात. किंवा चंद्र आणि पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाच्या रीतीत थोडे बदल होतात... असं पुष्कळ ज्ञान आपल्याला असतं. पण 'वॉटर किंगडम'मध्ये सपाट पृथ्वीवर ऊर्जेच्या साहाय्यानं त्याला अमानुषपणे नाचवलं जातंय अन् तरीही ते नाचतं! कवीचा प्रश्न पाण्यासाठीच फक्त नाही. जे मुळात शुभ आहे, शुभ्र आहे त्यानंही स्वार्थी राक्षसी वृत्तींना शरण जावं, अशा कशालाही आहे. ज्या आकारात ठेवाल त्या आकारात राहणाऱ्या मातृत्वाच्या सोशिकपणालाही आहे. पाणी असतं माय. कवीही पाण्याला आईच म्हणतो. पण ही आई दलिताला उपकार केल्यासारखी का वाढली गेली? ही आई कोणीही नाचवावं तशी का नाचतेय? कवी पाण्याच्या आईपणालाच प्रश्न करतो.

### ४

'बारकोडिंगवाल्या मुली' मधल्या ओळी—

*लिहा ना यांच्यावर एखादी कविता*
*ज्या स्वत:च्या लग्नाचा दहेज गोळा*
*करायला आल्यात*
*दोन-तीन वर्षं चुदवून घेऊ,*
*पैसे साठवू*
*गावी जाऊन लग्न करू,*
*तिकडे गावाकडे*
*पैसे असले की मुलांची कमी नाही*
*आज गिऱ्हाईकाची वाट पाहतोय,*
*उद्या नवऱ्याची वाट पाहू,*
*वडाला सात फेऱ्या मारू*
*करवाचौथचं व्रत करू,*
*ही स्वप्नं घेऊन त्या उभ्या आहेत.*

किंवा

'शहर, महामार्ग, पाऊस आणि कट-टू-कट' कवितेमधल्या या ओळी,

*ह्या महामार्गावर धंदा करणाऱ्या पोरी*
*गळक्या झाडांखाली उभ्या*
*ह्यांची पुनर्वसनाची छत्री*
*नेहमीच जाते चोरी*

पण,

*पोरगं हरवू नये म्हणून*
*बाप पुढे जाऊन*
*रस्त्यावर उभा राहतो*
*तसा तू पुढे आलास*
*एकविसाव्या शतकात*
*आमच्याही आधी.*

प्रत्येक काळाचे प्रश्न वेगळे असतात. लढ्याचं स्वरूप वेगळं असतं. आयुधं वेगळी असतात. प्रत्येक काळात नवनवे विषाणू पैदा होतच असतात. (खरं म्हणजे विषाणू कायमच असतात. सजीव आणि निर्जीव अशा दोन्हींमध्ये ते वर्षानुवर्षे निद्रिस्त राहू शकतात. पेशी दुबळ्या झाल्या की विषाणू सजग होऊन सजीवांची लक्षणं प्रकट करतात. पेशीपेशींवर हल्ला करून सजीवांचा सारा मुलुख बेचिराख करू लागतात. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी निसर्गाच्या संरचनेत माणसांना अनेक हस्तक्षेप करावे लागतात. समजा, झाला तो म्हणजे सारं संपतं, असं नाही होत. आणखी वेगळे, आणखी दुर्दम्य विषाणू सजग व्हायला सज्जच असतात. कारण ते सतत असतातच!) त्यांच्याशी लढावंच लागतं. त्यातून सुटका नसते.

*आता या आयटीच्या युगात*
*दलितांना डिलिट करण्यासाठी*
*नवनवीन सॉफ्टवेअर येताहेत*
*आणि प्रोग्रॅम खराब करण्यासाठी*
*सोडले जाताहेत विषाणू*
*तरीही तुझी ॲन्टी व्हायरस*
*खबरदारी*
*पुन्हा पुन्हा करतेय त्यांना पराभूत*

एखाद्या जेनेटिक सूत्रासारखं नित्यनूतन आत्मबळ बाबासाहेबांनी शोषितांच्या लढ्याला पुरवलंय. याचा असाधारण प्रत्यय या कवितेतून येतो.

### ५

आता 'लहानीबाय : लार्जर दॅन लाईफ.' खरं म्हणजे ह्या एकाच कवितेवर मला लिहायचं होते. आधी नियतकालिकात ती छापून आली अन् वाचली तेव्हाच मी 'लहानीबाय'नं खूप प्रभावित झालो होतो. अरुण काळे यांनी या कवितेत ही जी बाई उभी केलीय, तिला खरोखरीच तोड नाही. खरेच ती लार्जर दॅन लाइफ. ती सम्राज्ञी. स्वत:च्या साम्राज्याची सम्राज्ञी. तिचा कोणीही सम्राट नाही. सम्राट आणि सम्राज्ञी दोन्हीही तीच.

लहानीबाई - एक पूर्ण स्त्री. एक पूर्ण अस्खलित स्वतंत्र स्त्री. ती पुरुषांच्या विरोधी नाही. आवडतो त्या पुरुषाशी ती राजरोस संबंध ठेवते. आपल्या आयुष्यावर इतकी अस्सल मांड ठेवून जगणारी स्त्री, की केवळ स्वप्नवत्च वाटावी, अन् तरीही प्रत्यक्षात असणारी. तिचं आत बाहेर असं काहीही नाही. कसलीही लपवा-छपवी नाही. आहे ते सगळं खुलं अन् त्या सगळ्याचे लगाम कायम तिच्याच हातात. उपवर होताच चारचौघींसारखं तिचं लग्न झालं. सहा महिन्यांनी नवरा मेला. पण म्हणून तिनं मंगळसूत्र तोडलं नाही वा कुंकू लावणंही सोडलं नाही. चार पोरं झालीत तिला त्यानंतर. एक नामदेवाचा. एक अर्जुनाचा. दोन वारले ते काशीनाथाचे होते.

*ती कुणाची मोहताज झाली नाही*
*पुरुषांपेक्षाही जास्त कामं करून*
*बिनधास्त उभी राहिली.*

सगळ्या पोरांपुढं मेलेल्या नवऱ्याचं नाव लावलं तिनं. तशीच पद्धत असते एवढं तिला ठाऊक. ती साधी कामगार आहे. चतुर्थ श्रेणी कर्मचारी. तिचं सामर्थ्य आहे तिचं आंतरिक स्वातंत्र्य. त्यामुळं स्वतःच्या दुनियेचे कायदे कानून तीच तयार करू शकते. ती आयुष्यावर निर्लेपपणानं प्रेम करते. तिचा आजचा आवडता पुरुषही तिच्या कायद्यांनी बांधलेला आहे.

*गस्तीच्या नावाखाली तो पहाटे हजर होतो*
*आणि पट्टा काढून ठेवतो*
*लहानीबायच्या ऑर्डर्स फॉलो करू लागतो*
*तो बिल्ली मांजर होऊन जातो*
*तुक्या थोडा थांब. तो उठलेला*
*पुन्हा बसतो*

मुळात कशी असेल लहानीबाई? अगदी जन्मल्यापासून आतून स्वतंत्र? असेलही. पण आपण तसे आहोत, हे कदाचित तिला माहीतही नसेल. चारचौघींसारखं उपवर होताच तिचं लग्न झालंय. तिनं स्वतंत्र वा वेगळी अशी वाट चोखाळलेली नाहीय. आयुष्यात जे जसं वाट्याला आलं ते तिनं स्वीकारलंय. नाकारलं काहीही नाहीय. या स्वीकारातूनच कधीतरी तिला तिचं आंतरिकदृष्ट्या स्वायत्त असणं दिसलं असेल. नवरा मेल्यावर ती कोणाची मोहताज झाली नाही. पुरुषापेक्षाही अधिक काम करत बिनधास्त उभी राहिली. आयुष्य आलं तसं स्वीकारलं. पण त्यात वाहून नाही गेली ती. त्या त्या क्षणावर स्वार होत त्याला सहज काबूत आणत ती वाढत गेली. अन् ती साधीसुधी नाहीय. इतकी भरघोस की,

*तरुण मुलंही तिच्याकडे पाहतात*
*लालचावत*

अन् तिच्या नजरेत ती मुलं ही 'मुलं'च असतात.

ही अत्यंत नैसर्गिक अशी स्त्री आहे. ती संस्कारांच्या, परंपरांच्या ओझ्यांपासून पूर्णतः मुक्त आहे. 'लांडगीन पैदास घेऊन लागली फिरायला' अशा टिचकुल्यांना ती किंमत देत नाहीय. तिच्या मुलांच्या वाटेला कुणी गेलं तर पैलवानासारखी मांडी ठोकत गर्जना करण्याची हिंमत तिच्यात आहे. या आयुष्यानं तिला तिचं आंतरिक स्वातंत्र्य-खरं तर पौरुषच-उजेडासारखं बहाल केलंय. अन् त्या उजेडाची प्रभा अशी की ती इतरांनाही सहज जाणवते. म्हणूनच आसपास राडा झाला की तिच्या शब्दांनी शांतता प्रस्थापित होते. वार्डात निवडणूकीत उमेदवारी करणारे तिच्या पाया पडायला येतात. तिचे आशीर्वाद घेतात.

लहानीबाई तेही नाकारत नाही. ती काहीच नाकारत नाही.

*आता मतदानाच्या दिवशी तिचं*
*स्टार्चचं लुगडं करकरत असतं.*

..............................

*आता तिला पक्षाच्या मिटींगसाठी*
*घ्यायला येते गाडी*
*गाडीलाही थांबावं लागतं तासभर.*

ठरवून ठेवलेल्या अशा कोणत्याही अपेक्षा आयुष्याकडून नाहीत. जगणं अंगावर येईल तसं घ्यायचं. अन् त्याला आपल्या कवेत सामावून टाकायचं, हा तिचा खाक्या. म्हणूनच ती जगतानाच वाढत गेलीय अन् वाढता वाढता लार्जर दॅन लाईफ झालीय. सगळ्या ताणतणावांसकट मुक्त. अन् स्वार घट्ट मांड ठोकून सगळ्यावर. भाषणाचा आग्रह झाल्यावर म्हणते,

*माझा कामावर इस्वास हाय*
*आपल्याला कोणाला नडायचं नाय*
*सगळे लोक म्हणतील तवा*
*मागं हटणार नाय*

कुठंही मागं न हटणारी अत्यंत अद्‌भुत अशी लहानीबाय अरुण काळे यांनी उभी केलीय. मराठी साहित्यातही ती दीर्घकाळ न हटता उभी राहील. या एका अजोड निर्मितीसाठी अरुण काळेंना सलाम!

६

या संग्रहातल्या 'माहितीचे माहीतगार' या कवितेतल्या एका ओळीनं मला कोड्यात टाकलंय. काही केल्या मला ते उलगडत नाहीय. अरुण काळेंना फोन करून त्याविषयी विचारायचं मनात आलं. केलासुद्धा फोन. सुदैवानं 'जिस नंबरपर आप डायल कर रहे है, मला फोन करायचा मोह झाला तो झालाच! असो. तर ओळ अशी,

*इतिहासावर विषाणू ॲना कुर्निकोवा*

कोण ही ॲना कुर्निकोवा? आपल्याला माहीत असते ती या नावाची रशियन टेनिस खेळाडू. ती उत्तम खेळाडू होतीच पण त्याहीपेक्षा तिच्या देखणेपणासाठी ती अधिक प्रसिद्ध जाहिरातीत. तरीही जाहिरातीत ॲना कुर्निकोवा कोण? तर एक खेळाडू. एक अत्यंत देखणी टेनिस खेळणारी. या ताणात हळूहळू खेळाडू संपली. जाहिरातीची दुनिया विजयी. इतिहासावर विषाणू ॲना कुर्निकोवा? काय समजायचं?

ही कविता माहीतीच्या माहितगारांची.



वो व्यस्त है' असा संदेश ऐकायला मिळाला. बरंच झालं. कवीला असं विचारणं चूकच आहे. की बाबा, तू हे जे लिहिलंस, त्याचा अर्थ सांग. तो काय सांगणार? तो सांगता आला असता तर तोच सांगितला असता त्यानं. कविता कशाला लिहिली असती? अन् हे सगळं माहीत असूनही होती. तिच्या खेळापेक्षा तिला खेळताना पाहण्यासाठी लोक गर्दी करत. प्रसारमाध्यमांचा ससेमिरा तिच्यापाठी कायम असे. तिच्या प्रेमप्रकरणांच्या चर्चा होत. जाहिरात माध्यमांचा तिच्यावर जाहिरातीत कामं करण्यासाठी कायम दबाव असे. खेळण्यापेक्षा कैक पटीनं अधिक पैशांचं प्रलोभन या माहितीच्या महाजालात माहितीचा महास्फोट आहे. महाजाल विणणाऱ्या कोळ्यांच्या लेखी 'नाही रे' वर्ग अस्तित्वातच नाहीय. 'नाही'रेचा कळप डिस्कवर अस्तित्वातच नाहीय.

*हे अभावग्रस्तांनो आहे का माहीत*
*या माहितीच्या शतकात*
*नाही रें ची नाहीं संस्कृती?*

याच्यानंतर लगेच ओळ येते,

*इतिहासावर विषाणू अॅना कुर्निकोवा*

काय समजायचं? इतिहासावरच्या विषाणूनं काय केलंय? त्यानं डिस्कवरचे 'नाही रें'चे कळप गायब केलेत? की ते सगळं कोळ्यांनी केलंय? माहितीची जाळी विणणारे पूर्वापार माहितीवाल्यांचीच माहिती भरणारे कोळी? इतिहासावर विषाणू कोणी सोडलाय? तो तर या भद्र जनांनीच सोडलाय. या विषाणूंनी 'नाही रें'ना गायब करून टाकलंय सगळ्या माहितीतून.

*इतिहासावर विषाणू अॅना कुर्निकोवा,*
काय समजायचं? अॅना कुर्निकोवा हा इतिहासावरचा विषाणू आहे. त्याचा वापर 'आहे रे'वाल्यांनी केलाय अन् माहितीच नष्ट करून टाकलीय शोषणाची, शोषितांची महाजालातून.

आता लिहिता लिहिता जाणवतंय. संगणकात विषाणू सोडून त्याची सगळी यंत्रणा बाद करण्यासाठी जे काही प्रोग्रॅम्स मेलनं येतात, त्या मेलमध्ये अशा सुंदर बाया, अश्लील छायाचित्रांचं आमिष यांचा वापर भरपूर केला जातो. अॅना कुर्निकोवाचा असा वापर झालाय पुष्कळ. व्हायरस सोडण्यासाठी.

*इतिहासावर विषाणू अॅना
कुर्निकोवा.*

अॅना कुर्निकोवाला आणलंत अन् आम्हाला गायब करून टाकलंत. मुळातूनच 'नाहीच आहात' असं सांगत आहात.

## सनातन मोडस ऑपरेंडी

*हे ग्लोबल गाव आसंल
हे नोबल गाव नाऽय
जुन्या बाटलीतील जुनी दारू
नव्या लेबलला चिकटवलेली*

*सर्व भेद आणि बुद्धिभेद मौजूद
इथलं उपगाव सरकतंय तिकडे
खालच्या वरच्या आळ्यांसहित
सोबत जातीचे दाखले धर्माचे हवाले*

*तिकडे रंगात सूट नाही
ते रेड इंडियन हे आदिम
ते जिप्सी हे भटके
तिकडे कुंपण इकडे गावकूस
अर्थात : अदृश्य
वर-वर उदार डंके खुल्या समुद्राचे गेट बंद
नेमके*

*हा कॉमन मिनीमम प्रोग्रॅम
हे महाजाल एक इंद्रजाल
याचा दंतूर किनारा
वळतो तोंड पाहून*

*जे बळी सुरुंगाच्या स्फोटाचे
तेच बळी माहितीच्या स्फोटाचे
हे बदललेले फॉर्म जातीय द्वेषाचे
हे विषाणू बहुजन-हिताचा प्रोग्रॅम नष्ट करणारे*

*ही सनातन मोडस ऑपरेंडी
ही अपेक्षा, ही अवहेलना
ही पाताळयंत्रे, ही खुन्नस
हे वैचारिक चळवळींचे कबरस्तान
हे जागतिकीकरण*

*बळी दादांनो!
तुम्ही मनवला उत्सव मिलेनियमचा
क्वार्टरभर दारू पिऊन
पाव किलो मच्छी खाऊन
घाटा, ताठा, वाटा
यावर करणार की नाही काम?
माझ्याबद्दल काय पुसता?
हे कंगाल बनवणारे धनादेश
अनादरीत करतो मी
ह्या पक्षपाती शतकांशी
उभा दावा मांडतो मी
ह्या शतकांच्या पलीकडे राहतो मी*

●

*इतिहासावर विषाणू ॲना कुर्निकोवा*
*डोकं माहीत चेहरा गायब*
*हे कळप नाहीत डिस्कवर*
*जंतूंची पूर्ण हिस्टरी, जीव गायब*
*तुम्ही इथं नसल्याचे बनतात प्रोग्रॅम*

या एका विषाणूचा वापर करत माहितीच्या कोळ्यांनी एक भला मोठा समाजच गायब करून टाकला. बाकी संगणक ठीक ठाक. पडद्याच्या आत आनंदीआनंद. पडद्याबाहेर ढकललेले लोक आणि समाज गायब. पडद्याबाहेर अर्धपोटी, अवहेलना साहणारे, वंचित समाजगट यांचं काहीही माहितीच्या बैलांच्या खिजगणतीत उरत नाही. ते,

*अतिरिक्त माहितीचीच देतात*
*न दमता माहिती.*

मला वाटतं, की लिहिता लिहिता मी ॲना कुर्निकोवाच्या गुंत्यातून बऱ्यापैकी सुटलोय. कसला आहे हा विषाणू? वासना. लस्ट. चंगळवादी हाव. चाळवाचाळव. एका देखण्या स्त्रीचा चंगळवादी वापर. एक समाजच्या समाजच अस्तित्वाच्या जाळ्यातून नाहीसा करण्यासाठी वापरलेला मोहक विषाणू. आता, यात ॲना कुर्निकोवाची काय चूक? तर काहीच नाही. किंवा म्हटली तर आहे सुद्धा. तिचं सुंदर, मोहक असणं ही चूकच की! त्या मोहकतेचाच विषाणू म्हणून वापर कोळ्यांनी केलाय. या चंगळवादी दुनियेत भलं-बुरं सगळं तुमचा वापरासाठी खुलं आहे. तुमचा वापर होऊ द्यायचा की नाही हे तुमच्या हातात नाही. तुम्ही कोणालाही कसल्याही वापरासाठी उपलब्ध आहात.

*इतिहासावर विषाणू ॲना कुर्निकोवा*

## ७

हल्ली चांगली कविता खूप प्रसिद्ध होतेय. किंवा भरपूर प्रमाणात चांगली कविता अनेक कवींकडून लिहिली जात असणं, हे आजच्या आपल्या काळाचं एक सुंदर वर्तमानच आहे. चांगली कविता अस्वस्थ करते. पुन्हा पुन्हा वाचनाला खुणावते अन् नव्यानव्या जागा दाखवते. एकाच वेळी इतक्या सगळ्या अस्वस्थ करणाऱ्या अन् तापदायक कविता अरुण काळे यांनी या संग्रहात आपल्याला दिल्या आहेत की ठरवून दाखवायचं तरी आणखी दुसरं कोणतं नाव दाखवता येत नाही. अगदी प्रत्येक कवीची अन् कवितेची जातकुळी वेगळी असते असं असूनसुद्धा अरुण काळे आपल्याला आपला चेहरा दाखवतात, आपल्यातल्या क्रूर विरूपासकट. आता, तो पाहून आपण काय करायचं याचं ते काय सांगणार? आस्थेच्या कवेतून नाहीसं करण्यात येतंय माणसांना. आपण आपल्या निर्ढावलेपणाचं काय करणार आहोत? आपल्या आस्थेच्या ढोंगाच्या चिंध्या आपल्यासमोर उभ्या करून ठेवल्यात त्यांनी.

*हुकूम कंपनीचा आहे,*
*झिंग लपालपालपा*
*घुंब घुंब नकानका,*
*झिंग झिंग लपालपा*

ही कसली लय? लग्नाच्या वराती असोत किंवा निवडणूक जिंकण्याचा जल्लोष अथवा कोणत्याही विजयाचा जल्लोष; नाचणारे अतोनात नाचत असतात. ते आलटून पालटून व अधूनमधून उत्तेजक द्रवपदार्थांचं सेवन करीत जल्लोष करत असतात. वाजंत्री मात्र तेच असतात. बव्हंशी दलित जातीतली माणसं असतात ती. जेव्हा हे वाजंत्री दमतात, तेव्हा नाचणाऱ्या वीरांचा काटा ढिल्ला करण्यासाठी या प्रकारची लय घेऊन ती उच्च स्तरावर नेली जाते. लयीचा असा कल्लोळ मातवला जातो की नाचणारे झेंडू फुटायच्या बेताला येऊन थांबतात. स्वतःच्या थकवणुकीतून सुटण्यासाठी सामान्य माणसांनी घेतलेला पवित्रा म्हणजे ही लय. तिचा एका अफलातून गाण्यासाठी अरुण काळे यांनी चपखल वापर करून घेतला आहे. एका अर्थानं हा जनसामान्यांनी आजच्या वास्तवाच्या संदर्भात दिलेला इशारासुद्धा म्हणता येईल.

बऱ्याच वर्षांत इतकी अस्वस्थ करणारी चांगली कविता मी वाचलेली नाहीय!

# हृदय हेलावणारा, समृद्ध करणारा काव्यस्वर

# आवानओल

शोभा नाईक

अस्सल कवितेचा स्वर साहित्यविश्वात नेहमी श्रेष्ठ असतो. हा स्वर नेहमीच दुर्मीळ असतो. जेव्हा अचानक, कवितेचा हा स्वर कानावर येतो आणि जगण्याच्या लयीशी अनुबंध साधणाऱ्या त्या काव्यस्वरांशी आस्वाद पातळीवरून संवाद सुरू होतो, तेव्हा तो संवाद सबंध मानवी जीवनधारेलाच खळखळून घ्यायला लावतो ही वस्तुस्थिती आहे. कविता ही एका दृष्टीतून एकट्या कवीच्या अंतरंगातून स्फुरलेली भाव-विचारांची कारंजी असली तरी त्यामधून परिसराचे विविध रंग-ढंग-गंध हुंगता येतात. कारण अत्यंत संवेदनशील असणारे कविमन भोवतालच्याही जीवनानुभूतींशी कळतनकळत एक महत्त्वाचे संवादसातत्य राखून असते. त्यामुळे अशा कवितांमधील उत्स्फूर्त कारंजांमध्ये चिंतनाची खोल डूब अस्तित्वात असते. या कविता कवीचा, त्याच्या परिसराचा असे म्हणताम्हणता मानवी पातळीचाच सजग वेध घेऊ लागतात. अशावेळी त्या एकट्याचे गाणे न राहता संपूर्ण विश्वाचेच गाणे होतात. मानवाचे गाणे झालेल्या कविता अर्थातच आशयघन व लयघन असतात. 'आवानओल' या अजय कांडर यांच्या काव्यसंग्रहातील कविता अशाचप्रकारे स्वत:चा स्वतंत्र आणि समृद्ध लयबद्ध काव्याशय ओंजळीत घेऊन आपल्या अस्तित्वाची सुंदर प्रचीती देतात.

सावंतवाडी-वेंगुर्ल्याच्या समृद्ध साहित्यिक परंपरा असणाऱ्या कोकण परिसराच्या, एकूणच बदलत्या पर्यावरणीय जीवनजाणिवांना चिमटीत पकडणाऱ्या कवी कांडर यांच्या 'आवानओल'मधील कवितांनी दुय्यम स्तरावर ढकलल्या गेलेल्या स्त्री-पुरुषांच्या जगण्याचा काव्यबद्ध आविष्कार साधला आहे. कणकवली तालुक्यातील बावशी नावाच्या अगदी छोट्याशा खेड्यात कवी अजय कांडर यांचा १९७० साली जन्म झाला. एस.एस.सी.पर्यंत त्यांनी शिक्षण घेतले. वयाच्या अवघ्या एकोणिसाव्या वर्षी त्यांची पहिली कविता प्रसिद्ध झाली. त्यानंतर विविध नियतकालिकांतून त्यांच्या कविता प्रसिद्ध होत राहिल्या आणि २००५मध्ये त्या कविता 'आवानओल' या कवितासंग्रहाच्या रूपाने प्रकाशित झाल्या. जिथे पंधरा पंधरा दिवस पोस्टमन फिरकत नाही अशा बावशी या खेड्यात राहून ते आपल्या शेतीव्यवसायाबरोबरच पत्रकारिताही करतात. जात-धर्म यापलीकडे जाऊन केवळ माणूस केंद्रस्थानी ठेवणारे अजय कांडर स्वत:च्या जगण्याची गरज म्हणूनच कवितेशी आपले नाते सांगतात. मराठी काव्यक्षेत्रात नव्या-जुन्याचा मेळ ठरेल असा प्रगल्भ हृदयस्पर्शी आवाज त्यांनी आपल्या कवितांमधून अस्तित्वात आणला आहे. वैशिष्ट्य म्हणजे या कवितांनी जागतिकीकरणाच्या झपाट्याने महानगरांची सांस्कृतिक कोलमड सुरू असणाऱ्या दिवसांत मराठी कवितेचे लक्ष खऱ्या अर्थी सशक्त अशा ग्रामव्यवस्थेतील जीवनलयीकडे वळविले. या कवितेने कृषिजीवन व्यवहारांचे पारंपरिकपण तर व्यक्त केले आहेच पण त्यामधील शोषणाच्या नेमक्या जागाही अचूक टिपल्या आहेत. वाचकाला ह्या कविता एका श्रेष्ठ काव्यानुभूतीचा आस्वाद तर घेऊ देतातच पण त्याचवेळी त्या अंतर्बाह्य ढवळूनही टाकतात. कवितांमधून ठासून भरलेला आशय आणि कवी अजय कांडर यांची मौखिक परंपरेशी नाते सांगणारी हृदयंगम काव्यशैली लक्षणीय असून स्त्रीसंदर्भातून व दुय्यम घटकसंदर्भातून व्यक्त झालेली आस्था विशेष आहे.



अजय बाळकृष्ण कांडर

जन्म : ९ ऑगस्ट १९७०

**कविता**

आवानओल (२००५)

'आवानओल'मध्ये कृषिजन व्यवस्थेतील गावपातळीवरील स्त्रीजीवनावर भाष्य करणाऱ्या कविता संख्येने अधिक आहेत. मुकेपणाचा साज चढवून सारे काही कसेबसे साजरे करत निघालेल्या स्त्रीच्या प्राकृतिक समृद्धीने रसरसलेल्या अंतरंगाशी ह्या कवितांनी जो संवाद साधला तो वास्तवाचा नेमका आलेख मांडतो. त्यातून स्त्री व तिच्या अनुषंगाने पुरुष, रूढ जीवनव्यवस्थेत कोणकोणत्या संवेदनविश्वात कसेकसे चढउतार अनुभवतात व त्यातूनच 'स्व'शी संवाद साधण्याचे प्रयत्न कसे करतात, एकमेकांशी बांधल्या गेलेल्या नातेसंबंधांचे अस्तित्व कशा प्रकारे झेलतात, हे सामर्थ्याने अधोरेखित होते. वाचकाला गलबलून व हादरून जायला होते. *बाया झऱ्यापाशी उभ्या; आटत चाललेल्या धारेसारख्या तुटक बोलत... दिवसरात्र बाया पाण्याशीच बोलतात; झरा मुका होत जातांना., टपटप आसू गळतांना मुक्याच राहतात; मनाशीच बोलतात। घरापाशी येताच मात्र चांदण्याचं हसू गोंदवून घेतात. (लांबतायत सावल्या...), बायांना पाऊस नकोसा झालाय। या उतरत्या वयात, नाहीतर ऐसपैस चालतांना। कोवळ्या वयातच लागेल काटाकुटा झाडाझुडपातच* (झडत गेलेल्या झाडाची गोष्ट) इत्यादी अनेक दाखले समोर ठेवता येतील. पण माणसाबाबतची कांडर यांची भूमिका प्रचंड आस्थेची असल्यामुळे आश्वासकता, निसर्गाशी-मातीच्या आवाहनांशी मजबुतीने स्वतःला जोडून घेण्याचे व्यक्त झालेले संदेशनही या कवितेचे सामर्थ्य ठरते. हे सामर्थ्य अर्थातच कांडरांनी गावस्वरूपाच्या अंतर्बाह्य रसाकसाच्या प्रवाहाशी संवाद साधण्याचे लक्षण आहे.

गावपातळीवरील संकेतव्यवस्थेच्या संदर्भातून अस्तित्वात आलेले संवेदन बहुसंख्य कवितांना आशयांकित करताना आढळते. संकेतांच्या प्रभावाखालील तसेच दारिद्र्यरेषेखालील जगणे कांडरांची कविता टिपू लागते. म्हणजेच शोषितांचा बाह्य व आंतरिक आवाज आपल्या आस्थेच्या परिघात घेते व त्यातूनच तिला आपल्या वाटा मिळत जातात. खेड्यातील रूढ व्यवस्था, त्यातून निर्माण होणारी सुखदुःखे, बदलती समाजव्यवस्था, त्यातून निर्माण होणारे स्त्री-पुरुषांतील तसेच माणसामाणसातील परस्पर संबंध, प्रतिष्ठेचे स्वरूप, अर्थकारण, खेडे व शहर यांचे तुलनात्मक चित्र, कष्टकरी शेतकऱ्याचे सतत अस्वस्थ असणारे मन, एकूणच सामाजिक व राजकीय वस्तुस्थितीने माणसांच्या मनावर गाजविलेले प्रभाव आणि राखलेले पगडे, त्यातून निर्माण होणारे ताणेबाणे तसेच श्रद्धा, भक्तिमय अंतःकरणे, सद्य राजकारण-स्वार्थ-संवेदनशून्यता या साऱ्यातून निर्माण होणारी माणसाची




अगतिकता आणि सर्व स्वीकारत जाण्याची प्रवृत्ती पण तरीही आकारास आलेल्या वास्तवाला बदलून घेण्याचे आतले भान जागृत करणे इत्यादीविषयी आपले स्वतंत्र संवेदन ही कविता सादर करते.

अजय कांडर यांच्या कविता दुहेरी पेड विणतात. एक वाच्यार्थाचा व दुसरा व्यंग्यार्थाचा. राजकीय अस्वस्थकारक वर्तमान व्यक्त करताना कविता उपरोधिक व उपहासात्मक बनते. छंद, मुक्तछंद, अभंग असे रूढ विविध प्रकार ती अनुसरते पण भाषिक तंत्राचेही वैविध्य येथे पाहायला मिळते. आपल्या दृक्‌संवेदनेने आपण कविता पाहात गेलो आणि अर्थाच्या वलयांनुसार ती वाचत गेलो की हे लक्षात येईल. 'किती काळ पाणी जाणार वाया', 'लांबतायत सावल्या तशा धावतायत बाया' यासारख्या कवितांमध्ये कवी प्रत्येक ओळीच्या अखेरीला यमक जुळवतो. तर 'खूप दिवस झाले शहरात' यासारख्या कवितेत एका ओळीआड यमक जुळविलेले आहे व त्यानुसारच अर्थ प्रवाहित झालेला आहे. 'अंधार पडलाच तर' या कवितेत काव्यपंक्तीतून प्रवाहित भावाशय काही ठिकाणी ओळींच्या अखेरीस थांबायला लावून मग पुढे जायला लावतो.

उदाहरणार्थ,
*अंधार पडलाच तर समजुतीची*
*पेटवावी एखादी सांजवात देहात*
*पण जाणून घे इथल्या जगण्याचे संदर्भ*
*आणि एकरूप हो मातीच्या कणात.*

यातली प्रत्येक ओळ आशयाची एकेक सुटी वस्तू वाटते. पहिल्या ओळीतली वस्तू मनात भरवताना दुसऱ्या ओळीतील वस्तूची कल्पना येत नाही. ती पुढे जाऊन प्रत्यक्षात आपण जेव्हा पाहतो तेव्हाच दिसते. असे एका ओळीतून थांबत थांबत अचूकपणे पुढे-पुढे जात राहण्याची अनुभूती येथे येते. आणि काही ओळी थोडीही उसंत घेऊ देत नाहीत. एक ओळ संपली की लगेच त्याच्यातूनच दुसरी पुढ्यात. उदाहरणार्थ, याच कवितेमध्ये—,

*पडतो पाऊस, दरवळतो मृद्‌गंध*
*तेव्हा पल्याड असतं*
*हिरव्या स्वप्नाचं सुख*
*निथळत जावं पाणी,*
*तसं पेरणीच्या कल्पनेनंच*
*विरून जातं उरातील दुःख*

'दोघी' ही कविता दृक्‌संवेदनेला मुक्तछंद अनुसरणारी दिसते. आशय प्रवाहित होताना या कवितेतही शब्दांचे, काव्यपंक्तींचे थांबे आणि उड्या पाहिले की कवीला नेमके कोणते मर्म अधोरेखित करायचे आहे ते स्पष्ट होते. कविता वाचत जाताना— *मात्र पीळ विसकटलेल्या दोरीसारखा त्यांचा चेहरा बांधूही देत नाही, त्या नेमक्या काय बोलत असाव्यात याचा अंदाज* हा अखेरचा तुकडा येईपर्यंत सरळ अर्थाची संगती सुरू असते पण 'मात्र' शब्द येताच कवितेची आशयाची बोट जी पाण्याच्या पृष्ठभागावरून सरळ रेषेत जात होती ती अचानक वादळ आल्याप्रमाणे पुढेमागे न जाता हेलकावत खोलात शिरू लागते. ही कविता *त्यांच्या उद्याच्या कर्तृत्वाच्या पाऊलखुणा* या ओळीने दुसरे यमकविरहित कडवे संपवते आणि पुढल्या दहा ओळींनंतरच्या ओळीत, 'पाऊलखुणा' या शब्दाला 'दाण्याला दाणा' असा जुळता शब्द शेवटी येतो. त्यानंतरच्या तिसऱ्या ओळीत शेवटी 'दाणा' या शब्दाचा आकारान्त 'थांगपत्ता'मधील आकारान्ताशी जुळतो. आणि शेवटची ओळ *पण भेटतायत पुन्हा पुन्हा तळमळीने* या ओळीतून 'दोघीं'ची व्यथा अचूकपणे व्यक्त होते. अख्ख्या कवितेत शेवटच्या ओळीआधी एकही ओळ एकारान्ती आढळत नाही. त्यामुळेही पुन्हा पुन्हा तळमळीने भेटणे अधिक उठावदार होते. अगतिकतेतली तेवढीच एक गती जतन करण्याची ही प्रवृत्ती, हे ग्रामपातळीवरील स्त्रियांचे एक वैशिष्ट्य याप्रकारे कांडर टिपतात. थेट प्रकृतीदर्शक शब्दातून चपखलपणे आशय प्रवाहित होतो. कोकण प्रांताच्या बोलीचा समर्थ आविष्कार ते सहज तंत्रबद्धतेने साधतात. 'पोरी ओल्या होऊ पाहतायत'मधील आणि *झरे । मोकळे मोकळे होत । भिडू पाहतायत पोरींच्या अंगाखांद्यावर, ती गुपचुप, गुपचूप घेत राहते माझा पापा, तसा मी छोटा, छोटा होऊन । तिच्या जगाचा शोध घेत राहतो* या 'मैत्रीण'मधील काव्यपंक्ती, तसेच 'संवाद'मधील अखेरच्या ओळीतील *जिंकता, जिंकता हरलो तरी समाधानाने डाव सोडू!* या रचनेमध्ये शब्दांची जाणीवपूर्वक आशयानुरूप पुनरुक्ती कवी करतो पण वेगवेगळ्या, मागच्या पुढच्या वस्तूंची ती विशेषणे असतात. याप्रकारे कांडर काव्यरचनांची तंत्रे विविध प्रकाराने हाताळतात त्यामुळे संग्रहातील कविता भाषिक श्राव्य अंगाने कानाला वेगवेगळ्या वाटतात. एकसुरीपणा त्यांच्या जवळही फिरकत नाही. आणि काव्यास्वादाची गोडी वाढत जाते. योग्य ठिकाणी योग्य असे साजेसे तंत्र त्यांनी वापरलेले दिसते. शेतकऱ्याची मातीतून पीक काढण्याची

धडपड ही शाश्वत बाब. अशावेळी ही कविता बरोबर अभंगाचे अंग धारण करते. *उकरू मी किती । शेतामध्ये माती । मातीमध्ये मोती सापडेना.* तसेच 'कळीचे फूल होताना' या कवितेचा स्वर छंदाच्या अंगाने प्रकटतो. *कुठे ना थेंब पाण्याचा । भुईचा कोंडलेला श्वास । उन्हाची आग झालेली । नदीला लागला रे ध्यास ।* कवीचे पर्यायाने त्याच्या परिसराचे जगणेच नित्यानुभूतीतून आकारणाऱ्या तंत्राचे, अंतर्गत लयीचे बोट घट्ट धरून राहते, *मन मातीवर जडे श्वास मातीला मिळाला । उभ्या दगडात मी हा चिरा, चिरा कोरलेला* याप्रकारे या कवितांना घनरूपता प्राप्त होते. तरल, न दिसणाऱ्या काहीशा मन:स्थितींच्या अवस्था मराठी कवितेने भरपूर आळवल्या, पण कांडरांची कविता काव्यवस्तूच्या घन अवस्थेतच राहते. मराठी कवितेने एक महत्त्वाचे समर्थ वळण येथे घेतले असे म्हणावे लागेल. वास्तवाचा, वस्तुस्थितीचा घटकन्‌घटक आपले स्वत:चेच तंत्र घेऊन काव्यवस्तूच्या पातळीवर येतोय. जगणे आणि जीवनानुभूती यांत नवसर्जनात्मक लयबद्ध दुवा निर्माण होतोय.

पाण्याचे दुर्भिक्ष्य हे वास्तव तर प्रत्येक खेड्याला सोसावे लागत असतेच. यात बायांचे हाल होतात. इतर कष्टाची कामेही असतातच. पारंपरिक भूमिकाही असतात. त्यामुळे चौकटीच्या रिंगणातील त्यांची धडपड कित्येकदा करुणमयी भासते. स्त्रियांचे अस्तित्व आकारत जाण्याची प्रक्रिया कांडर आपल्या कवितेचा विषय बनवितात.

## सारीच नाती गढूळ होत चाललेल्या दिवसांत

*शेजारी नाही, पाजारी नाही*
*मित्र नाही, मैत्रीण नाही*
*सारीच नाती गढूळ होत चाललेल्या या दिवसांत*
*सामाजिक व्यासपीठावरून*
*दोन पक्षांतील नेत्यांनी एकमेकांबद्दल गळे काढत रहावं*
*आणि निवडणुकीच्या आधीच*
*मतांच्या संवादासाठी*
*विसंवादातून*
*एकानं गावं भजन*
*दुसऱ्याने धरावा ताल कव्वालीचा*
*असे करता करता शेवटी ऐन निवडणुकीत*
*दोघांचेही एकमेकांकडून उतरले जावेत कपडे*
*असाच मित्रधर्म पाळला जातोय आता सर्वत्र*

*म्हणून तर*
*मित्रधर्माची व्याख्या करू नये*
*फक्त जोडत जावेत संबंध*
*फायद्यापुरते*
*बोलघेवडेपणाने रहावं जावं संपर्कात*
*तसा आपण ठेवू शकतो कुणाशीही संपर्क*
*संपर्क- ठेवू शकतो कवींच्या कळपात सामील होण्यासाठी*
*संपर्क ठेवू शकतो कविता प्रसिद्धीसाठी*
*नोकरीच्या बढतीसाठी,*
*राजकीय बस्तान बसविण्यासाठी*
*महाआरतीसाठी,*
*नमाज पढण्यासाठी,*
*दंगल घडविण्यासाठी*
*'रती' सुखासाठी,*
*'पती' सुखासाठी,*
*'हे' करण्यासाठी,*
*'ते' करण्यासाठी,*
*संपर्क ठेवू शकतो संपर्कासाठीही*

*पण हे सारं करताना*
*आपण कोणासाठीही आतून*
*उमाळायला हवंच, असं नाही*
*जोखीमही पत्करू नये.*
*मात्र गात राहावे गुणगान सर्वांचेच,*
*तपासूनही घेऊ नये कुणाचा इतिहास,*
*भविष्य - त्यांच्यासोबत आपलंही*
*मातीमोल होत असलं, तरीही.*

●

'आवानओल'मध्ये सगळीकडे अखंड निरीक्षण करत असलेला कवीचा डोळा जाणवत राहतो. हा डोळा स्त्रीजीवनाकडे किती खोलवर पाहतो ते समजून घेण्यासारखे आहे.
स्त्रीजीवनवास्तवाची इतिमिती प्रकट करताना कवी जीवनातील पाणी, झाड, नदी, झरा, पाऊस, माती या अविभाज्य, प्रकृतीदर्शक घटकांनाच कवितेचा साज चढवतो. नित्याचेच घटक असे काही फिरवतो की त्यातून विलक्षण भावगहिरा नवा आशय झरत राहतो. स्त्रीसंदर्भातून गावव्यवस्थेतील जीवनवास्तवाचा कांडर यांनी घेतलेला वेध एकूणच भारतीय प्रस्थापित व्यवस्थेला आवाहन देणारा आहे. 'नदीला ध्यास लागला आहे.' 'भुईचा श्वास कोंडलेला आहे' इत्यादी प्रतिमांतून स्त्रीची अवस्था प्रकटते. काय अपेक्षतात या स्त्रिया? *नभाने दाटूनी यावे । फुटावे, स्नान घालावे । भुईला हर्ष होताना । पुन्हा यावा फुलांना वास.* यामधील 'पुन्हा' हा शब्द सातत्य, शाश्वती व्यक्त करतो. एकीकडे भुईचा श्वास कोंडलाय तर दुसरीकडे कळीचे फूल होताना त्यांचे श्वास रोखलेत. एकीकडे पाऊस नकोसा झालाय तरी पुन्हापुन्हा कोसळतोय आणि दुसरीकडे पावसाची प्रतिक्षा आहे पण त्याने कुठल्यातरी गावाला दडी मारलीय.



न्हात्या-धुत्या-ओल्या मुली, आपल्या प्राकृतिक लयीशी नाते गवसलेल्या मुली पाणी शोधू लागतात तर त्यांना फक्त त्याचा 'भास' वाट्यास येतो. 'मोहराचा वास' या कवितेतही कांडर स्त्रीचे अंतरंग पृष्ठभागावर आणण्याची किमया साधतात. नियोजित घाट चढताना स्त्रीने आपल्या पायाखालची वाट कुठल्याशा ओढीने सोडून दिलेली असते. *त्यांना हवा असतो फक्त । फांद्याफांद्यातून फुटणारा मोहराचा वास पण हंगाम संपत आला तरी । झाडांना मोहर फुटत नाही* ही वस्तुस्थिती. पाणी, झाडे, फांद्या, झरा, दाटलेले नभ, भुईचा कोंडलेला श्वास, नदी, कळी, फूल या प्रतिमा स्त्रीत्वाशी संवाद साधण्याचा प्रयत्न करत, स्त्रीशी संबंध प्रस्थापित करत नवअर्थाचे सर्जन करतात तेव्हा कांडर यांच्या समर्थ कवित्वाची कल्पना येते.

रानावनातून वणवणणाऱ्या खेडूत स्त्रिया चेहऱ्यावरील रंगरंगोटी, वेशभूषा पाहत नाहीत त्यांना फक्त 'मोहराचा वास' खेचत असतो. तो प्राप्त करण्यासाठी त्या आपल्या परीने कार्यरत होऊनही पाहतात पण यश येत नाही. मग त्या रोषाने बारक्यासारख्या वेली पाळामुळांसकट उचकटून टाकतात, झुडपांवर कचाकच घाव घालतात. 'रान' साफ करतात. कुणाकुणाच्या नावाने 'दगडां'नाही धडकतात. पण आपलेच अंगठे फोडून घ्यायची वेळ त्यांच्यावर येते. मग स्वत:वरच खेकसत निमूट घरी परततात. घरी आल्यावर नेहमीच्या सवयीने ढणढणणाऱ्या चुलींवर सगळे नित्याचे व्यवहार उतू जातात. बायांच्या नशिबी प्रत्येक हंगामात अवसकाळी रात्रच येते. श्रमाधिष्ठित जीनवव्यवहारांमुळे मोकळेपणा प्राप्त झालेल्या या स्त्रीची घुसमट प्रचंड व्यथेचीच निर्मिती करते. आंतराची धडक या स्त्रीला नेमकी जाणवत असते आणि गावजीवनवास्तवाने इतर घटकांना पिचवून टाकलेले असते. हे सारे जगण्यातील भोवरे या कवितेने बरोबर

बोलतात', 'बायांना पाऊस नकोसा झालाय', 'लांबतायत सावल्या तशा धावतायत बाया', 'किती काळ पाणी जाणार वाया' इत्यादी कवितांनी स्त्रीत्वाचे प्राकृतिक व सांसारिक कल्लोळ नेमके दर्शविले आहेत. स्त्रीत्वाची कुचंबणा अनेक पातळ्यांवरून होतेच, पण निःसंगाचे नाटक करत असलेला तिचा पुरुष पाहून होणारी कुचंबणा अधिक जिव्हारी बोचणारी. आत्मसन्मानासाठी स्त्री 'कानाकोपरा' शोधते पण कितीही प्रयत्न केला तरी अंग चोरत, आक्रसत, शेणात कुजून गेलेली आपली बोटे पदराआड दडवत, कावरीबावरी होत तिला जगावे लागते. (पृ. २६) तिच्या वाट्यास येणाऱ्या या प्रकारच्या वास्तवाचा थेट संबंध पुरुषाशी कसा आहे, याचे मार्मिक चित्र कांडर किती सहज रेखाटून जातात! अनेक परींनी 'आवानओल'मध्ये स्त्रीजीवनानुभूती बोलकी होऊन त्यायोगे व्यवस्था पृष्ठभागावर आली आहे.

चिमणी-मुलगी जन्मली आणि तिचे बाल्य सरले. त्या दरम्यान आईने आजीने तिला आपल्यापरीने कानमंत्र दिले. *मी शाळेत जाईन। खूप मोठी होईन। मोठा साहेब येईल। मला घेऊन जाईल।* (पृ. १६), ...*नाहीतर ऐसपैस चालताना। कोवळ्या वयातच लागेल काटाकुटा झाडाझुडपातच, ...आपल्या अडथळ्यालाही ओलांडून जावं धीरानं* (पृ. १०) इत्यादी बाळकडूसह चिमण्या मोठ्या होतात. मग त्यांची उचलबांगडी होते कष्टप्रद वाटचालीत. कवी या सर्व व्यवहारांचे सूक्ष्म निरीक्षण करतो. अस्वस्थ होतो. वयाला बाजूला सारून मोठ्या होणाऱ्या, अकाली संसाराच्या रगाड्यात पोहचविल्या जाणाऱ्या मुलींची अवस्था वजू केलेल्या पाड्यासारखीच अशी प्रतिक्रिया व्यक्त करून व्यवस्थेवर तो अचूक बोट ठेवतो. पण ह्या व्यवस्थेच्या रिंगणात भिरभिरत असतानाही या स्त्रियांमध्ये असणारी आगळी वैशिष्ट्ये मिटून जायला मागत नाहीत याकडे कवी लक्ष वेधतो. या वैशिष्ट्याची मुळे 'पोरी ओल्या होऊ पाहतायत' ही कविताही अचूक प्रकट करते.

मुलींसंदर्भातून नदी, पाणी, कळी, फूल या प्रतिमा तर बायांसंदर्भातून झरा, घागर, पाणी, पाऊस, शेणात कुजलेली बोटे, वस्त्रे बदलणे, ओल्या अंगाने एकमेकीत ठेवलेले अंतर, चढणीचे घाट, ढणढणणाऱ्या मुलींवरती उतू जाणे, गायी, फांद्या, झाडे, तळघर, काळोख, घुसमटलेला श्वास, भुई, अंगणात हसण्याचा भास इत्यादी प्रतिमा, खोलवरचा आशय प्रवाहित करतात. स्त्रियांविषयक कवितांमधून अधोरेखित जीवनामध्ये निसर्ग, प्रकृती, पुरुष, समाज, आई-वडील, माहेर-सासर हा प्रवास, कन्या, बालिका, तरुणी–विवाहिता-मैत्रीण-आई-गृहिणी-सून-सासू-आजी या भूमिकांशी स्त्रीचा असणारा संबंध व्यक्त झाला आहे. अर्थकेंद्री पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत आकारास आलेली भावस्पंदने प्रामुख्याने या कवितांचा विषय झाली आहेत. मुलगी-आई किंवा नात-आजी यांतील प्रकट संबंधातूनही हे ठसठशीत होते. भारतीय समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा पारंपरिक दृष्टिकोण 'कुजबुजतील कान' या कवितेत व्यक्त होतो. समाजसंकेतव्यवस्थेमुळे झाडावरच्या मीलनोत्सुक पाखरांनाही आतील नाद ऐकण्याची मोकळीक नसावी हे येथील वास्तव. गावाच्या स्त्री-पुरुष प्रतिष्ठा ठरलेल्या आहेत. त्यानुसारच तिने व्यवहार करायचे. अन्यथा *तुझं गाऱ्हाणं ऐकण्यापूर्वीच। व्यक्त होत जाशील तू कुणाकुणाच्या देहबोलीतून* या परिस्थितीला तोंड द्यावे लागते. भारतीय सामाजिकतेचे हे रंग कवी चिमटीत घेतो. *तुझ्या माझ्या परंपरेचा वारस। तो तुझ्या बाईपणाच्या परंपरेवर। गाजवील पुन्हा पुरुषी अधिकार* असे पुरुषी व्यवस्थेवर थेट भाष्यही करतो. प्रस्थापित व्यवस्थेने केलेले स्त्रीचे वस्तूरूप या कवितेच्या जिव्हारी लागले असल्याचे दाखले सगळीकडे सापडतात. 'चांदण्याचं हसू गोंदवून घेणारी' स्त्री, केवळ मनाशीच बोलणारी, टपटप आसू गाळताना मुकीच राहणारी स्त्री, व्यंग्यार्थातून उलगडत जाते. स्त्रियांच्या बौद्धिक अंगाची नुसतीच पडझड होते त्यांना वादळवारेच सदैव घेरतात हे 'दोघी'मध्ये स्पष्ट होते. गाय-वासरू हे नाते म्हणजे सुंदरतेचा साज चढविलेले महत्त्वाचे पारंपरिक अस्तित्व. पण वस्तुस्थितीत गायी वासरांसाठी हंबरतायत पण वासरे हाकेच्या पलीकडे गेलीत. मग गायींची वासरांसाठीही तगमगच. स्त्रीसंदर्भातून हे मोठेच करुण अस्तित्व. म्हणूनच तर कांडरांची कविता 'चांदण्याचं हसू गोंदवून' घेऊन वावरणारी स्त्री दर्शवत असावी. स्त्रीचा स्त्रीशी असणारा बंध-अनुबंध शोधणारीही कविता येथे आढळते.

'दोघी', 'मैत्रीण', 'दळण', 'चिमण्या', 'खुणा', 'पोरवयात', 'बायांना पाऊस नकोसा झालाय', 'डोईवर अख्खं ऊन', 'अंगावरील साडीच्या विटलेल्या रंगाइतकाच' या प्रकारच्या कविता या दृष्टीतून महत्त्वाच्या संवेदना व्यक्त करतात. *चिऊ चिऊ दाणा दे पाणी दे. जमलंच तर तुझं घरटं विस्कटून माझं घरटं बांधून दे!* अशा गोंडस दिसणाऱ्या सामाजिकतेचा बळी होत असल्याचे जागरण निर्माण झालेली संवेदनाही 'उंबरा ओलांडणाऱ्या बायका' या कवितेने व्यक्त केली.

आपला आवाज शोधण्यासाठी, प्रकाशाची वाट निर्माण करण्यासाठी बाया दाटीवाटीने जमतात तेव्हा गाव त्यांच्याकडे तिरकस नजर लावतो, दात विचकवतो,त्यांना घायाळ करण्याचा प्रयत्न करतो. पण बायांनीही आपले आंतरिक सामर्थ्य जागृत करण्याचा चंग बांधलेला. 'चढू देत नाहीत थर भीतीचा आपल्या मेंदूवर' असे मोठे उद्बोधक चित्र येथे प्रकटते. 'उंबरा ओलांडणे' ही भारतीय पातळीवरून अर्थपूर्ण असणारी प्रतिमा यातून अस्सल स्त्रीवादी संवेदन प्रत्ययास येते. गावासारख्या पारंपरिक सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय पातळ्यांचा घट्ट थर साचलेल्या पर्यावरणात 'उंबरा ओलांडणाऱ्या बायका' कवीला उठावदार वाटतात. कवितेच्या माध्यमातून अजय कांडर यांनी एकीकडे शैलीद्वारे गावाच्या मौखिक साहित्य परंपरांशी आपली नाळ घट्ट केली आणि त्याचवेळी स्त्रिया व इतर शोषितांच्या उद्बोधन व विकसनाच्या नव्या सर्जनात्मक वाटांशी संवाद साधला. स्त्रीविषयक कवितांमधून कांडर आई, आजी, पत्नी व मुलगी या नात्यांशी संवाद साधताना एकूणच स्त्रीला 'बाया' व 'मुली-पोरी' या समूहात्मक पातळीवर आणतात. त्यामुळे आशयाची समृद्धी आणखी वाढते. गावातील विविध पातळ्यांवरून वावरणाऱ्या समाजमानसाचा विचार टोकदार होतो.

हाडाचा कवी हा त्या त्या प्रांताचा प्रतिनिधिक स्वर असतो. त्याच्या परिसरातील सुखदुःखातून कवीच्या प्रतिक्रिया आकारत असतात. कृषिजन व्यवस्थेचे गावजीवन कांडरांची कविता आपल्यात घेते. त्यामुळे माणसांबरोबर तेथील निसर्गाचा प्रत्येक घटक-प्राणी, किटक, मुंगी इ. एकूणएक घटक येथे सामूहिक स्वरूपात कार्यरत आहेत हे या कवितेचे भाषिक अंग स्पष्ट करते. कांडरांची शब्दकळा नेहमी प्रतिमांची पातळी गाठते. त्यामुळे आशयाची खोली विस्तारत जाते. ज्याप्रमाणे ही कविता स्त्रीरूपांचा वेध घेते तसेच 'मैत्रिण', 'वणवा', 'शिकारीच्या नादाने', 'बैल', 'चिमण्या', 'कुजबुजणारे कान', 'उंबरा ओलांडणाऱ्या बायका', 'उजळणी' यासारख्या कवितांमधून एक नवी महत्त्वाची पुरुषप्रतिमाही व्यक्त करते. 'संवाद', 'बैल', 'शिकारीच्या नादाने' यासारख्या कवितांमधून समाजपुरुषाला वळण देण्याचा प्रयत्न दिसतो. 'सल', 'सारीच नाती...', 'जुने दिवस...' मधून जगण्यावरचे आपले भाष्य कवी प्रकट करतो. काल, आज आणि उद्या यामध्ये एक अनुबंध निर्माण करत राहण्याचा आग्रह पुढे येतो. समूहमनाची दिशा निश्चित करण्याचा प्रयत्न सामोरा येतो.

आजकालच्या खेड्यांवर शहराचे जे परिणाम घडताहेत त्याचेही सजग भान 'आवानओल'मध्ये प्रकटते. विज्ञानयुगात सुधारणांच्या नावाखाली नुसतीच घाईगडबड झाली आपल्याकडे. त्यातून आजची 'खेडी','शहरे' आणि 'महानगरे' ही वास्तवे आकारली. ग्लोबलायजेशनच्या झपाट्यात शहरे-महानगरे काही आर्थिक संघर्ष-समस्यांनी घेरली गेली. याचे थेट परिणाम अर्थातच हातावर पोट घेऊन शहरात वणवणत गेलेल्या खेडुतावर झाले. पूर्वीचे खेडे-शहर संबंध आज मागे पडले. खेडुत आपले प्राक्तन भोगून, शहरांना धडकून, घायाळ होऊन पुन्हा गावाकडे परतत असल्याचे चित्र या कवितांनी आपला विषय केले. पण तो विषय करताना गावाचे शाश्वत सत्त्वशील असणे अधोरेखित करून ठेवले. अनेकविध कारणांनी ही गावरूपी जमीन जरी शुष्क होत निघाली तरीही अजूनही तिच्या आत खोलवर 'आवानओल' शिल्लक आहे. तिच्यावरच भिस्त ठेवून शहराकडून तांडे पुन्हा गावाकडे परतले. *पूर्वी मठीच होती रिकामी, आता माणसंही आलीत रिकामी होऊन शहरातून.* गावातील माणसांना अजूनही आशा आहे प्रकाशाची. कशीबशी तेवत ठेवतात ही माणसे आपली पणती. गांगेश्वर, विठ्ठलाईवर भरोसा ठेवण्याची भाबडी प्रेरणा जशी काही यांची शक्तीच. पण याहीबाबतीत श्रद्धा तपासून घेण्याची दृष्टी कांडरांची कविता देते. खेडुतांनाही

आत्मपरीक्षणाला प्रवृत्त करते.

काहीजण, *आपल्या आयुष्याचा भार सोपवतात बिनधास्तपणे, एखाद दुसऱ्या कर्तव्यनिष्ठ आप्तेष्टावर* यांच्या कानात दडी साचलेल्या असतात त्यामुळे *ओल्या-सुक्या हंगामाच्या दिवसात। घुमत नाही। कुठल्याही नैसर्गिक घटनांची शीळ त्यांच्या कानात* (पृ.४१) पण असे असले तरीही 'अजूनही गावात' अंधार आणि प्रकाश यामधील भेद तळहातावर ठेवला जातो. नुसत्या पेरणीच्या कल्पनेनेच त्यांच्या उरातील दुःख विरू लागते. मातीशी नाते ठेवण्याचा आग्रह येथे जतन केला जातो. अंधारातूनही साद घातली जाते. प्रतिसादाचा कानोसा घेतला जातो. या पार्श्वभूमीवर शहर मात्र श्वास घुसमटविणारे असल्याचे कांडर अधोरेखित करतात. 'खूप दिवस झाले शहरात' या कवितेने गाव आणि शहर यात केलेली तुलनाच मोठी मार्मिक आहे. कोरड्या व्यवहारांवर भिस्त ठेवणारे शहर तर कोरडे दिवसही, हृदयाच्या पालवीने शीतल करू बघणारे गाव. बाया-बापयांची मने गावात शेताचा हिरवा रंग, टिपकागदासारखी टिपून घेत राहतात तर शहरातल्या वस्त्या, माणसांच्या मनांवर दुर्गंधीचा मारा करतात. 'ती' ही कविताही शहराच्या पार्श्वभूमीवर गावाचे असेच महत्त्व, वैशिष्ट्य अधोरेखित करते. 'अंधार पडलाच तर' या कवितेत गावाच्या जगण्याचे संदर्भ जाणून घेऊन मातीच्या कणांशी एकरूप होण्याचा आग्रह व्यक्त होतो.

गावातील स्वार्थांध राजकारणाचा जोरदार फटका कविमनाला कसा



घायाळ करतो हेही येथे प्रकट झाले. यातून स्वत:ची एक अलिप्त भूमिका त्याने निर्माण केली असल्याचे दिसते. आंतरप्रेरणांशी असणारे बंध सदैव घट्ट ठेवण्याचे व आपला वसा शांतपणे जतन करण्याचे, गावाचा आंतरिक ओलेपणा तगविण्याचे विचार त्याला महत्त्वाचे वाटतात. 'तर ते बडवतील ढोल, ताशे, झांज.... ' या कवितेत सद्य वास्तवात भगवी, निळी, तिरंगी निशाणे कसा 'पहारा' होऊ लागलीत या 'राजकीयते'लाही काव्यरूप लाभले आहे. पण हे राजकारण जरी कितीही हादरवणारे असले आणि या साऱ्यासह या कवितेतील 'मी' जेव्हा त्याच्या प्रौढवयातही *आजीच्या मांडीवर झोपी जाऊन, अंगाई गीत ऐकण्याचं/ जागेपणीच स्वप्न पाहतो* आणि त्यातच आजीचे राबण्याने पायाचे सांधे खिळखिळे झालेत. (पृष्ठ ३०) हे शब्द आठवले की पुन्हा काहीतरी हरवल्याचा काळोखात शोध घेत राहतो. असे जरी असले तरी कवीची गावाची ओढ या साऱ्यांवर मात करणारी आहे. *उजाड माळरानावरती सदैव बहरू पाहात आहे माझं झाड* (पृ. ३९) अशा ओळींतून त्याची सकारात्मक भूमिका प्रकटते. स्वाभिमानी, सत्त्वशील असे त्याचे असणे क्षितिजापर्यंत विस्तारत राहण्याची मनीषा बाळगताना भेटते. झाडाशीच संवाद त्याला महत्त्वाचा वाटतो. *झाडे करतात आभाळाशी स्पर्धा तरी पाखरांना निवारा देतात, माणसांहून तीच बरी... सर्वांनाच ती जवळ घेतात.* अशा गुणधर्मांनी युक्त झाडांच्या सान्निध्यात जाण्याचा आग्रह कवी कांडर गावाला आणि शहरालाही करतात. गावाच्या अस्सल रसाकसावर पोसलेले, वेगवेगळी वाट चुकविण्याची परिस्थिती गावात वाट्यास येऊनही आपल्या सच्चेपणाला मातीशी संवादित राखण्याचा धर्मच जतन करत निघालेले कवी अजय कांडर जीवनानुभूतींचा समृद्ध असा काव्यप्रत्यय वाचकाला देतात. एकीकडे पेरणी वाया गेल्याचे, दुबार पेरणी करूनही चिम् निपजल्यावर निर्माण होणारे हताशपण ते अनुभवतात पण त्यातूनही दुसरीकडे आपली कविता जोपासण्याची धडपड ते नेटाने करतात हे महत्त्वाचे.

'कळत्या न कळत्या वयात' या शीर्षकाखालील सहा कविताही मुळातून समजून घेण्यासारख्या आहेत. कवीची जडणघडण आणि त्यांच्या वाट्यास आलेल्या पर्यावरणातून घडत गेलेली भूमिका येथे प्रामुख्याने व्यक्त होते. सर्वबाजूंनी मनाच्या अंगावर कोसळणाऱ्या वास्तवाचा त्यांच्या कवितांशी असणारा अभेद्य संबंध येथे लक्षात येतो. ''दुबार पेरणी करूनही सारंच बियाणं चिम् निपजावं तसा'', ''बांधा फुटून वाहून गेलेल्या शेताकडं पहावं तसा'', बाहेरचा संपर्क होऊ नये म्हणून ''मेंदूलाच कवितेचं लिंपण'' या शब्दप्रयोगातून स्वत:ची तगमग त्यांनी व्यक्त केली. वारकरी संप्रदायाशी जोडू पाहणारे मेळे, लगोरी-आईचा रुमाल हरवला, सावता माळ्याचा आदर्श आणि प्रत्यक्षातील वारकऱ्यांचे वास्तव व्यक्त करणारे शब्दसौष्ठव कवीचे वैशिष्ट्यपूर्णरित्या ग्रामीण असणे व्यक्त करते. गावपरिसरातील दृक्-श्राव्य-स्पर्श-गंध या माध्यमातून व्यक्त होणाऱ्या कवीच्या संवेदना काव्यमयता धारण करताना पाहणे म्हणूनच आस्वादपातळी समृद्ध करते. 'कधीच निष्ठावंत पाईक झालो नाही', 'उजळणी', 'सल', 'सारीच नाती गढूळ होत चाललेल्या दिवसांत' या आत्मपरीक्षण आणि महत्त्वाचे चिंतन उद्युक्त करणाऱ्या उपहासात्मक - उपरोधात्मक शैलीतील कविता वाचकाला खरोखर अंतर्मुख करतात. खडे, शहर, महानगर या पातळ्यांवरच्या आजच्या बकालपणाला कित्येकदा आपण स्वत:च तर कारणीभूत आहोत असा साक्षात्कार सहजपणे घडविणाऱ्या आणि नकळतपणे एक महत्त्वाचे जागरण निर्माण करणाऱ्या ह्या कविता आहेत.

भाषेतून आशयवस्तू की आशयातून भाषावस्तू हे कळू नये इतकी काव्यमयता 'आवानओल'मधील कविता साधतेच कशी याचा स्वतंत्र शोध घेण्याची आवश्यकता निर्माण होते. आणि या एकसंध काव्यात्मतेला शोधू जाता, या कवितेने ग्रामजीवन

**पाळेमुळे**

*ते पिढीजात दारिद्र्याची पाळंमुळं सांभाळीत*
*मातीतच राबत राहिले*
*तेव्हा*
*अख्खं, आयुष्य उजळून टाकण्यासाठी*
*त्यांनी प्रथम,*
*सर्व झाडे भुईसपाट केली*
*नंतर त्यांनी मातीतच दाणे पिकवून*
*ताठ कण्यानं उभं राहण्याचा अंदाज घेतला*
*शेवटी,*
*आपण उभं राहूच शकणार नाही,*
*हे लक्षात आल्यावर*
*त्यांनी मातीचाच सौदा केला*

●

परिसरातील जगण्यात, बोलण्यात, चालण्यात जी अनादिकाळापासून मानवात चालत आलेली, स्वत:ला कष्टातूनही तगवण्याची उपजत नैसर्गिक लय आहे, तिच्याशी निकटचा संवाद राखल्याचे लक्षात येते. त्यामुळे कांडर बोलघेवड्या माणसांपेक्षाही झाडांशीच संवाद साधण्याची गोष्ट महत्त्वाची हे जाणवून देतात. आणि स्पर्धेने घायकुतीला येणाऱ्या नव्या जगाला हे झाड ''जिंकता, जिंकता हरलो तरी समाधानाने डाव सोडू!'' असे जगण्यातील खरे प्रगल्भ तत्त्व उपलब्ध करते. या परिसरातील स्त्रीला वास्तविक हे तत्त्व नेमके आकळलेले आहे. ती झाडांशीच जिवाभावाचे नाते जगते. जगण्यातील शाश्वत लयीशी स्त्री-प्रकृती नेहमीच निकट असते आणि शिवाय तिच्या प्राप्त अनुभूतीही तिला झाडाशी बांधून घ्यायला लावत असाव्यात. पण नव्या पर्यावरणात झाडेही होरपळू लागलीत आणि त्यामुळे बायांची बेचैनी दिवसेंदिवस वाढत निघालीय. 'झाड' हे चिन्ह येथे या जीवनव्यवहारातील सामर्थ्याचे प्रतीक म्हणून उभे राहते. व्यवहारीकरणाच्या झोतात ते जळून गेले तरी त्याची मुळे निखाऱ्यांच्या रूपात धगधगत असल्याचे संवेदन कांडर प्रकट करतात. मातीच्या नैसर्गिक अंतर्गत लयीशी नाळ जुळलेली ही कविता आशादायी प्रवासातच रमते. जेव्हा *आतल्या आत होते कोंडी, तरीही बोलता येत नाही,* अशाही वेळी या कवितेला *श्वास मोकळा करता येत असतो, फुलाशी बोलून, फुलासारखे मन जपण्याचा एक नवा मार्गही मिळत जातो. हा गाव ही माणसं, सारं आपलं जगण्याचंच एक संचित असतं। तुझ्यामाझ्या प्रेमाइतकंच तुला प्रिय असावं आपल्या मातीचं नातं.* (पृ. २१) झाडांच्या सावलीत आकारत आलेल्या गावसंस्कृतीच्या या मंत्रातून कांडरांची कविता आपली भाषा प्राप्त करत राहते, जगण्याची-माणसांची लय ही कविता आपल्यात घेत आकारते. पूर्वापार चालत आलेले हे आंतरिक भावबंध रूढ सामाजिकतापूर्व लयीच्या रूपाने ग्रामजीवनात सतत प्रत्येक पिढीतून पुढे संक्रमित होत असतात. जगण्यात कितीही कष्ट उपसावे लागले तरी त्याच्या आतील आनंदाचे झरे मिटत नाहीत. मुके झाले असले तरी नष्ट झाले नाहीत. म्हणूनच तर ही माणसे एकमेकासाठी एकमेकाकडे कष्टातही धावून जातात. एकमेकांची 'गाणी' गातात. पाऊस, मृद्‌गंध, पेरण्या, कापण्या, सुगी, मग कधी उन्हाळा, उन्हाळ्यातील शोषग्रस्त अवस्थेतील पाण्याची स्वप्ने, 'अंधार पडलाच तर' हिरवंच स्वप्न अशीच भाषा कविता बोलू लागते, तेव्हा ती या जगण्याच्या लयीशी असणारा आपला घनिष्ठ संबंध प्रस्थापित करते. त्यामुळे या कवितेने मराठी कवितेला नव्याने बदलणारे भाषेचे नवे अंग दिले आहे.

कृषिपरंपरेअंतर्गत असणाऱ्या लयीशी ही कविता सुसंवाद साधते तर व्यवस्थेअंतर्गत आकारणाऱ्या शोषक प्रवृत्तींशी बंडात्मक, निषेधात्मक भूमिकेत वावरते. त्यामुळे ती उपहास व उपरोधात्मक भाषाशैली अनुसरते. 'सारीच नाती गढूळ होत चाललेल्या दिवसात'सारखी कविता आजच्या स्वार्थकेंद्रित्वामुळे-आत्मकेंद्रित्वामुळे क्षुद्र होऊन गेलेल्या वास्तवाला धारेवर धरते. बदललेल्या राजकीय पर्यावरणात माणसांची मने 'मुस्क्या आवळलेल्या मुस्क्या बैलांसारखी' झाल्याची वस्तुस्थिती तळमळून पण थेटपणे व्यक्त करते.

जुन्यातून नव्या वाटचालीच्या संपर्कात येण्याचा प्रवास अचूकपणे या कवितेच्या भाषेत व्यक्त होतो. 'आवानओल'मधील कवितांमधून गावाचे रूप नेमके कसे बदलत गेले आणि त्याचे परिणाम बाया व बापयांवर कसे होत राहिलेत याचा अस्वस्थकारक प्रत्यय येतो. एकूण या बायांच्या, मुलींच्या, झाडांच्या, गावाच्या, जशा परंपरांच्या तशाच बदलत्या नव्या काळाच्या, संसाराच्या, स्त्री-पुरुष माणसांच्या कविता समृद्ध काव्यदृष्टीचा प्रत्यय देतात. ग्रामीण परिसराने निर्माण केलेल्या जगण्याच्या आंतरिक स्पंदनांचा त्यांच्या नित्याच्या आरसपानी व्यवहारांशी कसा संवाद अस्तित्वात येतो त्यांचे काव्यमय अस्तित्व प्रस्तुत करतात.



# दर साल दर शेकडा

## गल्बल्यात भयभीत तरीही अशरण

गणेश विसपुते

गेल्या पंधरा-वीस वर्षांत मराठी मुलखात, वेगवेगळ्या ठिकाणांहून अनेक कवी नव्याने कविता लिहू लागले. नेमका हा काळ अतिशय वेगाने होणाऱ्या बदलाचा काळ आहे, समाजाच्या सर्व क्षेत्रांमध्ये अराजकसदृश्य परिस्थिती आहे. सर्वव्यापी बदलाचा वरवंटा ग्रामीण, नागरी अशा सगळ्या समाजावरूनच फिरत असल्याने त्या त्या ठिकाणच्या संवेदनशील कवींच्या कवितांमधून बदलाच्या या प्रक्रियेतल्या ताणाच्या, अस्वस्थतेच्या खुणा उमटणं साहजिक होतं. त्यातही काही कवींनी सच्चेपणानं, संवेदन आणि चेतना जागृत ठेवून या बदलांची आणि अस्वस्थतेची दखल घेतली. वीरधवल परब यांची कविता अशा प्रकारची असल्यामुळे लक्ष वेधून घेणारी आहे.

ही कविता लक्ष वेधून घेते कारण तिचा स्वर प्रामाणिक आहे. प्रसंगी भाबडा वाटावा एवढा प्रामाणिक आहे. एका विशिष्ट विचारसरणीवर विश्वासून, मूल्यांच्या मजबूत अधिष्ठानाने समाजात काही एक भलं घडेल अशी आशा बाळगत असताना विपरीत परिस्थिती धडाधड गड काबीज करतेय, हे कवीला हतबलपणे पाहावं लागतं. अशा परिस्थितीत आपल्याजवळच्या अनुभवानिशी, तीव्र संवेदनशीलतेनं, मराठी असण्याचं भान जागं ठेवत हा कवी प्रामाणिकपणे व्यक्त होतो. हा निखळपणा कवीला त्याची शैली, ओळख आणि वेगळेपण देतो.

वीरधवल परब हा कोकणातल्या लहान गावातला कवी आहे. तो लहान गावातला, ग्रामीण भागातला असणं हे काही त्याच्या कवी असण्याचं जादाचं क्वालिफिकेशन नाही. कारण खेडं आणि शहर अशी विभागणी आजच्या काळात नि:संदर्भ ठरत जाणार आहे. अशा स्थानमाहात्म्यापेक्षा आजच्या काळात त्या त्या अवकाशातल्या अनुभववैविध्यावर, आशयावर, प्रसरणशील भाषेच्या निष्ठेवर कवितेचा कस लागणार आहे. त्यामुळे ग्रामीण म्हणून कौतुक करणं किंवा नागरी म्हणून केंद्र असण्याचा किंवा मार्केटिंग करून मध्यवर्ती असण्याचा दावा कुणी करू नये. असे उसने आणलेले आव कालांतरानं उघडे पडतात. या प्रकारच्या भिन्न प्रादेशिक विभागण्या नि:संदर्भ ठरत असल्या तरी त्यातलं अंतर नाकारता येणार नाही. जागतिकीकरणाचा प्रत्यक्ष लाभार्थी किंवा नवग्राहक किंवा अंध-अनुमोदक प्रामुख्याने नागरी भागातला, नवअभिजन असतो. उपभोगाच्या नाना परी त्याला नागरी भागात अधिक घनतेनं उपलब्ध असतात. हा भाग माध्यमे आणि इतर स्रोतांचे केंद्र असल्याने अस्सल व दुय्यम, सगळेच त्याचा फायदा घेऊ शकतात. यात भ्रामक पण मोहक असा बाजार आणि त्यावर प्रतिष्ठेपासून ते असण्यापर्यंत केंद्रित झालेलं जगणं, त्यात आलेला उथळपणा आणि व्यक्तिलय या बाबी एका बाजूला आहेत, तर दुसऱ्या बाजूला बाजार आणि आनुषंगिक परिवर्तनाचे फायदे-तोटे नागरी भागातही झिरपल्यानं तिथलं दारिद्र्य, भूक, विषमता आणि अज्ञानाचं प्रखर वास्तव. या प्रखर वास्तवाची, तडफडींची स्पंदनं समजणारी संवेदनशीलता असेल तर तो आशय कवितेच्या चांगल्या कवितेच्या पातळीवर आणणं शक्य असतं—

*दर साल दर शेकडा*मध्ये परिवर्तनाच्या पाशवी रेट्यात चोळामोळा होत जाणारी मूल्यं, अव्यवस्थेतला (डिसऑर्डर) संभ्रम, सामूहिक कृती संपुष्टात येत असण्याची हतबलता अशी अस्वस्थतेंची वेगवेगळी रूपं आहेत. प्रत्यक्ष दारात येऊन उभं ठाकलेलं रेट्याचं चक्र आहे.

*लोक घुसताहेत पैशांच्या थैल्या घेऊन*
*हजारो एकर जमिनीवर हजारो रुपये*
*खर्चून*
*प्लॉट पाडून*



**वीरधवल नारायण परब**

**जन्म :** २१ डिसेंबर १९६८

**कविता**

दर साल दर शेकडा (२००६)

*सुरू आहेत तेजीत...*
('जुन्या समाजवादी मित्रास', पृ. ६९)

नव्या व्यवस्थेत खेडी ही कच्च्या मालाची पण वाजवी भाव मिळू न शकणारी उत्पादक आणि तयार मालाची सक्तीची ग्राहक अशी दुहेरी पद्धतीनं शोषित आहेत. आक्रमणाचे येणारे नवनवे लोंढे पाहताना सामान्य माणूस दिङ्मूढ झाला आहे..

*आपले आता काय होणार, हे*
*विचारू नये पुन्हा फिरून*
*इतकी निर्ढावून हाताबाहेर गेली*
*आहे परिस्थिती...*
*...लोक तर नागवून घेताहेत*
*स्वतःला, जल्लोष करत*
*देव देश धर्म जात राखीव मंडल*
*मंदिर मशीद*
*त्यांना कळतंय सारं काही किंवा*
*काहीसुद्धा कळत नाहीये*
*आणि तरीही मान्य करताहेत ते*
*साऱ्याच अटी बिनशर्त*
('आता आपले काय होणार?', पृ. ४०)

समकालीन आंतरराष्ट्रीय आर्थिक-राजकीय घडामोडीचे संदर्भ कवितेमधून येतात, पण अचानक घोंघावत आलेल्या आक्रमणानं ऊर्ध्वमूल झालेला सामान्य माणूस या संग्रहातल्या बहुतेक कवितेचा केंद्रीय संदर्भ आहे. यात या सामान्य माणसाची अगतिकता, पराभूत असणं भेदकपणे समोर येत राहतं. कोणत्याही हुकूमशाही, क्रूर सत्तेच्या विरुद्ध बोलणं हा पहिला प्रतिरोध असतो. तुम्ही जगभरातल्या अनेक गरीब देशांमध्ये थैमान घालत लूट करीत सुटला आहात हे आम्हाला माहीत आहे आणि आम्ही ते ओरडून किंवा दुःखानं मांडत आणि नोंदवत आहोत अशा पद्धतीनं जुलमी व्यवस्थेत इथं खेड्या-खेड्यातल्या सामान्य माणसांची होणारी होरपळ व्यक्त करणंही निषेधाची अशीच एक रीत ठरते. *किती गाढवं गेली आहेत पुढे निघून । नि किती सुपीक डोकी बनली आहेत नापीक गॅटचं ताक पिऊन असं म्हणताना डोळ्यात पाणी आणण्यावाचून । या लोकशाही देशात । मी अन्य काहीही करू शकत नाही ।* अशी विषण्ण जाणीव कवीला अस्वस्थ करते आहे. त्याचबरोबर लोकशाही मूल्यं, श्रद्धास्थानं, सरकारंही बेभरवशी झाल्याची दुःखद जाणीव बोचते आहे.

*कोणाला काय*
*सांगावं?*
*सगळंच*
*अळवावरचं*
*पाणी आताशा*
*आणि सत्तेची*
*बेमुर्वत मुजोरी*
*अशी*
*की देवही*
*बोलतो*
*ज्याच्या त्याच्या मनासारखं*
*ज्याचा त्याचा मानपान तोलमोल*
*सांभाळून*

नव्या व्यवस्थेत रोज नव्या परिभाषा घडवल्या जात आहेत. वापरून, फेकून पुन्हा नव्याने घडवल्या जात आहेत. भाषा बिघडवल्या जात आहेत.

वैविध्य, खाचखळगी नकोत, एकच एक सपाटीकरण, एकच एक भाषा, सगळ्यांना-विशेषतः विक्रेत्याला समजणारी आणि सोयीची असलेली. स्वाभिमानी समूह त्याला क्षीण का होईना प्रतिकार करू पाहताहेत. पण हे घोंघावणारं वादळ सगळ्या दिशांकडून




येत जाणार आहे. परिवर्तनाचे पहिले धक्के अजून ओसरले नाहीत. या धूळधाणीच्या धामधुमीत निषेधाची नवी भाषा घडवावी लागणार आहे. वीरधवल परब आपल्या कवितांमधून हा सांध्यावरचा भाषिक संभ्रमही

नितळपणे दिसू देतात. त्यांच्या कवितेत मध्येच जाहिरातीतली ओळ येते, ज्ञानेश्वरांच्या अभंगातल्या ओळी येतात, ''भली गे शिमगो... शबय... शबय'' अशी होळीतली बोंब येते, जयघोष येतात. यातून मूळ आशयाला भाषिक पातळीवर ते सुसंगत आणि सघन अर्थ देण्याचा प्रयत्न करतात. या संदर्भात 'हे तकलादू हात दरिद्री' ही कविता पाहावी.

*ही मन्वंतर घडवून आणणारी*
*गॅटची सचित्र रंगीत बाराखडी*



*महासत्तांची तुघलकी राजनीती*
*.....*
*भात आहे तर आमटीचा पत्ता नाही*
*कर लो दुनिया मुठ्ठी में*

असं म्हणत पिढ्यान्‌पिढ्या जपलेल्या जमिनीच्या तुकड्याचं काय होणार, आपल्या अस्तित्वाचं, पिकांचं काय होणार अशी दहशत आणि या परिस्थितीतली विचारवंतांची निष्क्रियता ते ठळकपणे अधोरेखित करतात.

*हे मयूर डोळे*
*रोखलेले उभ्या पिकांवर*
*ही संस्कृतीची जुनाट मुळी*
*हे मुखदुर्बळ ज्ञानमहर्षी*

एवढ्या मितव्ययी भाषेत ते एका शोकांतिकेची पटकथाच लिहून जातात.

उघडउघड नागवण्याची प्रक्रिया सावपणे सुरू झालेली असताना तिला रोखण्याचे क्षीण प्रतिकार दुबळे पडत असल्याची विवशता कवी जाणतो. 'अनुदारीकरणा'च्या जागतिक गल्बल्यातल्या दहशतीतली ही विवशता आहे. आपल्या अस्तित्वाचा आस आणि केंद्र ढळल्यासारखं हे भय आहे. मार्क्सिझम, सेक्युलरिझम आम्हाला माहीत नाही, आम्हाला यात आमचं साधं जगणं हवं आहे. जे या व्यवस्थेत शक्य नाही अशा साध्या जगण्याची साधी आस आहे.

*शापित पिढ्या*
*आत्ताच्या*
*मागच्या नि*
*पुढच्याही*
*ग्लोबलायझेशनचा भस्मासूर*
*नाचतो आहे अंगणात गल्लोगल्ली*
*निरंकुश*

या परकं, विस्थापित आणि हद्दपार वाटायला लावणाऱ्या जगातलं काहीही नकोय. जिथून कुणीही हलवणार नाही असा एक कोपरा हवा आहे.

*मरतुकडं कुत्रंही तंगडी वर करून*
*मुतू नये*
*अशी अवघड जागा*
*मागून घेत आहे आपल्यातला ध्रुव.*

स्वातंत्र्यानंतरच्या पन्नास-साठ वर्षांत जे काही शिक्षण पदरात पाडून छोट्या-मोठ्या नोकऱ्या-धंदे मिळवू शकलेली किंवा नोकरी मिळवण्याच्या स्पर्धेत पराभूत झालेली लहान गावांतली अलीकडची पिढी आहे, ती ना धड इकडं, ना धड तिकडं अशा अवघड सांध्यावर संभ्रमित आणि निराश उभी असलेली दिसते आहे. गेल्या पंचवीस-तीस वर्षांतलं चित्रही फारसं वेगळं नाही. स्मार्टनेसने संधी साधून शहरात मोक्याच्या नोकऱ्या-जागा मिळवणाऱ्यांची टक्केवारी प्रामुख्याने शहरातल्यांचीच आहे. एका अर्थाने शिक्षणाने गावा-शेतातून उखडलेली आणि शहरात पराभूत झालेली ही पिढी आहे. शहरी जगातल्या संधी सुविधांचा मोहक स्पर्श या पिढीनं पाहिलेला आहे. पण त्यापासून वंचित असल्यानं पराभूत तुटलेपणही आहे. अशा प्रकारच्या उखडलेल्या तरुणांच्या प्रतिनिधींचं *मी इथं नाही, मी तिथं नाही* असं वास्तव वीरधवल परब यांच्या कवितेतून वारंवार दिसतं.

*वेशीपाशी उभे*
*माझे गणगोत*
*एकटा मी येथे*
*भयभीत...*
*...कसं परतावं*
*गावाला अपुल्या*
*पाणंदी मनाच्या*
*बंद झाल्या*

गावात असून गावात नसल्यासारखं बांडगुळासारखं हे जगणं : यात शेतीभातीची राखणही करता न येण्याचं शल्य आहेच तसंच वंशपरंपरागत काळी कसदार माती नि:सत्त्व होत गेल्याची बोचही आहे, खरं दु:ख आहे ते *आपली नाळ कधी पुरली गेलीच*

नाही गावकुसात हे. पुन्हा—

*खूप दूरवर पाहूनही दूरचं काही*
*दिसत नाही*
*पायाखालची मातीही स्वीकारायला*
*तयार नाही*

अशी स्थिती आहे. त्यामुळे अशा निर्विकार नेभळट जगण्याच्या हमीत तीनतेरा वाजलेले आहे, हातात केवळ नि:सत्व वाळू उरते आहे, आणि दिवस उगवतो, मावळतो काहीही घडत नाही. वास्तवाच्या तीक्ष्ण सुया खुपसल्या जाताना—

*अर्धवट आसक्त संन्याशासारखे*
*उपभोगतो आयुष्याचे कलेवर*
*ना सन्मुख*
*ना विन्मुख*

संग्रहातल्या कवितांमधून समकालातल्या वाङ्मयव्यवहाराबद्दलची निरीक्षणं येतात. अर्थात ती निरीक्षणांच्या पातळीवर न राहता साहित्यव्यवहार आणि दुर्व्यवहारावरचं तीव्र आणि जळजळीत भाष्य ठरतात. नवसाम्राज्यशाही झिलकरी आणि दुय्यमत्वाला मध्यवर्ती आणण्याचे कारस्थान करणारे, त्यांच्या बेरकी मार्केटिंग-मॅनेजमेंटचे सटीक निरीक्षण *साडेसातीच्या तीव्र कल्लोळात* या लक्षणीय कवितेत दिसतं.

*तो देशीवादी नसतो, आधुनिकही*
*नसतो*
*उत्तर आधुनिकतेची तर गंधवार्ताही*
*नसते त्याच्या गावी*
*तरी दूरवरून हाकून आणले जातात*
*त्याच्या डोक्यावर भाषिक अवकाश*
*खुडून घेणारे*
*दहशतीचे ढगच्या ढग...*
*...आणि उगवणक्षमताच नसलेल्या*
*बियाण्यासारखं*
*निपचित पडून राहावं लागतं*
*सालोसाल*
*भाषेचा एकूणच काय चतकोर*
*तुकडाही*
*खुला झालेला नसतो*
*त्याच्यासमोर...*
*...पंढरीची वारी त्याच्यासाठी*
*निव्वळ वारीच असते*
*जिथे तो शोधत असतो*
*वाङ्मयीन नाझीवादात गहाळ*
*झालेला*
*व्यापक सहानुभाव.*

नवसाम्राज्यशाही-बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या नवहुकूमशाहीत सामान्य माणसाचे भवितव्य काय असणार आहे? शेतजमिनी बळकावून त्याची लहान-मोठी संस्थानं औद्योगिक शहेनशहांच्या घशात घालण्याची कारस्थानं रचली जात आहेत. शरण न जाता आपल्या संस्कृती-भाषेसकट जगताना, नव्या व्यवस्थेत आपलं स्थान टिकवण्यासाठीचे अटीतटीनं प्रयत्न करावे लागणार आहेत. एकविसाव्या शतकाच्या प्रारंभीच याप्रकारचे अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. या प्रश्नव्यूहातले काही प्रश्न वीरधवल परब त्यांच्या कवितांमधून नोंदवतात, आणि ते कसोशीनं, प्रामाणिकतेनं नोंदवतात. प्रतिकार किंवा निषेधाची पहिली अटच उच्चार नोंदवणं ही असते.

कविता म्हणून अनुभवाच्या घटनेची सालं सोलत सोलत खोलवर शोध घेत जाणं अभिप्रेत असतं. भाषेतून आरपार पाहता येत असल्यानं तिथं विशेषत: कवितेच्या भाषेतल्या लबाड्या उघड्या पडण्याचा संभव असतो. त्यामुळे भाषेचा वापर निकराची काळजी घेत करावा लागतो. संक्रमणाच्या काळात



भाषेवर प्रभाव गाजवणारे मोह अधिक असतात. इमान डळमळण्याचा धोका असतो. भेसळ भाषेचा विदुषकी हव्यास वाढत असताना मराठीत अलीकडे अरुण काळेनं सायबरजगतातल्या भाषेलाच उलटं वाकवत जगण्यातल्या अनुभवाशी तिला एकरूप करून दाखवलं. त्याच्या कवितेतलं सच्चेपण, मराठीपण त्यामुळे झाकलं तर जात नाहीच, पण ते अधिक झळाळून निघालं आहे. निव्वळ साक्षरता ही गुणवत्ता मानल्या जाणाऱ्या या काळातच भाषेच्या अशा नव्या शक्यता धुंडाळाव्या लागतील. सरकार, शासकीय संस्था आणि माध्यमांद्वारे व्यक्त होणाऱ्या भाषेत आपल्या आकांक्षा, स्वप्नं सांगता येणार नाहीत, त्यासाठी भाषेच्या प्रसरणाच्या नव्या शक्यता धुंडाळाव्या लागतील. वीरधवल परब यांच्यासारख्या तरुण कवीच्या कवितेची आश्वासक उपस्थिती या आव्हानांची, प्रश्नांची उत्तरं शोधायला सहाय्यभूत ठरेल अशी आशा वाटते.

## आयुष्याचे वेगवेगळे कप्पे खोलत जाणारी कविता

# कुठल्याही विरामचिन्हाशिवाय

हरिश्चंद्र थोरात

'कुठल्याही विरामचिन्हाशिवाय' हा अविनाश साळापुरीकर यांचा पहिलाच कवितासंग्रह आहे. चक्षू प्रकाशन, औरंगाबाद यांनी हा कवितासंग्रह २००६ साली प्रकाशित केला आहे. कवीचा पहिलाच कवितासंग्रह असूनही त्यात नवखेपणाच्या खुणा दिसत नाहीत, ही गोष्ट आवर्जून नोंदवावीशी वाटते. कवीच्या पूर्णपणे विकसित अशा क्षमता प्रकट करणारी प्रगल्भ अशी कविता या संग्रहातून वाचकाला सामोरी येते.

या संग्रहातील साळापुरीकरांच्या कवितेचे स्वरूप समजून घेण्यापूर्वी ही कविता ज्या कविताविषयक पार्श्वभूमीवर अवतरलेली आहे, ती समजून घेणे अगत्याचे ठरते. कवितेच्या क्षेत्रात गेल्या पंधरा-वीस वर्षांत मराठीमध्ये तीन प्रमुख प्रवाह अस्तित्वात आले आहेत. यातील एक प्रवाह आपण कविता जनसामान्यांपर्यंत पोहोचवतो आहोत असा पवित्रा घेऊन लोकानुनयाचे व्रत घेतलेल्या, क्रयवस्तू झालेल्या 'मंचीय' कवितेने आकाराला आलेला आहे. एकेकाळच्या भावगीत परंपरेचा हा काहीसा अधिक सफाईदार अवतार म्हणता येईल. लोकप्रिय होऊ शकतील अशा लयींचा वापर, शब्दांवरील हुकूमत आणि स्थूल स्वरूपाचे अनुभवविश्व हे या कवितेचे विशेष आहेत. दुसरा प्रवाह सांस्कृतिक चिन्हांची चिन्हयुक्तता जणू काय नुकतीच निर्माण झाली आहे असा आविर्भाव आणून आधुनिकोत्तर प्रतिमाविश्वाच्या उथळ पाण्यामध्ये मजेमजेने तरंगण्याची भूमिका घेणाऱ्या कवितेने आकाराला आला आहे. टोकाची प्रयोगशीलता हा या कवितेचा महत्त्वाचा विशेष आहे. या कवितेला जागतिकीकरणाचे व महानगरी जगण्याचे स्पष्ट संदर्भ आहेत. मराठी कवितेतील तिसरा प्रवाह प्रामुख्याने मानवकेंद्रित भूमिका घेणाऱ्या कवितेने आकाराला आला आहे. या कवितेवर आधुनिकतावादी, रोमँटिक आणि वास्तववादी या तिन्ही दृष्टिकोणांचे संस्कार झालेले आहेत. त्यातील आधुनिकतावादी प्रभाव पुसट होत चालला आहे. त्यामुळेच प्रयोगशीलतेच्या संदर्भात ही कविता काही प्रमाणात उणी वाटते. तथापि, भोवतालच्या वास्तवाविषयी घेतलेल्या भूमिकेला या कवितेमध्ये महत्त्वाचे स्थान आहे. 'कुठल्याही विरामचिन्हाशिवाय'मधील कविता या तिसऱ्या प्रवाहामधील कविता आहे.

अविनाश साळापुरीकरांच्या कवितेचे तिच्या भोवतालच्या वास्तवाशी निकटचे नाते आहे. गेल्या पंधरा-वीस वर्षांत महाराष्ट्रात, विशेषत: ग्रामीण महाराष्ट्रात जे काही घडते आहे त्या घडून आलेल्या विविध परिवर्तनांशी संबंध जोडण्याचा प्रयत्न ही कविता करते आहे. भोवतालाचे प्रखर भान हा या कवितेचा महत्त्वाचा विशेष आहे. या विशेषाचे आधुनिकतेच्या संकल्पनेशी आणि आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेशी महत्त्वाचे संबंध आहेत. आधुनिकता या संकल्पनेमधून येथे युरोपीय प्रबोधनाच्या चळवळीमधून आकाराला आलेली मानवकेंद्री, इहवादी, बुद्धिप्रामाण्यवादी आणि उपयुक्ततावादी जीवनजाणीव अभिप्रेत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांच्या माध्यमातून या जीवनजाणिवेचे संस्कार आपल्यावर झाले. एवढेच नव्हे तर साम्राज्यवादी शक्तींनी योजलेले भारताच्या आधुनिकीकरणाचे प्रारूप याच विश्वभानानुसार बेतले गेले. भारतातील स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षणप्रसार, लोकशाही शासनव्यवस्था, नागरी समाजाची संकल्पना, विकासाची संकल्पना इत्यादी सामाजिक-राजकीय-सांस्कृतिक दृष्टिकोणातून महत्त्वाच्या ठरणाऱ्या गोष्टी आधुनिकतेच्या याच आराखड्याला अनुसरत रचण्याचे



**अविनाश दिनकरराव साळापुरीकर**

**जन्म :** ४ फेब्रुवारी १९७३

**कविता**

कुठल्याही विरामचिन्हाशिवाय (२००६)

........................................................................

प्रयत्न झाले. या प्रयत्नांमुळे पारंपरिक भारतीय समाजाच्या संरचनेमध्ये मोठी परिवर्तने घडून आली. या परिवर्तनांमुळे केवळ आर्थिक पातळीवरच्याच नव्हे तर सामाजिक सांस्कृतिक पातळीवरच्या संबंधांचे पोत बदलू लागले.

आधुनिकतेच्या या संकल्पनेमध्ये मुळातच काही अंतर्विरोध होते. या संकल्पनेच्या भारतीय उपयोजनामधून या अंतर्विरोधांमध्ये आणखी काही भर पडली. स्वातंत्र्य, समता, बंधुता, लोकशाही अशी काही स्वप्ने आधुनिकतेच्या या प्रारूपाने दाखवली खरी, पण प्रत्यक्षातील लोकजीवनामध्ये अनेक दुखणी बळावत गेली. साठीच्या दशकात लघुअनियतकालिकांमधून लिहिणाऱ्या संतप्त तरुणांना याच वस्तुस्थितीने अस्वस्थ केले होते. तथापि, लोकजीवनाच्या समग्रतेला भिडण्याऐवजी या संतप्त तरुणांनी व्यक्तीच्या अस्मितेविषयीचे प्रश्न जवळ केले. याच सुमारास प्रखर सामाजिक जाणिवांनी युक्त अशी दलित कविता लिहिली जाऊ लागली. तथापि, तिच्या आस्थेच्या व्यूहात समग्र समाज येऊ शकला नाही.

गेल्या काही वर्षात जागतिकीकरणाच्या रेट्याने आधुनिकतेमधील अंतर्विरोधांची तीव्रता विलक्षण वाढली आहे. व्यक्ती, तिचे समाजाशी असलेले संबंध, तिची अस्मिता, तिचे परंपरेविषयीचे भान या सर्व संदर्भात अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले आहेत. नवी प्रारूपे अपयशी ठरत आहेत हे लक्षात आल्यानंतर समाज पुन्हा वेगाने पारंपरिक संरचनांकडे निघाला आहे. व्यावहारिक पातळीवरील जगण्यात हाच पवित्रा अधिक किफायतशीर ठरतो आहे. आधुनिकतेच्या मर्यादा लक्षात आल्यानंतर तिचा संपूर्ण त्याग करण्याची घाईच जणू काय समाजाला झाली आहे. जातिव्यवस्था, धर्मविषयक पारंपरिक संकल्पना, पारंपरिक विश्वासविश्व या गोष्टींना अधिकात अधिक अधिकृतता आणण्याचे प्रयत्न समाजाच्या विविध स्तरांवर होत आहेत. यामधून अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होत आहेत.




अविनाश साळापुरीकरांची कविता आधुनिकतेमधील विधायक भाग आपलासा करून या प्रश्नांना भिडू पाहणारी कविता आहे. समकालीन परिस्थितीमध्ये व्यक्तीच्या कृतिप्रवणतेला पडलेल्या मर्यादा ती समंजसपणे समजून घेते, मात्र ही समज दाखवताना पारंपरिक गतानुगतिकतेला शरण जाणे ती निग्रहाने टाळते. व्यक्ती किंवा समाज यातील कोणताही एक प्रस्थानबिंदू न स्वीकारता व्यक्ती आणि समाज यांच्यातील गतिशील संबंधांना ती अधिक महत्त्व देते. तिला एकाबाजूने व्यक्तीच्या अस्मितेविषयीचे प्रश्न महत्त्वाचे वाटतात, पण हे प्रश्न ती भोवतालच्या मूर्त सामाजिक वास्तवाशी नेऊन भिडवते. स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षणप्रसार, ग्रामीण महाराष्ट्राचे बदलते स्वरूप, शेतीच्या वांझ आधुनिकीकरणातून निर्माण झालेले प्रश्न, पंचाहत्तरनंतरच्या काळात राजकारणाचे बदलत गेलेले स्वरूप, वेगाने ढासळणारी नैतिकता या सर्व गोष्टींचा संदर्भ साळापुरीकरांच्या कवितेला आहे. असे असूनही ती ग्रामीण-शहरी या द्वंद्वामध्ये अडकून

पडत नाही. ग्रामीण संस्कृतीचे उदात्तीकरण आणि शहरी संस्कृतीचे अध:पतन असे सोपे समीकरण या कवितेला अभिप्रेत नाही. तिच्यामधील आस्था प्रादेशिकतेच्या, उपसंस्कृतीच्या मर्यादा ओलांडून अधिकाधिक व्यापक होण्याचा प्रयत्न करते.

'कुठल्याही विरामचिन्हाशिवाय' या कवितासंग्रहाचे 'या मख्ख चेहऱ्याला', 'मी तं हजार वर्ष मागे जाऊन आलो', 'आत्ता तरी प्रेम दुर्लभ', 'डुचमळतो साक्षी', 'महासत्तेच्या वाटेवरून', 'घ्या आजही रात्रीचे बारा वाजलेयृत', 'जमील' आणि 'हे कुपोषित बालका' , असे आठ विभाग पाडण्यात आलेले आहेत. हे विभाजन जाणीवपूर्वक करण्यात आलेले आहे, असे वाटते. जीवनानुभवाचे एकेक अंग, आयुष्याला असलेले एकेक परिमाण प्रत्येक गुच्छामधून आविष्कृत व्हावे, अशी ही योजना आहे. प्रथमदर्शनी तरी ही योजना वाचकाला मार्गदर्शन करण्यासाठी अस्तित्वात आलेली असावी असे वाटते. कवितासंग्रहाचे प्रत्यक्ष वाचन करताना मात्र हे सोय म्हणून केलेले हवाबंद विभाजन नाही, ही गोष्ट लक्षात येते. यातील प्रत्येक विभाग दुसऱ्या विभागांवर अतिक्रमण करतो आहे आणि त्या विभागांना अधिक व्यामिश्र करतो आहे. प्रत्येक विभाग दुसऱ्या विभागांकडे पाहण्याचा दृष्टिबिंदू म्हणून अवतरतो आहे, आणि या अनेकविध दृष्टिबिंदूंमधून केलेल्या अवलोकनातून आयुष्याच्या अनेक अंगांनी मिळून तयार झालेली एक सलग समग्रता संग्रहामधून साकार होते आहे.

*या मख्ख चेहऱ्याला* हा पहिला कवितासमूह कवीच्या स्वविषयक जाणिवेला विशेष प्राधान्य देतो आहे. स्वत:ची अस्मिता, तिचा काळाच्या जाणिवेशी असलेला संबंध, 'स्व'च्या आणि आत्मशोधाच्या दृष्टिकोणातून महत्त्वाचे ठरणारे 'दुसऱ्या'शी असलेले संबंध आणि स्व आणि पर या दोहोंना जोडून असणारी, त्यांच्यातील संबंधांना अर्थपूर्णतेच्या शक्यता प्रदान करणारी संस्कृती या चार गोष्टींमधील परस्परसंबंधांचा खेळ या पहिल्या कवितासमूहामधून मांडण्यात आलेला आहे. या खेळामध्ये कवीचे कवी असणेही अगत्याने अधोरेखित केले गेले आहे.

*या मख्ख चेहऱ्याला*
*आता कुठवर थोपवून धरता येतील*
*आठवणींचे पाट*

असे म्हणत या पहिल्या कवितासमूहामधून कवी आपल्या भूतकाळाचे पुनर्वाचन करतो आहे. संसारासाठी आटापिटा करणारी आई, पोथ्या वाचून डोळे खराब करून घेणारा बाप, उदास कालखंडाला छेद देऊन स्वत:चा निरागसपणा टिकवून ठेवणारी मनी, उमलताना पाहिलेल्या चारदोन मुली, मैत्रिणींबरोबर खेळायला घेऊन जाणारी बहीण आणि पौगंडावस्थेतच कवीपणाचा साक्षात्कार झालेला कवी अशी विविध पात्रे व त्यांच्यातील परस्परसंबंध या विभागातून सामोरे येतात. साध्यासुध्या पारदर्शक जगण्यातून आयुष्याला अर्थपूर्णता देणारी ही आजूबाजूची माणसे भूतकाळाच्या या पुनर्वाचनात कवीला विशेष महत्त्वाची वाटतात. त्यांचे जगणे आणि स्वत:चे कवी असणे या संदर्भातला मूल्यनिर्णय करताना साळापुरीकरांनी आपल्या कवी असण्याला गौण स्थान दिले आहे. अग्रक्रम आयुष्याला, कवितेला नव्हे याबद्दलची ही जाणीव काव्यविषयक रोमँटिक कल्पनांना छेद देणारी आहे. आपल्या कवित्वाविषयीच्या भूतकालीन जाणिवेला कवी 'एखाद्या बाईच्या अंगात यावं तसं वाङ्‌मयाचं येणं' म्हणतो. 'स्वत:ची वेगळी ओळख बनवण्यापायी असलेल्या सर्व ओळखी तुटत' चालल्या होत्या याचे भान त्याला वर्तमानात आले आहे. पुढल्या कवितासमूहातील

*कविता शेत नांगरू शकत नाही*
*की पेरणी करू शकत नाही*
*सांजवेळी शेतातून परतताना*
*गुरांसाठी*
*डोक्यावर गवताचे भारे आणू*
*शकत नाही*

या ओळी या संदर्भात लक्षणीय आहेत.

बाल्य, पौंगडावस्था, तारुण्य या विविध अवस्थांमधून जाताना केलेल्या प्रवासाचा हा आलेख, त्यातील काळाचे भान, भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांची घातलेली सांगड, भोवतालच्या माणसांशी असलेल्या संबंधांचा घेतलेला लेखाजोखा मोजक्याच कवितांमधून कवीने प्रत्ययकारक रीतीने साकार केला आहे.

बाल्य व तारुण्य, कवी असणे आणि माणूस असणे, सहन करणे आणि तक्रार करणे यांसारखी आयुष्यातील विविध अवस्थांतरे या कवितासमूहामधून टिपली जातात. येथील कविता विविध अवस्थांमधील मोकळ्या जागेत उभी राहते. विविध अवस्थांची अर्थपूर्णता न्याहाळत

असताना अवस्थांमधील मोकळ्या अवकाशाला विरामचिन्हासारखी अर्थपूर्ण करण्याचा प्रयत्न करते. विरामचिन्हे वाक्याच्या सलगतेमधील खंड दाखवतात. विरामचिन्हे करतात ते सांधेजोडणीचे कार्य ही कविता आपल्या अंगावर घेते. म्हणूनच ती 'विरामचिन्हाशिवाय' आणि म्हणूनच विरामचिन्हाऐवजी, विरामचिन्हाची जागा घेणारी आहे. अर्थपूर्णतेच्या दृष्टिकोणातून किमान महत्त्वाच्या जागांना जास्तीत जास्त अर्थपूर्ण करणारी आहे. हा केवळ पहिल्या कवितासमूहाचाच नव्हे, तर संपूर्ण संग्रहाचा विशेष आहे. पहिल्या भागात बाल्य, तारुण्य आणि प्रौढत्व यांच्यामधील सांध्यांवर उभी राहत आयुष्याला सलगता देण्याचा तिचा प्रयत्न विशेष जाणवतो. वेगवेगळ्या अवस्थांच्या सांधेजोडीची आशयसूत्रे या पहिल्या भागाप्रमाणे संग्रहात इतरत्रही जाणवतात आणि संपूर्ण संग्रहाला एक प्रकारची गतिशीलता देतात. ही गतिशीलता विशिष्ट तात्त्विक भूमिकेतून निर्माण झालेली नाही. तिच्यामध्ये एक खास बौद्धिकता असते. येथील गतिशीलता आयुष्याच्या मूलभूत जडणघडणीतून मानवी कृतिशीलतेच्या निरपेक्षतेने निर्माण होणारी आहे. ती न्याहाळणे, ती अनुभवणे, तिला सामोरे जाणे एवढेच कवी करतो. आयुष्याला जाणीवपूर्वक आकार देण्याऐवजी आयुष्याकडून घडले जाण्याची जाणीव तिच्यामध्ये प्रभावी आहे. त्यामुळेच या कवितेजवळ क्रांतीच्या योजना नाहीत तर आयुष्य समजून घेण्याची समंजस आकांक्षा आहे.

याचा अर्थ साळापुरीकरांच्या कवितेची भूमिका 'जे आहे ते' जसेच्या तसे स्वीकारण्याची आहे असे म्हणता येत नाही. वास्तवाच्या अर्थनिर्णयनाच्या पातळीवर 'जे आहे त्यामधील' अंतर्विरोधाचे आकलन ही कविता समर्थपणे करते. हे आकलन अधिक धारदार करण्यासाठी उपरोधाचा आश्रय घेते. संस्कृतीचे पुनर्वाचन करून ती सत्ताधाऱ्यांनाच कशी धार्जिणी आहे



याचे दर्शनही घडवते. *मी तं हजार वर्षं मागे जाऊन आलो* या दुसऱ्या कवितासमूहात भोवतालचा परिसर, शेती आणि आभाळाकडे डोळे पसरून विश्वाच्या सदोदित बहारीखातर प्रार्थना हाकणारा आणि जगण्याची माती झालेला शेतकरी, त्याची अवस्था, कापूस-ऊस, साखरकारखाने आणि या सर्वांना वेढून राहिलेले संस्कृतीचे आणि सत्तेचे राजकारण या गोष्टी कवितेच्या केंद्रस्थानी येतात. कवी म्हणून साळापुरीकरांच्या व्यक्तिमत्त्वाला असलेले सामाजिक संदर्भ येथे दृष्टिपथात येतात.

साळापुरीकरांच्या कवितेतून प्रकट झालेले खेडे, शेतकरी आणि ग्रामीण वास्तव शेतीविषयक शासकीय प्रकल्पांचा आणि राष्ट्रीय धोरणांचा फोलपणा यांमधून निर्माण झाले आहे. जमिनीचा पोत कायमचा खराब करणारी रासायनिक खते, जंगले कापून झालेला शेतीचा विस्तार, सबंध पर्यावरण दावणीला बांधलेला बैल आहे असे समजून त्याचे जमेल तेवढे शोषण करण्याची प्रवृत्ती, समृद्धीच्या हव्यासातून पैसे देणाऱ्या पिकांना आलेले महत्त्व हे विकास योजनांचे परिणाम आहेत. सुरुवातीला या गोष्टींमधील तथाकथित विकास व्यवस्थेला आणि शेतकऱ्यांनाही

हवाहवासा वाटला मात्र त्यातील पोकळपणा लवकरच उघडा पडला. यामधून निर्माण होणाऱ्या हानीकडे व्यवस्था जाणीवपूर्वक काणाडोळा करते



आहे आणि सामान्य शेतकरी मात्र व्यवस्थेने आणि नोकरशाहीने निर्माण केलेल्या यंत्रणेत भरडला जातो आहे याचे विदारक दर्शन साळापुरीकरांची कविता घडविते. या दुसऱ्या कवितासमूहातील कवितांचा एक महत्त्वाचा विशेष हा की त्यांनी केवळ व्यवस्था व नोकरशाही यांसारख्या उघड जाणवणाऱ्या शोषकांना टीकेचे लक्ष्य बनविले नाही, तर संस्कृतीच्या संकल्पनेच्या बुडाखाली असलेल्या काळोखाला उजेडात आणले आहे. साळापुरीकरांच्या कवितेतून प्रकट होणारी

*मी तं हजार वर्षं*
*मागं जाऊन*
*आलो*
*मला कुठं कसं*
*काही आढळलं*
*नाही*
*आणि हे लोकं तं*
*म्हणताहेत की*
*आमची एक*
*विशिष्ट संस्कृती*
*आहे*
*आणि एक फार*
*महान परंपरा आहे*

ही जाणीव तीव्र उपरोधाचा उपयोग करीत हजारो वर्षांच्या परंपरेत शेतकऱ्याचे शोषण न झाल्याची वस्तुस्थिती आढळतच नाही असे सांगणाऱ्या संस्कृतीच्या संरचनेमागील विषमता स्पष्ट करते. प्रारंभी स्पष्ट केलेले आधुनिकतेच्या संकल्पनेशी असलेले संबंध या दुसऱ्या कवितासमूहातून विशेषत्वाने प्रकट होतात.

*आत्ता तरी प्रेम दुर्लभ* या शीर्षकाखाली एकत्र आलेल्या कविता पत्नी अनूला उद्देशून लिहिलेल्या आहेत. व्यापक अर्थाने या कवितांमधून प्रेमाची अनुभूती प्रकट झालेली असली, तरी तिचे स्वरूप सांस्कृतिक संदर्भामुळे गुंतागुंतीचे झाले आहे. या कवितांमध्ये अनूचे पत्नीपण कोठेही दडवण्यात आलेले नाही. म्हणूनच तिला उद्देशून लिहिलेल्या या कवितांमधून स्त्री-पुरुषसंबंध, कुटुंबसंस्था, भोवतालचे सामाजिक वास्तव आणि कवीचे स्वत:विषयीचे भान यांसारख्या गोष्टींनी या कवितासमूहाला संदर्भसंपृक्त केले आहे. या कवितांमधून जाणवणारे पतिपत्नी संबंध दोहोंच्या स्वतंत्र विकासाला वाव देणारे आहेत. पत्नीने पतीची पडछाया होऊन राहणे या पारंपरिक संबधांना येथे स्थान नाही.

*संसार हा आपल्या दोघांचा असला*
*तरी*
*प्रवास मात्र एकट्या एकट्याचा*
*असेल*

हे कवीचे उद्‌गार या नात्याची वैशिष्ट्यपूर्णता स्पष्ट करणारे आहेत. हे खास आधुनिक नाते आहे. मात्र कवीने श्रेयस्कर म्हणून स्वीकारलेले आहे असेही दिसत नाही. त्याच्या मूल्ययुक्ततेचे भान कवीला असले तरी त्यातील ताणतणावांची जाणीवही त्याला आहे. कोणत्याही नात्यामध्ये प्रेम सापडण्याची शक्यता जवळजवळ

नसतेच आणि म्हणूनच या नात्यामध्ये 'प्रेम दुर्लभ समज' असे कवी जेव्हा अनूला उद्देशून म्हणतो तेव्हाच आधुनिक संस्कृतीने नातेसंबंधांच्या राजकारणाला दिलेले स्वरूप त्याच्या ध्यानात आले आहे, ही गोष्ट लक्षात येते. तथापि, एक अपरिहार्यता समजून ही गोष्ट त्याने स्वीकारली आहे. या स्वीकारानंतरही परस्परांचे संबंध समजून घेऊन आपले नाते अधिक समंजस आणि सुंदर करण्याचा त्याचा प्रयत्न आहे. व्यक्तीच्या स्वतंत्र अस्तित्ववेडाला प्राधान्य देणाऱ्या या नातेसंबंधांचे चटके बसून कवी पारंपरिक नात्याकडे वळला असता, तर ते समजण्यासारखे होते. आजकालच्या सांस्कृतिक वातावरणात ते नेमकेपणाने बसूनही गेले असते. कवीने अशाप्रकारे भूतकाळात जाणे कटाक्षाने टाळले आहे. 'भारतीय परंपरेने स्त्रीमनावर केलेल्या संस्कारांच्या दुष्परिणामांची' त्याला चांगलीच जाणीव आहे.

या कवितासमूहातून समोर येणाऱ्या पतिपत्नीच्या नात्याला भोवतालच्या सामाजिक वास्तवाचाही सुस्पष्ट संदर्भ आहे. 'चंदू माणसांची गोष्ट' या कवितेमधून आपण कुठल्या प्रकारच्या समाजामध्ये राहतो आहोत याचे चित्र कवीने उभे केले आहे. या समाजामधील माणसे स्वत:भोवती सुरक्षिततेचे कडे उभारण्यात व्यग्र असतात, ती खोटे दांभिक आयुष्य जगतात, ती स्वत:कडे आत वळून पाहत असतात, त्यांच्यात भित्रेपणा असतो आणि अशा माणसांच्या जंगलातून वाट काढीत आपल्याला पुढे जायचे आहे याचे भान अनूला आणून देण्याचा प्रयत्न कवी करतो आहे. पुढची पिढी आजच्या वास्तवाबद्दल टोकदार प्रश्न विचारील तेव्हा आपण त्यांना काय उत्तरे द्यायची हा प्रश्नही आजच्या पतिपत्नी नात्यासमोर उभा आहे. अशा प्रकारे वर्तमान परिस्थितीतील परस्परांचे नाते, त्याभोवती असलेले सामाजिक पर्यावरण आणि भविष्याचे भान या सर्व संदर्भांनी पतिपत्नीसंबंधांवरील या कविता विशेष अर्थपूर्ण झाल्या आहेत.

*डुचमळतो साक्षी* या पुढल्या कवितासमूहामधून खास आध्यात्मिक म्हणता येईल अशी संवेदनक्षमता व्यक्त होते आहे. सहजता, संवेदनक्षमता, नश्वरतेचा व जीवनेच्छेचा स्वीकार या आशयसूत्रांच्या प्रभावामुळे येथील कविताही अध्यात्माच्या पारंपरिक संकल्पनेला नकार देतात. अध्यात्माच्या क्षेत्रातील अनेकआवाजीपणा साळापुरीकरांनी गृहीत धरलेला असल्यामुळे त्याची अध्यात्माची संकल्पना स्वत:च्या अस्मितेला सामोरी जाणारी आणि 'दुसऱ्या'ला त्याच्या वेगळेपणासह सामावून घेणारी झाली आहे. अंधारात माणुसकी चाचपणारे, सृष्टीतील सृजनाला सामोरे जाणारे आणि ब्रह्माऐवजी मानवाला केंद्रस्थानी ठेवणारे हे आधुनिक अध्यात्म अध्यात्माच्या संकल्पनेला अधिक मानवी करणारे आहे.

*महासत्तेच्या वाटेवरून* या पाचव्या कवितासमूहात फक्त पाचच कविता आहेत, तथापि, कवितासंग्रहातील समग्र विश्वभानाचा विचार करता त्या अत्यंत महत्त्वाच्या आहेत. प्रादेशिकतेच्या सीमारेषा ओलांडून कवी येथे संपूर्ण देशाचा आणि या देशाच्या बाहेरील जगाशी असलेल्या संबंधांचा विचार करतो आहे. हा कवितासमूह वर्तमान परिस्थितीवर रोखलेला असला तरी येऊ घातलेल्या संस्कृतीच्या पाऊलखुणांनी अस्वस्थ झालेला आहे. हा देश जागतिक पातळीवर एक महासत्ता होण्याचे स्वप्न पाहणारा आहे. महासत्ता होण्याचे हे पोकळ आणि चकचकीत स्वप्न वर्तमान परिस्थितीतील शोषणाचे संबंध दडवण्यासाठी कसे वापरले जाते आहे याचे उत्कट भान कवीला आले आहे. महासत्तेच्या महामार्गावरून वाटचाल करताना सर्वसामान्यांच्या आशाआकांक्षा चिरडल्या जात असल्यामुळे व्यवस्था आणि 'आपून' यांच्यातील द्वंद्वाची जाणीव कवीला झाली आहे. उत्पादनखर्च वाढवून आबाद झालेल्या कंपन्या आणि त्यांचीच सोय पाहणारी नोकरशाहीसहची व्यवस्था यांनी आयात केलेल्या आंतरराष्ट्रीय स्वप्नांनी येथील संस्कृतीचे पोत पूर्णपणे बिघडून गेल्याची ही जाणीव जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत मूल्ययुक्त वाटते. 'प्रधानजी'सारख्या कवितेमधून विकासाची चंगळवादी संकल्पना, कायदा–सुव्यवस्था-लोकशाही मूल्ये यांची धूळधाण, श्रम करणाऱ्या लोकांकडे पूर्णपणे दुर्लक्ष आणि जनमत आपल्या बाजूने वळवण्यासाठी केलेला माध्यमांचा उपयोग या सर्व गोष्टींवर प्रखर प्रकाशझोत टाकला गेला आहे. या परिस्थितीमध्ये 'आपून इतिहासातून निर्वासित झालो' असल्याची, आपल्याच पर्यावरणात उपरे ठरल्याची जाणीव कवीला होते आहे. असे असूनही जे घडते आहे त्याची जाणीव

## श्वेतपत्रिका तीन

मी तं हजार वर्षं मागे जावून आलो
मला कुठं कसं काही आढळलं नाही
आणि हे लोक तं म्हणताहेत की
आमची एक विशिष्ट संस्कृती आहे
आणि एक फार महान परंपरा आहे

हे लोक तं म्हणताहैत की
इतिहासात फार लढाया झाल्या
आणि आमच्याकडे पराक्रमांची
भलीमोठी जंत्रीच आहे

मी तं हजार वर्षं न्याहाळून पाहिली
कुठल्याच लढाईचा पाया नव्हता
शेतकऱ्याची हालाखी आणि
शेतीच्या शोषणाची कुठलीच घोषणा
कशी आढळली नाही

शिगोशिग कोठारं त्यांनीच भरलेली असताना
का नसावे अन्न त्यांच्यासाठीच
एवढी मोठी साधनसंपत्ती लाभलेल्या देशात
का असू नये निवारा त्यांच्यासाठीच
का पांठवताहेत लोकं
गुलामीची चड्डी चढवून चिमकुल्यांना कामावर
का विकताहैत मुलींना दिवसाढवळ्या

हे लोक तं म्हणताहैत की
आम्ही शांतताप्रिय आहोत
जगाला देण्यासाठी
आमचेजवळ पुष्कळ संदेश आहेत
आणि आम्ही लवकरच
एक महासत्ता म्हणून वर येवूत

हजारो वर्षांच्या शेतीच्या शोषणातून
निर्माण झालेला हा राडा
म्हणजे शांतताय् जगाला देण्यासाठी
पुष्कळ संदेश असलेले हे लोक
पन्नास टक्के दारिद्र्यरेषेखाली गेलेल्या
लोकांच्या डोक्यावर पाय ठेवून
निश्चितच एक दिवस
एक महासत्ता म्हणून वर येतील

मी तं हजार वर्षं मागे जावून आलो
एवढी शांतता आणि एवढं दारिद्र्य
एकत्र नांदतयूच कसं हा कमालीचा प्रश्नयू

●

## सर्वप्रथम तू एक कर

हे कुपोषित बालका
सर्वप्रथम तू एक कर
सुनियोजित कोसळलेल्या सुलतानी संकटाचं
नेमकं काय करावं
हे न उमजून गांगावून गेलेल्या त्यांनी
आलेल्या घोर निराशेत करण्याजोगी
गोष्ट म्हणून तुला जन्म दिला
त्या अडाणी जोडप्याला
तू प्रथम माफ करून टाक

हे कुपोषित बालका
सर्व शासकीय उपक्रमांना
शांतपणे समजावून घे त्यांना तुझ्या
गावाच्या डाव्या हाताला मोठा डोंगर
आहे का नाही तेवढ्या प्रचंड
मर्यादा असतात बघ
आणि च्यायला तू साला
अठरा वर्षांचा पण नाही
नाहीतर काही ना काही जोडजाड
लावता आली असती बघ

हे कुपोषित बालका
भूतदयेने पछाडलेले काही
स्वयंसेवी लोक तुझ्याकडे येतील
तेव्हा त्यांच्या तोकड्या
प्रयत्नांना तू चांगला प्रतिसाद दे
मुला हे गायीच्या अंतःकरणासारखे लोक
खरोखरच निष्पाप आणि सुंदर आहेत

हे कुपोषित बालका
अभिनंदन
जन्म मृत्यूच्या फेऱ्यातला
बहुधा हा तुझा शेवटचा फेरा
आचके देण्याचं काय रे काम
कमजोर जाती ह्या
हळू हळू नष्ट होणारंच या
साध्या निसर्गनियमांचा
तू स्वीकार का रे नाही करत
अध्यात्मात ना बुडबुड्यांना महत्त्व असतं
ना त्यांच्या स्वप्नांना
म्हणून मित्रा
धान्यांनी ठासून भरलेल्या
या कोठारांच्या साक्षीनं
अभिनंदन
त्रिवार अभिनंदन

लोकांना अद्यापही होत नाही याची खंत कवीला वाटते आहे. या परिस्थितीचे चित्रण करताना कवीने काढलेले—

*ही ओरिजिनल गढी ज्यांची आहे*
*ते कधीच इकडं फिरकणार नाहीत*
*शेतात दिवस कधी कलला अजून*
*हेच त्यांच्या लक्षात आलेले नाही*
*काही जण आजही तेंदूची पानंच*
*तोडताहेत*
*तुटपुंज्या मिळकतीच्या फांदीवर*
*सगळेच*
*वेताळासारखे तसेच लटकलेले*
*आहेत*

हे उद्‌गार परिस्थितीची विदारकता स्पष्ट करणारे आहेत.

येथे कवी फक्त परिस्थितीच्या आकलनापाशीच थांबत नाही. सार्वत्रिक विखुरध्वंसाच्या (फ्रॅग्मेंटेशनच्या) या वातावरणात आपल्याला जमेल तेवढा विरोध करण्याचा निर्णय तो घेतो आहे. स्वप्नातून बाहेर येऊन स्वत:चा व स्वत:च्या संस्कृतीचा नीट शोध घेऊन चकचकीत रस्त्यावरून चालताना पायाला नाल ठोकण्याची भाषा तो करतो आहे. महत्त्वाची गोष्ट अशी की ही निषेधाची, प्रतिकाराची विधायक भूमिका परस्परसंबंधांच्या, एकमेकांना ओळखण्याच्या ठाम भूमिकेवर तो उभी करतो आहे. या संदर्भात 'आपून', 'आई' यांसारखी कवितांची शीर्षकेही पुरेशी बोलकी आहेत. साळापुरीकरांची येथील कविता जागतिकीकरणाला, आर्थिक उदारीकरणाला, मूल्यरहित आधुनिकोत्तरवादाला आणि अलीकडे सार्वत्रिक होऊ पाहणाऱ्या विखुरध्वंसाला (फ्रॅग्मेंटेशनला) निर्भयपणे सामोरी जाणारी आहे. तथाकथित 'पोस्टमॉडर्निस्ट कंडिशन', 'एन्जॉय' करण्याऐवजी ती त्यांच्या संदर्भात चिकित्सक दृष्टी अंगीकारते आहे, ही मूल्ययुक्त गोष्ट आहे.

परस्परसंबंधांचे, एकमेकांना ओळखण्याचे वरील आशयसूत्र *घ्या आजही रात्रीचे बारा वाजलेयृत* या पुढच्या कवितासमूहात खेळवलेले आहे. या कवितासमूहात समकालीन पिढीतील मित्रांशी असलेल्या संबंधांबद्दलच्या कविता आहेत. पिढीतील सामायिकतेच्या या कविता अस्वस्थतेच्या समान सूत्रांनी 'दुसऱ्या'ला स्वत:शी जोडून घेणाऱ्या कविता आहेत. पिढी ही संकल्पना येथे सांस्कृतिक राजकारणाचे एक साधन म्हणून वापरली जात नाही, तर सर्वांच्या मनात सहकंप पावणारी, सर्वांना वेढून असणारी भावना म्हणून या कवितांमधून प्रकट होते आहे.

*जमील* आणि *हे कुपोषित बालका* हे पुढले छोट्या आकाराचे कवितासमूह कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा विस्तार दाखवणारे आहेत. जातिधर्माच्या सीमारेषा ओलांडून पलीकडे जाणाऱ्या, अखिल समाजाच्या तळागाळापर्यंत जाऊन पोहोचणाऱ्या कवीच्या विश्वभानाचे दर्शन या दोन कवितासमूहांमधून होते आहे. कुपोषित बालकाचाच नव्हे तर संस्कृतीचाच अंत आपण पाहतो आहोत याची अस्वस्थ करणारी भयावह जाणीव या कवितांमधून होते. वर्तमान समाजरचना, शासनव्यवस्थांचे गुन्हेगार असणे या जाणिवेमध्ये अभिप्रेत असले तरी समग्र संस्कृतीच्याच संरचनेमध्ये काहीतरी गोम असण्याची भावना येथे अत्यंत महत्त्वाची मानायला हवी.

*मित्रा*
*कुपोषित तू एकटा नाहीस*
*आपला इतिहास*
*संस्कृती नाटक साहित्य सारे काही*
*तुझ्या फुगलेल्या पोटासारखे आहे*

हे कवीचे उद्‌गार आपल्याच नव्हे तर समग्र मानवी संस्कृतीवर तिखट भाष्य करतात आणि कवीच्या जाणिवेची सर्वंकष व्यापकता दाखवून देतात.

'कुठल्याही विरामचिन्हाशिवाय'मधली अविनाश साळापुरीकरांची कविता आयुष्याचे वेगवेगळे कप्पे खोलत जाणारी कविता आहे. स्वत:सह भोवतालच्या वास्तवाला तळहातावर घेण्याचा प्रयत्न ती करते. मूठ बंद करून 'ओळखा पाहू' असे उखाणे घालण्याऐवजी अर्थनिर्णयनाच्या पातळीवर 'फार काही' पुढे आणून वाचकाला 'ठरवा काय काय अर्थपूर्ण ते' असे आवाहन करणारी ही कविता स्वभावत: 'खुली' कविता आहे. शहरांनी जोपासलेल्या आधुनिकतावादी सौंदर्यशास्त्राला ती विशेष अनुसरत नाही. शब्दांशी खेळ मांडण्याचे ती टाळते. तिच्यातील नितळ प्रामाणिकपणाला हे अनुरूपच आहे. गेल्या पिढीतील महत्त्वाच्या मराठी व पाश्चात्त्य कवींच्या खुणा साळापुरीकरांच्या कवितेत सापडत नाहीत. ती पंथीय अभिनिवेशापासून आणि कळपाच्या समाजशास्त्रापासून स्वत:ला जाणीवपूर्वक दूर ठेवून स्वत:चे मार्ग स्वत:च शोधण्याचे आव्हान स्वीकारणारी कविता आहे.

# पालकनीती

## एक महत्त्वाची पण कठीण वाट!

अरविंद वैद्य

२००७चे 'महाराष्ट्र फाउण्डेशन'चे पुरस्कार जाहीर झाले आणि त्यामधील नियतकालिक-अनियतकालिकांसाठी असलेला पुरस्कार 'पालकनीती' ह्या मासिकाला मिळाला, ही बातमी वाचनात आली. मनस्वी आनंद झाला. माझ्या आनंदाची कारणे तिहेरी स्वरूपाची होती. मध्यंतरी काही वर्षे ह्या मासिकात मी सलग दोन लेखमाला केल्यामुळे आपल्या 'पालकनीती'ला पुरस्कार मिळाला हे कारण होतेच; पण त्याहूनही दुसरे कारण महत्त्वाचे होते. महाराष्ट्र फाउण्डेशनचे प्रतिष्ठेचे मानले जाणारे पुरस्कार सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्रात दिले जातात. नियतकालिके हे जरी साहित्य असले तरी 'पालकनीती' हे मासिक गेली वीस वर्षे खरे तर एक मोठे सामाजिक काम करीत आहे. सामाजिक आणि साहित्यिक ह्या दोनही गोष्टींचा सुंदर मेळ घालणाऱ्या ह्या मासिकाला पुरस्कार मिळाल्याने मला आनंद झाला. आनंदाचे तिसरे कारण म्हणजे, माझा ज्या क्षेत्राशी—शिक्षणक्षेत्राशी—गेली चाळीस वर्षे जैवसंबंध आहे, त्या क्षेत्रातील एका मासिकाला पुरस्कार मिळाला आहे.

'पालकनीती'च्या संपादिका श्रीमती संजीवनी कुलकर्णी आणि त्यांचे पती डॉ. विनय कुलकर्णी ह्या दोघांनी आणि त्यांच्या संचाने सामाजिकदृष्ट्या किती महत्त्वाचे आणि मोठे काम गेली वीस वर्षे अंगीकारले आहे ते जाणून घेतल्याशिवाय ह्या मासिकाचा खरा परिचय होणार नाही. त्याचबरोबर हे काम कसे कठीण असते हे समजल्याशिवाय ह्या मासिकाला मिळालेल्या पुरस्काराचे औचित्य कळणार नाही व निवड समितीला मनापासून दाद जाणार नाही. म्हणून ह्या मुद्यांचा थोडा ऊहापोह होणे गरजेचे आहे.

एकूण जगातच आधुनिक शिक्षणाची सुरुवात सुमारे दोनशे वर्षांपूर्वी झाली. आधुनिक जगाचा आत्मा आहे 'लोकशाही विचार'. हा आत्मा शिक्षणात शिरला आणि बहुतांशी लोकांच्या दृष्टीने मृतवत शिक्षण जिवंत झाले. लोकशाही विचार येण्यापूर्वीच्या समाजव्यवस्थेचा आत्मा होता 'मानवी समाजाची श्रेणीबद्ध रचना'. ह्या रचनेत औपचारिक शिक्षण ही उच्चभ्रूंची मिरासदारी होती. बहुजनांचा ह्या शिक्षणाशी संबंध नव्हता. लोकशाहीत सर्व माणसे तत्त्वत: समान असतात. मतदार ह्या नात्याने सर्व प्रौढ नागरीक हे राज्यकर्ते असतात. ह्या परिस्थितीत दर्जेदार तेही सार्वत्रिक शिक्षणाचा प्रश्न पुढे येतो. असा समाज चालायचा तर शिक्षण हे नुसते दागिना असून चालत नाही तर ते व्यवहारउपयुक्त असावे लागते. ह्या मुद्यांच्या पार्श्वभूमीवर आधुनिक काळातील 'पालक' ह्या संज्ञेत पडलेला बदल पाहावा लागेल.

पालक ह्या संज्ञेचा संबंध खरे तर शिक्षणाशी नाही. तो मुलांशी आहे. एखादे मूल औपचारिक शाळेत जात असेल वा नसेल त्यांना कोणीतरी पालक असणारच. जेव्हा शिक्षण सार्वत्रिक नसते तेव्हा फारच थोडे पालक हे शिक्षणाशी संबंधित असतात. जसजसे शिक्षण सार्वत्रिक होऊ लागते तसतसे सर्व पालक मुलांचे नव्हे तर शिकणाऱ्या मुलांचे पालक बनतात. अशा पालकांकडून असलेल्या अपेक्षा बदलतात, मुलांबरोबर पालकांच्या प्रशिक्षणाची आवश्यकता तयार होते.

आधुनिक जग गेली दोनशे वर्षे तयार होते आहे. लोकशाही विचाराचा जसा विकास होतो आहे, तसाच विकास विज्ञानाचा होतो आहे. मुलांच्या सुयोग्य वाढीसाठी आवश्यक ते भान देणाऱ्या शरीरशास्त्र, मानसशास्त्र, शिक्षणशास्त्र ह्यांच्या शाखा विकसित होत आहेत. सुजाण पालकाला ह्या सम्यक ज्ञानाची व भानाची गरज आहे. 'पालकनीती'



पालकवर्गाला देण्याचा प्रयत्न करत असल्याने मी ह्या कामाला महत्त्वाचे आणि मोठे मानतो. आधुनिक काळाचे मार्गदर्शक सूत्र आहे, 'थिंक ग्लोबली'.—विचार जागतिक पातळीवर करा. कारण वसंत बापट म्हणतात त्याप्रमाणे 'काळाचे पाऊल द्रुत वेगाने पुढती पडे । क्षितिजाचे बंधन क्षणोक्षणी अधिकचि उघडे ।' पण ते त्या आधी म्हणतात त्याप्रमाणे 'कळे मला' हे मात्र बऱ्याचदा घडत नाही. आणि त्यामुळे 'माझ्या घरची विशाल दारे सताड ही राहोत खुली ।' ही अपेक्षा पूर्ण होत नाही. पालकांना पालकत्वासाठी, हे जागतिक बदलत्या परिस्थितीचे भान येण्यासाठी 'पालकनीती'ची धडपड असल्याने मी त्यांच्या कामाला मोठे व महत्त्वाचे मानतो. मुलांचा आहार, खेळ, छंद, भावनिक व बौद्धिक क्षमतांचा विकास, त्यांचे शिक्षण, त्यांचा अभ्यास एक नाही हजार बाबी आज संगोपनात येतात. ह्या गरजा वयाच्या प्रत्येक टप्प्यावर बदलतात. मुलाला हे सारे मिळायचे तरी ह्या सर्व क्षमता प्रत्येक पालकात नसणार हे उघड आहे. पण




प्रत्येक पालकाला ह्या गरजा कशा भागवायच्या? त्यासाठी साहाय्य करणाऱ्या व्यक्ती, संस्था, साधने कोणती? ही माहिती हवी. त्यासाठी नेटवर्किंग हवे. एक व्यासपीठ हवे. 'पालकनीती' हे तसे व्यासपीठ आहे.

'पालकनीती' हे जे काम करते आहे ते कठीण आहे असे मला का वाटते? आधुनिक काळाच्या मार्गदर्शक सूत्राचा 'थिंक ग्लोबली'चा जो पुढचा भाग आहे 'ॲक्ट लोकली' त्यामध्ये हे काम कठीण असण्याचे कारण आहे. आधुनिक जगाला आणि आधुनिक शिक्षणाला प्रारंभ जरी युरोपात झाला असला तरी त्या गोष्टी जगभर पसरताना त्या त्या भागातील ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक व सांस्कृतिक वारसा घेऊन पसरणे स्वाभाविक तसेच आवश्यक होते. वर्चस्ववादी स्नॉबिस्ट विचारातून पश्चिमेच्या विचारांबरोबर, पश्चिमेची संस्कृतीही लादण्याचा जेव्हा प्रयत्न झाला तेव्हा त्यामुळेच त्याला विरोधही झाला. भारततही शिक्षणाचे तसेच पालकत्वासंबंधीचे विचार, तत्त्वज्ञान राबवताना, लोके, रुसो, माँटेसरी या पाश्चिमात्य पूर्वसूरींचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख होत असला तरी रवीन्द्रनाथ टागोरांपासून अलीकडील कृष्णकुमारांपर्यंतच्या भारतातील तज्ज्ञांनी इथे आधुनिक शिक्षण रुजवताना त्याला इथल्या मातीचा गंध दिला. ह्या तज्ज्ञांच्या नामावलीत गिजूभाई बधेका, ताराबाई मोडक, जे. पी. नाईक इत्यादी अनेक तज्ज्ञ आणि 'एकलव्य' (मध्य प्रदेश), 'बोध' (राजस्थान)सारख्या अनेक प्रयोगशील संस्था यांची नावे घ्यावी लागतील.




'पालकनीती'च्या संपादक मंडळाने गेली वीस वर्षे पालकांना चाखता यावा म्हणून ह्या अनेक ठिकाणचा विचार, चिंतन, अनुभवाचा मध मासिकाच्या पोळ्यात भरला. मधाचे पोळे हे जसे मधमाशांच्या सांघिक प्रयत्नांचे फलित असते तसाच 'पालकनीती'चा उपक्रम हा 'पालकनीती' परिवाराचा उपक्रम आहे. 'पालकनीती' हे केवळ त्याच्या वाचकांसाठी असलेले मासिक नाही तर सुजाण पालक घडविण्याचा तो सातत्याने चाललेला खटाटोप आहे. आधुनिक जागतिक विचारांची येथील मातीशी नाळ जोडण्याचा हा प्रयत्न आहे आणि म्हणूनच तो कठीणही आहे.

ह्या कामातील कठीणपणा नीट ध्यानी येण्यासाठी आधुनिक शिक्षणपद्धती व विचार भारतात कसे रुजले ते पाहणे गरजेचे आहे. अव्वल सरंजामी राजवटींखाली असलेला मध्ययुगीन युरोप पंधराव्या-सोळाव्या शतकापासून गाभ्यातून बदलू लागला. कोलंबसापासून पुढील दर्यावर्दींनी लावलेला नव्या जगाचा शोध, त्यातून

युरोपला लाभलेली प्रचंड नैसर्गिक साधनसंपत्ती, न्यूटनपासूनच्या शास्त्रज्ञांनी केलेली वैज्ञानिक क्रांती व पुढील औद्योगिक क्रांती ह्या साऱ्यातून युरोप पुढील तीनशे-चारशे वर्षांत



आतून बदलला. भारतात तसे झालेले नाही. आधुनिकतेचे वरील बदल भारतात बाहेरून, वरून आले. भारतीय समाजाची मानसिकता अद्याप मध्ययुगीनच आहे. अशा समाजात आधुनिकतेला पोषक मानसिकता घडविणे हे त्या त्या क्षेत्रातील लोकांसमोरचे महत्त्वाचे पण कठीण काम आहे. पालकांच्या संदर्भात हे काम 'पालकनीती' गेली वीस वर्षे करत आहे.

या कामाचा प्रारंभ १९८७च्या जानेवारीत झाला. मासिकाचा पहिला अंक निघाला. संपादक होत्या संजीवनी कुलकर्णी. लोकशिक्षणाच्या दोन पद्धती असतात. 'मला माहीत आहे, तुम्हाला काही प्रश्न आहेत. माझ्याकडे उत्तरे आहेत. ऐका!' ही एक पद्धत, तर 'मला काही प्रश्न आहेत. तसे ते तुम्हालाही असतील. चला सर्वांनी एकत्र येऊन त्यांची उत्तरे शोधूया.' ही दुसरी पद्धत! 'पालकनीती'ने दुसरी पद्धत स्वीकारली. सर्वांनी मिळून 'पालकनीती' घडविणे, वाढविणे व जोपासणे म्हणजेच सामाजिक पालकत्व. 'हे काम ज्याने त्याने आपापल्या कुवतीप्रमाणे, कुणी पैशाने, कुणी आपला वेळ-श्रम-विचार देऊन करायचे आहे. हे काम सेवेचे नाही. सह-अनुभूतीचे आहे.' ह्या पहिल्या काही अंकातील मांडणीतील आर्जव एवढे प्रभावी होते की 'निकले थे अकेले। चलते कारवाँ बन गया।' ह्या उक्तीप्रमाणे तीन वर्षांत 'पालकनीती' परिवार परिवारनियोजनाची बंधने न मानता वाढला.

मी आधीच म्हटलेय की प्रश्नांचे स्वरूप आणि उत्तरे आधी माहीत आहेत, असा दावा करून हे काम सुरूच झालेले नसल्याने 'पालकत्व' ह्या संज्ञेची व्याप्ती कामाच्या क्रमात वाढत गेली. समाजातील ज्या-ज्या घटकाला सांभाळायची गरज आहे त्यांना त्यांना पालक हवेत. 'पालकनीती'च्या तिसऱ्या अंकापासूनच 'वृद्धांच्या पालकत्वा'चा समावेशही 'पालकनीती'त करण्यात आला.

एखाद्या उपक्रमाची वा व्यक्तीची यशोगाथा सांगताना 'नंतर त्याने मागे वळून पाहिलेच नाही' असे म्हणण्याचा प्रघात आहे. 'पालकनीती'चे तसे नाही. हा परिवार जाणीवपूर्वक ठरवून मधूनमधून थांबतो, एकत्र बसतो व मागे वळून पाहतो. हे करण्यासाठी तो बाहेरील तज्ज्ञ व्यक्तींनाही निमंत्रित करतो.

संजीवनीने 'पालकनीती'ची सुरुवात केली आणि पहिली सात-आठ वर्षे ती बहुतांशी एकटीने पेलली. पण त्यानंतरच्या प्रवासासाठी खास उल्लेख केला पाहिजे तो अनुक्रमे शुभदा जोशी आणि नीलिमा सहस्त्रबुद्धे यांचा. आर्किटेक्ट आणि इलेक्ट्रिक इंजिनियर असलेल्या ह्या दोघींनी आपला मूळ व्यवसाय सोडून 'पालकनीती'च्या

कामालाच वाहून घेतले. ह्या दोघींनी व संजीवनीने अनेक लेखकांना 'पालकनीती'मध्ये लिहिण्यासाठी प्रवृत्त केले. त्यामध्ये श्रीपाद धर्माधिकारी, डॉ. अशोक केळकर, रमाकान्त धनोकर, सुहास कोल्हेकर, रेणू गावस्कर, रेणू दांडेकर, वर्षा सहस्रबुद्धे, विद्या पटवर्धन, गणेश विसपुते, डॉ. मोहन देशपांडे, वंदना भागवत, वैशाली आणि अरविंद वैद्य ह्यांचा समावेश आहे. देवदत्त दाभोलकर पहिल्या वर्षापासून परिवारात होतेच. स्वेच्छेने आपल्या घरातील मुलांचे पूर्णवेळ काम म्हणून पालकत्व घेणारे व त्यामध्ये प्रयोग करणारे सदानंद घासकडवीही परिवारात होते. ह्यातील अनेकांनी आपापल्या अनुभवांवर आधारलेल्या लेखमाला 'पालकनीती'मध्ये चालविल्या. त्यातील काही लेखमालांची स्वतंत्र पुस्तके नंतर प्रसिद्ध झाली. विस्तारभयास्तव ह्या साऱ्या पुस्तकांचा व लेखमालांचा तपशील देण्याचा मोह टाळला आहे. तरीही त्यातील काही महत्त्वाच्या लेखमालांचा उल्लेख केलाच पाहिजे. *सांगोवांगीच्या सत्यकथा* - शशी जोशी, *भाषा आणि विकास* - नीती बडवे, *मुलांची भाषा आणि शिक्षण* - कृष्णकुमार, *डेव्हिड ससूनमधील अनुभव* - रेणू गावस्कर, *शिक्षणाचा सामाजिक इतिहास* - अरविंद वैद्य, *समजू या अंतरंगा* - शारदा बर्वे, *आरोग्य शिक्षणाच्या वाटा* - डॉ. मोहन देशपांडे, *आरोग्य शिक्षणाच्या नव्या वाटेवर* - वैशाली वैद्य.

'पालकनीती'ने १९९५च्या जवळपास पालकत्व आणि शिक्षण ह्या विषयातील पुस्तकांचे संकलन सुरू केले. ह्यातून सुरू झालेल्या 'माहिती घर' हा उपक्रम साधारण पाच वर्षे चालला. ह्या उपक्रमामुळे कित्येक चांगल्या मराठीतर भाषांतील पुस्तकांचा परिचय पालकनीतीच्या वाचकांना करून देणे शक्य झाले. त्यामध्ये जॉन होल्ट, गिनिची सुझुकी, डॅनियल गोल्डमन,




कृष्णकुमार, उदय प्रकाश आणि इतर कितीतरी प्रज्ञावंतांचा समावेश आहे.

गेल्या वीस वर्षात 'पालकनीती' मासिकाने अनेक विषय हाताळले. त्यामध्ये मुलांचे निकोप संगोपन, त्यांचा अभ्यास, त्यांच्याशी संवाद, त्यांचा सर्वांगीण विकास, शिक्षणाचे माध्यम, इंग्रजीचे स्थान, हे विषय तर आहेतच पण त्याशिवाय शिक्षणात काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींचा परिचय, अभिव्यक्ती, एकात्मिक जीवन,लैंगिक शिक्षण, सहशिक्षण, असुरक्षिततेची समस्या, मानवी समाज व त्यातील विविध समस्या, नीतिमूल्ये, कुमारवयीन व तरुण मुलांचे खास वयसापेक्ष प्रश्न, स्त्री-पुरुष समानता, पर्यावरण, सादरीकरण आणि संवादकौशल्य, सर्जन लेखन अशा कितीतरी विषयांचा समावेश आहे. पालकांचा पत्रव्यवहार, मुलांचे अनुभव, संपादकीय व नेहमीची सदरे हे सांभाळून नेहमीच्या अंकात ह्या विषयांना जागा उपलब्ध करून देणे केवळ दुरापास्त. त्यासाठी विशेषांक आणि जाडजूड तरीही आशयघन असे दिवाळी अंक 'पालकनीती' परिवाराने संपादित केले. ह्या अंकांचा खास उल्लेख केला पाहिजे. गेल्या काही वर्षातील 'पालकनीती'चे नेहमीचे तसेच विशेषांक बाह्यांगानेही सुंदर असतात. त्याचे श्रेय अर्थातच संबंधिताना जाते.

१९८७मध्ये सुरू झालेल्या उपक्रमाला १९९६मध्ये दहा वर्षे पूर्ण झाली. सुरू झाला तेव्हा हा उपक्रम चार लोकांचा वैयक्तिक उपक्रम होता. आता त्याचा वाढलेला विस्तार व विषयांची खोली पाहता त्याला संस्थात्मक स्वरूप देणे गरजेचे होते. उपक्रमाला तीन वर्षे पूर्ण झाली तेव्हा एका सिंहावलोकनाच्या बैठकीत संपादक म्हणून संजीवनी कुलकर्णी यांनी 'हे काम पुढे चालू ठेवायचे का?' असा प्रश्न उपस्थित केला होता. 'असे काम कोणताही विचार न करता आधी किमान दहा वर्षे करायचे असते आणि मग यशापयशाची चर्चा!' असे त्याला समर्पक उत्तरही देवदत्त दाभोळकर यांनी दिले होते. आता दहा

वर्षे झाली होती. कामाचे यशच नव्हे तर महत्त्वही सर्वांना पटले होते. त्यामुळे संस्थेची रीतसर स्थापना करण्यात आली आणि 'पालकनीती परिवार' ही संस्था रीतसर नोंदवली गेली. रमाकांत धनोकर, सुरेश कशेळीकर, डॉ. विनय कुलकर्णी आणि डॉ. संजीवनी, नीलिमा सहस्रबुद्धे, शुभदा जोशी हे त्याचे विश्वस्त बनले.

संस्था नोंदणीनंतर दरवर्षी एका व्यक्तीला सामाजिक पालकत्व पुरस्कार द्यायला संस्थेने प्रारंभ केला. हा उपक्रम १९९७ ते २००३ असा सात वर्षे चालला. ह्या उपक्रमाखाली क्रमाने थॉमस गे, दत्ता अहिवळे, इंदुताई पाटणकर, धवुबाई सुरवसे, निर्मलदादा ग्यानाणी आणि सुधाताई सोवनी (एकाच वर्षी), 'एकलव्य' ही संस्था आणि शिवाजी कागणीकर यांना हे पुरस्कार दिले गेले. बहुदा सुयोग्य व्यक्ती न मिळाल्यामुळे त्यानंतर हे पुरस्कार बंद झाले.

जाता जाता काही काळ चाललेल्या 'माहिती घर' आणि 'सामाजिक पालकत्व पुरस्कार' ह्या दोन उपक्रमांची थोडीशी ओळख आपण करून घेतली. तसाच एक उपक्रम म्हणजे 'संदर्भ' हे मासिक होय. विज्ञान शिक्षणात खास रुची असलेल्या नीलिमा देशपांडे यांनी ह्या उपक्रमात पुढाकार घेतला. 'संदर्भ' हे मुळातील 'एकलव्य' ह्या मध्यप्रदेशमधील चळवळीचे मासिक. 'पालकनीती' परिवाराचे सदस्य ह्या मासिकाचे चाहते होतेच. त्यांनी हे 'संदर्भ' ह्याच नावाने मराठीमध्ये छापायला सुरुवात केली; पण त्यातील मराठी भाषांतरीत मूळ लिखाणात आपली स्वत:ची भर घालून.

आणखी दोन उपक्रमांचा उल्लेख काहीशा तपशिलात जाऊन केल्याशिवाय 'पालकनीती'चा परिचय पूर्ण होणार नाही. ते उपक्रम म्हणजे 'खेळघर' व 'आनंदसंकुल.'

मादाम मॉंटेसरींचा उपक्रम जसा प्रथम




झोपडपट्टीत सुरू झाला तसा १९९६ साली शुभदा जोशी यांनी घराशेजारील झोपडपट्टीतील मुलांसाठी स्वत:चे घर खुले करून 'खेळघर' हा उपक्रम सुरू केला. स्वत:च्या मुलांना मिळणाऱ्या सृजनशील शिक्षणाचा व साधनांचा लाभ वंचित घटकातील मुलांनाही मिळावा ह्या प्रेरणेने तसेच त्या वस्तीतील मुलांच्या शिक्षणातील अडचणी व त्यांचे इतर प्रश्न यांनाही सामोरे जाण्यासाठी 'आनंदसंकुल' या वस्तीतील शिक्षणघराची सुरुवात झाली. आता हे काम चांगले विस्तारले आहे. कार्यकर्त्यांचा एक संचच तयार झाला आहे. सुनेत्रा गोखले, नीलिमा गावडे, नीला खरे, जयश्री देसाई ही काही नावे ह्या संदर्भात घेता येतील. झोपडपट्टीतील शाळेपासून नव्हे तर घर, पालक यांच्यापासून सुरुवात करून एकाच वस्तीतील का होईना पण मुलांच्या सर्वांगीण विकासाचा विचार व त्या अनुषंगाने कृती करणारा हा उपक्रम आहे.

ह्या उपक्रमाखाली मुलांच्या खेळांबरोबरच पालकांची सहल, गणित व विज्ञान विषयांचे शिबिर, मुलींचे स्वतंत्र शिबिर, मुलांसाठी अभ्यासवर्ग, अभ्यासिका, गणित वर्ग, इंग्रजी वर्ग, सामाजिक अध्ययन वर्ग असे अनेक उपक्रम राबविले जातात.

१९९०च्या सुमारास पुण्यात विद्या पटवर्धन ह्यांच्या पुढाकाराने शिक्षणात काही प्रयोग करू पाहणारा गट आकार घेत होता. प्रस्थापित प्राथमिक औपचारिक शिक्षणपद्धतीत हुकणाऱ्या काही गोष्टी, डावलला जाणारा बालमानसशास्त्राचा विचार, दुर्लक्षित राहणारी सृजनशीलता आणि पक्की होत जाणारी पठडी किंवा चाकोरी हे सर्व बदलायला हवे असे वाटणारी काही मंडळी एकत्र येत होती. १९९२ साली या गटातर्फे पुण्यात अशा विचारांची 'अक्षरनंदन' ही शाळा सुरू झाली. संजीवनी कुलकर्णी ह्यांनी या शाळेच्या उभारणीत सहभाग घेतला तेव्हापासून ते आत्तापर्यंतही शाळेच्या कार्यामध्ये आणि निर्णयप्रक्रियेमध्ये त्या सहभागी आहेत. सृजनात्मक

शिक्षणासंदर्भातील विचार, चर्चा नि प्रयोग ह्या प्रक्रियेला 'अक्षरनंदन'मुळे गती आली. 'अक्षरनंदन' उपक्रमात शिक्षणातील प्रत्यक्ष अनुभवांनी 'पालकनीती'ला अधिक समृद्ध केले.

लोकशाहीतील समन्यायी शिक्षणव्यवस्था व प्रायोगिकता ह्या परस्परविरोधी जाणाऱ्या गोष्टी नाहीत. जर शक्य असेल तर पालक स्वत:च्या मुलांना उत्तम शिक्षण देण्याचाच प्रयत्न करणार. प्रस्थापित रचनेत जर काही खटकत असेल तर ते दूर करण्याचा प्रयत्न करणार. त्यासाठी प्रयोग झाले पाहिजेत. फक्त ह्या प्रयोगातून जे पुढे येईल त्याचा लाभ मूठभर निवडक लोकांच्याच मुलांना न मिळता तो लाभ सार्वत्रिक झाला पाहिजे. आधुनिक काळातील उदार तत्त्वज्ञानाचे प्रसिद्ध भाष्यकार बर्ट्रांड रसेल आपल्या

'Postulates of Modern Educational Theory' ह्या निबंधात म्हणतात, 'The wise parent, at the present day, is likely to choose, if he can some method of education for his children which is not in fact universal, and for the sake of experiment it is desirable that parents should have the opportunity of trying new methods. But they ought to be such as could be made universal, if found to produce good result, not such as must from their very nature be confined to a privileged few.'

केवळ समन्यायी सार्वत्रिक शिक्षणाचा आग्रह धरला तर बहुदा दर्जाशी तडजोड होते. जर केवळ, प्रयोगशीलता दाखवून दर्जेदार प्रक्रिया शोधली पण ती सार्वत्रिक केली नाही तर सामाजिक न्याय लोप पावतो. त्यामुळेच शिक्षणातील प्रयोगशीलता जपत न्यायाचाही विचार करण्यासाठी 'पालकनीती'सारख्या उपक्रमांचे महत्त्व



आहे. हे काम करणाऱ्यांकडे एक पक्का विचार हवा, तसा तो 'पालकनीती'त दिसतो. बालकांच्या शिक्षणासंबंधी ह्या परिवाराची काही नवी सूत्रे असल्याचे जाणवते.

— मातृभाषा हेच शिक्षणाचे माध्यम असले पाहिजे.

— आमिष व शिक्षा ह्या प्राणीपातळीवरील शिक्षणप्रक्रियेतील गोष्टींना पूर्णत्वाने विसरता येत नसले तरी ह्या गोष्टी शिक्षणप्रक्रियेच्या मूलाधार होऊ शकत नाहीत. पाल्याशी पालकांचा, विद्यार्थ्यांशी शिक्षकाचा असलेला संवाद, नात्यातला विश्वास, आदर व प्रेम हे महत्त्वाचे.

— स्पर्धा ही विकासाला पूरक नसून तो एक मोठा अडथळा आहे.

— नैतिकतेच्या संकल्पना रूढी, परंपरा ह्यावर न सोडता बदलत्या जगाचे व अपरिहार्य अपेक्षांचे भान ठेवून त्या 'सत्यअसत्याशी मन केले ग्वाही' ह्या पद्धतीने ठरवाव्या.

— विद्यार्थीदशेतील मुलांच्या अभ्यासासाठी सर्व जबाबदाऱ्या ह्या त्यांच्या आहेत. ह्याचे भान त्यांना देऊन त्या पेलण्यासाठी सक्षम बनायला त्यांना सहाय्यभूत होणे हे आपले काम आहे.

— माणसामाणसातील फरक हा त्यांच्या त्यांच्या परिस्थितीतून तयार झालेला आहे तो जन्मजात नाही, हे समजून व्यक्तीचा आदर करणे व आत्मसन्मान ठेवणे हे महत्त्वाचे आहे.

— मूल म्हणजे मातीचा गोळा नाही. बीजरूपाने अनेक क्षमतांनी युक्त अशी ती व्यक्ती आहे. तिचा आदर केला पाहिजे. ही ती सूत्रे होत.

अशा ह्या 'पालकनीती' परिवाराला विशीच्या उंबरठ्यावर असताना 'महाराष्ट्र फाउण्डेशन'चा पुरस्कार मिळून पुढील वाटचालीसाठी एक हुरूप देणारी दमदार थाप त्यांच्या पाठीवर पडली आहे. त्यांचे मनापासून अभिनंदन!



## अखिल मानवजातीच्या आयडेंटिटीचा प्रश्न

# निब्बाण

### रवीन्द्र लाखे

तसं पाहिलं तर सूर्योदय आणि सूर्यास्त ह्या क्रमिक घटना आहेत. आणि त्या घटना ढोबळ आहेत. ह्या दोन ढोबळ घटनांच्या दरम्यान माणूस जगण्याची गुंतागुंत निर्माण करतो. त्याच घटनांच्या बाबतीत दुसरी नोंद अशी की अखिल मानवजातीच्या किंवा ह्या जगाच्या आयुष्यात Non-corrupt क्षण हे असे दोनच. माणसाचा जन्म आणि मृत्यूसुद्धा भ्रष्ट ठरू शकतो, भ्रष्टाचारी असू शकतो. पण सूर्य उगवणे आणि मावळणे ह्यात भेसळ होऊ शकत नाही. तसाच स्वच्छ ढोबळपणा अरुण मिरजकरांच्या लेखनात आहे. या पार्श्वभूमीवर मला 'निब्बाण'चे मराठी नाटकांमध्ये कुठले स्थान आहे, त्याचे Status काय हे मांडता येणार नाही, मांडायचे नाही. या म्हणण्याला परत पार्श्वभूमी अशी की मी यशस्वी महत्त्वाकांक्षी रंगकर्मी नाही की अरुण मिरजकरांचे 'निब्बाण' हे रंगभूमीवरचे यशस्वी नाटक नाही. यशस्वी असणे ही आजच्या काळाची गरज आहे. तुम्ही यशस्वी असलात तरच तुमच्या म्हणण्याला प्रतिष्ठा प्राप्त होते.

एक दिग्दर्शक म्हणून मला हे नाटक का आवडले ह्याचे उत्तर म्हणजे समस्त पुरोहितवर्गाच्या अधिपत्याखाली गुळमुळीत, गुळगुळीत झालेल्या प्रायोगिक नाटकांचा कंटाळा. सूक्ष्म अतिसूक्ष्म विचार, विकार, भावना वगैरे गुंताड्याची नाटके—त्याची चार भिंतीतली चर्चा वगैरेचा कंटाळा. म्हणजे कसं तर 'निब्बाण'चा प्रयोग पाहून माझा एक बंगाली मित्र एवढंच बोलला 'अे नाटक आमादेर मुक्तीर पॉथ देखिअेछे!' एवढंच. तर एकएकट्या माणसाची गोची त्याच्या मनातला गोंधळ, तो सोडविण्याचे त्याच्यापुरते उत्तर ह्यापेक्षा 'निब्बाण'मधून येणारा, समोर उभा ठाकणारा वर्तमानातील अखिल मानवजातीच्या आयडेंटिटीचा प्रश्न मला जास्त महत्त्वाचा वाटला. नाहीतरी एकएकट्या माणसाचे प्रश्न जास्त जटिल होण्याला कारण खरेतर तोच मूळ प्रश्न आहे. अशा वाटेने 'निब्बाण'कडे जाताना नव्या समीक्षापद्धतीने जन्म घेणे अटळ आहे. मी जातीने समीक्षक नसल्यामुळे ते जातीबाहेरचे काम मी करणे योग्य नव्हे. ते जातीतल्या माणसाने करणे अपेक्षित आहे.

आता 'निब्बाण' हे नाटक 'प्रायोगिक' का म्हणायचे? ह्या प्रश्नाच्या उत्तराची प्रस्तावना आधी मांडतो. १९७०-७२च्या दरम्यान 'घाशीराम कोतवाल'चे प्रयोग सुरू झाले. सुंदर प्रयोग! सगळंच सुंदर! फक्त त्याच्यावरचा वाद आणि त्यामुळे झालेले वादळ सुंदर नव्हते. पण ते नाटक पाहताना समाधान नाही झाले. मनात काहीतरी खटकत राहिले. त्यानंतर केव्हातरी गो. पु. देशपांडेंचे 'उध्वस्त धर्मशाळा' आले. ते पाहिले. त्यात सुंदर काही नव्हते. 'घाशीराम' पाहताना जसे खटकले तसे काही खटकले नाही. पण 'धर्मशाळा' पाहून आतून मोडायला झाले. माझ्या आत काहीतरी नवीन शिरले, आतल्या जुन्याची मोडतोड करणारे. तेव्हा माझ्या लक्षात आले की प्रायोगिक नाटक कुठले ह्याची माझी व्याख्या किंवा संकल्पना वेगळी आहे. आतून वेगळी असलेली नाटकेच मला प्रायोगिक वाटतात. बाहेरून वेगळी असलेली बरीच नाटके मराठी प्रायोगिक रंगभूमीला मिळाली. पण आतून प्रायोगिक असलेल्या नाटकांचा तेवढा बोलबाला नाही झाला. रंगकर्मी आणि प्रेक्षक ह्यांच्या मनाची प्रस्थापित/सुरक्षित जडणघडण मोडून पाडते ते प्रायोगिक नाटक. अशोक शहाणेंनी एकदा प्रायोगिक रंगभूमीचं श्राद्ध घालण्याची भाषा करताना श्याम मनोहरांबद्दल मात्र असं म्हटलंय की 'श्याम मनोहर



**अरुण मिरजकर**

**जन्म :** ७ मे १९७२

**कादंबरी**

फिरकी (२०००)

**नाटके**

द पिलर ऑफ सोशल डेमॉक्रसी (२००२)
जोती म्हणे (२००५)

**नाटके** (अप्रकाशित)

वाद
अंधारातली बाहुली
जस्ट फॉर डॉलर
निब्बाण
केसं

दाणदाण नाटकं लिहून आहे - नव्या जाणीवेनं होतील तेव्हा खरी!' 'नव्या जाणीवेनं' ह्या शब्दांच्या वापरातून शहाणे श्याम मनोहरांच्या नाटकातील आतल्या प्रयोगाचा निर्देश करतायत. श्याम मनोहर, चं. प्र. देशपांडे ह्यांची नाटके, एलकुंचवारांची नाटके, शफाअत खानचे 'भूमितीचा फार्स' किंवा जयंत पवारचे 'अधांतर', गो.पुं.ची सगळी नाटके, दिलीप जगतापचे 'एक अंडे फुटले' हे नाटक तसेच दत्ता भगत, प्रेमानंद गज्वींची नाटके नव्या जाणीवेनेच सादर व्हायला हवीत.

'निब्बाण'मध्ये असा आतला प्रयोग आहे. नीट भिडले तर मोडून पडायला व्हावे असे हे नाटक आहे. ते 'बोधी' नाटक आहे. 'बोधी' म्हणजे ज्ञान. नुसतं ज्ञान नव्हे. सम्यक ज्ञान. बोधी हा शब्द बुद्धाच्या तत्त्वज्ञानातला आहे. त्या अर्थाने मिरजकरांकडे फिलॉसॉफिकल मन आहे. 'निब्बाण' हे बदललेले नाव आहे. (आधी ह्या नाटकाचे नाव होते 'अस्वस्थ वर्तमान.' मिरजकरांशी चर्चा करून मी ते नाव बदलले) 'निब्बाण' म्हणजे निर्वाण. बुद्धाची निर्वाणाची कल्पना वेगळी आहे. कालातीत होऊन जगणे किंवा जिवंतपणी मुक्त होणे म्हणजे 'निब्बाण.' लोकांना कळावा, पोहोचावा अशा उद्देशाने हा गंभीर विषय मिरजकरांनी 'ढोबळ'पणे मांडलाय. पात्रांची नावे सरळसोट वर्तमान, भूतकाळ, भविष्य आणि परंपरा, आधुनिका अशी ठेवलीयत. वर्तमान अस्वस्थ आहे, अशांत आहे, अनेक समस्यांनी ग्रस्त आहे. वर्तमानाला वाटतेय की आपण काळ असूनही माणूस झालोय. तेव्हा या ग्रस्ततेतून सुटण्याचा उपाय शोधण्यासाठी त्याने भूतकाळ, भविष्यकाळ, परंपरा आणि आधुनिका ह्यांना बोलावलेय. भूतकाळ काही उदात्त ध्येयवादी महापुरुषांचे दाखले देऊन वर्तमानाला सुचवितो की ते महापुरुषही जगाच्या दुःखाने चिंताग्रस्त झालेले त्यावेळचे वर्तमानच एका अर्थाने. अशा दाखल्यांतून सिंधू संस्कृतीपासून ते ग्लोबल संस्कृतीपर्यंतच्या काळाचे पट नाटकातून स्पर्शिले जातात.



गौतमबुद्धापासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपर्यंतचे चार मसीहा फक्त सोयीसाठी मिरजकरांनी वापरलेयत.

गौतमबुद्धाची चिंतनयात्रा ज्या प्रसंगामुळे सुरू झाली तो flashback पद्धतीने रंगमंचावर दिसू लागतो. कल्पना अशी की भूतकाळ ते दर्शन वर्तमानाला घडवितो. सिद्धार्थ शाक्य गणाचा सदस्य असूनही, शाक्य आणि कोलियांच्या राज्याच्या सीमेवरील रोहिणी नदीच्या पाण्याच्या वापरावरील वादात/संघर्षात सिद्धार्थ युद्धाने हा प्रश्न सोडविण्याच्या विरोधात जातो. त्याला वाटते युद्ध हे कोणत्याही समस्येचे समाधान नाही. शत्रुत्वावर फक्त मैत्रीनेच विजय संपादन करता येतो. संघाच्याविरुद्ध गेला म्हणून तो स्वतः परिव्रज्या घेऊन देशत्याग करण्याची शिक्षा स्वीकारतो. इथून त्याची चिंतनयात्रा सुरू होते.

"या पुढचे महायुद्ध हे पाण्याच्या प्रश्नावरून होईल" अशा भाकिताच्या पार्श्वभूमीवर मिरजकरांनी केलेली वरील प्रसंगाची निवड ही त्यांच्या चिंतनशील मनाचे द्योतक वाटते. त्यांच्या चिंतनशील मनाची साक्ष पटवून देते. मी असं हे समीक्षकी थाटात 'निब्बाण'बद्दल लिहितोय, पण जास्त तसं लिहिता येत नाही. कारण आमचा लेखक तेवढा चलाख नाहीय. तो धाडकन वाक्य लिहून टाकतो. आणि ते भूतकाळ बोलतो. "त्याचा मार्ग कालमर्यादेच्या बंधनात न राहणारा होता. तो मार्ग आताही वर्तमानाला उपयोगी आहे." चमकदार भाषा म्हणजे काय हे जणू त्याला माहीतच नाही.

धाड धाड डायरेक्ट लिहितो लेखक. उदाहरणार्थ, "आधुनिकतेच्या घड्याळात काटेच नाहीत, भविष्य तसाच. परंपरेच्या घड्याळात सेकंद काटाच नाही. भूतकाळाचं अतिप्राचीन वाळूचं घड्याळ. किंवा परंपरा आठवड्यातले पाच दिवस डोळ्यावर पट्टी बांधून असते म्हणजे पाच दिवस ती अंध असते दोन दिवस ती डोळस असते." असं केवळ आशयाच्या ऊर्जेतून लिहीत असताना होणारी



मांडणीतली पंचाईतही हा लेखक झाकून ठेवत नाही. लपवत नाही. गौतमबुद्धाच्या वरील दृश्यांप्रमाणे पुढील चार दृश्येही गणिती पद्धतीने क्रमिक वाटावी अशी येतात. हे का? तर नाहीतरी त्या त्या काळातील जगण्याचा मार्ग दाखविणाऱ्या महापुरुषांना माणसाने ग्रेट मानून मंदिरात नाहीतर पाठ्यपुस्तकात ढकलून दिलेय. म्हणजे कसे की बुद्धाला ते जमले कारण तो ग्रेट होता. आपल्याला नाही जमणार. किंवा कसे जमणार वगैरे.

रक्तसंहाराच्या घटना पराक्रमाचा इतिहास म्हणून मिरविणाऱ्या माणसांच्या जगात बुद्धाच्या मार्गानं जाता येईल? वर्तमानाच्या ह्या प्रश्नाला उत्तर म्हणून थेट दुसरे दृश्य येते. कालानुक्रमे बुद्धानंतरचा मसीहा म्हणजे येशू ख्रिस्त. शांतीचा, क्षमाशीलतेचा संदेश देणाऱ्या येशूला राजसत्तेने क्रूसावर चढविले तो प्रसंग भूतकाळ वर्तमानाला दाखवतो. येशू देवाला प्रार्थना करतो. क्षमा कर, मला क्रूसावर चढवणाऱ्यांना क्षमा कर. क्रूस करणाऱ्या कारागिराला आणि कारागिरांना गुलाम करणाऱ्या सैतानाला क्षमा कर अगदी सर्वांना क्षमा कर. इथेही वर्तमान आजच्या माणसासारखा व्यक्त होतो. आज दुसऱ्यांसाठी क्रूसावर चढून कोण मरेल? कसे शक्य आहे सर्वांना क्षमा करणे ही अशी मानसिकता आज बहुसंख्य लोकांमध्ये आहे. मला काय त्याचे, ज्याचे तो पाहून घेईल, मी सुखी आहे आणि मी काही संत नाही.

भूतकाळ चिडतो, निघून जातो. मागोमाग भविष्य आणि आधुनिकाही निघून जातात. वर्तमानाबरोबर राहते ती परंपरा. बुद्धी थकली की माणूस परंपरेला शरण जातो. विचार हरवून

लेखकाने इथे वर्तमानकाळातील आखाती युद्धाचा दाखला दिलाय. परंपरा ह्या युद्धाची पाठराखण करताना दिसते. भूतकाळाच्या अनुपस्थितीत परंपरा वर्तमानाला जगन्नियंत्याचा आंधळा विश्वास देऊ पाहते. परंपरेचं वर्तमानावर प्रेम असणे हे, मिरजकर साध्या विधानाच्या पातळीवर भाषेत उतरवतात. परंपरा असेही म्हणते की माझे प्रेम स्वीकारले नाहीस तर मला जबरदस्तीही करता येते. "आजवर कितीतरी बलात्कार सहन केलेतच की तुझे", वर्तमानाच्या ह्या प्रतिक्रियेवर परंपरा म्हणते, "असे काय रे बोलतोस माझ्या राजा." प्रेमातल्या गुळगुळीत 'राजा' ह्या शब्दावरून वर्तमान विचारतो, "'राजा' क्रूसावर चढवून मारणारा, की फ्रेंचाच्या वस्तीत धिंगाणा घालून बॅस्टिलच्या तुरुंगात बंदिस्त करणारा, गिलोटिनवर शिरच्छेद करणारा की विद्या घेणाऱ्या शूद्राचे मस्तक उडवणारा? कोणता राजा?"



'प्रेमातला राजा' ह्या गुळगुळीत शब्दाची घृणा वाटावी किंवा 'राजा' ह्या शब्दाची घृणा वाटावी इतका तीव्र राग अत्याचार, अन्याय करणाऱ्यांच्या विषयी लेखकाच्या मनात आहे. तो राग व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य लेखक इथे बिनदिक्कत घेऊन टाकतो. ते स्वातंत्र्य घेण्यासाठी 'राजा' ह्या शब्दाचा एक सांकेतिक अर्थ मोडून टाकून, त्या शब्दाला तो अर्थाच्या दुसऱ्या सांकेतिक चौकटीत नेऊन ठेवतो. पण हीच त्याची शैली आहे असे नव्हे. शब्दांचे 'विरूपीकरण' करूनही त्याला हवा तो परिणाम तो साधतो. उदाहरणार्थ, 'कुलदैवतं' ह्या शब्दाच्याजागी 'कुलदगडं' हा शब्द तो वापरतो. आखाती युद्धामुळे भयभीत आणि असहाय होऊन वर्तमान परंपरेला शरण जातो. इथे मला आठवतो सर्वसामान्य माणूस जो त्याच्यावर आलेल्या संकटातून सुटण्याचे सगळे उपाय थकले की सत्यनारायणाची पूजा घालतो, नागनारायणबळी देतो, शांती, ग्रहशांती, लघुरुद्र वगैरे करतो. (सादरीकरणात मी परंपरेला कडकलक्ष्मी बनवलंय मात्र तिचा आसूड वर्तमानाच्या हातात दिलाय आणि तो स्वतःच्या शरीरावर त्वेषाने मारून घेतोय.)

सम्यक ज्ञानात पायाभूत जीवनमूल्यांचा आदर आणि त्यांच्यावरचा अढळ विश्वास अनुस्यूत आहे. प्रेम हे एक तसेच basic जीवनमूल्य आहे. त्याचेसुद्धा आधुनिकीकरण होतेय. प्रेमाच्या 'मॉड' संकल्पनांवर भाष्य करताना भविष्य ह्या पात्राच्या तोंडी मिरजकरांनी एक वाक्य टाकलेय ते 'प्रेमाच्या कल्पनाही बदलत असतात? काळानुरूप?' संपूर्ण नाटकभर भविष्याच्या क्रिया-प्रतिक्रिया innocent आहेत. मिरजकरांनी ह्या पात्राचा वापर सम्यक ज्ञानाची जाणीव करून देण्यासाठी केलाय. उदाहरणार्थ, प्रेम, लग्न वगैरेच्या आधुनिकतेबरोबरच्या वादात भविष्य निर्णायकपणे बोलतो—

"अगं, भविष्यात मी भविष्य असणार नाही. मलाही वर्तमान व्हावं लागेल."

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्याचा वेगळा वेगळा काळ मिरजकरांना मान्य नाही. सगळ्यांचा मिळून एक काळ असतो. ज्याचे तुकडे नाही पाडता येत. पुढच्या विज्ञाननिष्ठ अशा जगात माणसाला जेवणाची गरज भासणार नाही. एक टॅब्लेट घेतली की झाले जेवण. आधुनिकेचे हे स्वप्नरंजन ऐकून भविष्याला प्रश्न पडतो मग जिभेच्या चवीचं काय किंवा प्रगतीबरोबर प्रश्नपण वाढत असतील नाही असाही मूलभूत प्रश्न त्याला पडतो. जन्म घेण्याआधी एखाद्या गर्भाला प्रश्न पडावेत तसे सारे प्रश्न भविष्य उभे करीत राहतो.

अवघ्या चाळीस पृष्ठांच्या ह्या नाटकातून माणसाच्या जगण्यातल्या मूलभूत अशा सर्वच प्रश्नांना मिरजकरांनी ऐरणीवर घेतलंय. परंपरा समस्यामुक्तीचा मार्ग म्हणून वर्तमानाला कलेची आराधना करायला सांगते. सरळ कलेत मग्न व्हावे मग सारा निचरा होतो ताणाचा, हे सुचवतांना परंपरेच्या डोळ्यावर पट्टी नाहीय. ती डोळस आहे. अशा डोळस परंपरेला आधुनिकाही आनंदाने साथ देते. दोघी मिळून वर्तमानाला अंजिठ्याच्या



भित्तीचित्रावरील ॲना पॉवलावने रचलेला बॅले करून दाखवितात. स्वत:च्याच घरी भिक्षा मागून त्यागी होणाऱ्या राजकुमाराची जातककथा सादर करतात. बॅले पाहून वर्तमान म्हणतो, "खरं आहे. कला दु:खाचं विस्मरण करते." यावर भूतकाळ म्हणतो, "पण दु:खमुक्त करीत नाही. मग कलेचे प्रयोजन काय?", परंपरा म्हणते तू कलावादी आहेस म्हणून तुला रिलीफ मिळाला. पण वर्तमानाची मानसिकता अशी झालीय की

पिरॅमिडचे सौंदर्य दिसण्याआधी त्याला पिरॅमिड बांधणारे, ताजमहाल बांधणारे कामगार आणि हात तोडून टाकलेले कारागीरच दिसतात. लेखक ह्याच दरम्यान एकलव्याचा पण संदर्भ देऊन टाकतो. ('अंगठा कापून टाकलेला शिष्य.')

सगळ्या जीवनमूल्यांचाच ऱ्हास झालाय. भीक मागूनही शील, अब्रू, स्वातंत्र्य, करुणा, दया, बुद्धी, आरोग्य, मैत्रप्रेम, माणूसकी मिळत नाही माणसाला. कुणाकडे शिल्लक नाहीयत ती मूल्ये. भाकरी आणि पैशाची भीक मागणारे मात्र चैनीत आहेत. हे मांडण्यासाठी लेखकाने भिकाऱ्यांचे दृश्य लिहिलेय. आताच्या विश्वाची दैना कशी झालीय हे सांगताना वर्तमान या दृश्याचे वर्णन करतो.

सुटकेचा एकही मार्ग चोखाळायचे धैर्य वर्तमानाकडे नसल्यामुळे तो फक्त चिडतो, कावतो. भूतकाळ निघून जातो. सगळे निघून जातात. वर्तमान एकटा उरतो. दारू पितो. इथेही एकट्या वर्तमानाला परंपरा हेरते. त्याला सावरते. आता तिच्या डोळ्यावर पट्टी आहे. त्याला आस्तिकतेचा मार्ग दाखवते. त्याचवेळी आधुनिकाही तिथे येते. नास्तिकतेचा

पारखी मार्ग वर्तमानाला दाखविण्यासाठी. परंपरा आणि आधुनिका, तीच पात्रे पण त्यांच्यातला नवा कलगीतुरा लेखक इथे मांडतो. परंपरा माणसाच्या भौतिक प्रगतीवर हल्ला चढवते. आधुनिका परंपरेने दिलेल्या माणसाच्या धर्मांधतेवर हल्ला चढवते. लेखकाने इथे परंपरेला आंधळी तर आधुनिकेला मशीन म्हटलंय. परंपरा वर्तमानाला बंधनसंहिता देऊ पाहते. बंधनसंहिता हा शब्द मिरजकरांनी धर्म ह्या शब्दाऐवजी वापरलाय. कारण त्यांना धर्म म्हणजे साखळदंड किंवा गुलाम बनविणारी संस्था वाटते. धर्माचा, बंधनसंहितेचा गुलाम होण्यापासून परावृत्त करण्यासाठी भूतकाळ वर्तमानाला कार्ल मार्क्सचा विचारदाखला देतो. ह्या विचारदाखल्यातून धर्म ही एक अफूची गोळी आहे आणि ती अफू परंपरा आपल्याला देते आहे, हे वर्तमानाला कळते. परंपरा म्हणते, चिरंतन शांती हवी असेल तर बंधनसंहितेचा हा काढा तुला घ्यावाच लागेल. वर्तमान तयार होतो. आधुनिका त्याला परावृत्त करण्याचा प्रयत्न करते. त्यासाठी ती भूतकाळ आणि भविष्याची साथ मागते. ते साथ देत नाहीत. जो अंध परंपरेच्या अधीन झालाय, त्याला भूतकाळ भविष्यकाळ काय मदत करू शकणार. बंधनसंहितेचे किंवा धर्माचे हे विष अंगात भिनलं की पोटात भगव्या-हिरव्याचे भांडणे होतं. ६ डिसेंबर १९९२ ह्या दिवसाने केल्या तशा उलट्या होतात. असे सांगून आधुनिका वर्तमानाला सावध करू पाहते. वर्तमान सावध होऊ इच्छित नाही, हे पाहून आधुनिका वर्तमानाच्या हातातला

बंधनसंहितेच्या काढ्याचा ग्लास फेकून देते.

प्रत्येक विचारदाखल्याच्या आधी किंवा नंतर वर्तमानात थोडासुद्धा बदल दिसत नाही. किंवा लेखक जाणून बुजून थोडा थोडा बदल होतोय असे दाखवित नाही. नाटकाच्या सुरुवातीस जी त्याच्या मनाची अवस्था आहे तीच अखेरच्या विचारदाखल्याआधी आहे. त्याचा आजार मात्र खूप बळावलाय. वर्तमान सतत आजारी असणे – कितीही भौतिक प्रगती झाली तरी, हे एक सत्य आजही आपण अनुभवतो. आजचा वर्तमानही आजारी आहे. अखेरचा मसिहा मिरजकरांनी निवडलाय तो महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ज्याने बुद्धांचा मार्ग स्वीकारला. कारण त्यांना वाटत होते, माणसाला बंधनसंहितेची नाही तर जीवनसंहितेची गरज आहे. बंधनसंहिता आणि जीवनसंहिता! मिरजकरांनी केलेला या शब्दांचा परस्परविरोधी वापर खूपच अर्थपूर्ण आहे. बंधनसंहिता म्हणजे धर्म (हा शब्द मनुस्मृतीकडे निर्देश करतो) आणि जीवनसंहिता म्हणजे जीवन जगण्याची आदर्श शैली! (जीवनसंहिता हा शब्द बौद्ध तत्त्वज्ञानाकडे निर्देश करतो.)

बाबासाहेबांनी दु:खमुक्तीसाठी सांगितलेल्या जीवनसंहितेच्या मार्गाने वर्तमान सुखावतो. लक्षात येते ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकात गौतम बुद्धाने सांगितलेलाच हा मार्ग आहे. तो विसाव्या शतकापर्यंत टिकून आहे. त्याच्यातला आशावाद जागा होतो. तरी तो साशंक आहे. साऱ्या जगाला ह्या मार्गाने घेऊन जाता येईल? मिरजकरांनी इथे एक कटू सत्य मांडणारी भीती व्यक्त केलीय. बुद्धाच्या विचारांचेही मक्तेदार ठेकेदार तर निर्माण होणार नाहीत? तर ते होणार. ते स्वीकारतील सर्वांना? क्षणात वर्तमानाला वाटते की कोणी स्वीकारण्यावर अवलंबून नाहीय हा स्वत:च प्रकाश होण्याचा मार्ग! वर्तमानाच्या ह्या आकलनाबरोबरच, भूतकाळ भविष्य परंपरा आधुनिका एकत्र येतात. काळाचे तुकडे नष्ट होतात.

वर्तमानाला क्षितिजावर लाली दिसते. हा प्रकाश सूर्योदयाचा असो की सूर्यास्ताचा – त्याने वर्तमानाला फरक पडत नाही. सूर्योदय आणि सूर्यास्त त्याला सारखेच वाटतात. तो प्रसन्नपणे आकाशभर हात पसरतो आणि उत्स्फूर्तपणे उच्चारतो —

*'अत्त दीप भव'*



मूलत: ह्या नाटकाचा शेवट वरीलप्रमाणे नाहीय. वेगळा आहे. वर्तमानकाळ भूतकाळ होतो आणि भविष्यकाळ वर्तमानकाळ होतो आणि तसेच चक्र पुढे चालू राहते असा आहे. वर्तमानाला लेखकाने आकलनाच्या बिंदूवर आणून ठेवल्यानंतर हे असेच चक्र चालू राहणार असे सांगणे म्हणजे stock acting सारखा तद्दन stock प्रायोगिक शेवट वाटतो. हे असे चालायचेच अशी प्रतिक्रिया आजच्या माणसाची आहेच. कारण हे असे चालायचेच म्हणून, माणूस म्हणून जगतानाच्या जबाबदारीतून मोकळे होता येते. अंग काढून घेता येते. लेखकाशी चर्चा करून शेवट बदलला. तो बदललेला शेवट पाहून प्रेक्षकांची प्रतिक्रिया अशी आली की हे असे ह्या युगात बुद्धाच्या मार्गाने जाणे कसे शक्य आहे कुणाला? म्हणजे प्रेक्षक विचार करायला तरी तयार होतो.

आता 'निब्बाण' ह्या नाटकाच्या नावाविषयी. 'अत्त दीप भव'—स्वत: प्रकाशमान व्हा, असे सांगण्याआधी बुद्धाने पंचशील तत्त्वांसह काही तत्त्वांचे आचरण करण्यास सांगितले आहे. ही सर्व तत्त्वे जो पालन करतो तो विचार-विकार किंबहुना मनापासून मुक्त होतो. मन आणि त्याचे विचार-विकार ही काळाची अपत्ये आहेत. अशा मुक्त मानवाचे जुने कर्म क्षीण होते आणि नवे उत्पन्न होत नाही. असा मुक्त मानव भावी जन्माविषयी निरपेक्ष असतो. असा क्षीणबीज आणि उत्पत्तिच्छंदविरहित मुक्त मानव प्रदीपाप्रमाणे निर्वाण पावतो. 'निब्बाण' पावतो.

# व्यक्ती-समष्टी-धर्माची वाङ्‌मयीन अभिव्यक्ती म्हणजे साहित्य

**महाराष्ट्र फाउण्डेशनचा 'गौरव पुरस्कार' स्वीकारताना**
**रा. ग. जाधव यांनी केलेले भाषण**
**(३० डिसेंबर २००६, मुंबई)**

या समारंभाच्या व्यासपीठावरील सर्व मान्यवर व्यक्ती तसेच महाराष्ट्र फाउण्डेशनचे अध्यक्ष मा. सुनील देशमुख व इतर पदाधिकारी, आणि श्रोतृवर्गातील सर्व ज्येष्ठ-श्रेष्ठ बंधुभगिनी या सर्वांना मी प्रथम अभिवादन करतो. महाराष्ट्र फाउण्डेशनने मला पुरस्कार दिला. याबद्दल मी या प्रतिष्ठानास मनापासून धन्यवाद देतो. आपल्या समाजात ऋणत्रयाची (माता, पिता व आचार्य यांच्या ऋणाची) कल्पना आहे. त्या कल्पनेचा आधुनिक काळातील विस्तार म्हणजे सांस्कृतिक ऋणाची कल्पना होय. महाराष्ट्र फाउण्डेशन ही अशा सांस्कृतिक ऋणाचा विचार व आचार करणारी स्पृहणीय संस्था आहे. तिच्याविषयी एकूणच मराठी समाजाला आदर आहे व अभिमानही वाटतो.

मराठी साहित्याच्या क्षेत्रात मी गेली पन्नास वर्षे जिज्ञासू छात्रवृत्तीने वावरत आहे. कधी थेटपणे त्या क्षेत्रात, तर कधी त्याच्या परिघावर. मराठी वाङ्‌मयीन निर्मितीची गुणवत्ता आणि तिचा क्षेत्रीय अवकाश चित्तथरारक वेगाने वाढवत जाणाऱ्या गेल्या अर्धशतकाचा (सुमारे १९५० ते २०००) किमानपक्षी साक्षीदार होण्याचे भाग्य मला लाभले. एवढ्याही अर्थाने



कृतकृत्य झाल्यासारखे मला वाटते. महाराष्ट्र फाउण्डेशनचा हा पुरस्कार म्हणजे त्या सर्जनशील पन्नाशीला माझ्या निमित्ताने दिलेली दाद आहे, असे मी समजतो.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धानेच, म्हणजे त्यातील सर्जनशील उत्थानपर्वानेच मला अंशतः साहित्यिक व बव्हंशी समीक्षक म्हणून घडविले. त्या उत्थानपर्वाचे 'फोडिले भांडार/ धन्याचा हा माल' अशाच विनम्र भावाने मी माझ्या भल्याबुऱ्या वाङ्‌मयीन योगदानाकडे पाहतो. त्यावेळी माझ्यासारख्याला विनामूल्य प्रवेश देणारे एकमेव दालन हे साहित्याचेच होते. साहित्यक्षेत्राने मला जगण्याचे एक प्रयोजन दिले आणि मुक्तपणे जगण्यासाठी एक समांतर अशी पर्यायी सृष्टीही बहाल केली.

त्या उत्थानपर्वाचे व्यामिश्र आव्हान मला समग्रपणे पेलता आले नाही हे खरेच; तथापि समीक्षा आणि समीक्षक यांची जी एक व्यापक सांस्कृतिक भूमिका संभवते, त्या भूमिकेची तीव्र जाणीव मात्र त्या उत्थानपर्वाने करून दिली. समीक्षा हे एक स्वायत्त मूल्य आहे व समीक्षक ही एक मूल्यसंपन्न सांस्कृतिक भूमिका आहे, यांचे क्रियाशील आत्मभान माझ्यात उत्तरोत्तर अधिकाधिक दृढ करण्याचे कार्य त्या उत्थानपर्वाने केले. सकल साहित्यधर्मसमभाव असे काहीसे ते आत्मभान होते.

विविध आणि पुष्कळदा विरोधी अशा कलावादी-जीवनवादी प्रणालींनी आणि जीवनविषयक विचारप्रणालींनी विसाव्या शतकाचा उत्तरार्ध ढवळून निघत होता. बहुविध अस्मितांच्या व आकांक्षांच्या राजकारणी संघर्षात साहित्यक्षेत्र सापडले होते. या अवस्थेत उन्नत साहित्यदृष्टी व गंभीर जीवनदृष्टी यांचा जमेल तसा व तेवढा मेळ घालून मराठी साहित्याचे एक प्रातिनिधिक असे प्रजासत्ताक कसे निर्माण करता येईल, हा प्रश्न मलाही छळत होता. साहित्याचे प्रजासत्ताक हे साहित्य वाचणाऱ्या, पोसणाऱ्या व संवर्धन करणाऱ्या बहुस्तरीय समाजासाठी जसे

हवे, तसेच ते वाङ्मयीन गुणवत्तेला जोपासणारे, निर्मितीमधील साचेबंदपणा तथा वाङ्मयीन अभिरुचीचे एकारलेपण यांना रोखणारेही हवे, असे मला वाटत होते. माझी समीक्षा या दिशेने केलेली धडपड होती. हे खरे की, साहित्याचे प्रजासत्ताक हा एक धूसर आदर्श, त्याची पर्याप्त समीक्षा हा दुसरा व अधिक धूसर आदर्श आणि या दोन आदर्शांच्या आकाशपुष्पाचा शोध घेण्यासाठी धडपडत राहिलेली माझी भाबडी समीक्षा, असेच वर्णन माझ्याविषयी मला करावे लागेल.

साहित्याचा आद्य व अंतिम विषय इतिहासबद्ध व समाजबद्ध व्यक्ति-समूह-जीवनाचे मूल्यगर्भ चित्रण करणे, हाच आहे. लोकान्ती वावरून एकान्ती आचरण्याचा हा साहित्यधर्म आहे. मानवी जीवनाच्या भर अंगणात आणि प्रखर रणांगणात शिरून-वावरून, घोळून-पोळून, लढून-दमून पुन्हा एकान्तात जाऊन ताटी लावून घेणे आणि निर्मिती करणे, हेच त्या साहित्यधर्माचे स्वरूप आहे. बाहेरचे व आतले, दिसणारे व भावणारे, भौतिक व आत्मिक, समष्टीचे व व्यष्टीचे अशा वास्तव-अवास्तवात सर्जनशील संवेदनक्षमता गुंतविणे हेच साहित्यिकाचे इतिकर्तव्य असते.

लोकान्त आणि एकान्त या दोन चाकांवरच वाङ्मयीन निर्मितीचा रथ चालत असतो, धावत असतो व उभादेखील असतो. अशा व्यक्ति-समष्टि-धर्माची वाङ्मयीन अभिव्यक्ती म्हणजेच साहित्य होय.

या दुचाकीवरच ठामपणे आरूढ होऊन आपणास एकविसाव्या शतकातील नव-भांडवलशाही, जागतिकीकरण, इलेक्ट्रॉनिक क्रांती, दहशतवाद, भ्रष्टाचार यांसारख्या सगळ्या अपूर्व वास्तवाशी सर्जनशील नाते जोडता येईल. साहित्याला पेलणार नाही, उचलता येणार नाही असे शिवधनुष्य या जगात कधीही नव्हते, आजही नाही व उद्याही असणार नाही...!

साहित्य ही समाजातील व्यक्तीची, सौंदर्यमानवाची मिरास आहे. कोणतीही मनुष्यकृत निर्मिती सौंदर्यमूलकच असते; मग ती निर्मिती साहित्याची असो, ललित कलांची असो वा संस्था-संघटनांची असो. व्यक्तीशिवाय सौंदर्यनिर्मिती नाही आणि समष्टीशिवाय त्या सौंदर्याला समर्थनीयता नाही.

आज आपले संवेद्य जग क्रांतिकारक रीतीने व विलक्षण झपाट्याने बदलत आहे. नव्या अनोख्या वास्तवाशी संवेदनशीलता झगडत आहे, भिडत आहे. आपल्या परंपरागत राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक संरचनांना अभूतपूर्व आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. नवे जग, नवे वास्तव शाप की वरदान आहे, हे कळेनासे होत आहे. एकविसावे शतक हे मनुष्यसंस्कृतीच्या प्रदीर्घ इतिहासातील सर्वांत मोठे व कडवे आव्हान आहे.

—या संदर्भात साहित्य तथा ललितकला यांचे आज-उद्याचे अवतारकार्य कोणते? मला वाटते, हे अवतारकार्य एकविसाव्या शतकाचा न्यायनिवाडा करण्याचे नाही; तर इतिहासपुरुषाला तसा न्यायनिवाडा करण्यासाठी महत्त्वाची साक्ष देण्याचे आहे. पुरावा देण्याचे आहे. म्हणूनच आज-उद्याच्या कलावंतांनी—साहित्यिकांनी उदयोन्मुख वास्तवातील मानवी जिण्याचा, त्यातील अंत:कलहांचा व अंत:स्वरांचा सखोलपणे ठाव घेऊन मानवतेच्या बाजूने भक्कम पुरावा उभा केला पाहिजे; लखलखत्या जाज्वल्य साहित्यकृतींच्या रूपाने! आणि समीक्षेने अशा साहित्यकृतींचे साक्षीपण, त्यांचे महत्त्व प्रभावीपणे प्रस्थापित केले पाहिजे.

आज-उद्याच्या साहित्य-समीक्षेचे हे इतिहासप्राप्त इतिकर्तव्य आहे!




# गोरेगावकरांचा 'ट्रस्ट'

स्थित्यंतर हा कोणत्याही जिवंत समाजाचा गुणधर्म आहे. मुंबईसारख्या महानगरात तर या बदलांची गती विलक्षण असणे स्वाभाविक असते. परंतु या बदलांवर स्वार होत स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण ओळख जपणाऱ्या व्यक्ती वा संस्था ही त्या महानगराचीही ओळख बनतात. मुंबईच्या गोरेगाव या उपनगरातील 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट' ही अशीच एक संस्था. पन्नासाव्या वर्षात पदार्पण करताना, गोरेगावच्या सामाजिक-वैचारिक जीवनावर ठसा उमटवण्यात तिला आलेले यश वादातीत आहे.

केशव उर्फ बंडू गोरे या समाजवादी कार्यकर्त्याच्या अकाली निधनानंतर त्यांची प्रेरणा जागी ठेवण्यासाठी १९५८ साली त्यांच्या निकटच्या सहकाऱ्यांनी हा ट्रस्ट स्थापन केला. बंडू गोरे मूळचे पुण्याचे. स्वातंत्र्य आंदोलनात 'चले जाव चळवळी'च्या काळात भूमिगत असताना ते गोरेगावातील ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ते आबा करमरकर यांच्याकडे वास्तव्यासाठी होते. तुरुंगातून सुटल्यावर पुढे १९४८ साली ते करमरकर यांच्या टोपीवाला बंगल्यावर राहू लागले आणि गोरेगाव हेच त्यांचे कार्यक्षेत्र झाले. त्या वेळी गोरेगाव ही ग्रामपंचायत होती. प. बा. उर्फ बाबूराव सामंत हे तिचे सरपंच होते. बंडू गोरे, सामंत प्रभृतींनी समविचारी तरुण कार्यकर्त्यांचा गट बांधला होता. त्या सर्वांवर समाजवादी विचारांचा प्रभाव होता. विशेषतः डॉ. राममनोहर लोहिया, जयप्रकाश नारायण यांचे त्यांना आकर्षण होते.

त्यावेळी महाराष्ट्रात सक्रिय असलेले जे चार-दोनच गट होते, त्यात बंडू गोरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी बांधलेल्या या गटाचा समावेश होता. टोपीवाला बंगल्यात दर बुधवारी ६०-७० कार्यकर्ते जमायचे. येथे चर्चा तर चालायच्याच, पण कृतिकार्यक्रमही आखले जायचे. गावापासून देश-विदेशापर्यंतच्या घडामोडींची सखोल माहिती येथे करून घेतली जायची. डॉ. लोहिया, जेपी यासारख्यांनी दोन-तीन वेळा या चर्चांत सहभागी होऊन मार्गदर्शन केल्याची आठवण आजही त्यावेळचे कार्यकर्ते सांगतात.

त्यावेळी गोरेगावात कोणत्याच पक्षाचे फारसे राजकीय काम नव्हते. ती पोकळी समाजवादी गटाने भरून काढली. पुढे मुंबई महापालिकेत गोरेगावचा समावेश झाल्यावर नगरसेवक पदासाठी बंडू गोरे यांच्या पत्नी मृणाल गोरे यांना उभे करायचा निर्णय या गटाने घेतला. मृणालताईंना राजकीय कामात सक्रिय करण्यामागे बंडू गोरे यांचा मोठा वाटा होता. तळागाळापासून कामाला सुरुवात करायची म्हणून या गटाने ग्रामपंचायत व महापालिकेच्या स्तरावरील कामाला प्राधान्य दिले होते. गोरेगावात आपल्या राजकीय व सामाजिक कामाचा ठसा उमटवण्यात समाजवादी गटाला यश येऊ लागले असतानाच बंडू गोरे यांचे निधन झाले. त्यांची स्मृती अधिक अर्थपूर्ण रीतीने जपण्यासाठी त्यांचे निकटचे मित्र आबा करमरकर, बाबूराव सामंत प्रभृतींनी 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट' स्थापन करण्याचा निर्णय घेतला आणि १९५८ साली कुटुंबनियोजन केंद्रांच्या रूपाने ट्रस्टच्या कामाला सुरुवात झाली.

त्यावेळी गोरेगावची लोकवस्ती ६०-७० हजारांपर्यंत होती. पण गावात आरोग्यसेवेचा अभाव होता. अगदी खाजगी आरोग्यसेवेचाही. त्यावेळी ट्रस्टकडे स्वतःची जागा नव्हती. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या आरोग्यकेंद्रातच ट्रस्टच्या कुटुंबनियोजन केंद्राचे काम सुरू करण्यात आले. मृणालताईंच्या दोघी बहिणी डॉक्टर होत्या. त्यांच्या मदतीने हे केंद्र चालविले जाई. त्या काळात

कुटुंबनियोजन केंद्र चालवण्याची कल्पना आगळीवेगळीच होती. कदाचित मुंबईतील हे पहिलेच केंद्र असावे, असे ट्रस्टचे कार्यकर्ते अभिमानाने सांगतात.

ट्रस्टला स्वतःची जागा मिळाली, ती त्यानंतर तीन-चार वर्षांनी. 'अंबाबाई मंदिर ट्रस्ट'च्या मालकीच्या जागेतून छोटा भूखंड ट्रस्टला माफक भाडेतत्त्वावर मिळाला. वास्तविक ट्रस्टच्या काही हितचिंतकांकडे स्वतःच एखादी जागा विकत घेऊन त्यावर ट्रस्टचे काम सुरू करण्याइतकी आर्थिक क्षमता आणि बांधीलकी जरूर होती, पण लोकसहभागातूनच काम उभे करायचे असा संकल्प असल्यामुळे, गावातून निधी गोळा करण्यात आला आणि मिळालेल्या जागेवर दोन खोल्या बांधून त्यात आरोग्यकेंद्र हलविण्यात आले.

सुरुवातीला केवळ तज्ज्ञ डॉक्टरांकडून सेवा उपलब्ध करून दिली जात होती. समाजवादी चळवळीला वाहून घेण्यासाठी मृणालताईंनी वैद्यकीय शिक्षण अर्धवट सोडले होते. त्यांना त्यावेळी शिकवणाऱ्या अनेक नामवंत डॉक्टरांनी या केंद्रासाठी स्वतःची सेवा विनामूल्य दिली. मृणालताई व अन्य कार्यकर्ते अनेक वर्षे केसपेपर्स तयार करण्यासारखी कामे करीत. पैशांचा मोठा आधार नसला, तरी काम उभे राहू शकते, हे दाखवून देण्यात त्यांना यश आले. केवळ केसपेपर काढण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या अत्यल्प दरात नामवंत डॉक्टर्सचे मार्गदर्शन उपलब्ध असल्यामुळे, केंद्राची विश्वासार्हता आणि लोकांमधील मान्यता वाढू लागली. गरिबांनाच नव्हे, तर महापालिका वा

आरोग्यसेवेपासून दूर राहणाऱ्या मध्यमवर्गीयांनाही या आरोग्यकेंद्राचा मोठाच आधार वाटू लागला. ट्रस्टचे नाव झाले आणि अधिक बांधकाम करायचे ठरविले, तेव्हा लोकांनी भरभरून पैसे दिले.

आज या वैद्यकीय सेवेचा चांगलाच विस्तार झाला आहे. पूर्णवेळ दंतविभाग हे या सेवेचे वैशिष्ट्य आहे. ॲलोपॅथीच्या सर्व शाखा आणि होमिओपॅथी यांचे उपचार येथे उपलब्ध आहेत. आरोग्यसेवेसारख्या सामान्यांसाठीच्या सामाजिक

माध्यम ठरावे, अशीच ट्रस्टीची अपेक्षा होती आणि आहे. साहजिकच त्या दृष्टीने अनेक उपक्रम राबवले जात आहेत.

केशव गोरे स्मृतिव्याख्यानाचा उपक्रम सन १९६६पासून दरवर्षी २ फेब्रुवारीला अव्याहतपणे चालू आहे. अपवाद फक्त १९७६ सालचा. त्यावेळी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी लादलेल्या आणीबाणीच्या विरोधात लढणाऱ्या गोरेगावातील अनेक समाजवादी कार्यकर्त्यांना सरकारने तुरुंगात डांबले होते. त्यात



सुरक्षायोजनांवरील सरकारी खर्चाच्या प्रमाणात कपात होत असताना आणि खाजगी आरोग्यसेवा आवाक्याबाहेर जात असताना, या वैद्यकीय सेवेमुळे गरीब व मध्यमवर्गाच्या दैनंदिन आयुष्यात ट्रस्टने आपुलकीचे स्थान मिळवले आहे.

प्रबोधन हे ट्रस्टच्या स्थापनेमागील एक महत्त्वाचे उद्दिष्ट होते. किंबहुना समाजाच्या काळानुरूप जडणघडणीला पोषक ठरेल अशा वैचारिक चळवळीला गती देण्याचे ट्रस्ट हे एक

केशव गोरे स्मारक ट्रस्टच्या विश्वस्तांचा व कार्यकर्त्यांचाही समावेश होता. त्या वर्षी या व्याख्यानाला सरकारनेच परवानगी नाकारली होती. सन १९६६पासून चालू असलेली ही व्याख्यानमाला हा एक प्रकारचा ज्ञानयज्ञच असून, ग. प्र. प्रधान, एस. एम. जोशी, मधु लिमये, लक्ष्मणशास्त्री जोशी, डॉ. पु. ग. सहस्रबुध्दे, न्या. विद्यारण्य तुळजापूरकर, न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, न्या. पी. बी. सावंत, डॉ. सत्यरंजन साठे, अनंतराव भालेराव, विजय तेंडुलकर, डॉ. य.दि.

फडके, डॉ. आ. ह. साळुंखे अशा विविध क्षेत्रांतील अनेक ज्येष्ठ अभ्यासकांनी त्यात विचार मांडले आहेत. याखेरीज सावित्रीबाई फुले व्याख्यानमाला व अन्य चर्चासत्रांच्या माध्यमातून त्या त्या वेळी समाजात चर्चायोग्य असलेल्या घटनांचा सर्वांगाने वेध घेण्याचा प्रयत्न केला जात असतो.

अमेरिकेतील सुनील देशमुख यांच्या प्रमुख देणगीतून महाराष्ट्र फाउण्डेशनतर्फे गेली काही वर्षे सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना पुरस्कार दिले जातात. विचाराने सेक्युलर आणि परिवर्तनवादी या निकषांना उतरणाऱ्या संस्था व कार्यकर्त्यांचा त्यासाठी विचार केला जातो. शिवाय साहित्यक्षेत्रासाठी स्वतंत्र पुरस्कार दिले जातात. ट्रस्टच्या उद्दिष्टांना फाउण्डेशनचे पुरस्काराचे निकष हे पूरक असल्यामुळे, पुरस्कारासाठी निवडीची जबाबदारी ट्रस्टने स्वीकारली. महाराष्ट्राच्या दुर्गम भागात तळमळीने काम करणाऱ्या, पण प्रसारमाध्यमांतील महानगरकेंद्री पत्रकारितेकडून उपेक्षित राहिल्यामुळे लोकांनाही माहीत नसलेल्या अनेक कार्यकर्त्यांना पुरस्कार देऊन त्यांच्या कामाविषयी समाजाच्या वतीने कृतज्ञतेची पावती देण्यात ट्रस्ट महत्त्वाची भूमिका निभावत आहे.

प्रबोधनाशीच निगडित कामाचा भाग म्हणून कायमस्वरूपी ग्रंथालय चालवण्याबरोबरच, संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि सोविएत युनियनमधील गोर्बाचेवप्रणीत परिवर्तन, यांच्या दस्तावेजीकरणाचा उल्लेख करता येईल. ट्रस्टचे दिवंगत कार्यकर्ते मुकुंद जोगळेकर आणि माधव साठे यांनी परिश्रमपूर्वक केलेल्या या कात्रणांच्या संग्रहाचे प्रदर्शन ट्रस्टने भरवले होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या अभ्यासकासाठी एवढे संदर्भमूल्य असलेले दस्तावेज एकत्रितपणे क्वचितच अन्यत्र उपलब्ध असतील, असा ट्रस्टच्या विश्वस्तांचा दावा आहे. ग्रंथालयात संदर्भ ग्रंथ, घरी नेण्यासाठी ललित तसेच वैचारिक पुस्तके आणि वृत्तपत्रे उपलब्ध असतात. ग्रंथालयाला सरकारी अनुदान मिळते.



समाजातील सर्व घटकांशी जोडून घेण्याची दृष्टी ट्रस्टच्या कामांत दिसते. सामान्य आर्थिक स्तरांतील विद्यार्थ्यांना शांतपणे अभ्यास करण्यासाठी महानगरांत असलेल्या जागेच्या अभावाची दखल घेत, अभ्यासिकेची चालू केलेली योजना हे असेच एक काम. अभ्यासिका सकाळी आठ ते रात्री बारापर्यंत खुली असते. इंग्रजीतून संभाषणाचा सराव, कम्प्युटरची ओळख, करिअर मार्गदर्शन, त्यासाठीच्या संधीचा लाभ घेण्याच्या स्पर्धेत उतरता यावे यासाठी परवडणाऱ्या दरात प्रशिक्षण देणारे कोर्सेस, ही आजच्या विद्यार्थ्यांची गरज ओळखून काही प्रमाणात ती भागवण्याचा प्रयत्न ट्रस्ट करतो.

ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्रांसाठी अनेक ठिकाणी घालावे लागणारे खेटे आणि तेथील भ्रष्टाचारामुळे होणारा मनस्ताप टाळण्यासाठी २००४ पासून, ओळखपत्र देण्याचे काम ट्रस्टतर्फे केले जाते. एकाच ठिकाणी ओळखपत्रासाठी आवश्यक ती सर्व प्रकिया होत असल्यामुळे, ज्येष्ठ नागरिकांची मोठीच सोय झाली आहे. आजवर चार हजारांवर नागरिकांनी याचा फायदा घेतला आहे. स्त्रियांसाठी मदतीपासून संघर्षापर्यंत सर्व मार्गांनी कार्यरत असलेल्या 'स्वाधार' या संस्थेचे काम स्वतंत्रपणे ट्रस्टच्याच इमारतीतून चालते.

वस्तीपातळीवरील कामाचेही प्रयोग ट्रस्टने गेल्या चार-पाच वर्षांत सुरू केले आहेत. एका फ्रेंच स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने राबविला जाणारा 'कुटुंब विकास कार्यक्रम' हा त्यापैकी एक. सुमारे ४०० कुटुंबांना त्याचा लाभ होत आहे. बालसंगोपन, कुपोषण रोखणे यासाठी जाणीव जागृतीचे, सरकारी योजनांची माहिती देऊन त्याचे

लाभ घेण्यास मदत करण्याचे काम वस्तीत जाऊन केले जाते.

असाच दुसरा कार्यक्रम राबविला जातो, तो गोरेगावच्या महापालिका शाळेतील मुलांची गळती रोखण्याचा. ट्रस्टच्या कल्पनेतून आणि 'बॉम्बे कम्युनिटी ट्रस्ट'च्या मदतीने साकार झालेल्या या योजनेत पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांवर भर दिला जातो. ही मुले शाळेत का जात नाहीत, याची कारणे त्यांच्या व त्यांच्या पालकांच्या संपर्कात राहून शोधून काढणे, त्यावर उत्तरे शोधण्यास मदत करणे, त्यांच्या अभ्यासात वेगवेगळ्या कारणांमुळे येणारे अडथळे दूर करणे, अशी कामे घरोघरी जाऊन केली जातात. मुलांच्या शाळा गळतीचे प्रमाण कमी करण्यात या कार्यक्रमाला यश आले आहे. ट्रस्टच्या दोन वर्षांपूर्वी सुरू झालेल्या 'प्रा. सुहास गोळे भाषा शिक्षण केंद्रा'चाही भर या शाळांतील इंग्रजी शिक्षणाचा स्तर उंचावणे हाच आहे. मराठी माध्यमात पहिलीपासून इंग्रजी सक्तीचे केल्यानंतर, प्राथमिक शाळांतील शिक्षकांना इंग्रजीचे प्रशिक्षण या केंद्रातर्फे दिले जाते.

पन्नाशीतील पदार्पणाच्या निमित्ताने दोन नवे उपक्रम ट्रस्ट हाती घेऊ पाहत आहे. एक कार्यकर्ता प्रशिक्षणाचा आणि दुसरा पत्रकारांच्या प्रशिक्षणाचा. अलीकडच्या काळात व्यावसायिक समाज कार्यकर्त्यांची संख्या वाढते आहे. अनेक बिगरसरकारी संस्था (एनजीओ) कार्यरत आहेत. मात्र त्यातील बहुसंख्य कार्यकर्त्यांत व्यावसायिकता असली, तरी समग्र दृष्टीचा अभाव असल्याचे जाणवू लागले आहे. कोणत्या वैचारिक बैठकीतून हे काम करावे, याचे मार्गदर्शन या प्रशिक्षणातून बाणविण्याचा ट्रस्टचा इरादा आहे. भूमिका घेणारे कार्यकर्ते तयार करणे, हे त्यामागील उद्दिष्ट असणार आहे. पत्रकारितेत नव्याने येणाऱ्यांच्या बाबतीतही माहितीचा, विविध सामाजिक-राजकीय-आर्थिक घडामोडीमागील कार्यकारणभाव जाणून घेण्याविषयीच्या कुतूहलाचा अभाव जाणवतो. त्यामुळेच प्रशिक्षण अभ्यासक्रमाची योजना आखली जात आहे.

सर्वस्पर्शी अशा कामांमुळे असेल, पाळते व मदत करणाऱ्या हितचिंतकांविषयीचे उत्तरदायित्वही मान्य करते.

ट्रस्टीची स्वतःची अशी व्यापक व ठाम राजकीय विचारधारा असूनही, ट्रस्टच्या गेल्या अर्धशतकातील कामाचे स्वरूप मात्र पक्षीय राजकारणापासून अलिप्त असेच राहिले आहे. ट्रस्टींपैकी काहींच्या राजकीय पक्षांची लोकमान्यता काळानुसार कमी-जास्त झाली, पण ट्रस्टच्या विविध कामांचे क्षेत्र विस्तारतच राहिले आणि समाजाच्या सर्व स्तरांतील नागरिकांत या कामांची




ट्रस्टला आर्थिक चणचण फारशी जाणवली नाही. राजकारणामुळे महापालिकेचे अनुदान बंद झाले, तरी संस्थेने मिळवलेल्या 'गुडविल'मुळे गरज लागली तेव्हा लोकांनी तर पैसे दिलेच, शिवाय मृणालताईंना साठाव्या वाढदिवसानिमित्त मिळालेली २७.५ लाखांची थैलीही त्यांनी ट्रस्टलाच दिली. कायद्याने बंधनकारक नसतानाही ट्रस्टच्या हिशेबतपासणीचा तपशील दरवर्षी हितचिंतकांना देऊन, ट्रस्ट आर्थिक पारदर्शकतेचे तत्त्व

विश्वासार्हता आणि त्यांचा आपलेपणाचा सहभागही वाढत गेला. त्यामुळेच कार्यविस्ताराच्या नवनव्या योजना आखून त्या यशस्वीपणे राबविण्याचा विश्वास आणि उमेद पन्नासाव्या वर्षात पदार्पण करताना ट्रस्टींना वाटते आहे. त्यांना त्यात यश येवो अशीच गोरेगावकरांची सदिच्छा राहील.

**- सतीश कामत**

# महाराष्ट्र फाउण्डेशन

चैतन्याची फुलवा झाडे, द्या जगण्याला अर्थ नवा
अडले पडले उचला, ज्यांना आधाराचा हात हवा

— दिलीप वि. चित्रे

'महाराष्ट्र फाउण्डेशन' ही अमेरिकेतील मराठी माणसांची संस्था आहे. १९७८ साली या संस्थेची स्थापना झाली. समाजसेवेची भावना ही या संस्थेच्या स्थापनेमागील प्रेरणा आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्यांचे निवारण करून त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न ही संस्था गेली एकोणतीस वर्षे करीत आहे.

आदिवासींमध्ये शिक्षणप्रसार, अपंगांचे पुनर्वसन, गावातील आरोग्यसेवेची सुधारणा, शेतीतील उत्पादनवाढीचे प्रयोग यांसारखे समाजोपयोगी उपक्रम करणाऱ्या ध्येयवादी संस्थांना आर्थिक व श्रमदानाचे साहाय्य 'महाराष्ट्र फाउण्डेशन' या संस्थेद्वारे होत असते.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने भारतातील सातशे पन्नासहून अधिक गरजू मुलांना आर्थिक साहाय्य केले आहे; सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्रातील बारा गावे दत्तक घेतली आहेत; जनकल्याण रक्तपेढीमार्फत महाड येथे 'एड्स चिकित्सा प्रयोगशाळा' स्थापन केली आहे. 'पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन'साठी एक रुग्णवाहिका घेऊन दिली आहे. महाराष्ट्रातील भूकंपग्रस्तांसाठी पाच लक्ष डॉलर्सचे, तर गुजरातमधील भूकंपग्रस्तांसाठी सव्वा लक्ष डॉलर्सचे साहाय्य केले आहे.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने स्त्रियांचे सबलीकरण, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आदी क्षेत्रांत काम करणाऱ्या साठ स्वयंसेवी संस्थांना ६ लक्ष ८० हजार डॉलर्सच्या देणग्या दिल्या. याव्यतिरिक्त डिसेंबर २००४ मधील त्सुनामीची आपत्ती आणि जुलै २००५ मधला महाराष्ट्रातला पूर या दुःखद घटनांतील संकटग्रस्तांसाठी 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने तातडीने ७३ हजार डॉलर्सची रक्कम उभी केली. 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने 'भारत-वैद्य' (अनवाणी डॉक्टर) व 'मैत्रीण' हे दोन नवे प्रकल्पही गेल्या वर्षी हाती घेतले, तर 'समाज परिवर्तनासाठी माहिती तंत्रज्ञान' हा 'फाउण्डेशन'चा प्रकल्प आता दुसऱ्या टप्प्यात प्रवेश करत आहे. एक गाव - एक संगणक हा या प्रकल्पाचा पहिला टप्पा होता व त्याद्वारे आजपर्यंत ५९ खेड्यांना त्याचा लाभ मिळवून देण्यात आला आहे.

अशा रीतीने आजवर भारतातील चारशेहून अधिक संस्थांना ८७ लक्ष डॉलर्सहून अधिक रकमांच्या देणग्या दिल्या गेल्या आहेत. येत्या वर्षासाठी 'महाराष्ट्र फाउण्डेशन' पुढील प्रकल्प हाती घेत आहे : (१) मानवी अपव्यापाराचे नियंत्रण : भारतात या तऱ्हेच्या अपव्यापारातून दरवर्षी हजारो स्त्रिया वेश्याव्यवसायात आणल्या जात आहेत. त्यांतील ४०% प्रमाण १८ वर्षांखालील मुलींचे आहे. हा अपव्यापार थांबवण्यासाठी विविध उपायांचा अवलंब करणे व या व्यवसायातून बाहेर येणाऱ्या मुली/स्त्रियांचे पुनर्वसन करणे या हेतूने हा प्रकल्प योजला आहे. (२) बालिका-विवाह नियंत्रण : लातूरच्या 'ग्रामीण विकास लोकसंस्थे'च्या सहकार्याने १३ ते १६ वयोगटातील मुलींचा विवाह लावण्यास प्रतिबंध करणारा प्रकल्पही या वर्षी सुरू केला जात आहे. (३) निराधार महिला पुनर्वसन/ज्येष्ठ नागरिकांना काळजीवाहू सहकारी : या दुहेरी प्रकल्पातून निराधार परंतु सक्षम महिलांना एकाकी ज्येष्ठ नागरिकांसोबत राहून त्यांना साथ देणे व त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे यासाठी प्रशिक्षण देण्यात येईल. पर्यायाने दोन्ही घटकांना त्याचा लाभ होईल.

विशेष अभिमानाची बाब म्हणजे या सर्व कामाची दखल घेऊन 'संयुक्त राष्ट्रसंघा'ने 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ला Special Consultative Status हा विशेष दर्जा दिला आहे. यामुळे 'फाउण्डेशन'ला संयुक्त राष्ट्रसंघाने आयोजित केलेल्या स्वयंसेवी संघटनांच्या परिषदांना सल्लागार म्हणून उपस्थित राहता येणार आहे.

*Invest in future*
*of those*
*with no future...*
*So they can reinvest*

हे 'महाराष्ट्र फाउण्डेशन'चे घोषवाक्य आहे.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ला अभिप्रेत असणाऱ्या या समाज-परिवर्तनाचा वसा घेतलेल्या अनेक व्यक्ती व संस्था महाराष्ट्रात सतत कार्यरत आहेत. अशा संस्था व व्यक्ती यांच्या कार्याबद्दल वाटत असलेली कृतज्ञता अल्पांशाने का होईना, व्यक्त व्हावी या हेतूने श्री. सुनील देशमुख यांच्या पुढाकाराने १९९६ साली सुरू केलेली समाजकार्य पुरस्कार योजना या वर्षी बाराव्या वर्षात प्रवेश करत आहे.

समाजाच्या सांस्कृतिक विकासात व समाजाच्या घडणीत साहित्य व साहित्यिक यांचा मोठा वाटा असतो. मराठी साहित्यिक व साहित्य यांचे हे ऋण अल्पांशाने फेडावे, या भावनेने 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने १९९४ साली सुरू केलेली 'मराठी साहित्य पुरस्कार योजना' या वर्षी चौदाव्या वर्षात पदार्पण करत आहे.

# महाराष्ट्र फाउण्डेशन
## मराठी साहित्य पुरस्कार योजना २००७
## निवड सल्लागार समिती

(भारत)

२९६५



प्रा. चंद्रकांत केळकर



सतीश काळसेकर



दत्ता भगत



अर्जुन डांगळे



नंदा खरे



राजन गवस



पुष्पा भावे



डॉ. रोहिणी तुकदेव



जयंत पवार

# महाराष्ट्र फाउण्डेशन
# मराठी साहित्य पुरस्कार योजना २००७
## निवड / सल्लागार समिती
(अमेरिका)



**सुनील देशमुख**



**दिलीप वि. चित्रे**
वास्तुविशारद, 'हिमगंध' हा कवितासंग्रह, 'ऐलतीरावर' व 'स्वर हे पश्चिमरंगी' या गीतांच्या दोन ध्वनिमुद्रिका. 'अलिबाबाची गुहा' हे दोन अंकी संगीतप्रधान नाटक. 'कुंपणापलीकडले शेत' या प्रातिनिधिक कथासंग्रहाचे जनक. 'कशासाठी कुणासाठी' या पुस्तकाचे संपादन व पुनर्लेखन



**राजन गडकरी**
'लीझार्ट' या वित्तसंस्थेतून अर्थविश्लेषक म्हणून निवृत्त. ललित व वैचारिक साहित्यात मनापासून रस



**रजनी शेंदुरे**
रा. शं. दातार नाट्य पुरस्काराच्या प्रवर्तक. या नाट्य पुरस्कारासाठी अमेरिकेतील निवड/सल्लागार समितीचेही काम पाहतात. शिवाय 'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या माध्यमातून ग्रामीण व शहरातील मागास भागातील गरजू विद्यार्थ्यांसाठी मदत कार्य



**विद्युल्लेखा अकलूजकर**
प्राध्यापिका, 'मेरा जूता है जपानी', आणि 'यथा काष्ठं च काष्ठं च', 'मेपलची पाने', 'कहाणी' अशी चार स्वतंत्र पुस्तके. आजीच्या सुपातील मोती *(गोमंतकीय म्हणींचा कथारूप परिचय)*, 'विदेशिनी' *(एकता त्रैमासिकातील बक्षिसपात्र कथांचा संग्रह)* ही संपादने. 'एकता' *(टोरांटो)* या त्रैमासिकाचे दीर्घकाळ सहसंपादन. 'शब्दवेध' हे 'साप्ताहिक सकाळ'मधील 'भाषावेध' सदराचे संकलन पुस्तकरूपाने प्रकाशित

# मराठी साहित्य पुरस्कार योजना २००७

'महाराष्ट्र फाउण्डेशन' ही अमेरिकेतील मराठी माणसांची संस्था आहे. १९७८ साली या संस्थेची स्थापना झाली. समाजसेवेची भावना ही या संस्थेच्या स्थापनेमागील प्रेरणा आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्यांचे निवारण करून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न ही संस्था गेली एकोणतीस वर्षे करीत आहे.

श्री. सुनील देशमुख, कनेक्टिकट यू.एस.ए. ह्यांच्या एक कोटी रुपयांच्या उदार देणगीमधून प्रगतिशील मराठी साहित्याला प्रोत्साहन देणारी, मराठी साहित्य व साहित्यिक यांच्यासाठी प्रतिवर्षी सुमारे दहा लक्ष रुपयांचा विनियोग करण्याची एक योजना १९९४ साली कार्यान्वित करण्यात आली. भारताच्या वैचारिक नेतृत्वात मराठी विचारवंतांचा व साहित्यिकांचा सिंहाचा वाटा आहे. तेराव्या शतकातील संतसाहित्यापासून सुरू झालेली ही परंपरा आधुनिक काळात लोकहितवादी, महात्मा फुले, महर्षी शिंदे, न्यायमूर्ती रानडे, टिळक, आगरकर, राजवाडे, कर्वे, आंबेडकर यांसारख्या विचारवंतांनी टिकविली आहे. ही सामाजिक व प्रगतिशील वैचारिक परंपरा साहित्याच्या माध्यमातून अशीच पुढे चालू राहावी आणि तिची कृतज्ञतापूर्वक नोंद घ्यावी, हा या योजनेमागील हेतू आहे.

पहिली चार वर्षे या उपक्रमाचे आयोजन मुंबईतील 'अभिनव शिक्षण प्रसारक मंडळा'च्या 'अभिनव भाषाभ्यास केंद्रा'मार्फत करण्यात आले होते. आता या उपक्रमाचे आयोजन मुंबईतील 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'मार्फत करण्यात येते. या आधी प्रा. दिगंबर पाध्ये हे या आयोजनाचे सूत्रधार होते. तर २००४ सालापासून श्री. सतीश काळसेकर यांनी सूत्रे स्वीकारली आहेत. या उपक्रमातील 'गौरव पुरस्कार' व 'ग्रंथ पुरस्कार' यांसाठी महाराष्ट्रातील विचारवंत, समीक्षक व चोखंदळ वाचक यांच्याकडून त्यांच्या पसंतीची नावे प्रथम मागविली जातात. आलेल्या नावांमधून पुरस्कारासाठी योग्य नावांची शिफारस करण्याचे काम 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ने येथे नियुक्त केलेल्या तज्ज्ञांच्या समितीकडून केले जाते. महाराष्ट्रातून केलेल्या शिफारशींचा विचार करण्यासाठी अमेरिकेतही एक समिती नेमण्यात आली आहे व ही समिती भारतातील 'निवड समिती'च्या शिफारशींच्या आधारे योग्य व्यक्ती, पुस्तके इत्यादींची पुरस्कारांसाठी निवड करते. एखाद्या वर्षात गौरव पुरस्कार/ पारितोषिके वा अनुदाने यांच्यासाठी योग्य व्यक्ती वा पुस्तके नसल्यास त्या रकमेचा विनियोग भाषा, साहित्य व साहित्यिक यांसाठी कसा करावा हे त्या वेळी ठरविण्यात येते.

## १. महाराष्ट्र फाउण्डेशन गौरव पुरस्कार

मराठी ललित किंवा वैचारिक साहित्याच्या क्षेत्रांत आपल्या आयुष्यभराच्या कार्याने मोलाची भर घालणाऱ्या साहित्यिकाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्याचा गौरव करण्यासाठी दोन लक्ष रुपये आणि मानचिन्ह असा एक गौरव पुरस्कार दिला जातो. दरवर्षी ललित किंवा वैचारिक यांपैकी एकाच विभागात पुरस्कार दिला जातो.

या गौरव पुरस्कारासाठी नावांचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या जातात.

**ललित साहित्यिकांच्या संदर्भात –**

- ज्यांच्या साहित्यातून मानवी स्वातंत्र्य, समता, न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाची जाणीव व्यक्त झाली आहे.
- ज्यांच्या साहित्यातून मानवी जीवनाचे समर्थ दर्शन घडविले गेले आहे.
- ज्यांच्या साहित्यातून सार्वकालीन व सार्वत्रिक मूल्यांचा आविष्कार झाला आहे.

- ज्यांच्या साहित्यामुळे मराठी साहित्याच्या संचितात मोलाची भर पडली आहे व त्यामुळे ज्यांचे साहित्य मराठी साहित्याच्या इतिहासात महत्त्वाचे ठरले आहे.

अशा प्रतिभावंत साहित्यिकांचे कार्य या गौरव पुरस्कारासाठी विचारात घेतले जाते.

**वैचारिक साहित्यिकांच्या संदर्भात –**

- इतिहास, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, राजकारण, अर्थशास्त्र, विज्ञान, साहित्य-संशोधन व समीक्षा यांसारख्या वैचारिक क्षेत्रात ज्यांच्या मराठी लेखनामुळे त्या त्या विषयाच्या संदर्भात महत्त्वाची भर पडली आहे.
- त्या त्या क्षेत्रात ज्या साहित्यिकांनी निःस्पृहवृत्तीने व निर्भयपणे तात्त्विक सत्याचा शोध घेतला आहे.
- ज्यांची जाणीव मानवी स्वातंत्र्य, समता व न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाच्या प्रेरणेने उद्युक्त झाली आहे.
- मराठी समाजाच्या सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने ज्यांचे लेखन महत्त्वाचे ठरणारे आहे.

अशा विचारवंतांचे कार्य या गौरव पुरस्कारासाठी विचारात घेतले जाते.

## २. विशेष पुरस्कार

महाराष्ट्र फाउण्डेशन साहित्य पुरस्कार निवड समितीच्या असे निदर्शनास आले की काही साहित्यिकांचे वैशिष्ट्यपूर्ण व मोलाचे असे योगदान असूनही वेगवेगळ्या कारणांमुळे त्यांना पुरस्काराने गौरविण्याचे राहून जाते. यासाठी २००५ या वर्षापासून रु. ३०,००० व सन्मानचिन्ह अशा स्वरूपाच्या एका विशेष पुरस्काराची योजना करण्यात आली आहे. भारतातील निवड समिती या पुरस्कारासाठी साहित्यिकाच्या नावाची शिफारस करील.

## ३. ग्रंथांसाठी पुरस्कार

समकालीन मराठी साहित्याला प्रोत्साहन म्हणून सात मराठी ग्रंथांना प्रत्येकी रु. २५,००० व सन्मानचिन्ह असे सात 'महाराष्ट्र फाउण्डेशन ग्रंथ पुरस्कार' या वर्षी दिले जात आहेत. या पुरस्कारांसाठी अर्ज करावे लागत नाहीत. पुरस्कार दिल्या जाणाऱ्या वर्षालगतच्या मागील दोन वर्षांतील पुस्तकांचा या पुरस्कारांसाठी विचार केला जातो. या वर्षी जानेवारी २००५ ते डिसेंबर २००६ या दोन वर्षांतील पुस्तके विचारात घेण्यात आली. हे सात पुरस्कार या वर्षी खालील गटांतील पुस्तकांना दिले गेले आहेत.

१. कविता

२. कादंबरी/कथा

३. आत्मकथन/आत्मचरित्र

४. वैचारिक/समीक्षा/संशोधन

एखाद्या साहित्यप्रकारात पुरस्कार-योग्य साहित्यकृती न आढळल्यास दुसऱ्या एखाद्या साहित्यप्रकारातील पुस्तकाची निवड समिती पुरस्कारासाठी शिफारस करू शकते.

पुरस्कारप्राप्त ग्रंथांच्या प्रती महाराष्ट्रातील निवडक ५० ग्रंथालयांना भेट म्हणून पाठविल्या जातात. समाजाच्या सर्व थरांत साहित्य-प्रसार करणे, हे या मागचे उद्दिष्ट आहे.

## ४. ललित वा वैचारिक नियतकालिक-अनियतकालिकांसाठी पुरस्कार

मराठी साहित्यक्षेत्रात नियतकालिकांची प्रभावी परंपरा आहे. विचारांची देवाणघेवाण व जाणिवांचा विकास या दृष्टीने आधुनिक जगात नियतकालिकांना विशेष महत्त्व आहे. परंतु आज मराठी नियतकालिकांच्या क्षेत्रात गंभीर नियतकालिकांची स्थिती समाधानकारक दिसत नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत नियतकालिकांचे सांस्कृतिक महत्त्व ध्यानात घेऊन ध्येयनिष्ठ वृत्तीने मराठी नियतकालिके चालविणाऱ्या व्यक्तींच्या कार्यांची नोंद घेऊन त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी व अशा कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी एका नियतकालिकाला रुपये २५,००० व सन्मानचिन्ह या स्वरूपाचा पुरस्कार दिला जातो.

या पुरस्कारासाठी नियतकालिक/अनियतकालिकाचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या जातात—

- ललित व वैचारिक साहित्य-पुरस्कारासंदर्भात लेखकांकडून यापूर्वी नमूद केलेल्या अपेक्षांची पूर्ती जी नियतकालिके गंभीरपणे करीत असतील.
- जी शास्त्रीय दृष्टीने निःस्पृहपणे सत्याचे प्रकटन करण्याचे कार्य करीत असतील.
- ज्या नियतकालिकांना त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात काही विशेष महत्त्व प्राप्त झाले असेल किंवा त्यांच्या कार्यातून तसे आश्वासन मिळत असेल.
- ज्या नियतकालिकांद्वारे महाराष्ट्रातील विख्यात व नवोदित लेखकांच्या विचारांची देवाणघेवाण होत असेल व त्यामुळे सांस्कृतिकदृष्ट्या जी महत्त्वाची ठरणारी असतील.

- या शिवाय ज्या अनियतकालिकांमध्ये भूमिकेचे गांभीर्य व प्रकाशनाचे सातत्य असेल अशा अनियतकालिकांचा विचारदेखील या पुरस्कारासाठी करण्यात येईल.

'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ने नियुक्त केलेली निवड समिती या पुरस्काराची शिफारस करते.

## ५. रा. शं. दातार नाट्य पुरस्कार

नाटक या प्रकारासाठी २००३ सालापासून हा विशेष पुरस्कार महाराष्ट्र फाउण्डेशनतर्फे दिला जात आहे. या वर्षापासून हा पुरस्कार एखाद्या महत्त्वाच्या सामाजिक समस्येविषयी आशयसंपन्न नाट्यकृती सादर करण्यात मोलाचा वाटा असणाऱ्या नाट्यकर्मीसाठी देण्याची योजना आहे. हा पुरस्कार प्रामुख्याने रंगभूमीवरील उभरत्या, तरुण नाट्यकर्मीसाठी आहे. या पुरस्काराचे स्वरूप रु. २५,००० व सन्मानचिन्ह असे असून त्याची शिफारस करण्यासाठी 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'तर्फे वेगळी त्रिसदस्य समिती नियुक्त करण्यात आली आहे.



# सुनील देशमुख

सुनील देशमुख हे मूळचे सांगलीचे. १९६४ साली एस.एस.सी. परीक्षेत बोर्डात चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यावर शिक्षणासाठी ते मुंबईत आले. १९७० साली मुंबई विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी या विभागातून बी.केम. ही पदवी त्यांनी प्राप्त केली. पुढील शिक्षणासाठी ते अमेरिकेत गेले.

अमेरिकेमध्ये एम.एस. (केमिकल इंजिनिअरिंग), एम.बी.ए. या पदव्यांबरोबरच जे.डी. ही कायद्याची पदवीही त्यांनी मिळविली. अमेरिकेत वकिली करण्याचा परवानाही त्यांनी प्राप्त केला.

नंतर अमेरिकेतच कमॉडिटी ट्रेडर म्हणून वॉलस्ट्रीटवर त्यांनी अनेक वर्षे यशस्वी व्यवसाय केला.

आज गिरीश, निशा व सुशील या तीन मुलांसह ते व त्यांची पत्नी प्रतिभा (पूर्वाश्रमीच्या प्रतिभा टिळक) अमेरिकेत स्थायिक झाले आहेत.

व्यवसायात नेत्रदीपक यश मिळवणाऱ्या श्री. सुनील देशमुख यांना साहित्य व समाजसेवा यांविषयी विशेष आस्था आहे. व्यवसायातून स्वेच्छेने निवृत्त झाल्यापासून आठवड्यातील काही काळ ते सामाजिक कामासाठी आवर्जून देत असतात.

मराठी भाषा, समाज व संस्कृती यांबद्दल त्यांना प्रेम व कळकळ आहे. हे ऋण फेडण्याचा अल्पसा प्रयत्न म्हणून 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ला एक कोटी रुपयांची देणगी देऊन १९९४ पासून 'महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कार योजना' त्यांनी सुरू केली. 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट' आयोजित 'महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य पुरस्कार योजने'मागेही सुनील देशमुख यांचीच प्रेरणा आहे.

Sunil Deshmukh
Tele/Fax : 305-918-0755
email : sunild@aol.com

# महाराष्ट्र फाउण्डेशन
# मराठी साहित्य पुरस्कारांचे मानकरी

### गौरव पुरस्कार

नारायण सुर्वे १९९४
मेघःशाम पुंडलिक रेगे १९९४
मालतीताई बेडेकर १९९५
य. दि. फडके १९९५
श्रीपाद नारायण पेंडसे १९९६
विष्णू भिकाजी कोलते १९९६
गो. वि. तथा विंदा करंदीकर १९९७
वसंत पळशीकर १९९७
विजय तेंडुलकर १९९८
रा. भा. पाटणकर १९९८
पु. ल. देशपांडे १९९९
रा. चिं. ढेरे २०००
भालचंद्र नेमाडे २००१
ग. प्र. प्रधान २००२
मारुती चितमपल्ली २००३
दिलीप पुरुषोत्तम चित्रे २००४
बाबूराव बागूल २००५
*रा. ग. जाधव* २००६

### विशेष पुरस्कार

भा. रा. भागवत / बालसाहित्य १९९६
उमा कुलकर्णी / भाषांतर १९९७
बाबूराव बागूल / दलित साहित्य १९९८
वसंत दावतर / मराठी भाषा, संशोधन व समीक्षा १९९९
रा. वि. सोवनी / मराठीतून विज्ञानप्रसार २०००
गंगाधर मोरजे / लोकसाहित्य २००१
दत्ता भगत / दलित साहित्य २००२
केशव मेश्राम / दलित साहित्य २००२
भास्कर चंदनशिव / ग्रामीण साहित्य २००३
मनोहर शहाणे २००५
रत्नाकर मतकरी २००६

### प्रकाशन संस्था

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९४
कॉन्टिनेण्टल प्रकाशन, पुणे १९९५
देशमुख आणि कंपनी, पुणे १९९६
मौज प्रकाशन गृह, मुंबई १९९७
साधना प्रकाशन, पुणे १९९८

### नियतकालिके /अनियतकालिके

नवभारत, वाई १९९४
आजचा सुधारक, नागपूर १९९४
मराठी संशोधन पत्रिका, मुंबई १९९४
समाज प्रबोधन पत्रिका, पुणे १९९५
भाषा आणि जीवन, पुणे १९९५
विचारशलाका, लातूर १९९५
अर्थसंवाद, कोल्हापूर १९९६
संशोधक, धुळे १९९६
पंचधारा, हैदराबाद १९९७
परिसर-वार्ता, पुणे १९९७
मराठी विज्ञान परिषद पत्रिका, मुंबई १९९८
पुरोगामी सत्यशोधक, पुणे १९९८
ताज (Thinkers' Academy Journal), मुंबई १९९९
सृष्टिज्ञान, पुणे २०००
बायजा, पुणे २००१
शब्दवेध, बुलडाणा २००४
अभिधानंतर, मुंबई २००५
परिवर्तनाचा वाटसरू २००६

### ग्रंथ / ललित

ताम्रपट / रंगनाथ पठारे १९९४
दिवसेंदिवस / अनुराधा पाटील १९९४
भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा / भाऊ पाध्ये १९९५
उदकाचिया आर्ती / मिलिंद बोकील १९९५
वनवास / प्रकाश नारायण संत १९९६
एकूण कविता : दोन / दिलीप पुरुषोत्तम चित्रे १९९६
युगान्त / महेश एलकुंचवार १९९७
कार्यरत / अनिल अवचट १९९८
शुभ्र काही जीवघेणे / अंबरीश मिश्र १९९८
अधांतर / जयंत पवार १९९९
कबीर / अनुवाद : मंगेश पाडगावकर १९९९
तणकट / राजन गवस २०००
आतंक / विलास सारंग २०००
कोरडी भिक्षा / श्रीनिवास कुलकर्णी २००१
तिची कहाणी / ना. धों. महानोर २००१
गल्ली बदललेला मोर्चा / राम दोतोंडे २००१
मन्वंतर / दीनानाथ मनोहर २००१
तिरिछ आणि इतर कथा / अनु. जयप्रकाश सावंत २००१
उत्तरायण / रवींद्र शोभणे २००२
हिरोशिमाच्या कविता / अनु : निरंजन उजगरे २००२
राहिले दूर घर माझे / शफाअत खान २००२
वकिल्या पारधी / लक्ष्मण गायकवाड २००३
जीवनायन / यशवंत मनोहर २००३
येरवडा विद्यापीठातील दिवस / कुमार सप्तर्षी २००३
राहीच्या स्वप्नांचा उलगडा / भारत सासणे २००३

| | |
|---|---|
| आषाढमाती / श्रीकांत देशमुख | २००४ |
| खूप लोक आहेत / श्याम मनोहर | २००४ |
| पिढीजात / सतीश आळेकर | २००४ |
| भूमी / आशा बगे | २००५ |
| व्यवहाराचा काळा घोडा/ अजीम नवाज राही | २००५ |
| महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : जीवन व कार्य / गो. मा. पवार | २००५ |
| निशाणी डावा अंगठा / रमेश इंगळे-उत्रादकर | २००६ |
| हॉटेल माझा देश / धम्मपाल रत्नाकर | २००६ |

**ग्रंथ / वैचारिक**

| | |
|---|---|
| आस्तिक शिरोमणी चार्वाक / आ. ह. साळुंखे | १९९४ |
| आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी / गो. म. कुलकर्णी | १९९५ |
| हिंदू-मुस्लिम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदू राष्ट्रवाद / रावसाहेब कसबे | १९९५ |
| समाजपरिवर्तनाच्या दिशा / जनार्दन वाघमारे | १९९६ |
| जाळ्यातील चंद्र / म. वा. धोंड | १९९६ |
| नव वसाहतवाद आणि आधुनिक भारत / गोपाळ राणे | १९९७ |
| तुकाराम दर्शन / सदानंद मोरे | १९९७ |
| नारायण मेघाजी लोखंडे / मनोहर कदम | १९९७ |
| आंबेडकर / नलिनी पंडित | १९९८ |
| साहित्यविवेक / म. द. हतकणंगलेकर | १९९८ |
| काश्मीर प्रश्न / ना. य. डोळे | १९९९ |
| दखनी भाषा : मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार / श्री. रं. कुलकर्णी | १९९९ |
| ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना / संपादक : विलास खोले | १९९९ |
| शोकात्म विश्वरूप दर्शन : जीवन आणि साहित्य / स. रा. गाडगीळ | २००० |
| नवरात्र / अशोक चौसाळकर | २००० |
| कर्मयोगी संन्यासी / नरेंद्र चपळगावकर | २००० |
| मार्क्सचा मानव विचार / मुरलीधर पवार | २००१ |
| प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती / म. अ. मेहेंदळे | २००२ |
| वि. स. खांडेकर सचित्र चरित्रपट / जया दडकर | २००२ |
| साहित्य प्रत्यय / भा. ल. भोळे | २००३ |
| महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : जीवन व कार्य / गो. मा. पवार | २००५ |
| तुकाराम : अंतर्बाह्य संघर्षाची अनुभवरूपे / म. सु. पाटील | २००५ |
| मराठी साहित्य : इतिहास आणि संस्कृती / वसंत आबाजी डहाके | २००६ |

**ग्रंथ / अ-पारंपरिक**

| | |
|---|---|
| जिहाद / हुसेन जमादार | १९९४ |
| आक्रोश / भीमराव गस्ती | १९९५ |
| दशक्रिया / बाबा भांड | १९९६ |
| लॉरी बेकर / अतुल देऊळगावकर | १९९७ |
| विमुक्तायन / लक्ष्मण माने | १९९८ |
| दुष्काळ आवडे सर्वांना / अनु. हेमंत कर्णिक | २००४ |
| आयदान / उर्मिला पवार | २००४ |

**रा. शं. दातार नाट्य पुरस्कार**

| | |
|---|---|
| ढोलताशे / चं. प्र. देशपांडे | २००३ |
| कळा या लागल्या जीवा / किरण पोत्रेकर | २००४ |
| छोट्याश्या सुट्टीत / सचिन कुंडलकर | २००५ |
| मळभ / किरण यज्ञोपवीत | २००६ |

**नाट्य क्षेत्रातील विशेष कामगिरीसाठी पुरस्कार**

| | |
|---|---|
| अतुल पेठे | २००६ |

# म । नो । ग । ते

# भा. ल. भोळे

या कार्यक्रमाचे अध्यक्ष न्या. हेमंत गोखले, प्रमुख अतिथी श्री. जब्बार पटेल, महाराष्ट्र फाउण्डेशनचे श्री. सुनील देशमुख, केशव गोरे ट्रस्टचे सर्व पदाधिकारी आणि उपस्थित सर्व बंधुभगिनींनो,

महाराष्ट्र फाउण्डेशनचा यंदाचा गौरव पुरस्कार मला मिळाला याचा मला खूप आनंद आहे. खरं तर हा पुरस्कार घोषित झाला तेव्हापासून आजच्या या क्षणापर्यंत माझी जी काही मन:स्थिती आहे ती मला नेमक्या शब्दांत सांगता येईल की नाही याची शंकाच आहे. यापूर्वी ज्यांना हा पुरस्कार मिळाला आहे ती फार मोठी माणसं आहेत. मी, माझं चिंतन आणि लेखन त्या महनीयांच्या तुलनेत फारच तोकडं आहे याची मला जाणीव आहे; तरीही आजवर मी जे काही लिहिलं किंवा केलं ते योग्य दिशेनं होतं याची पावती या पुरस्कारानं मला दिली आहे असं मी मानतो आणि त्याचा नम्रपणे स्वीकार करतो. आयुष्यात आजपर्यंत केलेली सहेतुक धडपड यापुढेही अधिक आत्मविश्वासपूर्वक करण्याची उमेद मला या पुरस्कारानं दिली हे मला अधिकच महत्त्वाचं वाटतं. ज्या सर्वांनी माझ्या नावाची शिफारस पुरस्काराच्या भारतातील निवडसमितीच्या विचारार्थ केली त्यांच्याबद्दल, तसंच भारतातील आणि अमेरिकेतील निवडसमित्यांच्या सदस्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणं मी माझं कर्तव्य समजतो. प्रथम पुरुषी एकवचनी बोलणं मला फारसं रुचत नसलं तरी अशा प्रसंगी ते टाळणं कठीणचं असतं, म्हणून त्याबद्दल मी सुरुवातीलाच आपली क्षमा मागतो.

ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेत अध्यापन करणाऱ्या एका शिक्षकाचा मी मुलगा. मॅट्रिकपर्यंत खानदेशात आणि महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षण औरंगाबादेत पूर्ण करून काही काळ तिथेच पदवीपातळीपर्यंतचं आणि पुढे नागपुरात पदव्युत्तर पातळीवरचं अध्यापन मी केलं. या वाटचालीत माझ्यावर सर्वाधिक ऋण माझ्या मित्रांचं झालं आहे. विल्यम बटलर यीट्स यांचं 'थिंक व्हेअर मॅन्स ग्लोरी मोस्ट बिगिन्स ॲण्ड एण्ड्स / ॲण्ड से माय ग्लोरी वॉज आय हॅड सच फ्रेण्ड्स' हे विधान मला या संदर्भात नेहमीच आठवतं. माझी ग्रामीण पार्श्वभूमी, मित्रांशी नाना विषयांवर वेळोवेळी केलेल्या चर्चा आणि मार्क्स-फुले-आंबेडकर यांच्या साहित्याचं तसंच इतरही विविध स्वरूपाचं वाचन यातूनच माझा साहित्य आणि समाजविषयक दृष्टिकोन तयार झाला. राज्यशास्त्र या विषयानं मला जगभरच्या राजकीय विचारविश्वाचा परिचय घडवला, संविधानातील आधारभूत मूल्ये व सिद्धान्त यांची ओळख करून दिली आणि सामाजिक लोकशाहीखेरीज राजकीय लोकशाहीला अर्थ नसतो हे मनावर पक्कं बिंबवलं. देशाच्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या क्रमात राजकीय उद्दिष्टांना प्राधान्य मिळालं आणि स्वातंत्र्याच्या सामाजिक उद्दिष्टांकडे कानाडोळा झाला याचे येथील जनजीवनावर झालेले अनिष्ट परिणाम मला सतत जाणवू लागले. यातूनच माझे चिंतनाचे आणि लेखनाचे आस्थाविषय निश्चित झाले. बहुजन समाजातील सामान्य माणूस हा माझ्या चिंतनाचा केंद्रबिंदू झाला.

पीएच्.डी.साठी भारतीय शेतकरी कामगार पक्षाचा अभ्यास करण्याचं मी ठरवलं त्यामागेही बहुजनसमाजाच्या चळवळीविषयीची आस्थाच कारणीभूत होती. सामाजिक शास्त्रांचा अभ्यास केवळ विद्यापीठीय करियरपुरता न करता सामाजिक परिवर्तनाची दिशा शोधण्यासाठी करण्याची प्रेरणा मला त्यातूनच मिळाली. लेखन करताना ते मराठीतूनच करावं असा निर्णय मी जो सुरुवातीलाच घेतला होता तोही याच भूमिकेतून.

लहानपणापासून घरात शैक्षणिक वातावरण असल्यामुळे शिक्षणक्षेत्राचं आकर्षण मनात कायमच होतं. मॅट्रिकची परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊनही मेडिकल-इंजिनियरिंगसारख्या 'अर्थ'पूर्ण शाखांकडे न जाता कलाशाखेत मी प्रवेश घेतला त्यालाही हे आकर्षणच कारणीभूत झालं होतं. महाविद्यालयीन अध्यापक व्हावं हीच माझी महत्त्वाकांक्षा होती, ती पूर्ण झाली आणि आजतागायत कधीही या व्यवसायात शिरल्याबद्दल पश्चाताप झाल्याचं मला आठवत नाही. माझ्या लेखनाचा बराचसा भाग विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरतील अशा पुस्तकांचा आहे हा केवळ योगायोग म्हणता यायचा नाही. इयत्ता तिसरीपासून पाचवीपर्यंतच्या इतिहासाची आणि पाचवी ते आठवी या वर्गांच्या नागरिकशास्त्राची पुस्तकं निर्माण करण्याच्या कामात माझा बराच वेळ आणि शक्ती खर्ची पडल्या, पण तो अनुभव मला फार समृद्ध करणारा ठरला. बी.ए. आणि एम.ए.च्या राज्यशास्त्राच्या मी लिहिलेल्या सर्वच ग्रंथांना विद्यार्थ्यांकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला हे मी माझ्या प्रयत्नांचं सर्वांत मोठं सार्थक समजतो.

पाठ्यपुस्तकांखेरीज महात्मा जोतीराव फुले, विठ्ठल रामजी शिंदे, आगरकर, आंबेडकर, यशवंतराव चव्हाण इत्यादिकांच्या विचारांचा चिकित्सक ऊहापोह करणाऱ्या ग्रंथांचं लेखन माझ्या हातून झालं असून त्याचंही वाचकांनी भरभरून स्वागत केलं आहे. आज पन्नासहून अधिक पुस्तकं आणि पाचशेहून अधिक लेख माझ्या नावे आहेत याचं श्रेय मुख्यत्वे मी माझ्या विद्यार्थ्यांनी व वाचकांनी दिलेल्या या सकारात्मक प्रतिसादाला देतो.

आपण असं पाहतो की पिढीगणिक काही बदल आपल्या अवतीभवती होतच असतात, आणि त्यामुळेच तर पिढीतील अंतराची भाषाही केली जाते. प्रत्येक दोन पिढ्यांमध्ये आचार-विचार-व्यवहार यांत तफावत पडल्यामुळे काही ताणतणाव अपरिहार्यतः निर्माण होतच असतात. पण आमच्या पिढीच्या वाट्याला बदलांमधून निर्माण झालेल्या या अंतराचं जेवढं अफाट प्रमाण आज आलं आहे तेवढं यापूर्वीच्या कोणत्याही पिढीच्या अनुभवास आलं नसावं. या पिढीच्या संस्कारक्षम वयातलं जग आणि आता ती मावळतीला झुकत असतानाचं जग यांच्यात अक्षरशः जमीन-अस्मानाचं अंतर पडलेलं आहे. माझी पिढी विचार करू लागली तो समाजवादातून सामाजिक-आर्थिक परिवर्तन घडवून नवसमाजरचना अस्तित्वात आणण्याची उमेद बाळगण्याचा काळ होता. जगभरच भांडवलशाही लोकशाहीला समाजवादी पर्याय सापडला असल्याचा आशावाद त्या काळात प्रचंड मोठा होता. भारतीय संविधानानं ज्या स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय या मूल्यांचा पुरस्कार केला होता ती त्याकाळी प्रत्यक्ष जगण्यात प्रत्ययास येत नसली तरी आज ना उद्या ती येथे नक्कीच मूळ धरतील अशी खात्री जनमानसात वसत होती. पण आमची पिढी सेवानिवृत्त होत असताना जे चित्र तिच्यापुढे आलं ते अगदीच निराळं आहे. आमच्या पिढीच्या हयातीतच जगरहाटी कमालीची बदलली आहे. हे बदल केवळ प्रमाणात्मकच नाहीत तर गुणात्मक आणि मूलगामी स्वरूपाचे आहेत. आपण कसं जगतो, वागतो, खातोपितो, सेवा व वस्तू वापरतो आणि विचार करतो या प्रत्येक गोष्टीत नाट्यपूर्ण बदल घडून आले आहेत, येत आहेत. विज्ञान-तंत्रज्ञान आणि अर्थराजकीय व्यवस्थाही आरपार बदलली आहे. भौतिक जीवनाची नव्यानं निर्माण झालेली संघटना समाजातील सत्तासंरचनेला आणि संतुलनांना अगदीच नवं वळण देऊ लागली आहे. स्पर्धेच्या तत्त्वानं नियंत्रित होणारी बाजारव्यवस्था आणि जगभर अनिर्बंध संचार करणारी भांडवलसत्ता यामुळे अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. नव्या तंत्रज्ञानानं बेरोजगारी, पर्यावरण-असंतुलन आणि पारंपरिक व्यवसायांचा नाश अशी अनेक संकटं उद्भवली आहेत. ग्रामीण आणि शहरी जीवनातील दरी अभूतपूर्व प्रमाणावर रुंदावली आहे.

जागतिकीकरणाच्या या लाटेत लोकांच्या जीवनशैली, विचार, कल्पना, छंद, रुची एवढंच नव्हे तर साहित्य, संगीत आणि सिनेमासुद्धा खऱ्या अर्थानं जागतिक होत आहेत. एकाच वेळी राजकारण, तत्त्वज्ञान, संस्था आणि विविध प्रक्रिया यांच्या क्षेत्रांत विलक्षण मंथन होत आहे; नवे सिद्धान्त, नीतिमूल्यं, आदर्श व प्रमाणकं प्रचलित होत आहेत. पण हे खरं असलं तरी दुर्दैवी वस्तुस्थिती अशी आहे की भारतासारख्या विकसनशील देशातील ऐंशी टक्के जनता जागतिकीकरणाच्या लाभांपासून दूर असून दुष्परिणामांचा मात्र बळी ठरत आहे. प्राथमिक शिक्षण, प्राथमिक

आरोग्य, सामाजिक सुरक्षा, रोजगार इत्यादी जीवनावश्यक गोष्टींपासूनही ती वंचित राहिली आहे. तिच्याकडे केवळ संभाव्य बाजारपेठ म्हणून पाहणाऱ्या उद्योजकांना तिच्या मानवी गरजांशी काहीही देणंघेणं नसतं. त्यांची निरक्षरता, असहाय्यता, उपासमारी एवढंच नव्हे तर आत्महत्यासुद्धा आक्रमक विपणन करणाऱ्या बाजारशक्तींच्या खिजगणतीत नसतात. सामाजिक अन्याय, अस्पृश्यता आणि अत्याचार-बलात्कार हे त्यांना विचार करण्यासारखे प्रश्नच वाटत नाहीत. त्यामुळे निरर्थक वाक्प्रयोग, घोषणा आणि आभासी वास्तव एवढ्याच स्वरूपात जागतिकीकरण त्यांच्यापर्यंत पोहोचतं. याचा परिणाम असा होतो की त्यांच्या पारंपरिक जीवनशैलीवर अगदीच भिन्न प्रकारच्या जीवनशैलींचं कलम बांधलं जातं. यातून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे अनेक विकृत परिणाम आपल्या समाजात आज पाहायला मिळतात. जलद माहितीप्रसारणाच्या माध्यमांचा उपयोग गणपतीने दूध पिण्याच्या कथित चमत्काराचा प्रसार देशभर करण्यासाठी केला जातो. अर्धनग्न व अर्धपोटी लोकांच्या या देशातील अभिजनवर्ग सौंदर्यस्पर्धा आणि फॅशनपरेड अशा पेज थ्री कार्यक्रमांत त्याच संध्याकाळी साजऱ्या करत असतो. संगणकांचा वापर लग्नाच्या कुंडल्या तयार करण्यासाठी आणि व्हिडिओ कॅसेटींचा उपयोग विविध धार्मिक विधींसाठी पौरोहित्य करण्यासाठीच मुख्यत्वे केला जातो. छायाचित्रणाच्या अद्ययावत तंत्रज्ञानातून अंधश्रद्धावर्धक मालिकांमधून अद्भुतरम्य चमत्कारांची निर्मिती केली जाते. टोयोटो गाडीतून रथयात्रा काढली जाते आणि महाजालाचा वापर केला सांप्रदायिकतेचा प्रचार करण्यासाठी सर्रास सुरू असतो. अस्पृश्यता आणि सायबर कॅफे येथे सुखेनैव एकाच वेळी नांदत असतात.

विलक्षण गती आणि व्याप्ती घेऊन आलेल्या या अभूतपूर्व बदलांची सगळ्यात मोठी झळ येथील विचारविश्वाला लागत असलेली दिसते. आपल्या भोवताली जे घडतं आहे त्यासंबंधी मूलगामी चिंतन करून त्याचं विश्लेषण आणि त्यावरची व्यूहनीती सांगणारं विचारमंथन समाजातून जवळपास हद्दपार झालं आहे. तसा आपापल्या विषयापुरता व गरजेपुरता अभ्यास पत्रकार, प्राध्यापक, वकील, तंत्रज्ञ वगैरे मंडळी करत असली तरी त्या पलीकडे जाऊन संपूर्ण समाजाचा भूत-वर्तमान-भविष्याच्या अनुषंगाने समग्र विचार करणाऱ्यांची संख्या मात्र दिवसेंदिवस रोडावत चालली आहे. आपण सवंगपणे 'विचारवंत' ही संज्ञा कोणालाही लावत असलो तरी खऱ्या अर्थानं ज्यांना विचारवंत म्हणता येईल अशांची संख्या समाजात बहुदा जेमतेम हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच असावी. जे विचारवंत आपल्या सामाजिक समूहासोबत जोडले गेलेले असतात, समूहाला एकजिनसी करून स्वकर्तव्याचं भान करून देत असतात आणि समाजाशी द्वंद्वात्मक नातं टिकवत आत्मविकास साधतात त्यांना ग्राम्शी या इटालियन विद्वानानं ऑरगॅनिक इंटलेक्च्युअल्स असं संबोधलं आहे. आपल्याकडे असे विचारवंत अभावानंच आढळतात. जे काही वैचारिक लेखन होताना दिसतं त्यात बहुदा लेखक स्वत:ची भूमिकाच बिनचूक असल्याचं गृहीत धरून लिहीत असतात. आपण जे प्रतिपादन करतो त्याला दुसरी बाजूही आहे, तिचाही आपण विचार केला पाहिजे असं त्यांना कधी वाटतच नाही; किंवा आपल्या भूमिकेला पर्यायी अशा आणखी काही भूमिका असू शकतात हे ते ध्यानातच घेत नाहीत त्यामुळे आणि त्या भूमिकांशी द्वंद्वात्मक संबंध राखून लेखक लिहीत नसल्यामुळे अनेकदा त्यांचं लेखन वैचारिक न होता कृतक-वैचारिक होतं. तुकाराम महाराज ज्याला, ''आपुलाचि वाद आपणासी'' असं म्हणतात तसा प्रयत्न वैचारिक लेखक सहसा करताना दिसत नाही. कधीकाळी सर्जनशील साहित्यापेक्षाही समृद्ध असलेल्या वैचारिक लेखनाची मराठीतील परंपरा आज त्यामुळेच क्षीण झालेली दिसते. एकीकडे वैचारिक स्वरूपाचं लेखन प्रचंड प्रमाणावर होत असलं तरी त्याचं मूलगामित्व, कसदारपणा आणि काटेकोर तत्त्ववैचारिक अधिष्ठान पूर्वीइतकं टिकून राहिलेलं दिसत नाही. अलीकडच्या काळात तर सांप्रदायिकतेची व जातीयतेची लागण वैचारिक विश्वालाही झपाट्यानं होत असलेली दिसून येते. एक अनिष्ट प्रवृत्ती अलीकडे अशी अनुभवास येते की आपल्या जातीच्या विचारवंतानं कितीही तर्कदुष्ट किंवा चुकीचं लेखन केलं तरी त्याच्या जातीतील समीक्षक त्या लेखनाची परखड समीक्षा सहसा करत नाहीत आणि गटाबाहेरच्या कोणी ती कितीही सप्रमाण केली तरी जातीय हेत्वारोप करून ती उडवून लावली जाते. या संकुचित दृष्टिकोनामुळेच

बदलत्या परिस्थितीचं चिकित्सक विश्लेषण करून नवदर्शन घडवणारं वैचारिक लेखन अपेक्षित प्रमाणावर घडताना आज दिसत नाही.

वैचारिकतेचा हा अभाव सर्जनशील साहित्यातूनसुद्धा दिसून येतो. जे दिसतं किंवा सुचतं ते त्यावर कोणत्याही प्रकारचं वैचारिक किंवा समाजशास्त्रीय चिंतन न करता साहित्यातून मांडण्याचं प्रमाण सामाजिक वास्तववादाच्या नावाखाली दिवसेंदिवस वाढत आहे. साहित्यात आशयवस्तूला महत्त्व नक्कीच असतं पण तेवढंच महत्त्व तो आशय किती कलात्मक पद्धतीनं मांडला जातो यालाही असतं. नाहीतर एरवी कविता, कथा, नाटक वगैरे साहित्यप्रकार न अवलंबता सर्वांनी निबंधच लिहिले असते! अनुभवविश्वातील घटितांवर चिंतन करून त्याचं आंतरिकीकरण केल्यावर त्याला कल्पिततेची डूब देऊ शकणारा लेखकच श्रेष्ठ साहित्य निर्माण करू शकतो. दुर्दैवाने आजच्या मराठी साहित्यात काही फारच थोडे सन्माननीय अपवाद वगळता फिक्शनची निर्मिती अभावानंच आढळते. साहित्याच्या मूल्यमापनाचे आपले निकषही त्यामुळे बहुधा तात्कालिक, अविचारी व अशास्त्रीयच असतात. दोस्ती, नातीगोती, हितसंबंध आणि निहित स्वार्थ यांच्या निकषांवरच अनेकदा साहित्याचं मूल्यांकन केलं जातं किंवा त्यास पुरस्कार दिले जातात. दुसरं म्हणजे वैचारिक आणि वाङ्मयीन अशा दोन्ही आघाड्यांवर भाषेची हेळसांड होणं हेसुद्धा मोठंच गंभीर गंडांतर आज आपल्यापुढं उभं राहिलं आहे. भाराभर लिहिणारांनाही भाषेच्या धाटणीकडे आणि सर्वमान्य व्याकरणाच्या नियमांकडे लक्ष द्यावंसं वाटत नाही. एकदा लिहिल्यानंतर ते पुन्हा भाषेच्या दृष्टीने वाचून पाहणारे लेखक मराठीत किती असतील हा प्रश्नच आहे. भाषेची निर्मिती ज्या सामाजिक व्यवहारांतून होते त्यांच्याशी बहुतेक वेळा लिहिणाऱ्यांचा साक्षात संबंध नसल्यामुळे ते सजीव भाषेत लिहू शकत नाहीत. अगदी बोलीभाषेत लिहिणाऱ्या लेखकांची भाषाही किती अस्सल असते हे खरं तर दैनंदिन व्यवहारात ती भाषा बोलणारे स्त्री-पुरुषच सांगू शकतील, पणं त्यांच्यापर्यंत हे साहित्य पोहोचतच नाही आणि बहुतेक वेळा अनभिज्ञ शहरी पांढरपेशांकडूनच बोलीभाषांची कौतुकं केली जातात. साहित्याच्या क्षेत्रात नवनवे सामाजिक स्तर आणि वर्ग प्रविष्ट झाले यातून ही परिस्थिती निर्माण झाली असं काही लोक म्हणतात, पण ते काही खरं नाही. पूर्वापार लेखनकामासाठी करत आलेल्या वर्गाचीही परिस्थिती याहून फारशी निराळी नाही.

साहित्य आणि समाज यांच्यात प्रचंड दरी पडण्याचं एक कारण म्हणजे शिक्षणाद्वारे ज्ञानाची मक्तेदारी मोडून स्त्री-शूद्रादी-अतिशूद्रांना अविद्येच्या दुष्परिणामातून मुक्त करण्याचं फुले-शाहू-भाऊराव पाटील-आंबेडकर-प्रभृतींनी पाहिलेलं स्वप्न आजही पूर्णपणे साकार होऊ शकलेलं नाही. एकीकडे प्रचंड शिक्षणप्रसार आणि शिकवणाऱ्या मुलामुलींच्या संख्येत अफाट भर पडलेली दिसते, अमेरिकेतील सायबरसिटीत नोकरी करणाऱ्या भारतीय अभियंत्यांची संख्या विक्रमी प्रमाणावर वाढलेली दिसते आणि जागतिक बाजारपेठेत भारतीय पदवीधरांना अभूतपूर्व मागणी असल्याचं आढळतं, पण त्याचवेळी असंही दिसतं की प्राथमिक शाळांचा उंबरठाही न पाहिलेल्या बालकांची संख्या लाखोंच्या घरात असते, पहिल्या इयत्तेत प्रवेश घेतलेल्यांपैकी गळती होत होत फक्त चार-पाच टक्के मॅट्रिकपर्यंत पोहोचू शकतात, चौथीपर्यंत शिकलेल्यांना बालवर्गाची पुस्तकं वाचता येत नाहीत आणि उच्चशिक्षण ही अजूनही एकूण लोकसंख्येतील फक्त सात टक्क्यांचीच मक्तेदारी राहाते. हे चित्र ज्ञानसमाजाचं आहे असं खचितच म्हणता येणार नाही. समाजात सर्वत्र विखुरलेल्या ज्ञाननिर्मितीच्या एकूणएक स्रोतांना विकसित करून नव्या सहस्रकाची आव्हानं पेलू शकतो तो समाजच ज्ञानसमाज म्हणवण्यास पात्र ठरतो. स्वाभाविकच अशा समाजात शिक्षणप्रक्रियेपर्यंत समाजातील सर्वांची सारखीच पोच असणं अगत्याचं असतं. ज्ञानसमाज सर्वांना सामावून घेणाराच असतो, वगळणारा नव्हे. आपण मात्र प्राथमिक शिक्षणाचा औपचारिक मूलभूत हक्क फक्त संविधानात नमूद करण्यावरच समाधान मानतो, तो हक्क समाजातील प्रत्येक बालकाला उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेला कायदा करण्याची मात्र आपल्या संघराज्यातील एकाही घटकराज्याची तयारी नसते. त्यामुळेच चौदा वर्षाखालील मुलामुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचं, सार्वत्रिक आणि मोफत करण्याचं संविधानाचं वचन स्वातंत्र्योत्तर साठ वर्षांचा कालावधी उलटून

गेल्यावरही आम्ही पूर्ण करू शकलेलो नाही. आपली शिक्षणव्यवस्था सर्वांना सामावून घेण्याऐवजी जास्तीत जास्त समाजघटकांना वगळणारी आणि बाहेर फेकून देणारी आहे हे सत्य लपून राहू शकत नाही. आजपर्यंत शिक्षणप्रणालीत होत गेलेले सर्व बदल हे जनसामान्यांसाठी अपायकारकच ठरले आहेत, आणि यापुढे तर शैक्षणिक सुधारणांच्या शिफारसी करण्याचं काम शिक्षणतज्ज्ञांऐवजी उद्योगपतींच्या शिरावर सरकारनं सोपवलं असल्यामुळे इथून पुढचे बदल गोरगरिबांना अधिकच घातक ठरणार आहेत, हे सांगायला ज्योतिषी असण्याची गरज नाही. शिक्षणाद्वारे सामाजिक परिवर्तन घडवून आणून नवसमाजनिर्मितीचं कार्य पार पडू शकतं हा फुले-शाहू वगैरे थोरामोठ्यांचा आशावाद आपण अगदीच भ्रामक ठरवला आहे. बाजाराप्रमाणे पुरवठा करण्याच्या भरात विज्ञान-तंत्रज्ञानावर आत्यंतिक भर देऊन साहित्य, कला आणि सामाजिक शास्त्रांची अक्षम्य उपेक्षा करणारी आपली आजची शिक्षणव्यवस्था कमालीची एकारलेली असून समाजपरिवर्तनाप्रमाणेच सर्जनशीलतेलाही मारक ठरणार आहे. समाजात नैतिक मूल्यांची निर्मिती व प्रसार करण्याची प्राथमिक जबाबदारी ज्या शिक्षणक्षेत्राची असते त्याचंच स्वरूप असं बाजारू आणि ननैतिक होण्याचे फारच गंभीर परिणाम भारतीय समाजाला आज भोगावे लागत आहेत. खाजगीकरण आणि विनाअनुदान संस्कृती यांनी तर शिक्षणक्षेत्राचं सगळं पावित्र्य आणि मांगल्य निकालात काढलं असून शिक्षणसंस्थानिकांची बेबंदशाही समाजात माजवली आहे.

शिक्षणव्यवस्थेची ही दुरवस्था होण्याचं मुख्य कारण तिला झालेली ग्राहकवादाची बाधा हे सांगता येईल. नव्या आर्थिक धोरणांनी नागरिकांचं रूपांतर बिनचेहऱ्याच्या आणि विचारशक्ती गमावलेल्या ग्राहकांत करून टाकलं असल्यामुळे सामाजिक प्रश्नांचं कोणालाही काही वाटेनासं झालं आहे. आपण जणू स्वत:च्या गुणवत्तेच्या बळावरच यश संपादन करून भौतिक सुबत्ता आणि त्या सुबत्तेच्या बळावर हवं ते मिळवलं असल्याच्या अहंकारात आपण समाजाचं काही देणं लागतो याचा विसर या व्यवस्थेच्या लाभान्वित घटकांना पडतो. राज्यसंस्थेनं तर आधीच सर्व कल्याणकारी जबाबदाऱ्यांतून अंग काढून घेतलं आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या शिक्षणासाठी, आरोग्यासाठी आणि एकूणच कल्याणासाठी विशेष प्रयत्न करण्याची जी जबाबदारी संविधानकारांनी राज्यसत्तेवर टाकली होती ती एकेक करून तिनं झटकून टाकली असून सर्व क्षेत्रांत खाजगी हितसंबंधांना मोकळं रान करून दिलं आहे. आज सामाजिक न्यायाची आपली जबाबदारी तर राज्यसत्ता उचलत नाहीच पण सामाजिक न्यायासाठी लढणाऱ्या चळवळींना चिरडून काढण्याचं कार्य मात्र तत्परतेनं पार पाडत आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या आणि आंतरराष्ट्रीय भांडवल यांच्या अनिर्बंध संचारावर मर्यादा घालणाऱ्या श्रमिकांच्या हक्कांचा संकोच करण्यात कोणत्याही राजकीय पक्षाच्या हाती असलेली राज्यसत्ता मुळीच हयगय करीत नाही हा आपला आजचा अनुभव आहे. खैरलांजी आणि नंदीग्राम ही उदाहरणे या संदर्भात बोलकी आहेत. जागतिकीकरणाच्या नावाखाली देशात आलेल्या नवसाम्राज्यवादाच्या आणि नवभांडवलशाहीच्या कचाट्यात सापडलेली राज्यसंस्था जी धोरणे राबवते ती सगळीच ग्रामीण गरिबांच्या आणि शोषित-वंचितांच्या दृष्टीने अत्यंत अनुपकारक ठरत आहेत. सर्वांसाठी समान शैक्षणिक संधी एवढी साधी गोष्टही त्यामुळे आपल्याला आजतागायत असाध्य राहिली आहे; आणि पालकांच्या आर्थिक स्तरानुसार त्यांच्या पाल्यांसाठी शिक्षण विकत घेण्याची सोय शैक्षणिक बाजारपेठेत स्वत: राज्यसत्तेनंच उपलब्ध करून दिली आहे. समाजवादाची धोरणं अमलात आणून समाजातील आर्थिक विषमता दूर करण्याचं ध्येय राज्यसंस्थेने सोडून दिलं असून आर्थिक विषमतेत सतत भर पडेल अशीच धोरणं ती राबवत आहे. त्यामुळे अनुसूचित जाती-जमाती, भटके-विमुक्त, कष्टकरी व शेतमजूर हे आधीच सीमांत रेषेवर असलेले वर्ग आज झपाट्यानं दारिद्र्यरेषेखाली ढकलले जात आहेत. विकासाची किंमत ज्यांना नानाप्रकारे चुकती करावी लागते त्यांना विकासाच्या लाभांचा वाटा मात्र कधीच मिळताना दिसत नाही. त्यामुळे त्यांच्यासाठी हा विकास म्हणजे विनाशच ठरलेला असतो.

या क्षणी सर्व संवेदनशील भारतीयांची मनं अस्वस्थतेनं भरून टाकणाऱ्या एका समस्येचा उल्लेख केल्यावाचून मला माझं हे हृद्गत पूर्ण करावंसं वाटत

नाही. ती समस्या आहे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची. १९९७ ते २००५ या आठ वर्षांच्या काळात भारतातील एक लाख पन्नास हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या अशी नोंद सरकारदप्तरी आहे. गेल्या दोन वर्षांत आणखी शेकडो शेतकऱ्यांना मरण जवळ करणं भाग पडलं आहे. ऐंशी टक्के कष्टकऱ्यांची तशीच मागास जाती, जनजाती, अल्पसंख्याक जमाती यांची रोजची कमाई, तसंच सीमांत शेतकरी यांची रोजची कमाई पाहता ग्रामीण व शेतकी क्षेत्रातील आपल्या विकासावर प्रश्नचिन्ह लावण्याखेरीज गत्यंतर उरत नाही. वाढत्या समृद्धीच्या आणि उंचावत्या विकासदराच्या आपल्या वल्गना तळपातळीवरच्या या विदारक वास्तवामुळे पोकळ वाटू लागतात. समाजाचा पोशिंदा असलेला शेतकरी जर जगू शकणार नसेल तर आपण कोणीच जगू शकणार नाही हे आपण लक्षात घ्यायलाच हवं. आज आपल्यासमोर राजकीय अस्थैर्याचा प्रश्न आहे, हिंसाचाराचं प्रमाण रोज वाढतं आहे आणि दहशतवादाचा भस्मासुरही भीषण रूप धारण करत आहे, सांप्रदायिक दंगली आणि द्वेषमूलक राजकारणाची सरशी होत आहे. त्याखेरीज विस्थापन, अनियोजित शहरीकरण, पर्यावरणविनाश, नैसर्गिक संसाधनांची लूट, कारभारातील अनागोंदी व भ्रष्टाचार अशी अनेक आव्हानं आपल्याला आज भेडसावत आहेत. पण जोपर्यंत शेती, शेतकरी आणि ग्रामीण गरीब यांच्या प्रश्नांच्या मुळापर्यंत जाऊन ते आपण अग्रक्रमानं सोडवणार नाही आणि समाजाच्या तळपातळीवर निकोप आणि रसरशीत सहजीवनाचा आणि सुखसमृद्धीचा पाया पक्का करत नाही तोपर्यंत या आणि अशा कोणत्याही समस्येची सोडवणूक होण्याची सुतराम शक्यता नाही हे आपण लक्षात घ्यायलाच हवं.

माझ्या मर्यादित शक्तीनिशी का होईना लेखणी आणि वाणीच्या माध्यमातून आजचं हे वर्तमान बदलण्यासाठी लढण्याचं बळ महाराष्ट्र फाउण्डेशनच्या पुरस्कारानं मला मिळालं आहे हे पुन्हा एकदा कृतज्ञतापूर्वक नमूद करतो आणि मी आपला निरोप घेतो.

# महादेव मोरे

अध्यक्ष महाशय, प्रमुख पाहुणे, पत्रकार बंधु व आपला अमूल्य वेळ खर्च करून, इथे खास उपस्थित असलेले रसिकवर्ग.

'महाराष्ट्र फाऊंडेशन'तर्फे विशेष पारितोषिक देऊन आज इथे जो माझा सन्मान केला जात आहे तो केवळ माझा नव्हे, तर गेल्या एक्कावन वर्षांहून अधिक काळ महाराष्ट्रापासून दूर लोटल्या गेलेल्या निपाणी, बेळगाव, कारवार, बिदर, भालकी भागातील माझ्या लाखों सीमा बांधवांचा आहे, असे मी समजतो आणि ह्या 'फाऊंडेशन'च्या उभारणीसाठी व हा कार्यक्रम संपन्न करत मजसारख्यांना ऊर्जा देण्यासाठी ज्या अनेक कार्यकर्त्यांचे हातभार लागले, श्रम खर्ची पडले, त्या सर्वांचे प्रथम मन:पूर्वक आभार मानतो.

शिक्षण घेणे, ही चैनीची बाब ७० वर्षांपूर्वी समजली जाई. त्या बहुजनसमाजात २२ जून १९३९ रोजी तेव्हाच्या मुंबई राज्यातील बेळगाव जिल्ह्यातील निपाणी गावी माझा जन्म झाला. मोठ्या मेटाकुटीने-कष्टाने, तेथे १९५७ सालापर्यंत S.S.C. पर्यंतचे शिक्षण घेऊन पुढील शिक्षणाची सोय तेव्हा तेथे नसल्याने, पुढील शिक्षणासाठी २५ मैल अंतरावरील कोल्हापूरातल्या गोखले कॉलेजात दाखल झालो.

लहानपणापासून वाचनाची आवड होती. त्यात साने गुरुजींच्या पुस्तकांच्या वाचनाने सुसंस्काराक्षम मनोभूमी तयार केली. मामा वरेरकर, वि.सी.गुर्जर अशा सारख्यांनी अनुवादित करून मराठीत आणलेल्या शरश्चंद्र चटर्जींच्या बंगाली कादंबऱ्यांनी उच्च कोटीचे वाङ्मय म्हणजे काय हे शिकविले, माझ्या मराठीच्या प्राध्यापिका (व आताच्या कवयित्री) अनुराधा पोतदार ह्यांच्या व्याख्यानांनी वाङ्मयाकडे पहाण्याची एक वेगळी नजर दिली, तर अरविंद गोखल्यांच्या कथांच्या वाचनाने मनात स्फुलिंग पडले आणि मी त्या भरात तंबाखू वखारीतील मजूर स्त्रीच्या लैंगिक व श्रमिक शोषणावर अधारीत अशी 'काशी' नावाची कथा १९५८ साली लिहिली. त्याच वर्षी कॉलेजमध्ये शब्दसंख्येची मर्यादा असलेली कथास्पर्धा जाहीर झाली व त्या मर्यादेपेक्षा 'काशी' कथा मोठी असल्याने 'म्हाईचा दिवस' ही दुसरी एक कथा— म्हाई ह्या सणाचे एका खेड्यातील एक दिवस व एक रात्र ह्याचे समूह चित्रण करणारी ग्रामीण कथा लिहिली. तिला अव्वल क्रमांकाचे पारितोषिक मिळाले! नोबल पारितोषिक विजेते. एकमेव भारतीय साहित्यिक कै. रवींद्रनाथ टागोर ह्यांची 'गृहभंग' नावाने मराठीत अनुवादित झालेली कादंबरी मला पारितोषिकादाखल मिळाली. हा एक शुभ-शकुन असे मी समजतो.

हीच कथा पुढे १० ऑक्टोबर १९५९च्या सा.स्वराज्यमध्ये 'म्हाई' नावाने प्रसिद्ध झाली; हे वाङ्मय प्रांतातले माझे पहिले पाऊल. नंतरच्या काळात ह्या 'स्वराज्य'पासून 'सत्यकथे'पर्यंत मराठीतील सर्वच प्रमुख नियतकालिकांतून सातत्याने लेखन करीत आलो. सा.'नवयुग'ची आचार्य अत्रे कथास्पर्धा तसेच किर्लोस्कर मासिकाची कथास्पर्धा ह्यांतून कथांना पहिली पारितोषिके मिळाली. सा.'गावकरी' कथास्पर्धेतही कथेने पारितोषिक पटकावले.

(कै.) श्री. र. वा. दिघे यांनी १९५६च्या 'मौज' दिवाळी अंकात संपूर्ण ग्रामीण निवेदनशैलीतील 'आई' नावाची पहिली कथा लिहिली. तिही तशा संपूर्ण ग्रामीण निवेदनशैलीतील 'बैदा' नावाची कथा १९६१ साली सा. 'गावकरी'मध्ये लिहिली, अशा

ग्रामीण निवेदनशैलीतील एकही कादंबरी तोंवर मराठीत कुणी लिहिली नसल्याने 'पाव्हणा' नावाची संपूर्ण ग्रामीण निवेदनशैलीतील एक कादंबरी मी लिहिली व ती त्याकाळी पुण्याहून निघणाऱ्या 'अलीबाबा' मासिकात आक्टोबर, ६५ साली प्रसिद्ध होऊन ६६मध्ये पुस्तकरूपाने वाचकांसमोर आली. अशाच संपूर्ण ग्रामीण निवेदनशैलीतील 'रैत' ती दुसरी एक कादंबरी मी लिहिली व ती पुण्याच्या 'मेनका' मासिकाच्या सप्टें. व ऑक्टो.च्या अंकातून '७० साली प्रसिद्ध झाली, व ७१ साली पुस्तकरूपाने वाचकांपुढे आली. ५९ साली शिक्षण अपूरे राहून कोल्हापूरहून गावी परत आल्यावर मजुरांसह रानात राबणे, तसेच एक तपाहून अधिक काळ मोटार वर्कशॉपमध्ये काम केले. नंतर काही दिवस टॅक्सी ड्रायव्हिंग केले, मिरचीपूड मशीनवरही ६/७ वर्षे काम करून तिखटाने अंग जाळून घेतले. नंतर पिठाच्या गिरणीतून १२-१२ तास राबणे चालू आहे, ते अजूनही सुटले नाही. ६९हे रनिंग एज असले तरी शासनाकडे 'कलावंत मानधना'साठी अर्ज केलेला नाही. (काही सुस्थितीतील साहित्यिक असे मानधन घेतात नि मी घेत नाही. ह्याचेही बरेच लोक आश्चर्य व्यक्त करतात!) माझी आजवर अशी बाराबत्तर कामें व धंदे ह्यांमुळे समाजाच्या तळागाळातील लोकांत राबण्यातच आजवरचे (व आताचेही) आयुष्य व्यतीत होत असल्याने त्यांचं प्रतिबिंब माझ्या साहित्यात पडले आहे. डोंबारी, मांगगारडी, मुडीकर, पासेपारधी, गोसावी, बेलपत्तारी, मेडंजोशी, लाडलक्ष्मीवाले, दरवेशी ह्यांप्रमाणे महार, ढोर, चांभार, मांग (मांग वेगळे आणि मांगगारडी वेगळे!), बेरड ह्यांवर तर मराठी साहित्यात 'दलित साहित्य' हा शब्द रूढ होण्यापूर्वीच मी अनेक ठिकाणी लिहिल्याने एका साहित्य संमेलनात केशव मेश्राम भेटल्यावर अत्यानंदाने म्हणाले, 'आम्ही शाळा कॉलेजात होतो तेव्हापासून 'महादेव मोरे' हे नाव पक्के मनात बसलेय. आमच्या समाजावर लिहिणारा हा कोण मोरे? – असं वाटायचं, आज भेट झाली, खूप आनंद वाटला! वगैरे. ७५ साली माझ्या 'चिताक' कथासंग्रहाला राज्यपुरस्कार मिळाला तेव्हा मुंबईतील समारंभ स्थळी हजर असलेल्या दया पवारांनी खास माझ्याजवळ येऊन माझे अभिनंदन करीत पाठ थोपटली व 'ग्रंथाली'च्या ग्रंथयात्रेतून माझ्या गावी रात्री ११ला कार्यक्रमाला आले. तेव्हा 'तुम्ही ज्या पिठाच्या गिरणीत बसून लिखाण करता ती गिरणी मला पहायची आहे', असा हट्ट धरून बसले. जवळच वेश्या वस्ती आहे, आणि अशा अवेळी तिकडे जाणे ठीक नव्हे, असे सांगून मी त्यांना गप्प बसविले! 'चिताक'च्या मलपृष्ठावर मी लिहिलेय — 'मूठभर सुशिक्षित पांढरपेशांच्या जगाबाहेर दलित, पददलित, कामगार, वारयोषिता, जोगते-जोगतीणी, मजूर आदींचे एक विशाल जग आहे हेच माझ्या लेखनाची प्रेरणा व शक्ती.

माझ्या गावात शेकडो तंबाखूवखारी (वेअरहौसेस) असून तंबाखूच्या धुस्काटात काम करणाऱ्या हजारो मजूर बायका (व पुरुषही) आहेत. तंबाखू पिकविणारे शेतकरी व मातीमोल किंमतीने त्यांचा तंबाखू खरेदी करून गब्बर झालेले दलाल, व्यापारी, बिचाएत (प्रोसेसींग केलेला तंबाखू खरेदीसाठी येणारे कलकत्ता, मद्रास, मुंबई, बंगलोर, मंगलोर, दिल्ली, नागपूर आदी दूरदूरच्या गावातील गिऱ्हाईक, ह्यांना 'बिचाएत' म्हणतात!) मालकवर्गाकडून होणारे त्यांचे लैंगिक व श्रमिक शोषण हे एक मराठी वाङ्मयाला वेगळे असे तंबाखू व्यवसायाचे जग माझ्या लेखणीद्वारे मराठीत प्रथमच आल्याने प्रा.स.शि.भावेंनी नभोवाणी समीक्षणात म्हटले, 'तंबाखूच्या वासाची कथा मराठी साहित्यात नांदायला आली आहे.' वखारीत काम करणाऱ्या एका मजूर बाईने आपली एक कोवळी पोर यल्लमाला जोगतीण म्हणून सोडलेली मी ६१ साली जेव्हा पाहिली तेव्हा 'जोगतीण' नावाची कथा 'तरुण भारत' ६१ बेळगाव)च्या दिवाळी अंकात लिहिली. त्यानंतरच्या 'वर आभाळ, खाली धरती' या कादंबरीतही ह्या विषयाला मी मराठीत प्रथम आणले, कोकणात देवाला सोडलेल्या भाविणी व साताऱ्याकडील बाजूस खंडोबाला सोडलेल्या मुरळी वा मुरळ्या ह्यांहून/ह्यांपेक्षा जोगतीणींचं आयुष्य कितीतरी वेगळं असून मोठमोठ्या शहरातील वारयोषितांच्या वस्त्यांतून अशा जोगतीणीच बहुसंख्येने सडत

असलेल्या दिसून येतात. सा. 'माणूस', दै. 'केसरी' रवि. पुरवणी, दै. 'पुढारी' रवि. पुरवणी, 'लोकप्रभा' आदी बऱ्याच ठिकाणी मी जोगते-जोगतीणींच्यावर समग्रलेखही त्यावेळी लिहिले. ह्या वेगळ्या जगाशिवाय मोटार ड्रायव्हर, क्लीनर, मोटार मालक हे एक वेगळेच जग त्यांच्या भोंवताली असणाऱ्या वारयोषिता, पोलीस लाईन, आर.टी.ओ. ह्या दुसऱ्या एका जगासह माझ्या साहित्यात मुसंडी मारून आले. इतर पांढरपेशा लेखकांपेक्षा मी जे वेगळं आयुष्य जगलो त्याचे तपशील उर्मी येईल तसे मी मांडत गेलो. आता मी थोडं दलितांवर लिहणार, आता थोडं ग्रामीण लोकांवर लिहू, असं कधी घडलं नाही. मी जे अनुभवत गेलो ते झाडाची सावली पडल्यागत अगदी सहजपणे माझ्या साहित्यात येत गेलं. त्यासाठी मला प्रयास करावे लागले नाहीत, की कण्हतकुंथत बसावे लागले नाही! माझ्या लिखाणामागे सखोल चिंतन व साहित्यिक कलाकृतीची कारागिरी नाही, डेप्थ नाही वगैरे दोष माझे मलाच दिसून येतात. पण ते दूर करण्याजोगे स्वास्थपूर्ण आयुष्य मला दुर्दैवाने लाभलेले नाही.

राबल्याशिवाय, काम केल्याशिवाय निर्वाह नाही, त्यातूनही उसंत मिळाल्यावर लिहीत गेलो. कच्चे-पक्के करीत बसायला देखील कधी फुरसत मिळाली नाही. जे लिहिले तसेच पाठविले व ते प्रसिद्धही होत राहिले. मी अनुभवलेल्या धगधगत्या जीवनानुभवाचे लचकेच तोडून मी वाचकांपुढे ठेवले. ह्यांमुळे व माझ्या अळंग अनघड भाषाशैलीनेही गुलजार वाचनाची सवय जडलेल्या वाचकांवर तेजाब पडल्यागत झाले. 'हे असे लिहायचे असते का?' काही म्हणू लागले. तंबाखू शेतकरी व मजुरांवर लिहीत होतो तेव्हा काहींनी धमक्याही दिल्या-हातपाय मोडण्याच्या. पण मी अजून हातीपायी शाबूत आहे. काहींनी अब्रुनुकसानीचे खटले दाखल करण्याचेही भय घालून पाहिले, पण मी ह्या साऱ्यांना पुरून उरलो. मजुरांवरील माझे लेखन वाचून अनेकांनी मला मराठीतील मॅक्झीम गॉर्की म्हटले! माझ्या पिठाच्या गिरणीत दळण घेऊन येणारी मेहतर लोकांची अख्खी वस्ती मी त्याच वस्तीनावाने कथेत आणली. मेहतर समाजावरचे हे मराठीतील पहिलेच लिखाण असावे. अलीकडे ह्या समाजातील मुले शिकली, समाजकार्यकर्तीही झाली, अशाच एकाचे ह्या लेखनाबद्दल मला कृतज्ञतापत्रही आले.

४८/४९ वर्षांचा हा दीर्घ कालावधी मी लेखन-वाचनात घालविला. जी.एं.च्या कथेतील नियती आठवून म्हणावेसे वाटते की, त्या नियतीनेच माझ्याकडून हे करवून घेतले. (पिठाच्या गिरणीत राबणाऱ्याच्या हातून ४० पुस्तके लिहिणे, हे अघटीतच!) मी निमित्तमात्र आहे. आजवर भले मी लाखो मिळविले नसतील, पण लाखों वाचकांचे प्रेम मिळविले, हेही नसे थोडके! 'महाराष्ट्र फाऊंडेशन'च्या ह्या पारितोषिकामुळे मला श्रमसाफल्याची धन्यता वाटते....

कॉलेज सुटल्यावर रानाशिवारात राबताना नडी, ओपाडी तयार करताना सारणी खोदताना टिकाव, खोरे, पहार आदीमुळे माझ्या तळहातांवर फोड उठले, फुटले (जणू माझ्या स्वप्नांचेच फुगे फुटले.) व माझे हात निब्बर होऊन हातांवर घट्टे पडले. डंगावर काम करताना अंगावर, डोळ्यांत चटणी उडून दाह झाला, त्या साऱ्याचे साफल्य झाले.

८९६४



1
2
3
POWER
4
5
6
CH+
7
8
9
CH−
MENU
0
MUTE
VOL+
HELP
VOL−
वा
सं
OK
दि
नी
JUMP
ESC
EPG
PPV
GAMES
i
INTERACTIVE
digital